***Smart ways for 100 % success at the HSC Board Exam***

**EXCLUSIVE STUDY MATERIAL FOR HSC STUDENTS**

# Subject : History

**Prepared by**


State Council of Educational Research and Training(SCERT – Pune)

***Social Science Department***

***SCERT, Maharashtra***

# पुनर्परीक्षार्थीसाठी साहित्य निर्मिती

## विषय - इतिहास (38) इयत्ता – बारावी






# अनुक्रमणिका



| अ. क्र. | पुनर्परीक्षार्थी साहित्य | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| 1] | नमुना प्रश्नपत्रिका व आदर्श उत्तरपत्रिका -1 | 2 ते 20 |
| 2] | नमुना प्रश्नपत्रिका व आदर्श उत्तरपत्रिका -2 | 21 ते 38 |
| 3] | नमुना प्रश्नपत्रिका व आदर्श उत्तरपत्रिका -3 | 39 ते 53 |
| 4] | नमुना प्रश्नपत्रिका व आदर्श उत्तरपत्रिका -4 | 54 ते 71 |
| 5] | प्रकरणानिहाय प्रश्नपेढी | 72 ते 139 |

# नमुना प्रश्नपत्रिका व आदर्श उत्तरतालिका

## नमुना प्रश्नपत्रिका – १

**एकूण गुण : 80**

**प्रश्न 1 (अ ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा. ...06**

(1) इ.स.१६०९ मध्ये ..............ने अधिक सुधारित दुर्बीण तयार केली.
(अ) जॉन के (ब) कोपर्निकस (क) गॅलिलिओ (ड) केपलर

(2) अमेरिकेच्या 'स्वातंत्र्याचा जाहिरनामा' ....................याने तयार केला.
(अ) जॉर्ज वॉशिंग्टन (ब) थॉमस जेफरसन (क) लॉर्ड ॲमहर्स्ट (ड) लॉर्ड कॉर्नवॉलिस

(3) छत्रपती शिवाजी महाराजांवर ग्रंथ लिहिणारा ..............................पहिला युरोपीय लेखक होता.
(अ) गोंसालू मार्तीस (ब) फ्राँस्वाँ मार्टिन (क) पेराँ (ड) कास्मो-द-ग्वार्द

(4) ऑस्ट्रियाने सर्बियाविरुद्ध युद्ध पुकारले तेव्हा ............. देश सर्बियाच्या मदतीला धावून गेला.
(अ) जर्मनी (ब) अमेरिका (क) हंगेरी (ड) रशिया

(5) सिएटो संघटनेचे मुख्यालय ............ येथे होते.
(अ) थायलंड (ब) फिलीपाईन्स (क) पाकिस्तान (ड) ग्रेट ब्रिटन

(6) इ.स.२००२ मध्ये ......................... या शहरात मेट्रो सेवा सुरू झाली .
(अ) पुणे (ब) दिल्ली (क) मुंबई (ड) बंगळुरु

**(ब) पुढील प्रत्येक संचातील ब गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा. ...04**

(1)

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (अ) | अर्सबिश्पु | -- | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| (ब) | शान्सेलर | -- | न्यायाधीश |
| (क) | वेदोर द फझेंद | -- | मालमत्तेवरील अधिकारी |
| (ड) | कपितांव | --- | कॅप्टन |

(2)

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (अ) | पंडित जवाहरलाल नेहरू | -- | गोवा काँग्रेस कमिटीचे प्रमुख |
| (ब) | पुरूषोत्तम काकोडकर | -- | मडगाव येथील सत्याग्रह नेतृत्व |
| (क) | केशवराव जेधे | -- | गोवा विमोचन सहायक समिती नेतृत्व |
| (ड) | विमल सरदेसाई | -- | आझाद गोमंतक दल नेतृत्व |

-

(3) ‘अ’ गट — ‘ब’ गट

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | इजिप्त | -- | गमाल अब्दुल नासेर |
| (ब) | घाना | -- | क्वामे नखुमा |
| (क) | युगोस्लाव्हिया | -- | मार्शल टिटो |
| (ड) | इंडोनेशिया | --- | झिया-उर-रहमान |

(4) ‘अ’ गट — ‘ब’ गट

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | हमीद दलवाई | -- | मुस्लीम स्त्रियांच्या हक्कांसंबंधी कार्य |
| (ब) | राहीबाई पोपेरे | -- | बीजमाता (सीडमदर) या टोपण नावाने ओळखल्या जातात |
| (क) | खाशाबा जाधव | -- | हॉकी खेळात ऑलिंपिकमध्ये भारताचा झेंडा उंचावला. |
| (ड) | सचिन तेंडुलकर | -- | क्रिकेटमध्ये १०० शतकांची कामगिरी |

**प्रश्न 2 (अ ) ऐतिहासिक व्यक्ती, ठिकाण, घटना यासंबंधीची नावे लिहा . ...04**

(1) डचांची पहिली वसाहत --
(2) भारत सरकारने निजामाविरुद्ध केलेली पोलीस कारवाई ---
(3) इ.स.१९३५ मध्ये भारतापासून वेगळा झालेला देश --
(4) २००४ मध्ये ही कंपनी सॉफ्टवेअर सेवा पुरवणारी आशियातील सर्वात मोठी कंपनी ठरली ---

**(ब) दिलेल्या कारणांपैकी योग्य कारण निवडून विधाने पूर्ण करा. ...04**

(1) छपाईचा शोध जगाला प्रबोधनकाळात मिळालेली सर्वोच्च देणगी होय, कारण –
(अ) यामुळे विविध प्रकारची माहिती आणि ज्ञान सर्वसामान्य माणसांपर्यंत पोचणे शक्य झाले.
(ब) यामुळे युरोपात सतराव्या शतकात निसर्गाचा अभ्यास करणाऱ्या शास्त्रज्ञांनी आधुनिक वैज्ञानिक ज्ञानाचा पाया रचला.
(क) यामुळे आधुनिक युगाच्या प्रारंभी निसर्गवैज्ञानिक होऊन गेले.
(ड) यामुळे होकायंत्र, दुर्बिण, सूक्ष्मदर्शक यंत्र, तपमापक यंत्र तसेच भारमापक यंत्र यांचा शोध लागला.

(2) म्यानमारवर कब्जा मिळवणे हे ब्रिटिशांचे उद्‌दिष्ट होते, कारण –
(अ) ब्रिटिशांना साम्राज्यविस्तार करायचा होता.
(ब) म्यानमारमधील नैसर्गिक साधनसंपत्ती आणि हक्काची बाजारपेठ यावर ताबा मिळवणे ब्रिटिशांच्या दृष्टीने महत्त्वाचे होते.
(क) ब्रिटिशांना युरोपीय वसाहतवादी स्पर्धेत पुढे राहायचे होते.
(ड) म्यानमारचा राजा थिबा याला त्यांना धडा शिकवायचा होता.


(3) छत्रपती शाहू महाराज यांच्या नंतरच्या काळात इंग्रजांना मराठ्यांच्या राज्यकारभारात प्रवेश मिळाला, कारण –
(अ) दुसरा बाजीराव पेशवा आणि होळकरांमध्ये वितुष्ट आलेले होते.
(ब) नागपूरकर भोसले, निजाम आणि हैदर यांचा इंग्रजांविरुद्ध चतु:संघ उभा केला होता.
(क) नानासाहेब पेशवे यांनी इंग्रजांची मदत घेतल्यामुळे
(ड) इंग्रजी शिक्क्याची नाणी मराठ्यांच्या राज्यात चालणार नाहीत, अशी भूमिका घेतली गेली.

(4) १५ ऑगस्ट १९४५ रोजी जपानने दुसऱ्या महायुद्धात शरणागती पत्करली, कारण ---
(अ) जपानकडे लष्करी ताकद कमी होती.
(ब) अमेरिकेने हिरोशिमा व नागासाकी या शहरांवर अणुबॉम्ब टाकला.

(क) जर्मनीने जपानला मदत करण्याचे थांबविले .

(ड) अमेरिकेने जपानच्या ताब्यातून फिलिपाईन्स परत घेतले.

**प्रश्न 3 (अ ) पुढील नकाशाचे निरीक्षण करून प्रश्नांची उत्तरे लिहा. ...05**



(1) ब्रिटिशांनी उभारलेली 'जेम्सटाऊन' ही वसाहत प्रस्तुत नकाशात कोणत्या नावाने दर्शवली आहे ?
(2) प्रस्तुत नकाशातील कोणत्या वसाहतीने इंग्लंडला प्रथम विरोध केला होता ? कोणतेही एक नाव लिहा ?
(3) या नकाशाच्या मदतीने कोणती माहिती मिळते ?
(4) अमेरिकेच्या पूर्वेला कोणता महासागर आहे ?
(5) प्रस्तुत नकाशातील कोणत्या ठिकाणी इ . स. १९७४ मध्ये अमेरिकन वसाहतींचे अधिवेशन भरले ?

**(ब ) दिलेली संकल्पनाचित्रे पूर्ण करा. (कोणतीही चार)** **...08**

(1)

| ३१ डिसेंबर १६०० | ------------------------- | इ.स.१६६४ | --------------------- |
|---|---|---|---|
| --------------------- | युनायटेड ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना | --------------------- | फ्रेंचांची सुरत येथे पहिली वखार स्थापन |

(2)


| ----------------------------- | | ----------------------------- |
|---|---|---|
| | १८५७ च्या उठावातील नेते | |
| ----------------------------- | | ----------------------------- |

(3)


डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरू केलेली वृत्तपत्रे

..................
..................
..................
..................


(4)




(5)




(6)




**प्रश्न 4 (अ ) संक्षिप्त टिपा लिहा. (कोणत्याही तीन)** **...06**

(1) युरोपातील धर्मयुद्धे
(2) प्रार्थना समाज
(3) आफ्रिकी ऐक्य कल्पना
(4) निर्वसाहतीकरण
(5) भारत सरकारचे युवक धोरण

**(ब ) पुढील विधाने सकारण स्पष्ट करा. (कोणतीही तीन)** **...09**

(1) अल्बेरूनीचे योगदान महत्त्वपूर्ण आहे
(2) भारतीय सत्ताधीशांना कार्ताझ घेणे गरजेचे होते.
(3) इंग्लंडने भारतातून काढता पाय घेण्याचा निर्णय घेतला
(4) सेंटो करार विसर्जित करण्यात आला
(5) १९९३ मध्ये मानव अधिकार संरक्षण कायदा करण्यात आला

**प्रश्न 5 खालील विधानांवर तुमचे मत नोंदवा. (कोणतेही तीन) ...09**

(1) अमेरिकेतील वसाहतींमुळे स्पेनची भरभराट झाली
(2) मराठी सत्तेचे धोरण वसाहतवादविरोधी होते.
(3) इंग्रज काळात ब्रह्मदेशाचा राजा थिबा याचे वास्तव्य रत्नागिरीत होते
(4) पहिल्या महायुद्धानंतर काही वसाहतींना अंतर्गत स्वायत्तता देण्याची प्रक्रिया सुरू झाली.
(5) भारतात माहितीचा अधिकार कायदा लागू झाला

**प्रश्न 6. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) ...10**

(1) प्रबोधनकाळातील विज्ञानाचा विकास व वैज्ञानिक शोध यांची सविस्तर माहिती लिहा.
(2) रामकृष्ण मिशनने केलेले कार्य लिहा.
(3) भारतात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने कोणत्या योजना राबवल्या गेल्या

**प्रश्न 7. खालील प्रश्नांची दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे सविस्तर उत्तरे लिहा. (कोणतेही तीन) ...15**

(1) मराठी सत्तेचे वसाहतवादविरोधी धोरण स्पष्ट करा
मुद्दे : (अ) डच-मराठे
(ब) फ्रेंच-मराठे
(क) सिद्दी-मराठे

(2) महात्मा गांधीजींच्या 'चले जाव' आंदोलनाची माहिती लिहा
मुद्दे : (अ) महात्मा गांधीजींचे जनतेला आवाहन :
(ब) चले जाव चळवळीचे परिणाम :
(क) मुंबई अधिवेशन

(3) काश्मीर संस्थानाच्या विलीनीकरणाची माहिती लिहा
मुद्दे : (अ) पाकिस्तानी सीमेवरील सशस्त्र टोळ्यांचे आक्रमण
(ब) सामीलनामा
(क) विलीनीकरण

(4) महायुद्धांचे परिणाम स्पष्ट करा
मुद्दे : (अ) जीवित व वित्तहानी
(ब) भारतीय राष्ट्रीय सभेची भूमिका
(क) इंग्लंडवर झालेले परिणाम

(5) शीतयुद्धाविषयी माहिती लिहा :
मुद्दे : (अ) शीतयुद्ध व्याख्या
(ब) शीतयुद्धाची पार्श्वभूमी
(क) शीतयुद्धाची वाटचाल

◈◆◈◆◈◆◈◆◈◆◈

# आदर्श उत्तरपत्रिका प्रश्नपत्रिका – 1

**प्रश्न 1 (अ) : दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा. ...06**

(1) इ.स.१६०९ मध्ये **गॅलिलिओ** ने अधिक सुधारित दुर्बीण तयार केली.
(2) अमेरिकेच्या 'स्वातंत्र्याचा जाहिरनामा' **थॉमस जेफरसन** याने तयार केला.
(3) छत्रपती शिवाजी महाराजांवर ग्रंथ लिहिणारा **कास्मो-द-ग्वार्द** पहिला युरोपीय लेखक होता.
(4) ऑस्ट्रियाने सर्बियाविरुद्ध युद्ध पुकारले तेव्हा **रशिया** देश सर्बियाच्या मदतीला धावून गेला.
(5) सिएटो संघटनेचे मुख्यालय **थायलंड** येथे होते.
(6) इ.स.२००२ मध्ये **दिल्ली** या शहरात मेट्रो सेवा सुरू झाली .

**प्रश्न 1 (ब) : पुढील प्रत्येक संचातील ब गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा ...04**

1) चुकीची जोडी : अर्सबिश्पु -- मुख्य कार्यकारी अधिकारी
☛ दुरुस्त केलेली जोडी : **अर्सबिश्पु – मुख्य धर्मगुरू**

2) चुकीची जोडी : पंडित जवाहरलाल नेहरू -- गोवा कॉंग्रेस कमिटीचे प्रमुख
☛ दुरुस्त केलेली जोडी : पंडित जवाहरलाल नेहरू -- गोव्यासाठी 'ऑपरेशन विजय' या लष्करी कारवाईचा निर्णय

3) चुकीची जोडी : इंडोनेशिया -- झिया-उर-रहमान
☛ दुरुस्त केलेली जोडी : **इंडोनेशिया -- डॉ.सुकार्नो**

4) चुकीची जोडी : खाशाबा जाधव -- हॉकी खेळात ऑलिंपिकमध्ये भारताचा झेंडा उंचावला.
☛ दुरुस्त केलेली जोडी : **खाशाबा जाधव – कुस्ती खेळात ऑलिंपिकमध्ये भारताचा झेंडा उंचावला.**

**प्रश्न 2 (अ) : ऐतिहासिक व्यक्ती, ठिकाण, घटना यासंबंधीची नावे लिहा ...04**

1) मच्छलीपट्टण
2) ऑपरेशन पोलो
3) म्यानमार (ब्रह्मदेश)
4) टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस

**प्रश्न 2 (ब) : दिलेल्या कारणांपैकी योग्य कारण निवडून विधाने पूर्ण करा ...04**

(1) छपाईचा शोध जगाला प्रबोधनकाळात मिळालेली सर्वोच्च देणगी होय, कारण – **यामुळे विविध प्रकारची माहिती आणि ज्ञान सर्वसामान्य माणसांपर्यंत पोचणे शक्य झाले**.
(2) म्यानमारवर कब्जा मिळवणे हे ब्रिटिशांचे उद्दिष्ट होते, कारण – **म्यानमारमधील नैसर्गिक साधनसंपत्ती आणि हक्काची बाजारपेठ यावर ताबा मिळवणे ब्रिटिशांच्या दृष्टीने महत्त्वाचे होते.**
(3) छत्रपती शाहू महाराज यांच्या नंतरच्या काळात इंग्रजांना मराठ्यांच्या राज्यकारभारात प्रवेश मिळाला, कारण – **नानासाहेब पेशवे यांनी इंग्रजांची मदत घेतल्यामुळे**
(4) १५ ऑगस्ट १९४५ रोजी जपानने दुसऱ्या महायुद्धात शरणागती पत्करली, कारण --- **अमेरिकेने हिरोशिमा व नागासाकी या शहरांवर अणुबॉम्ब टाकला.**

**प्रश्न 3 (अ) : पुढील नकाशाचे निरीक्षण करून प्रश्नांची उत्तरे लिहा ...05**

1) व्हर्जिनिया
2) व्हर्जिनिया / मॅसॅच्युसेटस्
3) अमेरिकेतील 13 वसाहती
4) अटलांटिक महासागर

5) फिलाडेल्फिया

**प्रश्न 3 (ब) : दिलेली संकल्पनाचित्रे पूर्ण करा (कोणतीही चार)** **...08**

**उत्तर:** 1

| ३१ डिसेंबर १६०० | **इ.स.१६०२** | इ.स.१६६४ | **इ.स.१६६८** |
| --- | --- | --- | --- |
| **ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना** | युनायटेड ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना | **फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना** | फ्रेंचांची सुरत येथे पहिली वखार स्थापन |

**उत्तर: 2**

१८५७ च्या उठावातील नेते

- **कुवरसिंह**
- **नानासाहेब पेशवे**
- **राणी लक्ष्मीबाई**
- **बख्तखान**

**उत्तर:** 3

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरू केलेली वृत्तपत्रे

- **मूकनायक**
- **बहिष्कृत भारत**
- **जनता**
- **समता**

**उत्तर:** 4

फ्रेंचांच्या प्रभुत्वाखालील स्वतंत्र झालेले देश

- **इंडोचायना**
- **मोरोक्को**
- **ट्युनिशिया**
- **अल्जेरिया**

**उत्तर:** 5




**उत्तर:** 6




**प्रश्न ४ (अ ) : संक्षिप्त टिपा लिहा (कोणत्याही तीन)** **...०6**

(1) युरोपातील धर्मयुद्धे :

**उत्तर:** 1.जेरुसलेम आणि बेथेलहॅम ही शहरे ज्यू, ख्रिश्चन आणि इस्लाम या धर्मांच्या अनुयायांसाठी अत्यंत पवित्र आहेत. अकराव्या शतकात ही शहरे इस्लामी सत्ताधीशांच्या ताब्यात होती. ही शहरे परत मिळवण्यासाठी ख्रिश्चन धर्माच्या अनुयायांनी वेळोवेळी केलेल्या लढायांना धर्मयुद्धे (क्रुसेडस) म्हणतात.

2. इ.स.१०९६ मध्ये पहिले धर्मयुद्ध झाले. दुसऱ्या धर्मयुद्धाच्या दरम्यान पोप युजिनिअस (तिसरा) याने फ्रेंच राजा सातवा लुई आणि जर्मन सत्ताधीश तिसरा कॉनरॅड यांना मदतीस घेतले. तुर्कांनी त्यांचा पराभव केला.

3.इजिप्तचा प्रमुख सलादिन याने इ.स.११८७ मध्ये जेरुसलेम जिंकून घेतले. एकूण नऊ धर्मयुद्धे झाली.

4.युरोपीय धर्मयुद्धामध्ये ख्रिस्ती धर्मयोद्ध्यांना अपयश आले, कारण पोप आणि युरोपातील सत्ताधीश यांनी या युद्धांकडे संकुचित हेतूंनी पाहिले.

(2) प्रार्थना समाज :

**उत्तर:** 1.दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनी स्थापन केलेल्या परमहंस सभेतूनच पुढे 'प्रार्थना समाजा'ची स्थापना झाली.

2.डॉ.आत्माराम पांडुरंग, न्यायमूर्ती म.गो.रानडे, डॉ.रा. गो.भांडारकर या प्रार्थना समाजाच्या संस्थापक सदस्यांनी मूर्तिपूजेला विरोध करून एकेश्वरवादास प्राधान्य दिले.

3. कर्मकांडाला विरोध करून प्रार्थनेवर भर दिला. अनाथालये, स्त्री शिक्षणसंस्था, कामगारांसाठी रात्रशाळा सुरू केल्या.
4.स्त्री-पुरुष समानतेची चळवळ, जातिभेद नाकारणे आणि ऐहिक जीवनाला महत्त्व देणे या गोष्टींना प्राधान्य दिले.

(3) आफ्रिकी ऐक्य कल्पना :
**उत्तर:** 1. आफ्रिकी ऐक्याचा विचार प्रथम एच.एस. विल्यम्स याने मांडला. त्याने लंडनमध्ये १९०० मध्ये पहिली अखिल आफ्रिका ऐक्य परिषद भरवली.
2.या परिषदेस हजर असणाऱ्या डब्ल्यू.इ. बी.द्यूब्वा या कृष्णवर्णीय नेत्याने या कल्पनेस पहिल्या महायुद्धानंतर चालना दिली.
3. १९१९ मध्ये पॅरिस येथे त्याने 'अखिल आफ्रिका ऐक्य परिषद' भरवली. त्याच्या पुढाकाराने पुढे आणखी काही परिषदा झाल्या.
4.यातूनच आफ्रिका खंडात आफ्रिकी ऐक्याची कल्पना लोकांच्या मनात रूजू लागली. या संदर्भात १९४५ मध्ये मँचेस्टर येथे परिषद भरली होती. या परिषदेत आफ्रिकी नेत्यांनी सक्रीय सहभाग घेतला.

(4) निर्वसाहतीकरण :
**उत्तर:** 1. वसाहतवाद्यांचे वसाहतींवरील वर्चस्व संपुष्टात येणे आणि त्यांनी वसाहतींमधील स्थानिक लोकांच्या हाती सत्ता सुपूर्द करणे म्हणजे 'निर्वसाहतीकरण' होय.
2.विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात निर्वसाहतीकरण प्रक्रियेने वेग घेतला.
3. युरोपीय राष्ट्रांचे आपआपसांतील संघर्ष, पहिले व दुसरे महायुद्ध आणि वसाहतींमधील वसाहतवादविरोधी चळवळी यांमुळे निर्वसाहतीकरणाला चालना मिळाली.
4.वसाहतवादाच्या माध्यमातून वसाहतींच्या शोषणाचे समर्थन करणे वैचारिकदृष्ट्या युरोपला शक्य नव्हते. इंग्लंडला अमेरिकेची मदत घेण्यावाचून पर्याय नव्हता. महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय स्वातंत्र्याची चळवळ कळसाला पोहोचली होती. यामुळे इंग्लंडला वास्तवाची जाणीव झाली. यातूनच पुढे पहिल्या महायुद्धानंतर काही वसाहतींना अंतर्गत स्वायत्तता देण्याची प्रक्रिया सुरू झाली.

(5) भारत सरकारचे युवक धोरण :
**उत्तर:** 1.वय १५ ते २९ असणाऱ्यांना युवकांना शिक्षणाच्या संधी, कौशल्य उपलब्ध करून देणे म्हणजे भारत सरकारचे युवक धोरण होय.
2. भारत हा सर्वाधिक युवा लोकसंख्या असणारा देश आहे. वय १५ ते २९ असणाऱ्यांना युवक संबोधले जाते.
3. १९७२ मध्ये स्थापन झालेल्या 'नेहरू युवा केंद्र संघटन' या संस्थेच्या माध्यमातून युवकांना प्रशिक्षण देणे सुरू झाले. या केंद्राच्या अखत्यारीतून जेवढे कार्यक्रम चालू होते ते 'राष्ट्रीय युवा सशक्तीकरण कार्यक्रम' यात विलीन करण्यात आले.
4.या कार्यक्रमाच्या अंतर्गत साक्षरता, शिक्षण, आरोग्य आणि स्वच्छता, कुटुंबकल्याण, पर्यावरण संरक्षण, सामाजिक प्रश्नांसदर्भात जागृती, ग्रामीण विकास, कौशल्य विकास, स्वयंरोजगार इत्यादी विषयांवर भर देण्यात आला.

**प्रश्न 4 (ब ) : पुढील विधाने सकारण स्पष्ट करा. (कोणतीही तीन) ...09**
**(1) अल्बेरूनीचे योगदान महत्त्वपूर्ण आहे**
**उत्तर: अल्बेरूनीचे योगदान महत्त्वपूर्ण आहे, कारण--**
1. अल्बेरूनी गझनीच्या सुलतान महमूदबरोबर भारतात आला होता. त्याने पृथ्वीचा व्यास मोजण्याचा प्रयत्न केला होता.
2.अक्षांश-रेखांश ठरवण्याची अल्बेरूनीची पद्धत बिनचूक होती.
3.त्याकाळाच्या संदर्भात विचार करता हे काम अत्यंत कठीण होते.
4. अल्बेरूनीने पृथ्वीचा गोल नकाशा तयार केला.

**(2) भारतीय सत्ताधीशांना कार्ताझ घेणे गरजेचे होते.**
**उत्तर: भारतीय सत्ताधीशांना कार्ताझ घेणे गरजेचे होते, कारण--**

1. पोर्तुगिजांनी अरब आरमाराचा पराभव करून भारताच्या समुद्रकिनाऱ्यांवर आपले वर्चस्व निर्माण करण्यास सुरुवात केली .
2.त्यांचे आरमार प्रबळ होते. किनाऱ्यावर आरमारी छापा घालून शत्रूचा मुलुख ते उद्ध्वस्त करत असत.
3.या आरमाराचा सामना करणे स्थानिक भारतीय सत्तांना शक्य झाले नाही.
4. पुढे हिंदी महासागरावर पोर्तुगिजांनी वर्चस्व स्थापल्यावर भारतीय राजांना हिंदी महासागरात जहाजे पाठवायची असतील तर पोर्तुगिजांचे परवाने (कार्ताझ) घेणे आवश्यक झाले.

**(3) इंग्लंडने भारतातून काढता पाय घेण्याचा निर्णय घेतला**
**उत्तर: इंग्लंडने भारतातून काढता पाय घेण्याचा निर्णय घेतला, कारण —**
1. १९४५ सालच्या ऑगस्ट महिन्यात दुसरे महायुद्ध थांबले.
2.त्यात इंग्लंडला विजय मिळाला खरा, परंतु युद्धामुळे इंग्लंडची आर्थिक हानी व मनुष्य हानी फार मोठ्या प्रमाणावर झाली.
3.त्यामुळे इंग्लंडची शक्ती कमी झाली. तशातच भारतीय जनता आणि भारतीय सैनिक यांच्यावरील ब्रिटिश सत्तेचा दरारा नाहीसा झाल्याची जाणीव ब्रिटिश राज्यकर्त्यांना झाल्यामुळे भारतातून काढता पाय घेण्याचा निर्णय इंग्लंडने घेतला.

**(4) सेंटो करार विसर्जित करण्यात आला**
**उत्तर: सेंटो करार विसर्जित करण्यात आला, कारण--**
1. सेंटो करारान्वये कोणत्याही राष्ट्राला सुरक्षा उपलब्ध करून देण्याची चारही राष्ट्रांपैकी एकाचीही कुवत नव्हती.
2.ग्रेट ब्रिटन वगळता अन्य तीन राष्ट्रांच्या आर्थिक व तांत्रिक विकासाकडे लक्ष देण्यास अमेरिकेलाही वेळ नव्हता.
3.त्यामुळे चारही राष्ट्रांमध्ये अंतर्गत असमाधान होते.
4. सेंटो करारान्वये एकमेकांचे हितसंबंध गुंतवून घेण्यापेक्षा आपले आपण स्वतंत्र धोरण राबवावे या मतावर राष्ट्रे आली. पुढे इराण आणि पाकिस्तान या करारातून बाहेर पडले आणि सेंटो करार विसर्जित करण्यात आला.

**(5) १९९३ मध्ये मानव अधिकार संरक्षण कायदा करण्यात आला**
**उत्तर: १९९३ मध्ये मानव अधिकार संरक्षण कायदा करण्यात आला , कारण--**
1. बदलत्या भारताचे प्रतिबिंब सामाजिक क्षेत्रातही उमटल्याचे दिसते. विविध कायद्यांच्या आधारे सामाजिक विषमता दूर करून आर्थिक विकास समाजातील सर्व स्तरापर्यंत पोचवण्याचा सरकारचा प्रयत्न सुरू आहे.
2.या दृष्टीने १९९३ चा 'मानव अधिकार संरक्षण कायदा' महत्त्वाचा आहे. या कायद्यान्वये 'राष्ट्रीय मानवाधिकार आयोगा'ची (नॅशनल ह्यूमन राईट्स कमिशन) स्थापना करण्यात आली.
3.जगण्याचे स्वातंत्र्य, समानता इत्यादी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आणि हे हक्क नाकारले जाणार नाहीत याची दक्षता घेण्यासाठी हा आयोग स्थापन झाला.
4.या कायद्यानुसार वृत्तपत्रात किंवा प्रसिद्धी माध्यमांमध्ये अन्यायासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या बातमीची दखल आयोग घेऊ शकतो. अत्याचारग्रस्त व्यक्तीच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते किंवा सामाजिक संस्था तक्रार दाखल करू शकतात.

**प्रश्न 5 : खालील विधानांवर तुमचे मत नोंदवा. (कोणतेही तीन) ...09**
**(1) अमेरिकेतील वसाहतींमुळे स्पेनची भरभराट झाली**
**उत्तर: माझ्या मते,**
1.युरोपीय राष्ट्रांमध्ये वसाहती स्थापन करण्याची स्पर्धा सुरू झाल्यावर पोर्तुगाल आणि स्पेन या देशांनी त्यात पुढाकार घेतला.
2.स्पेनने अमेरिका खंडातील मेक्सिको ताब्यात घेतले. तेथे त्यांना सोन्याचे साठे सापडले. अमेरिकेच्या भूमीवर ऊस आणि तंबाखू पिकवण्यासाठी स्पॅनिश लोकांनी आफ्रिकेतून गुलाम आणले.

3.पेरू, मेक्सिको आणि व्हेनेझुएला येथे सोन्या-चांदीचे साठे सापडताच स्पेनने शेतीपेक्षा सोने मिळवण्यावर लक्ष केंद्रित केले.
4. त्यांनी दक्षिण अमेरिकेमध्ये संपूर्ण किनारपट्टीवर प्रभुत्व स्थापन केले. दक्षिण किनाऱ्यावरील फ्लोरिडा ते कॅलिफोर्नियाचा प्रदेश स्पॅनिश लोकांनी ताब्यात घेतला.
**........ म्हणून अमेरिकेतील वसाहतींमुळे स्पेनची भरभराट झाली.**

**(2) मराठी सत्तेचे धोरण वसाहतवादविरोधी होते.**
**उत्तर: माझ्या मते,**
1. . छत्रपती शिवाजी महाराजांनी या परकियांचे छुपे हेतू आणि त्यांची घुसखोरी ओळखून त्याचा प्रतिकार केला.
2.परकीय वसाहतवादाच्या विरोधात नौदल उभारणे, जलदुर्ग बांधणे इत्यादी उपाय त्यांनी केले.
3.इंग्रजांचा मिठाचा व्यापार मोडून काढण्यासाठी त्यांनी त्यावर जकात बसवली. अशा तऱ्हेने परकीय वसाहतवाद्यांना छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रखर विरोध केला.
4.छत्रपती संभाजी महाराजांनीही पोर्तुगिजांविरुद्ध तीव्र संघर्ष केला. पुढे थोरल्या बाजीराव पेशव्यांचे बंधू चिमाजीअप्पा यांनी वसई येथे पोर्तुगिजांचा पराभव केला.
5. परकीय सत्तेचा अशा रीतीने पराभव करणारी एकमेव भारतीय सत्ता म्हणजे मराठ्यांची सत्ता होय.
**.... म्हणून मराठी सत्तेचे धोरण वसाहतवादविरोधी होते.**

**(3) इंग्रज काळात ब्रह्मदेशाचा राजा थिबा  याचे वास्तव्य रत्नागिरीस होते.**
**उत्तर: माझ्या मते,**
1. इंग्रजांनी म्यानमार ताब्यात घेतल्यानंतर तेथील राजा 'थिबा' याला कैद केले.
2.त्याने भविष्यात पुन्हा उठाव करू नये आणि त्याचा प्रजेशी काही संबंध राहू नये म्हणून ब्रिटिशांनी त्याला भारतात, महाराष्ट्रातील रत्नागिरीच्या परिसरात आणले.
3.राजाला नजरकैदेत ठेवण्यासाठी तीन मजली प्रशस्त राजवाडा उभारण्यात आला. राजवाड्याच्या तळमजल्यावर संगमरवरी फरशीचे सभागृह आहे.
4.छताला सुंदर नक्षीकाम केलेल्या लाकडी पट्ट्या लावलेल्या आहेत. अर्धवर्तुळाकार खिडक्यांना रंगीबेरंगी इटालियन काचा लावलेल्या आहेत.
5.या राजवाड्याच्या परिसरात थिबा राजाने म्यानमारमधून आणलेली भगवान गौतम बुद्धांची मूर्ती आहे.
**........ म्हणून इंग्रज काळात ब्रह्मदेशाचा राजा थिबा  याचे वास्तव्य रत्नागिरीस होते**

**(4) पहिल्या महायुद्धानंतर काही वसाहतींना अंतर्गत स्वायत्तता देण्याची प्रक्रिया सुरू झाली.**
**उत्तर: माझ्या मते,**
1. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात निर्वसाहतीकरण प्रक्रियेने वेग घेतला. युरोपीय राष्ट्रांचे आपआपसांतील संघर्ष, पहिले व दुसरे महायुद्ध आणि वसाहतींमधील वसाहतवादविरोधी चळवळी यांमुळे निर्वसाहतीकरणाला चालना मिळाली.
2.वसाहतवादाच्या माध्यमातून वसाहतींच्या शोषणाचे समर्थन करणे वैचारिकदृष्ट्या युरोपला शक्य नव्हते.
3.इंग्लंडला अमेरिकेची मदत घेण्यावाचून पर्याय नव्हता.
4.महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय स्वातंत्र्याची चळवळ कळसाला पोहोचली होती. यामुळे इंग्लंडला वास्तवाची जाणीव झाली
**........ म्हणून यातूनच पुढे पहिल्या महायुद्धानंतर काही वसाहतींना अंतर्गत स्वायत्तता देण्याची प्रक्रिया सुरू झाली.**

**(5) भारत अवकाश संशोधन क्षेत्रातील अग्रणी देश आहे.**
**उत्तर: माझ्या मते,**
1. २००७ मध्ये भारताने अवकाश संशोधनातील एका नव्या क्षेत्रात पदार्पण केले. इटलीचा उपग्रह भारताने व्यापारी तत्त्वावर अंतराळात सोडला.

2. हे काम मिळवण्यासाठी अन्य राष्ट्रांनी चढ्या दराने किंमत आकारली होती. भारताने वाजवी किंमत आकारून हे काम केले. तरीही भारताला या व्यवहारातून नफा मिळाला.

3.व्यापारी तत्त्वावर काम करण्यापूर्वी भारताने अर्जेंटिना, बेल्जियम, दक्षिण कोरिया, इंडोनेशिया आणि जर्मनी या देशांचे उपग्रह अंतराळात सोडलेहोते.

4.२००८ मध्ये भारताने प्रक्षेपित केलेल्या 'चांद्रयान-१' या उपग्रहाद्वारे चंद्रावर पाण्याचे पुरावे सापडले. त्यानंतर 'मंगळयान' आणि 'चांद्रयान-२' हे उपग्रह सोडले.

5. नुकतेच याच वर्षी २०२३ मध्ये भारत देशाने चांद्रयान -३ ही यशस्वी मोहीम राबवली आहे

**........ म्हणून भारत अवकाश संशोधन क्षेत्रातील अग्रणी देश आहे.**

**प्रश्न 6. : पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही दोन) ...10**

(१) प्रबोधनकाळातील विज्ञानाचा विकास व वैज्ञानिक शोध यांची सविस्तर माहिती लिहा.

उत्तर: ◈ प्रस्तावना : प्रत्यक्ष अनुभवाच्या निकषावर आधारलेल्या वैज्ञानिक पद्धतीद्वारे माणूस सत्याचे आकलन करून घेऊ लागला. हाच आधुनिक विज्ञानयुगाचा पाया होय. प्रबोधनकाळातील विज्ञानाचा विकास व वैज्ञानिक शोध यांची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे --

## ◈मुख्य उत्तर :

**☞ प्रबोधनकाळातील विज्ञानाचा विकास :**

1. युरोपात सतराव्या शतकात निसर्गाचा अभ्यास करणाऱ्या शास्त्रज्ञांनी आधुनिक वैज्ञानिक ज्ञानाचा पाया रचला असे मानले जाते.

2.या काळातील शास्त्रज्ञांचा पुढील गोष्टींवर भर होता; प्रत्यक्ष प्रयोगाद्वारे वैज्ञानिक सिद्धान्तांना स्थलकालातीत महत्त्व आहे हे सिद्ध करणे, नव्याने शोधून काढलेले नियम सूत्रबद्ध करणे, नवी वैज्ञानिक परिभाषा तयार करणे. या प्रयत्नांतून *आधुनिक विज्ञान प्रगत होत गेले.

3.विज्ञानातील संशोधनासाठी युरोपात काही संस्थाही स्थापन करण्यात आल्या होत्या. त्यांमध्ये रोममधील 'ॲकेडमी ऑफ द लिंक्स आइड (लिंक्सिएन ॲकॅडमी)', फ्लॉरेन्समधील 'ॲकेडमी फॉर एक्सपिरिमेंट', लंडनमधील 'रॉयल सोसायटी फॉर इम्प्रुव्हिंग नॅचरल नॉलेज', फ्रान्समधील 'फ्रेंच ॲकेडमी ऑफ सायन्सेस' इत्यादी संस्था महत्त्वाच्या होत्या.


**☞ प्रबोधनकाळातील वैज्ञानिक शोध**

1. होकायंत्र, दुर्बिण, सूक्ष्मदर्शक यंत्र, तपमापक यंत्र तसेच भारमापक यंत्र यांचा शोध या काळात लागला.

2. सूक्ष्मदर्शक यंत्रामुळे सूक्ष्मजंतूंचा अभ्यास करणे सोपे झाले.

3.रॉबर्ट बॉईल याने वायूचे घनफळ त्यावरील दाबाच्या व्यस्त प्रमाणात बदलते हे शोधून काढले.

4.हायड्रोजन, नायट्रोजन, ऑक्सिजन या वायूंसंदर्भात संशोधन सुरू झाले. भौतिकशास्त्रात उष्णता, ध्वनी यांच्या अभ्यासाला प्राधान्य मिळाले. प्राणीशास्त्रामध्ये प्राण्यांची वर्गवारी केली गेली.



5. इ.स.१७३८ मध्ये जॉन के याने ‘धावता धोटा’ तयार केला. या धोट्यामुळे वस्त्र विणण्याच्या कामाची गती वाढली. त्याच्या पुढचा टप्पा ‘स्पिनिंग जेनी’ या यंत्राने गाठला. इंग्लंडमधील जेम्स हरग्रीव्हज याने ‘स्पिनिंग जेनी’ नावाचे यंत्र तयार केले.
6. इ.स.१७६९ मध्ये रिचर्ड आर्कराईट याने सूत कातण्यासाठी सुधारित यंत्र बनवले. या यंत्राद्वारे अधिक पीळदार व मजबूत धागे वेगाने तयार होऊ लागले.
7. जेम्स वॅटने बाष्पशक्तीवर चालणारे ‘स्टीम इंजिन’ तयार केले. हे इंजिन सुरुवातीला खाणीतून कोळसा व कच्चे लोखंड बाहेर आणण्यासाठी वापरले जात असे. पुढे ते वस्त्रोद्योगातही वापरले जाऊ लागले.

◈ उपसंहार :
अशा प्रकारे प्रबोधनकाळातील विज्ञानाचा विकास व वैज्ञानिक शोधाची माहिती सांगता येईल.

**(2)** रामकृष्ण मिशनने केलेले कार्य लिहा.


उत्तर:

◈ प्रस्तावना :

भारतीय समाजातील अंधश्रद्धा, रूढीप्रियता, जातिभेद, उच्च-नीचतेच्या भ्रामक कल्पना, चौकस व चिकित्सक वृत्तीचा अभाव यांमुळे येथील समाज मागे पडला होता. इंग्रजी शिक्षणामुळे येथील समाजसुधारकांची जगाकडे बघण्याची दृष्टी बदलली. यात स्वामी विवेकानंद अग्रेसर होते त्यांनी निर्मिलेल्या रामकृष्ण मिशनचे कार्य पुढील प्रमाणे ---

# ◈मुख्य उत्तर :

1. इ.स.१८९७ मध्ये स्वामी विवेकानंद यांनी ‘रामकृष्ण मिशन’ची स्थापना केली.
2.रामकृष्ण मिशनने लोकसेवेच्या कार्याला महत्त्व दिले.
3.दुष्काळग्रस्तांना मदत, आजारी लोकांना औषधोपचार, दीनदुबळ्यांची सेवा, स्त्री-शिक्षणाचा पुरस्कार आणि आध्यात्मिक उन्नती या क्षेत्रांत रामकृष्ण मिशनने कार्य केले.




4. ‘उठा, जागे व्हा आणि ध्येय प्राप्त होईपर्यंत थांबू नका’ हा संदेश स्वामी विवेकानंद यांनी रामकृष्ण मिशनद्वारे भारतीय तरुणांना दिला..

◈ उपसंहार :
अशा प्रकारे रामकृष्ण मिशनचे कार्य होते.

**(3)भारतात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने कोणत्या योजना राबवल्या गेल्या ?**

उत्तर:

◈ प्रस्तावना : वाढत्या लोकसंख्येसाठी रोजगार निर्माण करणे हे सरकारपुढचे एक मोठे आव्हान आहे. भारतात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सरकारने ज्या उपाययोजना केल्या आहेत त्यांची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे --

◈ मुख्य उत्तर :

☞ **(1) प्रधानमंत्री रोजगार योजना :** 1. सुशिक्षित तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने २ ऑक्टोबर १९९३ रोजी प्रधानमंत्री रोजगार योजना सुरू केली.

2.या योजनेत शहरी व ग्रामीण तरुणांना रोजगार व उद्योगाच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या. महात्मा गांधीजींच्या जन्मदिवसाचा मुहूर्त साधूनच 'प्रधानमंत्री रोजगार योजना' आणि 'रोजगार हमी योजना' सुरू झाल्या.

3.रोजगार हमी योजनेमध्ये कृषी क्षेत्रातील बेरोजगारांना रोजगाराची हमी देण्यात आली होती. शेतीचे काम नसेल त्या दिवसांमध्ये जो मागेल त्याला काम देणे हाच या योजनेचा उद्देश होता.

4. सुरुवातीला भारतातील २५७ जिल्ह्यांमधून ही योजना सुरू झाली. दारिद्र्यरेषेखालील प्रत्येक गरजू कुटुंबातील दोन तरुणांना १०० दिवस रोजगार उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट ठरवण्यात आले. डिसेंबर २००१ मध्ये ही योजना ग्रामीण रोजगार योजनेत विलीन करण्यात आली.

5.१९९८ मध्ये शेतकऱ्यांना अडी-अडचणीच्या वेळी आधार मिळावा म्हणून 'किसान क्रेडीट कार्ड' योजना सुरू झाली. शेतकऱ्यांना शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या वस्तूविकत घेण्यासाठी निधी उपलब्ध व्हावा यासाठी ही योजना सुरू झाली. पुढे कार्डधारक शेतकऱ्यांसाठी अपघात विमा सुविधा सुरू झाली.

☞ **(2) सुवर्णजयंती ग्रामीण स्वयंरोजगार योजना:** 1. १९९९ मध्ये ही योजना सुरू करण्यात आली. एकात्मिक ग्रामीण विकास योजना, स्वयंरोजगारासाठी ग्रामीण युवकांकरता प्रशिक्षण कार्यक्रम, ग्रामीण महिला व बालविकास कार्यक्रम, ग्रामीण कारागीरांना आधुनिक अवजारांच्या वाटपाचा कार्यक्रम, गंगा कल्याण योजना, दहा लाख विहिरी खोदण्याची योजना अशा सर्व योजना एकत्र करण्यात येऊन सुवर्णजयंती ग्रामीण स्वयंरोजगार योजना सुरू करण्यात आली. २००५-०६ मध्ये या योजनेचे बारा लाख सात हजार लाभार्थी होते

☞ **(3) जवाहर ग्राम-समृद्धी योजना:** 1.१९९९ मध्ये ग्रामीण भागातील बेरोजगार स्त्री-पुरुषांना पुरेसा रोजगार देण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली.

2.२००१ मध्ये या योजनेचे 'संपूर्ण ग्रामीण रोजगार योजने'त विलिनीकरण करण्यात आले.

☞ **(4)संपूर्णग्रामीण रोजगार योजना:** 1. 'रोजगार आश्वासन योजना' आणि 'जवाहर ग्राम-समृद्धी योजना' यांचे विलीनीकरण करून २००१ मध्ये ही योजना सुरू झाली.

2.ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी उपलब्ध करणे, कामाच्या बदल्यात धान्य देणे इत्यादी तरतुदी या योजनेत होत्या.

3.२००४ मध्ये देशातील आर्थिकदृष्ट्या सर्वाधिक मागे असणाऱ्या १५० जिल्ह्यामध्ये 'कामाच्या बदल्यात धान्य' ही योजना राबवण्यास सुरुवात झाली.

4.दुष्काळापासून संरक्षणासाठी जलसंवर्धन व शेतजमिनींचा विकास यावर भर देण्यात आला.

5. २००६ मध्ये ही योजना 'राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी' योजनेत समाविष्ट करण्यात आली.

◈ उपसंहार : अशा प्रकारे, भारतात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने निर्मित योजनांची माहिती देता येईल

प्रश्न 7 : **खालील प्रश्नांची दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही तीन) ...15**

**(1) मराठी सत्तेचे वसाहतवादविरोधी धोरण स्पष्ट करा**

मुद्दे : (अ) डच-मराठे
(ब) फ्रेंच-मराठे
(क) सिद्दी-मराठे

उत्तर : ◈ प्रस्तावना : मराठी सत्तेचे वसाहतवादविरोधी धोरण पुढीप्रमाणे :--

◈ मुख्य उत्तर :

☞ **(अ)** डच-मराठे**:** 1. वेंगुर्ला येथे डचांची वखार असल्याने स्वराज्याशी त्यांचा संबंध येणे अपरिहार्य होते. १६४९ मध्ये सुरू झालेल्या वेंगुर्ल्याच्या वखारीमुळे डचांचे व्यापारात चांगले बस्तान बसलेहोते.

2.कुडाळवर शिवाजी महाराजांची स्वारी झाल्याने डचांच्या व्यापारावर प्रतिकूल परिणाम झाला. १६६५ मध्ये सुरतेच्या मुघल सुभेदाराने मराठ्यांचे आरमार नष्ट करण्याकरता डचांची मदत मागितली. डचांनी ती नाकारली.

3. छत्रपती शिवाजी महाराजांनी दाभोळ येथे वखार काढण्यास डचांना जागा देण्यास परवानगी दिली होती. परंतु काही कारणास्तव ती वखार सुरू झाली नाही.
4.मराठे आणि डचांमधील राजकीय संबंध लवचीक होते. मुंबईतून इंग्रजांचे उच्चाटन करण्यास मराठ्यांनी आपणास मदत करावी अशी डचांची इच्छा होती.
5.सुरतेच्या दुसऱ्या स्वारीत मराठ्यांनी डचांच्या वखारीला नुकसान पोचवले नाही.
6.कर्नाटक स्वारीत डच वखारीचे संरक्षण आणि परवान्यांसाठी डचांनी छत्रपती शिवाजी महाराजांना मोठा नजराणा दिला. पोर्टो नोव्हो किंवा परंगी पेट्टाई, तेगनापट्टम उर्फ देवनापट्टिनम् येथील डचांच्या वखारी छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरक्षित राहू दिल्या.

☞ **(ब)** फ्रेंच-मराठे**:**

1. १६६८ च्या डिसेंबर महिन्यात राजापूर येथेशिवाजी महाराजांच्या परवानगीने फ्रेंचांनी वखार सुरू केली. फ्रेंचांनी स्वराज्याला दारूगोळा पुरवला. फ्रेंचांशी असलेले मित्रत्वाचे संबंध लक्षात घेऊन सुरतेच्या दुसऱ्या स्वारीत मराठ्यांनी फ्रेंचांच्या वखारीस नुकसान पोचवले नाही.
2.त्यामुळे फ्रेंचांनी मराठ्यांना मोठा नजराणा दिला. १६७७ मध्ये पुदुच्चेरीचा गव्हर्नर जनरल फ्रॉंस्वॉं मार्टिन याने फ्रेंच वखारीस संरक्षण व परवाना मिळवला.
3.छत्रपती शिवाजी महाराजांच्या दक्षिण दिग्विजयानंतर चोळमंडलच्या किनाऱ्यावर मराठ्यांचे प्रभुत्व निर्माण झाले. नंतरच्या काळात फ्रान्स आणि इंग्लंड यांच्यामधील सत्तासंघर्षाचे पडसाद भारतातही उमटले.
4.भारतातील वेगवेगळ्या राज्यांवर प्रभुत्व प्रस्थापित करण्यासाठी इंग्रज आणि फ्रेंच यांच्यात चुरस लागली. दोघेही स्थानिक राज्यांच्या कारभारात हस्तक्षेप करू लागले.
5.आधुनिक युरोपीय युद्धतंत्र शिकवण्याच्या अमिषाने फ्रेंचांनी निजामाच्या दरबारात प्रवेश केला. फ्रेंचांच्या तालमीत तयार झालेल्या इब्राहीमखान गारदी याला सदाशिवरावभाऊ पेशवे यांनी मराठ्यांच्या लष्करात तोफखान्याचा प्रमुख म्हणून नेमले होते.
6.इ.स.१७६१ मध्ये इब्राहीमखानाने पानिपतच्या तिसऱ्या युद्धात केलेल्या पराक्रमाने प्रभावित होऊन महादजी शिंदे यांनी फ्रेंच प्रशिक्षक डिबॉईन आणि पेरॉं यांच्या मदतीने आधुनिक कवायती फौज तयार केली आणि तोफखाना सुसज्ज केला. या कवायती फौजेच्या जोरावर त्यांनी उत्तर हिंदुस्थानात मराठ्यांचे वर्चस्व निर्माण केले. तसेच इंग्रजांनाही धाकात ठेवले.

☞ **(क)** सिद्दी-मराठे**:**

1.१५व्या शतकाच्या उत्तरार्धात आफ्रिकेतील ॲबिसिनियातून सिद्दी लोक भारतात आले. त्यांनी जंजिरा येथे बस्तान बसवले. इ.स.१६४८ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी कल्याण प्रांत विशेषतः तळे, घोसाळे आणि रायरी हे किल्ले ताब्यात घेतले तेव्हा सिद्दीला धोक्याची जाणीव झाली.
2. मार्च १६७१ मध्ये मराठ्यांनी जंजिरा किल्ल्याची नाकेबंदी केली. सिद्दीने मराठ्यांना किल्ला देण्याचे कबूल केले, परंतु त्याचवेळी मुघलांकडे मैत्रीचा प्रस्ताव पाठवला आणि मुघलांचे मांडलिकत्व पत्करले. त्यामुळे सिद्दी सुखरूप राहिला आणि किल्ला घेण्यात मराठे अपयशी ठरले.
3.सिद्दी आणि इंग्रज दोघेही एकमेकांना आपल्या शत्रूविरुद्ध कायम मदत करत असत. १६७९ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी या दोघांनाही धडा शिकवण्यासाठी खांदेरी बेटावर किल्ला बांधण्यास सुरुवात केली.
4.बांधकाम मायनाक भंडारी याच्या नेतृत्वाखाली चाललेहोते. बांधकाम बंद पाडण्यासाठी इंग्रज अधिकारी ह्यूजेस आला. इंग्रजांनी रसद बंद करण्याचा प्रयत्न केला. मायनाक भंडारी व आरमारप्रमुख दौलतखान यांनी इंग्रजांना तीव्र प्रतिकार केला. त्यांनी इंग्रजांची गलबते पकडली व अधिकाऱ्यांस कैद केले.
5.मुंबईहून इंग्रजांनी एक मोठे जहाज व ७ गलबते पाठवली. मराठ्यांच्या ४०-५० गलबतांनी त्यांना टक्कर दिली. १६८० मध्ये खांदेरीच्या प्रदेशातून इंग्रजांना माघार घ्यावी लागली.
6.जंजिऱ्याचा सिद्दी स्वराज्याला त्रास देऊ लागला म्हणून छत्रपती संभाजी महाराजांनी सिद्दीला धडा शिकवण्यासाठी मोहीम हाती घेतली. उंदेरी, आपटे, नागोठणे आणि जंजिरा परिसरात मराठ्यांनी सिद्दीला जेरीस आणले.
7.छत्रपती संभाजी महाराज सिद्दीचा नाश करण्यास सिद्ध झाले असतानाच मुघल स्वराज्यावर चालून आले. एकाच वेळी दोन शत्रूंना सामोरे जाण्यात शहाणपण नाही म्हणून मराठ्यांनी सिद्दीचा नाद सोडला.

## ◈ उपसंहार :

छत्रपती संभाजी महाराजांनंतर छत्रपती राजाराम महाराज आणि महाराणी ताराबाई यांना आपली सर्व शक्ती औरंगजेबाच्या विरोधात एकवटावी लागल्यामुळे या पाश्चात्य शत्रूंकडे त्यांचे दुर्लक्ष झाले.

(2) महात्मा गांधीजींच्या 'चले जाव' आंदोलनाची माहिती लिहा

मुद्दे : (अ) महात्मा गांधीजींचे जनतेला आवाहन :

(ब) चले जाव चळवळीचे परिणाम :

(क) मुंबई अधिवेशन

उत्तर :

## ◈ प्रस्तावना :

लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर १९२० मध्ये राष्ट्रीय चळवळीची सूत्रे महात्मा गांधीकडे आली. गांधीजींच्या नेतृत्वशैलीने व लढ्याच्या अभिनव तंत्राने राष्ट्रीय चळवळ अधिक व्यापक झाली. त्यातील चले जाव आंदोलन हे महत्त्वपूर्ण आंदोलन होते

## ◈ मुख्य उत्तर :

☞ **(अ) <u>महात्मा गांधीजींचे जनतेला आवाहन :</u>**

1. ब्रिटिशांनी तत्काळ भारत सोडावा अशी मागणी करण्यात आली. गांधीजींच्या नेतृत्वाखाली देशव्यापी अहिंसक आंदोलन सुरू करण्याचा निर्णयही घेण्यात आला.

2.गांधीजी म्हणाले, ''हे आंदोलन केवळ राष्ट्रीय सभेचे नसून सर्व भारतीयांचे आहे. प्रत्येक स्त्री-पुरूषाने या क्षणापासून आपण स्वतंत्र आहोत असे समजावे आणि लढ्यासाठी सिद्ध व्हावे.''

3.हा निकराचा लढा आहे हे सांगताना गांधीजी पुढे म्हणाले, ''आज मी तुम्हांला एक मंत्र देणार आहे. तो म्हणजे 'करेंगे या मरेंगे', ही आपली प्रतिज्ञा असली पाहिजे. या प्रतिज्ञेसाठी बलिदानाची तयारी ठेवा.'' गांधीजीच्या या शब्दांनी देशात नवे चैतन्य निर्माण झाले.

☞ **<u>(ब) चले जाव चळवळीचे परिणाम :</u>**

1. चले जाव आंदोलन सुरू होण्यापूर्वीच ते चिरडून टाकण्याचा सरकारन प्रयत्न केला. ९ ऑगस्टचा दिवस उजाडण्यापूर्वीच गांधीजी, मौलाना आझाद, पंडित जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल इत्यादी प्रमुख नेत्यांना अटक करण्यात आली.

2.सरकारने सभा, भाषणे, मोर्चे, निदर्शने यांवर बंदी घातली. राष्ट्रीय सभेची देशभरातील सर्व कार्यालये ताब्यात घेतली.

3. १९४२ सालच्या अखेरीस या जनआंदोलनाला नवे वळण लागले. आंदोलनाचे नेतृत्व भूमिगत झालेल्या तरूण समाजवादी कार्यकर्त्यांकडे आले. जयप्रकाश नारायण, डॉ. राममनोहर लोहिया, अच्युतराव पटवर्धन, अरुणा असफअली, एस.एम.जोशी, ना.ग.गोरे इत्यादी नेते या कार्यात अग्रेसर होते.

4. देशात अनेक ठिकाणी स्थानिक पातळीवर क्रांतिकारी गट स्थापन झाले.

5. . 'चले जाव' आंदोलनातून भारतीय जनतेचा प्रखर ब्रिटिश विरोध व्यक्त झाला. या काळात भारतातील ब्रिटिश सत्तेचा पाया खिळखिळा झाला या सर्व घटनांमुळे यापुढे फार काळ भारतात आपली सत्ता टिकवता येणार नाही याची जाणीव ब्रिटिश राज्यकर्त्यांना झाली.

☞ **(क)** मुंबई अधिवेशन :

1. राष्ट्रीय सभेच्या कार्यकारिणीने वर्धा येथे 'ब्रिटिशांनी भारत सोडून जावे' हा ठराव मंजूर केला.

2. त्या ठरावावर मुंबई येथील अधिवेशनात शिक्कामोर्तब व्हायचे होते.

3. ७ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईच्या गवालिया टँक मैदानावर राष्ट्रीय सभेचे अधिवेशन मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे सुरू झाले. 4.८ ऑगस्ट रोजी पंडित जवाहरलाल नेहरूंनी या अधिवेशनात मांडलेला 'छोडो भारत' ठराव प्रचंड बहुमताने मंजूर झाला.

◈ उपसंहार : अशा प्रकारे, 'चले जाव' आंदोलनाची माहिती देता येईल

(3) **काश्मीर संस्थानाच्या विलीनीकरणाची माहिती लिहा**

मुद्दे : (अ) पाकिस्तानी सीमेवरील सशस्त्र टोळ्यांचे आक्रमण

(ब) सामीलनामा (क) विलीनीकरण

उत्तर:

## ◈ प्रस्तावना :

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. मात्र त्यावेळी भारतामध्ये अनेक छोटी छोटी संस्थाने अस्तित्वात होती. भारतात सामील होणे किंवा न होणे हे ठरवण्याचा अधिकार या संस्थानांना देण्यात आला होता.

## ◈मुख्य उत्तर :

☞ **(अ)** पाकिस्तानी सीमेवरील सशस्त्र टोळ्यांचे आक्रमण **:**

1. भारत स्वतंत्र झाल्यावर भारत आणि पाकिस्तान यांपैकी कोणत्याही एका देशात सामील न होण्याचा निर्णय जम्मू-काश्मीरचा राजा हरिसिंग याने घेतला होता.

2.काश्मीर पाकिस्तानात सामील करून घेण्याचा पाकिस्तानचा मानस होता. यासाठी पाकिस्तान हरिसिंगावर दडपण आणू लागले.

3.२२ ऑक्टोबर १९४७ रोजी या संस्थानावर पाकिस्तानी सीमेवरील सशस्त्र टोळ्यांनी आक्रमण केले.

☞ **(ब)** सामीलनामा **:**

1. दोन्ही देशांपासून आपले स्वतंत्र अस्तित्व राखू इच्छिणाऱ्या राजा हरिसिंगने काश्मीरच्या संरक्षणासाठी भारताकडे लष्करी सहकार्य मागितले.

2.२७ ऑक्टोबर १९४७ रोजी राजा हरिसिंगने आपले संस्थान भारतात विलीन करण्यास परवानगी दिली.

3.भारत सरकारकडे आपला सामीलनामा सुपूर्द केला.

4.अशा प्रकारे काश्मीर भारतात विलीन झाल्यानंतर भारतीय लष्कर काश्मीरच्या रक्षणासाठी गेले.

☞ **(क)** विलीनीकरण **:**

1. लष्कराने काश्मीरचा मोठा भाग घुसखोरांच्या हातून परत मिळवला. काही भाग मात्र पाकिस्तानच्या ताब्यात राहिला.

2.जानेवारी १९४८ मध्ये भारताने काश्मीरचा प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघात नेला. दोन देशांमधील काश्मीरच्या या वादास आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले.

3.काश्मीरमधून पाकिस्तानी सैन्य काढून घेणे राष्ट्रसंघाला देखील शक्य झाले नाही. परंतु प्रौढमताधिकाराच्या आधारे तत्कालीन नॅशनल कॉन्फरन्स पक्षाच्या सरकारने घटनासभेसाठी मतदान घेतले. घटनासभेने भारतात विलीन होण्यावर शिक्कामोर्तब केले.

4.जम्मू-काश्मीरची घटना अमलात आली व तेव्हापासून जम्मू-काश्मीर हा भारतीय संघराज्याचा अविभाज्य भाग आहे.

5.भारतीय राज्यघटनेच्या कलम ३७० अन्वये काश्मीरला विशेष राज्याचा दर्जा प्रदान करण्यात आला होता.

### ◈ उपसंहार :

अशा प्रकारे, काश्मीर संस्थान भारतात विलीन झाले

(4) महायुद्धांचे परिणाम स्पष्ट करा

मुद्दे : (अ) जीवित व वित्तहानी (ब) भारतीय राष्ट्रीय सभेची भूमिका (क) इंग्लंडवर झालेले परिणाम

### उत्तर :

## ◈ प्रस्तावना :

विसाव्या शतकात दोन महायुद्धे झाली. ही दोन महायुद्धे विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळातील सर्वात महत्त्वाच्या घटना होत्या. या महायुद्धांचे परिणाम पुढीलप्रमाणे :--

### ◈ मुख्य उत्तर :

☞ **(अ)** जीवित व वित्तहानी **:**

1. दोन महायुद्धांमुळे मोठ्या प्रमाणावर जीवित व वित्तहानी झाली. यामुळे जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी एक यंत्रणा निर्माण केली पाहिजे या जाणीवेतून पहिल्या महायुद्धानंतर राष्ट्रसंघ आणि दुसऱ्या महायुद्धानंतर 'संयुक्त राष्ट्रे' या आंतरराष्ट्रीय संघटनेची स्थापना करण्यात आली.

2. युद्धकाळात जीवनावश्यक वस्तूंच्या किमती भरमसाट वाढल्या.

3.वाढलेल्या महागाईबरोबरच या काळात औद्योगिक मंदीमुळे बेकारीचे संकटही भारतीयांपुढे उभे राहिले.

☞ **(ब)** भारतीय राष्ट्रीय सभेची भूमिका **:**

1. पहिल्या महायुद्धात इंग्लंडने आपली वसाहत असणाऱ्या भारताला त्याची इच्छा असो वा नसो युद्धात सहभागी करून घेतले.
2. सप्टेंबर १९३९ मध्ये युरोपात दुसरे महायुद्ध भडकले. इंग्लंड व फ्रान्स यांच्याविरुद्ध जर्मनी व इटली असे युद्धाचेप्रारंभीचे स्वरूप होते. जर्मनीविरुद्ध इंग्लंडने युद्ध पुकारताच भारतही इंग्लंडच्या बाजूने युद्धात सामील झाल्याची घोषणा त्या वेळचे व्हाईसरॉय लॉर्ड लिनलिथगो यांनी केली.
3.व्हाईसरॉयच्या या घोषणेचा राष्ट्रीय सभेने निषेध केला. जर्मनीतील व इटलीतील आक्रमक हुकुमशाही विचारप्रणालींना जसा राष्ट्रीय सभेचा प्रखर विरोध होता तसाच तो इंग्लंडच्या साम्राज्यवादाला व वसाहतवादालाही होता.
4.युरोपात लोकशाहीचे रक्षण करण्यासाठी आपण जर्मनी व इटलीविरुद्ध लढत आहोत असा इंग्लंडचा दावा होता. तो खरा असेल तर इंग्लंडने भारताला तात्काळ स्वातंत्र्य द्यावे अशी मागणी राष्ट्रीय सभेने केली.

☞ **(क)** इंग्लंडवर झालेले परिणाम **:**

1. १९४५ सालच्या ऑगस्ट महिन्यात दुसरे महायुद्ध थांबले. त्यात इंग्लंडला विजय मिळाला खरा, परंतु युद्धामुळे इंग्लंडची आर्थिक हानी व मनुष्य हानी फार मोठ्या प्रमाणावर झाली.
2.त्यामुळे इंग्लंडची शक्ती कमी झाली. तशातच भारतीय जनता आणि भारतीय सैनिक यांच्यावरील ब्रिटिश सत्तेचा दरारा नाहीसा झाल्याची जाणीव ब्रिटिश राज्यकर्त्यांना झाल्यामुळे भारतातून काढता पाय घेण्याचा निर्णय इंग्लंडने घेतला.

## ◈ उपसंहार :

अशा प्रकारे, दोन्ही महायुद्धांचे परिणाम नुसतेच हानिकारक नव्हते, तर ते विनाशकारक होते.

(5) शीतयुद्धाविषयी माहिती लिहा :

मुद्दे : (अ) शीतयुद्ध व्याख्या (ब) शीतयुद्धाची पार्श्वभूमी (क) शीतयुद्धाची वाटचाल

## उत्तर : ◈ प्रस्तावना : शीतयुद्धाविषयी सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे --

## ◈ मुख्य उत्तर :

☞ **(अ) शीतयुद्ध व्याख्या :**

1.दुसऱ्या महायुद्धानंतर एका बाजूला भांडवलशाही राष्ट्रे व दुसऱ्या बाजूला कम्युनिस्ट राष्ट्रे यांच्यात सत्ता व प्रभाव यासाठी जो संघर्ष सुरू झाला त्याला 'शीतयुद्ध' म्हणतात.
2. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात वॉल्टर लिपमन या वृत्तपत्रात लेखन करणाऱ्या स्तंभलेखकाने सर्वप्रथम 'कोल्डवॉर' (शीतयुद्ध) हा शब्दप्रयोग वापरला.

☞ **(ब) शीतयुद्धाची पार्श्वभूमी :**

1. शीतयुद्ध घडून येण्यास दुसरे महायुद्ध कारणीभूत ठरले. इंग्लंड व फ्रान्स यांचे महत्त्व कमी झाले.
2. दुस-या महायुद्धादरम्यान सोव्हिएट रशियाच्या सैन्याने पूर्व युरोप तर अमेरिका, फ्रान्स आणि इंग्लंड यांनी पश्चिम युरोपवर प्रभुत्व मिळवले. यामुळे युद्ध संपल्यावर युरोपचे पूर्व आणि पश्चिम असे विभाजन घडून आले.
3.सोव्हिएट रशियाच्या प्रभावाखाली असलेल्या पूर्व युरोपीय राष्ट्रांनी साम्यवादी विचारप्रणालीचा स्वीकार केला.
4.अमेरिकेच्या प्रभावाखाली असणाऱ्या पश्चिम युरोपीय राष्ट्रांनी भांडवलशाही व्यवस्था मान्य केली. यातून शीतयुद्ध आकाराला आले.

☞ **(क) शीतयुद्धाची वाटचाल :**

1. दुसरे महायुद्ध संपल्यावर अमेरिकेने 'मार्शल प्लॅन'ची योजना आखून युरोपीय राष्ट्रांना साम्यवादापासून रोखण्यासाठी आर्थिक मदत सुरू केली. याच्या विरोधात रशियाने आशिया व आफ्रिकेतील स्वातंत्र्य चळवळींना प्रोत्साहन दिले.
2.अमेरिका आणि सोव्हिएट रशिया यांच्यात युरोपच्या पूर्व आणि पश्चिम विभागणीने तणाव निर्माण झाला. या दोन राष्ट्रांमध्ये प्रत्यक्ष समोरासमोर युद्ध झाले नाही.
3.जग तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यापर्यंत पोहचले आहे अशी परिस्थिती निर्माण झाली. परंतु, उभयपक्षी सामंजस्याचे धोरण अवलंबले गेले. दोन्ही राष्ट्रे कायम युद्धाच्या तयारीत, दोन्ही राष्ट्रांमध्ये तणाव मात्र प्रत्यक्ष युद्ध नाही या परिस्थितीला ढोबळमानाने शीतयुद्ध म्हटले जाते.

## ◈ उपसंहार : अशा प्रकारे] शीतयुद्धा विषयी सविस्तर माहिती देता येईल.

◆◈◆◈◆◈◆◈◆◈

# नमुना प्रश्नपत्रिका – २

**एकूण गुण : ८०**

**प्रश्न १ (अ ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा. ...०६**

(१) इ.स.१४४० मध्ये ................ याने छापखाना सुरू केला.
(अ) जेम्स वॅट (ब) गुटेनबर्ग (क) ॲरिस्टॉटल (ड) होमर
(२) वास्को-द-गामा हा ................या देशाचा दर्यावर्दी होता.
(अ) पोलंड (ब) इंग्लंड (क) फ्रान्स (ड) पोर्तुगाल
(३) छत्रपती शिवाजी महाराज आणि इंग्रज यांचा संबंध सर्वप्रथम.......................... या प्रकरणात आला.
(अ) कुडाळ स्वारी (ब) अफजलखान (क) फाजलखान (ड) राज्याभिषेक
(४) पहिले महायुद्ध ........................ च्या तहाने संपले .
(अ) व्हर्साय (ब) वॉर्सा (क) लंडन (ड) अंकारा
(५) राजा राममोहन रॉय यांनी ............... प्रथेविरुद्ध इंग्रजी भाषेत पत्र लिहिले.
(अ) जातिप्रथा (ब) बालविवाह (क) सती (ड) पडदा पद्धती
(६) सार्क संघटनेचे मुख्यालय......................... येथे आहे
(अ) थायलंड (ब) जकार्ता (क) काठमांडू (ड) दिल्ली

**(ब) पुढील प्रत्येक संचातील ब गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा. ...०४**

| (१) | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (अ) | जॉन के | -- | धावता धोटा |
| (ब) | सॅम्युएल क्रॉम्प्टन | -- | कॉटन जीन |
| (क) | एडमंड कार्टराईट | -- | यंत्रमाग |
| (ड) | जेम्स वॅट | -- | स्टीम इंजिन |

| (२) | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (अ) | वखार | -- | मालाच्या साठवणुकीचे ठिकाण |
| (ब) | कार्ताझ | -- | परवान्याचा दस्तऐवज |
| (क) | फॅक्टर्स | -- | वखारीत काम करणारे नोकर |
| (ड) | टांकसाळ | -- | जिंकून घेतलेला प्रदेश |

| (३) | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (अ) | कास्मो-द-ग्वार्द | -- | पोर्तुगीज इतिहासकार |
| (ब) | गोंसालू मार्तीस | -- | पोर्तुगीज वकील |
| (क) | फ्रांस्वाँ मार्टिन | -- | डच वखारीचा प्रमुख |
| (ड) | हेन्री रेव्हिंग्टन | -- | इंग्रज अधिकारी |

| (४) | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (अ) | हैदराबाद संस्थानाचे विलिनीकरण | -- | स्वामी रामानंद तीर्थ |
| (ब) | काश्मीर संस्थानाचे विलिनीकरण | -- | शेख अब्दुल्ला |
| (क) | गोवा मुक्तिलढ्यातील मोलाचे योगदान | -- | मोहन रानडे |
| (ड) | पुदुच्चेरी येथील कामगार नेते | -- | व्ही.सुबय्या |

**प्रश्न २ (अ ) ऐतिहासिक व्यक्ती, ठिकाण, घटना यासंबंधीची नावे लिहा . ...०४**

(१) वराहमिहीर यांनी लिहिलेला ग्रंथ --
(२) जैतापूरचा इंग्रज दलाल ---
(३) गुरुदितसिंग यांच्या नेतृत्वाखाली कॅनडाला गेलेले जहाज --

(४) ३० जून १९७७ रोजी या संघटनेचे औपचारिकरीत्या विसर्जन झाले ---

**(ब) दिलेल्या कारणांपैकी योग्य कारण निवडून विधाने पूर्ण करा** **...०४**

(१) गॅलिलिओला ' आधुनिक प्रायोगिक विज्ञानाचा जनक ' म्हटले जाते, कारण --

अ ] त्याने प्रथमच मोठी दुर्बीण तयार केली होती

ब ] त्याने आधुनिक प्रायोगिक विज्ञानाचा शोध लावला

क ] त्याने निरीक्षण करणे व सिद्धांत तर्कशुद्ध पद्धत रूढ केली

ड ] त्याने आधुनिक प्रायोगिक विज्ञानावर मोठा ग्रंथ लिहिला होता

(२) औद्योगिक क्रांती इंग्लंडमध्ये सुरू झाली, कारण --

(अ) इंग्लंड हा मोठा देश होता

(ब) इंग्लंडमध्ये भांडवलदार व कामगार वर्ग अस्तित्वात होता.

(क) इंग्लंडमध्ये मोठी बाजारपेठ अस्तित्वात होती

(ड) औद्योगिक क्रांती मर्यादित स्वरूपाची होती

(३) जुनागढ चा नवाब पाकिस्तानला पळून गेला कारण ---

(अ) नवाबाला पाकिस्तानात मोठा प्रदेश मिळणार होता

(ब) संस्थानी प्रजा त्यांना तुरुंगात कैद करणार होती

(क) संस्थानातील प्रजेचा नवाबावर विश्वास नव्हता


(ड) संस्थानी प्रजेने त्याच्या निर्णयाला विरोध करून आंदोलन उभे केले होते

(४) ॲन्झुस करारात ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड आणि युनायटेड स्टेटस् ऑफ अमेरिका वगळता कोणत्याही राष्ट्राला प्रवेश दिला नाही. कारण –

(अ) त्यांना ग्रेट ब्रिटन व फ्रान्सचे महत्त्व वाढू द्यायचे नव्हते. (क) हा गुप्त करार होता.

(ब) हा लष्करी करार होता. (ड) हा फक्त मित्रदेशांतील करार होता.


**प्रश्न ३ (अ ) पुढील नकाशाचे निरीक्षण करून प्रश्नांची उत्तरे लिहा** **...०५**




(१) दिलेल्या नकाशात दाखविलेले भारतातील पोर्तुगिजांचे सत्ताकेंद्र कोणते ?
(२) भारताच्या पश्चिमेला कोणता समुद्र आहे ?
(३) दिलेल्या नकाशात दाखविलेले भारताच्या वायव्य दिशेकडील राष्ट्र कोणते ?
(४) भारताच्या दक्षिणेला कोणता महासागर आहे ?
(५) या नकाशाच्या मदतीने कोणती माहिती मिळते ?

**(ब ) दिलेली संकल्पनाचित्रे पूर्ण करा (कोणतीही चार)** ...०८

(१)




(२)





३)

| **परकीय सत्तांच्या वखारी** | | **परकीय सत्ता** |
|---|---|---|
| ------------------ | → | डच |
| दीव | → | ------------------ |
| ------------------ | → | इंग्रज |
| पाँडिचेरी | → | ---------------- |


(४)




(५)




(६)




**प्रश्न ४ (अ ) संक्षिप्त टिपा लिहा (कोणत्याही तीन)** **...०६**

(१) कार्ताझ

(२) डॉ.कोटणीस

(३) अलिप्ततावाद

(४) शीतयुद्ध
(५) खेलो इंडिया

**(ब ) पुढील विधाने सकारण स्पष्ट करा (कोणतीही तीन) ...०९**

(१) औद्योगिक क्रांतीमुळे वसाहतवादाला चालना मिळाली
(२) राजर्षी शाहू महाराजांची धोरणे पुरोगामी होती
(३) भारताला दोन्ही महायुद्धांमध्ये सहभागी व्हावे लागले.
(४) ब्रिटिश आणि म्यानमार यांच्यात तीन युद्धे झाली
(५) भारत अवकाश संशोधन क्षेत्रातील अग्रणी देश आहे.

**प्रश्न ५ खालील विधानांवर तुमचे मत नोंदवा (कोणतेही तीन) ...०९**

(१) पोर्तुगीजांचे भारतातील धोरण असहिष्णू वृत्तीचे होते
(२) वसाहतवादाचा उदय हा युरोपियन राष्ट्रांच्या व्यापारवृद्धीचा परिणाम होता.
(३) व्हर्सायच्या तहात दुसऱ्या महायुद्धाची बीजे होती
(४) राष्ट्रसंघाने स्वीकारलेली विश्वस्त पद्धती अपयशी ठरली
(५) रात्रशाळा आणि साखरशाळा यांची समाजाला गरज आहे

**प्रश्न ६. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही दोन) ...१०**

(१) प्रबोधनकाळातील विज्ञानाचा विकास व वैज्ञानिक शोध यांची सविस्तर माहिती लिहा.
(२) आफ्रिका खंडातील निर्वसाहतीकरणाच्या प्रक्रियेची माहिती लिहा
(३) राज्यांची पुनर्रचना माहिती लिहा

**प्रश्न ७. खालील प्रश्नांची दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही तीन) ...१५**

(१) युरोपातील धर्मयुद्धाची माहिती लिहा
मुद्दे : (अ) अपयशाची कारणे
(ब) धर्मयुद्धांचे परिणाम

(२) अफगाण&मराठे संबंध स्पष्ट करा
मुद्दे : (अ) अब्दालीची १७४८ मधील पहिली स्वारी
(ब) अब्दालीची १७५७ मधील तिसरी स्वारी
(क) अब्दालीची १७५९ मधील चौथी स्वारी (पानिपतचे तिसरे युद्ध )

(३) १८५७ पूर्वीच्या लढ्यांची माहिती लिहा
मुद्दे : (अ) भिल्लांचा उठाव
(ब) रामोशी समाजाचा उठाव
(क) सावंतवाडीतील उठाव

(४) खालील समाज सुधारकांचे कार्य लिहा.
मुद्दे : (अ) राजा राममोहन रॉय
(ब) रामस्वामी नायकर

(५) देशी बियाणे संवर्धन कार्यात योगदान देणाऱ्या राहीबाई पोपेरे यांच्या कार्याची माहिती लिहा
मुद्दे : (अ) कार्याची सुरुवात :
(ब) कार्य :
(क) पुरस्कार :

-------------------

# आदर्श उत्तरपत्रिका प्रश्नपत्रिका – 2

**प्रश्न १ (अ) : दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा** ...०६

(1) इ.स.१४४० मध्ये **गुटेनबर्ग** याने छापखाना सुरू केला.
(2) वास्को-द-गामा हा **पोर्तुगाल** या देशाचा दर्यावर्दी होता.
(3) छत्रपती शिवाजी महाराज आणि इंग्रज यांचा संबंध सर्वप्रथम **अफजलखान** या प्रकरणात आला.
(4) पहिले महायुद्ध **व्हर्साय** च्या तहाने संपले .
(5) राजा राममोहन रॉय यांनी **सती** प्रथेविरुद्ध इंग्रजी भाषेत पत्र लिहिले.
(6) सार्क संघटनेचे मुख्यालय **काठमांडू** येथे आहे

**प्रश्न १ (ब) : पुढील प्रत्येक संचातील ब गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा** ...०४

**1)** चुकीची जोडी : सॅम्युएल क्रॉम्प्टन -- कॉटन जीन
☛ दुरुस्त केलेली जोडी : सॅम्युएल क्रॉम्प्टन -- म्यूल' यंत्र

2) चुकीची जोडी : टांकसाळ -- जिंकून घेतलेला प्रदेश
☛ दुरुस्त केलेली जोडी : **टांकसाळ -- नाणी पाडण्याचे ठिकाण**

3) चुकीची जोडी : फ्रांस्वाँ मार्टिन -- डच वखारीचा प्रमुख
☛ दुरुस्त केलेली जोडी : **फ्रांस्वाँ मार्टिन -- फ्रेंचांचा पाँडिचेरीचा गव्हर्नर जनरल**

4) चुकीची जोडी : काश्मीर संस्थानचे विलिनीकरण -- शेख अब्दुल्ला
☛ दुरुस्त केलेली जोडी : **काश्मीर संस्थानचे विलिनीकरण -- राजा हरिसिंग**

**प्रश्न २ (अ) : ऐतिहासिक व्यक्ती, ठिकाण, घटना यासंबंधीची नावे लिहा** ...०४

१½ बृहत्संहिता
२½ वेलजी
३½ कामागाटा मारू
४½ सीएटो करार

**प्रश्न २ (ब) : दिलेल्या कारणांपैकी योग्य कारण निवडून विधाने पूर्ण करा** ...०४

(1) गॅलिलिओला ' आधुनिक प्रायोगिक विज्ञानाचा जनक ' म्हटले जाते, कारण -- **त्याने निरीक्षण करणे व सिद्धांत तर्कशुद्ध पद्धत रूढ केली**

(2) औद्योगिक क्रांती इंग्लंडमध्ये सुरू झाली, कारण ---- **इंग्लंडमध्ये भांडवलदार व कामगार वर्ग अस्तित्वात होता.**

(3) जुनागढ चा नवाब पाकिस्तानला पळून गेला कारण --- **संस्थानी प्रजेने त्याच्या निर्णयाला विरोध करून आंदोलन उभे केले होते**


(4) ॲन्झुस करारात ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड आणि युनायटेड स्टेटस् ऑफ अमेरिका वगळता कोणत्याही राष्ट्राला प्रवेश दिला नाही. कारण – **त्यांना ग्रेट ब्रिटन व फ्रान्सचे महत्त्व वाढू द्यायचे नव्हते.**

**<u>प्रश्न</u> ३ <u>(अ ) :</u> पुढील नकाशाचे निरीक्षण करून प्रश्नांची उत्तरे लिहा** **...०५**


<u>(१) गोवा</u>
<u>(२) अरबी समुद्र</u>
<u>(३) अफगाणिस्तान</u>
<u>(४) हिंदी महासागर</u>
<u>(५) १५ ऑगस्ट १९४७ चा स्वतंत्र भारत</u>

**<u>प्रश्न</u> ३ <u>(ब) :</u> दिलेली संकल्पनाचित्रे पूर्ण करा (कोणतीही चार)** **...०८**

**उत्तर:** १½




**उत्तर:** २)



**उत्तर:** ३

| परकीय सत्तांच्या वखारी | | परकीय सत्ता |
|---|---|---|
| **वेंगुर्ला** | → | डच |
| दीव | → | **पोर्तुगीज** |
| **मुंबई** | → | इंग्रज |
| पाँडिचेरी | → | **फ्रेंच** |

**उत्तर:** ४½


| | | |
|---|---|---|
| **स्वातंत्र्यवीर सावरकर** | | **मदनलाल धिंग्रा** |
| | **सशस्त्र क्रांतिकारक** | |
| **श्यामजी कृष्ण वर्मा** | | **मादाम कामा** |

**उत्तर:** ५)

**गोवा मुक्तिलढ्यातील मडगाव येथील सत्याग्रहात सहभागी नेते**

- **टी.बी.कुन्हा**
- **गोपाळ मयेकर**
- **डॉ.पी.पी. शिरोडकर**
- **डॉ.राम हेगडे**

**उत्तर:** ६)




**प्रश्न ४ (अ ) : संक्षिप्त टिपा लिहा (कोणत्याही तीन)** **...०६**

(१) कार्ताझ :

**उत्तर:** 1. पोर्तुगीजांचा नाविक परवाना ' कार्ताझ ' होय

2. कार्ताझच्या दस्तऐवजांमध्ये सामान्यतः जहाजाचे नाव, तांडेलाचे नाव, कोठून कोठे जाणार, त्यात स्वसंरक्षणार्थ असलेली शस्त्रास्त्रे इत्यादी तपशील असे.

3. हिंदी महासागरावर पोर्तुगिजांनी वर्चस्व स्थापल्यावर भारतीय राजांना हिंदी महासागरात जहाजे पाठवायची असतील तर पोर्तुगिजांचे परवाने (कार्ताझ) घेणे आवश्यक झाले.

(२) डॉ.कोटणीस :

**उत्तर:** 1. डॉ.कोटणीस यांचा जन्म १० ऑक्टोबर १९१० रोजी सोलापूर येथे झाला. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात चीनच्या जखमी सैनिकांची सेवा करण्याचे काम त्यांनी केले.

2.१९३७ मध्ये जपानने चीनवर आक्रमण केले तेव्हा चिनी सरकारच्या मागणीप्रमाणे पंडित जवाहरलाल नेहरू यांनी जखमी चिनी सैनिकांची सेवा करण्यासाठी पाच डॉक्टर चीनला पाठवले. त्यात डॉ.द्वारकानाथ कोटणीस मुख्य होते.

3.त्यांनी पाच वर्षे चिनी सैनिकांची देखभाल केली. डॉ.कोटणीस यांचे प्लेगच्या साथीत ९ डिसेंबर १९४२ रोजी निधन झाले.

4.डॉ.कोटणीस यांचा त्याग व समर्पण वृत्तींनी भारत व चीन या देशांत मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित केले. प्रसिद्ध चित्रपटनिर्माते व्ही.शांताराम यांनी 'डॉ. कोटणीस की अमर कहानी' हा चित्रपट निर्माण करून कोटणीसांची स्मृती चिरस्थायी केली आहे.

5.डॉ.कोटणीसांचे सोलापूर येथील घर 'स्मारक' म्हणून घोषित केले आहे. तेथे डॉ.कोटणीस यांच्याशी संबंधित गोष्टींचे संग्रहालय आहे.

(३) अलिप्ततावाद :

**उत्तर:** 1. दुसऱ्या महायुद्धानंतर सोव्हिएट रशिया किंवा अमेरिका यांच्या गटात सामील न होता स्वतःचा विकास स्वतःच करणे, स्वतःची धोरणे ठरवून शांततेचा मार्ग अवलंबणे असे धोरण भारताने स्वीकारले. हे धोरण म्हणजे 'अलिप्ततावाद' होय.

2. 'अलिप्ततावाद' ही कल्पना युद्धापेक्षा शांततेशी निगडीत आहे म्हणून ती विधायक आहे.

3. अलिप्ततावाद (नाम)च्या स्थापनेत पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ.सुकार्नो (इंडोनेशिया), क्वामे नखुमा (घाना), गमाल अब्दुल नासेर (इजिप्त) आणि मार्शल टिटो (युगोस्लाव्हिया) यांनी पुढाकार घेतला.

(४) शीतयुद्ध :

**उत्तर:** 1. दुसऱ्या महायुद्धानंतर एका बाजूला भांडवलशाही राष्ट्रे व दुसऱ्या बाजूला कम्युनिस्ट राष्ट्रे यांच्यात सत्ता व प्रभाव यासाठी जो संघर्ष सुरू झाला त्याला 'शीतयुद्ध' म्हणतात.

2.दुसऱ्या महायुद्धाच्या काळात वॉल्टर लिपमन या वृत्तपत्रात लेखन करणाऱ्या स्तंभलेखकाने सर्वप्रथम 'कोल्डवॉर' (शीतयुद्ध) हा शब्दप्रयोग वापरला.
3. शीतयुद्ध घडून येण्यास दुसरे महायुद्ध कारणीभूत ठरले.

(५) खेलो इंडिया :
**उत्तर:** 1. इ.स. २०१७ पासून भारत सरकारने पूर्वीच्या काही योजना आणि नवी उद्दिष्टे एकत्र करून खेलो इंडिया ही योजना सुरू केली आहे.
2. खेळांना व्यापक जनाधार देणे आणि खेळांमध्ये उत्तम दर्जा गाठणे यासाठी ही योजना सुरू झाली. या योजनेचे १२ घटक आहेत.
3. यात शालेय पातळीपासून विद्यार्थ्यांमध्ये गोडी निर्माण करणे, मुलींचा सहभाग वाढवणे इत्यादींचा समावेश आहे.

**प्रश्न ४ (ब ) : पुढील विधाने सकारण स्पष्ट करा. (कोणतीही तीन) ...०९**
**(1) औद्योगिक क्रांतीमुळे वसाहतवादाला चालना मिळाली,**
**उत्तर:** औद्योगिक क्रांतीमुळे वसाहतवादाला चालना मिळाली, कारण—
1. आधुनिक यंत्रांमुळे उत्पादनात प्रचंड वाढ झाली.
2. देशांतर्गत बाजारपेठेत सगळे उत्पादन खपणे शक्य नव्हते.
3.अतिरिक्त उत्पादन खपवण्यासाठी नव्या बाजारपेठांची गरज होती.
4.यासाठी हक्काची बाजारपेठ आणि हुकमी वर्चस्व आवश्यक होते.

**(२) राजर्षी शाहू महाराजांची धोरणे पुरोगामी होती.**
**उत्तर:** राजर्षी शाहू महाराजांची धोरणे पुरोगामी होती, कारण--
1. कोल्हापूर संस्थानचे राजर्षी शाहू महाराज यांनी ब्राह्मणेतर चळवळीचे नेतृत्व करत असतानाच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वास पाठिंबा दिला.
2.राजर्षींनी कोल्हापूर संस्थानात आरक्षणाचा जाहीरनामा काढला. मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला.
3.राजर्षी शाहू महाराज यांनी रोटीबंदी, बेटीबंदी आणि व्यवसाय बंदीवर टीका केली. आंतरजातीय विवाहाचा कायदा त्यांनी केला. संस्थानात कोणताही व्यवसाय कोणालाही करण्याची परवानगी देण्यात आली.

**(३) भारताला दोन्ही महायुद्धांमध्ये सहभागी व्हावे लागले.**
**उत्तर: भारताला दोन्ही महायुद्धांमध्ये सहभागी व्हावे लागले, कारण--**
1. पहिल्या महायुद्धात इंग्लंडने आपली वसाहत असणाऱ्या भारताला त्याची इच्छा असो वा नसो युद्धात सहभागी करून घेतले.
2. भारताने इंग्लंडला पैसे, अन्नधान्य, कापड, युद्धसामग्री तसेच मनुष्यबळ या रूपात मदत केली.
3.१९१९-२० अखेरपर्यंत हिंदुस्थानमधील ब्रिटिश सरकारने सुमारे १९ अब्ज रूपये युद्धासाठी मदत केली.
4. १९३९ ते १९४५ या कालावधीत दुसरे महायुद्ध घडून आले. युद्धकाळात भारताने उत्तर आफ्रिका, इजिप्त, इराक, इराण, ग्रीस, म्यानमार व मलाया येथील युद्धात सहभाग घेतला

**(४) ब्रिटिश आणि म्यानमार यांच्यात तीन युद्धे झाली.**
उत्तर: ब्रिटिश आणि म्यानमार यांच्यात तीन युद्धे झाली, कारण--
1. इ.स.१५९९ मध्ये पोर्तुगिजांनी म्यानमारच्या राजाचा पराभव केला. या पराभवामुळे पोर्तुगिजांना म्यानमारमध्ये प्रवेश करणे सोपे झाले.
2.इ.स.१६११ मध्ये म्यानमारमधील विविध राजघराण्यांनी एकत्र येऊन पोर्तुगिजांचा पराभव केला आणि देशाचे एकत्रीकरण केले.
3.पुढे त्यांनी विस्तारवादाचा आश्रय घेऊन मणिपूर आणि आसामच्या भागावर ताबा मिळवला.
4.ब्रिटिशांच्या अंमलाखालील प्रदेशास धोका उत्पन्न झाल्यामुळे ब्रिटिश आणि म्यानमार यांच्यात तीन युद्धे झाली.

**(५) भारत अवकाश संशोधन क्षेत्रातील अग्रणी देश आहे.**
**उत्तर: भारत अवकाश संशोधन क्षेत्रातील अग्रणी देश आहे, कारण--**
1. २००७ मध्ये भारताने अवकाश संशोधनातील एका नव्या क्षेत्रात पदार्पण केले. इटलीचा उपग्रह भारताने व्यापारी तत्त्वावर अंतराळात सोडला.
2. हे काम मिळवण्यासाठी अन्य राष्ट्रांनी चढ्या दराने किंमत आकारली होती. भारताने वाजवी किंमत आकारून हे काम केले. तरीही भारताला या व्यवहारातून नफा मिळाला.
3.व्यापारी तत्त्वावर काम करण्यापूर्वी भारताने अर्जेंटिना, बेल्जियम, दक्षिण कोरिया, इंडोनेशिया आणि जर्मनी या देशांचे उपग्रह अंतराळात सोडलेहोते.
4.२००८ मध्ये भारताने प्रक्षेपित केलेल्या 'चांद्रयान-१' या उपग्रहाद्वारे चंद्रावर पाण्याचे पुरावे सापडले. त्यानंतर 'मंगळयान' आणि 'चांद्रयान-२' हे उपग्रह सोडले.
5. नुकतेच याच वर्षी २०२३ मध्ये भारत देशाने चांद्रयान -३ ही यशस्वी मोहीम राबवली आहे

**प्रश्न ५ : खालील विधानांवर तुमचे मत नोंदवा (कोणतेही तीन) ...०९**

(१) पोर्तुगीजांचे भारतातील धोरण असहिष्णू वृत्तीचे होते
उत्तर: माझ्या मते,
1. पोर्तुगिजांनी त्यांच्या सत्तेखालील प्रदेशात ख्रिस्ती धर्माखेरीज इतर धर्मांची प्रार्थना स्थळे बांधण्यास वा दुरुस्त करण्यास बंदी केली.
2. पोर्तुगिजांनी अन्य धर्मियांना त्यांच्या पद्धतीने धार्मिक उत्सव साजरे करण्यास वा लग्न समारंभ साजरे करण्यास बंदी घातली.
3. स्थानिक भाषांचीही गळचेपी केली. धर्मांतर करणाऱ्यांना पोर्तुगिजांनी नोकऱ्या देण्यास सुरुवात केली.
........ म्हणून पोर्तुगीजांचे भारतातील धोरण असहिष्णू वृत्तीचे होते

(२) वसाहतवादाचा उदय हा युरोपियन राष्ट्रांच्या व्यापारवृद्धीचा परिणाम होता.
उत्तर: माझ्या मते,
1. भारतीय परंपरेचा, येथील पीकपद्धती व हवामानाचा विचार न करता भारतात कायमधारा, रयतवारी, महालवारी या पद्धतीचे प्रयोग इंग्रजांनी केले. त्यामुळे शेतकरी कंगाल, जमीनदार आणि कंपनी सरकार श्रीमंत होत गेले.
2.पूर्वी शेतसारा वस्तूरूपात भरता येत होता. आता तो रोख स्वरूपात द्यावा लागे. पीक येवो न येवो पण कर भरावाच लागे.
3. . इंग्रज मळेवाल्यांनी येथे नगदी पिके घेण्यास सुरुवात केली. निळीच्या शेतात काम करणाऱ्या मजुरांची अवस्था भीषण होती. सार्वत्रिक बेकारी, असंतोष, अविश्वास यांनी भारतभर सामान्य जनतेचे जगणे अवघड केले होते.
........ म्हणून वसाहतवादाचा उदय हा युरोपियन राष्ट्रांच्या व्यापारवृद्धीचा परिणाम होता.

(३) व्हर्सायच्या तहात दुसऱ्या महायुद्धाची बीजे होती
उत्तर: माझ्या मते,
1. व्हर्सायच्या तहात जर्मनीवर व इतर अक्ष राष्ट्रांवर अपमानकारक अटी लादण्यात आल्या.
2. व्हर्सायच्या तहात जर्मनीवर लादलेल्या अपमानकारक अटी झुगारून जर्मनीला पुन्हा सामर्थ्यशाली करण्यासाठी हिटलरने जोरदार लष्करी तयारी सुरू केली.
3.मोठ्या प्रमाणावर सैन्यबळ, आरमार आणि वायुदल वाढवण्यावर भर दिला.
........ म्हणून व्हर्सायच्या तहात दुसऱ्या महायुद्धाची बीजे होती

(४) राष्ट्रसंघाने स्वीकारलेली विश्वस्त पद्धती अपयशी ठरली
उत्तर: माझ्या मते,
1. पहिल्या महायुद्धात जर्मनी व तुर्कस्तान या राष्ट्रांचा पराभव झाला. या राष्ट्रांच्या वर्चस्वाखाली असणाऱ्या वसाहतींच्या शासनव्यवस्थेसाठी राष्ट्रसंघाने विश्वस्त पद्धती आणली.
2.इंग्लंड व फ्रान्स या राष्ट्रांना विश्वस्त म्हणून कार्य करण्यास सांगितले..

3. वसाहतींच्या प्रदेशांचे व्यवस्थापन स्थानिक लोकांकडे असावी ही राष्ट्रसंघाची भूमिका होती परंतु त्यांचे विजेत्या राष्ट्राकडून शोषणच झाले.
4. विजेता राष्ट्रांकडे सोपवलेल्या वसाहतींना सांभाळणे गरजेचे होते उलट त्यांनी या वसाहतीला स्वातंत्र्य ही दिले नाही.
........ म्हणून राष्ट्रसंघाने स्वीकारलेली विश्वस्त पद्धती अपयशी ठरली

(५) रात्रशाळा आणि साखरशाळा यांची समाजाला गरज आहे
उत्तर: माझ्या मते,
1. महाराष्ट्रातील रात्रशाळा, साखरशाळा या उपक्रमांची विशेष दखल घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात पहिली रात्रशाळा पुण्यात महात्मा जोतीराव फुले यांनी एकोणिसाव्या शतकात सुरू केली.
2. यातूनच प्रेरणा घेऊन अनेक रात्रशाळा राज्यात चालू आहेत. दिवसभर काम करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम उपयुक्त आहे.
3. राज्यात ऊसतोडणी हंगामाच्या कामात शेकडो कामगार विविध साखर कारखान्यांच्या ठिकाणी जातात. या कामगारांच्या मुलांसाठी शिक्षणासाठी सोय म्हणून साखर कारखान्यांच्या परिसरात 'साखरशाळा' सुरू करण्यात आल्या आहेत.
4.राज्यात साक्षरतेचे प्रमाण वाढविण्यासाठी स्वयंसेवी संस्थांची मदत घेण्यात येत आहे. यातूनच सिंधुदुर्ग व वर्धा जिल्हे पूर्ण साक्षर झाले. तसेच प्रौढशिक्षणाच्या कार्यासही गती मिळाली आहे.
**........ म्हणून रात्रशाळा आणि साखरशाळा यांची समाजाला गरज आहे**

**प्रश्न ६. : पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही दोन) ...१०**

(1) प्रबोधनकाळातील विज्ञानाचा विकास व वैज्ञानिक शोध यांची सविस्तर माहिती लिहा.

उत्तर :

◈ प्रस्तावना : प्रबोधनकाळातील विज्ञानाचा विकास व वैज्ञानिक शोध यांची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे-

◈ मुख्य उत्तर :

☞ **प्रबोधनकाळातील विज्ञानाचा विकास :**

1.युरोपात सतराव्या शतकात निसर्गाचा अभ्यास करणाऱ्या शास्त्रज्ञांनी आधुनिक वैज्ञानिक ज्ञानाचा पाया रचला असे मानले जाते.
2.या काळातील शास्त्रज्ञांचा पुढील गोष्टींवर भर होता; प्रत्यक्ष प्रयोगाद्वारे वैज्ञानिक सिद्धान्तांना स्थलकालातीत महत्त्व आहे हे सिद्ध करणे, नव्याने शोधून काढलेले नियम सूत्रबद्ध करणे, नवी वैज्ञानिक परिभाषा तयार करणे. या प्रयत्नांतून आधुनिक विज्ञान प्रगत होत गेले.
3.विज्ञानातील संशोधनासाठी युरोपात काही संस्थाही स्थापन करण्यात आल्या होत्या. इंग्लंड-फ्रान्समध्ये शास्त्रज्ञांचे लेख प्रकाशित करणारी नियतकालिके चालवणे आणि पत्रव्यवहार, शंका समाधान, वैचारिक देवाण-घेवाण यांसाठी या संस्था काम करत.
4.त्यांमध्ये रोममधील 'ॲकेडमी ऑफ द लिंक्स आइड (लिंक्सिएन ॲकॅडमी)', फ्लॉरेन्समधील 'ॲकेडमी फॉर एक्सपिरिमेंट', लंडनमधील 'रॉयल सोसायटी फॉर इम्प्रुव्हिंग नॅचरल नॉलेज', फ्रान्समधील 'फ्रेंच ॲकेडमी ऑफ सायन्सेस' इत्यादी संस्था महत्त्वाच्या होत्या.

☞ **प्रबोधनकाळातील वैज्ञानिक शोध :**

1. होकायंत्र, दुर्बिण, सूक्ष्मदर्शक यंत्र, तपमापक यंत्र तसेच भारमापक यंत्र यांचा शोध या काळात लागला.
2. सूक्ष्मदर्शक यंत्रामुळे सूक्ष्मजंतूंचा अभ्यास करणे सोपे झाले. रॉबर्ट बॉईल याने वायूचे घनफळ त्यावरील दाबाच्या व्यस्त प्रमाणात बदलते हे शोधून काढले. हायड्रोजन, नायट्रोजन, ऑक्सिजन या वायूंसंदर्भात संशोधन सुरू झाले. भौतिकशास्त्रात उष्णता, ध्वनी यांच्या अभ्यासाला प्राधान्य मिळाले. प्राणीशास्त्रामध्ये प्राण्यांची वर्गवारी केली गेली.
3.इंग्लंडमध्ये लोकरीपासून वस्त्र विणणे हा व्यवसाय पूर्वापार चालत आलेला होता. हा व्यवसाय घरगुती स्वरूपाचा होता.

4.इ.स.१७३८ मध्ये जॉन के याने 'धावता धोटा' तयार केला. या धोट्यामुळे वस्त्र विणण्याच्या कामाची गती वाढली.
5.त्याच्या पुढचा टप्पा 'स्पिनिंग जेनी' या यंत्राने गाठला. इंग्लंडमधील जेम्स हरग्रीव्हज याने 'स्पिनिंग जेनी' नावाचे यंत्र तयार केले. या यंत्रावर एकाच वेळी सुताची आठ रिळेलावता येऊ लागली. त्यामुळे कामातील श्रम कमी झाले आणि कामाचा वेग वाढला.
6.इ.स.१७६९ मध्ये रिचर्ड आर्कराईट याने सूत कातण्यासाठी सुधारित यंत्र बनवले. या यंत्राद्वारे अधिक पीळदार व मजबूत धागे वेगाने तयार होऊ लागले.
7.इ.स.१७७९ मध्ये सॅम्युएल क्रॉम्प्टन याने 'म्यूल' नावाचे सुधारित सूतकताई यंत्र तयार केले. या यंत्रामुळे वस्त्र बनवण्याच्या कामाचा वेग जवळपास दोनशे पटींनी वाढला.
8.इ.स.१७८५ मध्ये एडमंड कार्टराईट याने 'यंत्रमाग' बनवला. इ.स.१७९३ मध्ये 'कॉटन जीन' नावाचे यंत्र आले. या यंत्राद्वारे कापसापासून सरकी वेगाने वेगळी करता येणे शक्य झाले.
◈ उपसंहार :
अशा प्रकारे, प्रबोधनकाळातील विज्ञानाचा विकास व वैज्ञानिक शोध यांची सविस्तर माहिती देता येईल

(2) आफ्रिका खंडातील निर्वसाहतीकरणाच्या प्रक्रियेची माहिती लिहा
उत्तर:
◈ प्रस्तावना : आफ्रिका खंडातील निर्वसाहतीकरणाच्या प्रक्रियेची माहिती पुढीलप्रमाणे ---
◈ मुख्य उत्तर :
1. १९१४ मध्ये पहिले महायुद्ध सुरू झाले. तेव्हा लायबेरिया आणि इथिओपिया वगळता संपूर्ण आफ्रिका खंड युरोपीय राष्ट्रांच्या सत्तेखाली होता.
2.पहिल्या महायुद्धादरम्यान सहभागी असलेल्या राष्ट्रांच्या वसाहती आफ्रिकेत असल्याने अप्रत्यक्षरीत्या या वसाहती युद्धात ओढल्या गेल्या. पहिले महायुद्ध सुरू होताच इंग्लंड व फ्रान्स यांनी जर्मनीच्या ताब्यात असणाऱ्या आफ्रिकन वसाहती जिंकून घेण्यासाठी त्यांच्यावर हल्ले केले.
3.महायुद्धात जर्मनीचा पराभव होताच जेत्या राष्ट्रांना पराभूत राष्ट्रांच्या ताब्यातील वसाहती आपल्या ताब्यात घेण्याची तीव्र इच्छा झाली. अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष वुड्रो विल्सन यांनी या प्रसंगी पुढील भूमिका मांडली.
4.त्यांच्या म्हणण्यानुसार जेत्या राष्ट्रांनी विश्वस्त या नात्याने वसाहती सांभाळणे योग्य होते. वसाहतींना स्वयंनिर्णयाचा अधिकार मिळणे आवश्यक होते.
5.राष्ट्रसंघाने परस्पर सामंजस्याने असे ठरवले की १९१९ मध्ये ब्रिटन, फ्रान्स व बेल्जियम या तीन राष्ट्रांनी आफ्रिकेमधील जर्मन वसाहती आपसात विभागून घ्याव्यात. या वसाहतींच्या राज्यकारभारावर देखरेख ठेवण्यासाठी राष्ट्रसंघाने ११ सभासदांचे एक स्थायी मंडळ नेमले.
6. १९२० मध्ये केप कॉलनी, नाताळ, ऑरेंज फ्री स्टेट आणि ट्रान्सवाल या चार ब्रिटिश वसाहतींचे एकत्रीकरण होऊन त्यांचे दक्षिण आफ्रिका हे राज्य निर्माण झाले. परंतु त्यांच्यावरील गोऱ्या लोकांचे वर्चस्व संपले नव्हते.
7.दुसऱ्या महायुद्धाच्या अगोदर इजिप्त स्वतंत्र राष्ट्र झाले. त्यानंतर लिबिया, ट्युनिशिया, मोरोक्को, अल्जेरिया आणि घाना ही राज्ये एकापाठोपाठ स्वतंत्र झाली.
8. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात मध्य आफ्रिकेतील आयव्हरी कोस्ट, मादागास्कर, माली यांसारख्या एकूण १२ फ्रेंच वसाहतीही स्वतंत्र झाल्या.
9.त्याचबरोबर संयुक्त राष्ट्रांच्या विश्वस्त मंडळाच्या देखरेखीखालील कॅमेरून, सोमालिया इत्यादी वसाहती तसेच विविध युरोपीय राष्ट्रांच्या वर्चस्वाखालील इतर वसाहतीही स्वतंत्र झाल्या.
10.या सगळ्या राष्ट्रांपैकी अल्जेरियाला मात्र कडवा संघर्ष करावा लागला.
11.१९६२ मध्ये सार्वमताच्या आधारावर अल्जेरियाला स्वातंत्र्य मिळाले.
12.टांगानिका व झांजीबार यांचे 'टांझानिया संयुक्त प्रजासत्ताक' या नावाने एप्रिल १९६४ मध्ये एकत्रीकरण झाले.
◈ उपसंहार :
अशा प्रकारे, आफ्रिका खंडातील निर्वसाहतीकरणाच्या प्रक्रियेची माहिती देता येईल

**(3) राज्यांची पुनर्रचना माहिती लिहा :**
उत्तर:
◈ प्रस्तावना :

इ.स.२००० हे वर्ष नवीन राज्यांच्या निर्मितीसाठी महत्त्वाचे ठरले. या वर्षात मोठ्या राज्यांचे (मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश आणि बिहार) विभाजन झाले आणि नवी राज्ये उदयाला आली. छत्तीसगढ (१ नोव्हेंबर २०००), उत्तराखंड (९ नोव्हेंबर २०००) आणि झारखंड (१५ नोव्हेंबर २०००) अशी तीन राज्ये उदयाला आली. भारताची भाषावार प्रांतरचना झाल्यावर प्रथमच अशा प्रकारे राज्यांची निर्मिती झाली.सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे --

◈ मुख्य उत्तर :

☞ **(अ) छत्तीसगढ :**

1. छत्तीसगढ राज्य निर्माण करण्यात यावे अशी मागणी स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात सर्वप्रथम करण्यात आली.

2.भारत स्वतंत्र झाल्यावर प्रांतरचनेच्या संदर्भात नेमलेल्या फाजल अली आयोगाने 'छत्तीसगढ' राज्य निर्मितीची मागणी फेटाळली.

3.१९९८ मध्ये मध्यप्रदेश विधानसभेत 'छत्तीसगढ' राज्य निर्मितीचा ठराव मान्य झाला.

4.पुढे केंद्र सरकारच्या पुढाकाराने छत्तीसगढ हे स्वतंत्र राज्य अस्तित्वात आले.

☞ **(ब) उत्तराखंड :**

1. गढवाल व कुमाऊँ भागातील जनतेने १९३० मध्येच उत्तराखंड राज्याची मागणी केली होती.

2.१९३८ च्या काँग्रेस अधिवेशनात त्याला पाठिंबा देण्यात आला. स्वातंत्र्योत्तर काळात फाजल अली आयोगाने उत्तराखंड राज्याची मागणी फेटाळली.

3.१९५७ पासून या भागातील जनतेने स्वतंत्र राज्यासाठी आंदोलन सुरू केले. १९७३ मध्ये 'उत्तराखंड पर्वतीय राज्य परिषद' स्थापन झाली. १९९४ मध्ये लोकआंदोलन तीव्र झाले. लोकांच्या भावनेची दखल घेऊन उत्तरप्रदेश राज्याच्या विधानसभेत स्वतंत्र राज्याचा ठराव संमत करण्यात आला.

4.२००० मध्ये उत्तरांचल हे स्वतंत्र राज्य अस्तित्वात आले. पुढे त्याचे उत्तराखंड असे नामांतर झाले.

| नवीन राज्य | कधी निर्माण झाले ? | कोणत्या राज्यातून निर्माण झाले ? |
|---|---|---|
| **छत्तीसगढ** | **१ नोव्हेंबर २०००** | **मध्यप्रदेश** |
| **उत्तराखंड** | **९ नोव्हेंबर २०००** | **उत्तरप्रदेश** |
| **झारखंड** | **१५ नोव्हेंबर २०००** | **बिहार** |
| **तेलंगण** | **२ जून २०१४** | **आंध्र प्रदेश** |

☞ **(क) झारखंड :**

1. १९२९ मध्ये झारखंड राज्याची मागणी पुढे आली. १९४७ मध्ये अखिल भारतीय झारखंड पार्टीची स्थापना होऊन राज्यनिर्मितीच्या मागणीला वेग देण्यात आला.

2.१९७३ मध्ये तत्कालीन राष्ट्रपती व प्रधानमंत्री यांना स्वतंत्र राज्यनिर्मितीचे निवेदन देण्यात आले.

3.१९९४ मध्ये बिहारच्या विधानसभेत झारखंड विकास स्वायत्त मंडळ स्थापनेचे विधेयक मंजूर झाले.

4.ऑगस्ट २००० मध्ये बिहारचे विभाजन करून स्वतंत्र झारखंड राज्य स्थापन करण्याची तरतूद असणारे विधेयक लोकसभेत मंजूर झाले. १५ नोव्हेंबर २००० रोजी झारखंड हे स्वतंत्र राज्य अस्तित्वात आले.

☞ **(ड) तेलंगण :**

1. हे राज्य २०१४ मध्ये अस्तित्वात आले. हे राज्य त्यापूर्वी आंध्र प्रदेश या राज्याचा भाग होते.

2.तेलंगण राष्ट्रीय समितीने तेलंगण हे वेगळे राज्य घोषित करण्यासाठी आंदोलन सुरू केले.

3.२००१ मध्ये भारत सरकारने तेलंगण हे स्वतंत्र राज्य होणार असे जाहीर केले.

4.२०१४ मध्ये संसदेने या प्रस्तावास मान्यता दिली. २ जून २०१४ रोजी तेलंगण हे स्वतंत्र राज्य अस्तित्वात आले.

◈ उपसंहार :

अशा प्रकारे, **नवीन राज्यांच्या निर्मिती तसेच पुनर्रचना** माहिती देता येईल

**प्रश्न ७. : खालील प्रश्नांची दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही तीन) ...१५**

(१) युरोपातील धर्मयुद्धाची माहिती लिहा

मुद्दे : (अ) अपयशाची कारणे

(ब) धर्मयुद्धांचे परिणाम

उत्तर :

◈ प्रस्तावना : जेरुसलेम आणि बेथेलहॅम ही शहरे ज्यू, ख्रिश्चन आणि इस्लाम या धर्मांच्या अनुयायांसाठी अत्यंत पवित्र आहेत. अकराव्या शतकात ही शहरे इस्लामी सत्ताधीशांच्या ताब्यात होती. ही शहरे परत मिळवण्यासाठी ख्रिश्चन धर्माच्या अनुयायांनी वेळोवेळी केलेल्या लढायांना धर्मयुद्धे (क्रुसेडस्) म्हणतात.

◈ मुख्य उत्तर :

☞ **(अ) अपयशाची कारणे :**

1.युरोपीय धर्मयुद्धामध्ये ख्रिस्ती धर्मयोद्ध्यांना अपयश आले, कारण पोप आणि युरोपातील सत्ताधीश यांनी या युद्धांकडे संकुचित हेतूंनी पाहिले.

2. धर्मावरील कमी झालेली श्रद्धा, पोप व जर्मन सम्राटातील वितुष्ट, बायझॅन्टाईन सम्राटांच्या सहकार्याचा अभाव या बाबी धर्मयुद्धांच्या अपयशास कारणीभूत होत्या.

3. युरोपातील विविध राजांमधील एकीचा अभाव होता.

☞ **<u>धर्मयुद्धांचे परिणाम</u>**

1.धर्मयुद्धांमुळे सरंजामशाहीचा अस्त झाला.

2.लोकांची पोपवरील श्रद्धा कमी झाली.

3. मध्य आशियाबरोबर वाढलेल्या व्यापारामुळे इटली आणि जर्मनीतील शहरांना नवी क्षेत्रे खुली झाली.

4.नवा व्यापारी वर्ग उदयाला आला. युरोपीय युद्धतंत्रात अनेक बदल घडून आले.

5.किल्लेबांधणी, किल्ल्यांचा लढाईचे ठाणे म्हणून उपयोग, लष्कराच्या वाहतुकीसाठी पूलबांधणी, शत्रूचे मार्ग उद्ध्वस्त करणे इत्यादी गोष्टींमध्ये युरोपीय राष्ट्रांनी प्राविण्य मिळवले.

6.लढाईचा खर्च भागवण्यासाठी युरोपमधील राजांनी नवीन कर लागू केले.

◈ उपसंहार : अशा प्रकारे युरोपातील धर्मयुद्धाच्या अपयशाची कारणे व परिणाम होते

(२) अफगाण&मराठे संबंध स्पष्ट करा

मुद्दे : (अ) अब्दालीची १७४८ मधील पहिली स्वारी

(ब) अब्दालीची १७५७ मधील तिसरी स्वारी

(क) अब्दालीची १७५९ मधील चौथी स्वारी (पानिपतचे तिसरे युद्ध )

उत्तर :◈ प्रस्तावना : १८ व्या शतकाच्या पूर्वार्धात दिल्लीचा बादशाह दिल्ली, आग्रा आणि पंजाब या भागाचा सत्ताधीश होता. त्याच काळात अब्दालीच्या भारतावर स्वाऱ्या झाल्या, ज्या अफगाण आक्रमण म्हणून ओळखल्या गेल्या

◈ मुख्य उत्तर :

☞ **(अ) अब्दालीची १७४८ मधील पहिली स्वारी :**

1.. इ.स.१७४८ मध्ये अफगाणिस्तानचा बादशाह अहमदशहा अब्दाली याची भारतावर पहिली स्वारी झाली.
2.दिल्लीच्या बादशाही फौजेने अब्दालीचा पराभव केला. याच वेळी दिल्लीच्या गादीवर अहमदशहा होता.
3.अब्दालीच्या स्वारीच्या वेळी अयोध्या, दिल्ली आणि आग्रा परिसरातील अफगाणांनी अहमदखान बंगश याच्या नेतृत्वाखाली अब्दालीला पाठिंबा दिला होता.

4. अब्दाली परत गेल्यावर बंगशने मुघलांविरुद्ध युद्ध केले. मुघलांनी शिंदे-होळकरांची मदत घेऊन अफगाणांचा पराभव केला.

☞ **(ब) अब्दालीची १७५७ मधील तिसरी स्वारी :**

1. इ.स.१७५७ मध्ये अब्दालीने भारतावर तिसऱ्यांदा आक्रमण केले. दिल्ली आणि मथुरा लुटून तो अफगाणिस्तानला परत गेला.

2.या वेळेस रघुनाथराव पेशवे यांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांची फौज पुण्याहून निघाली.

3.मराठ्यांचे सैन्य दिल्लीला पोचेपर्यंत अब्दाली परत गेला होता. मराठ्यांनी दिल्ली ताब्यात घेऊन येथील परिस्थिती पूर्ववत केली.

4. मराठे आणि शीख यांनी पंजाब मोहीम आखली. सरहिंद प्रांताचा पाडाव केला. लाहोर ताब्यात घेऊन मराठे अटक शहरापर्यंत पोचले.

☞ **(क) अब्दालीची १७५९ मधील चौथी स्वारी (पानिपतचे तिसरे युद्ध ):**

1. १७५९ मध्ये अब्दालीने भारतावर चौथी स्वारी केली. त्याचा प्रतिकार दत्ताजी आणि जनकोजी शिंदे यांनी केला.

2.अब्दालीचा वेग आणि आक्रमण एवढे तीव्र होते की पहिल्याच धडाक्यात त्याने पंजाब जिंकला. या लढाईत दत्ताजी शिंदे यांना वीरमरण आले.

3. अब्दालीने दिल्लीवर अंमल बसवला. अफगाणांना भारतातून कायमचे घालवण्यासाठी सदाशिवरावभाऊ पेशवे आणि विश्वासराव पेशवे यांच्या नेतृत्वाखाली मराठे पुण्यातून उत्तरेकडे निघाले.

4.१४ जानेवारी १७६१ रोजी यमुना नदीच्या तीरावर पानिपत येथे अब्दाली आणि मराठे यांच्यात मोठा रणसंग्राम झाला. हे युद्ध पानिपतचे 'तिसरे युद्ध' म्हणून ओळखले जाते.

5. या युद्धात सदाशिवराभाऊ पेशवे, विश्वासराव पेशवे मारले गेले. 'दोन मोत्ये गळाली, २७ मोहरा गमावल्या व चांदी आणि तांब्याची नाणी किती गेली याची गणतीच नाही.' असा सांकेतिक निरोप पुण्यास पोहचला.

6. 'भारतीयांसाठी भारत' अशी व्यापक भूमिका घेऊन मराठे पानिपतावर लढले. दिल्ली सांभाळणे अशक्य असल्याने अब्दाली दोनच महिन्यात अफगाणिस्तानला परतला. मराठ्यांकडून होणाऱ्या कडव्या प्रतिकाराची जाणीव झाल्यामुळे त्याची किंवा त्याच्या वारसदारांची भारतावर परत आक्रमण करण्याची हिंमत झाली नाही.

◈ **उपसंहार :** अशा प्रकारे अब्दालीच्या स्वाऱ्यांच्या निमित्ताने अफगाण - मराठे संबंध लक्षात येतात

(३) १८५७ पूर्वीच्या लढ्यांची माहिती लिहा

मुद्दे : (अ) भिल्लांचा उठा

(ब) रामोशी समाजाचा उठाव

(क) सावंतवाडीतील उठाव

उत्तर:

◈ **प्रस्तावना :** भारतीयांनी वसाहतवादाविरुद्ध लढण्याचा आदर्श जगासमोर ठेवला. त्यातून पारतंत्र्यातील अनेक देशांना स्वातंत्र्यलढ्याची प्रेरणा मिळाली. यात १८५७ स्वातंत्र्यलढ्याच्या पूर्वीचे काही लढे समाविष्ट आहेत

◈ मुख्य उत्तर :

☞ **(अ)** भिल्लांचा उठाव **:**

1. १८१८ मध्ये खानदेश इंग्रजांच्या ताब्यात गेला. सातपुडा, सातमाळा आणि अजिंठ्याच्या परिसरातील भिल्ल एकत्र आले. दुसऱ्या बाजीरावाचे विश्वासू सहकारी त्रिंबकजी डेंगळे कैदेतून निसटले आणि त्यांनी भिल्लांना प्रेरणा दिली. त्रिंबकजी डेंगळे यांचे पुतणे गोंदाजी व महिपा यांनी या उठावाचे नेतृत्व केले.

2.या उठावात हजारो भिल्लांनी भाग घेतला. कॅप्टन ब्रिग्ज याने या भिल्लांची कोंडी करण्यास सुरुवात केली. त्यांची रसद बंद केली.

3.इंग्रजी सत्तेचा प्रमुख माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टनने काही भिल्लांनाच वाटसरूंचे संरक्षण करण्याच्या कामावर नेमले. काही भिल्लांना नोकऱ्या व पेन्शन द्यायला सुरुवात केली. एका बाजूला भिल्लांना अशा सवलती देत असताना दुसऱ्या बाजूने मात्र त्यांची गळचेपी करण्यास सुरुवात केली.

4.मेजर मोरिन याने भिल्लांना शरण येण्यास भाग पाडले. १८२२ च्या दरम्यान 'हरिया' या भिल्लांच्या म्होरक्याचा उठाव कॅप्टन रॉबिन्सन याने दडपला. भिल्लांचा उठाव लेफ्टनंट औट्रॅम याने मोडून काढला.

5.त्याचबरोबर त्याने भिल्लांमध्ये राहून त्यांच्यात विश्वासही निर्माण केला. त्यांना शहरी जीवनात आणण्याचा त्याने प्रयत्न केला. माफीचे जाहीरनामे, जमिनी देणे, तगाई, मागील गुन्ह्यांची माफी यांमुळे भिल्लांचे उठाव करण्याचे प्रमाण पुढील काळात कमी झाले.

☞ **(ब)** रामोशी समाजाचा उठाव **:**

1.चितूरसिंग यांच्या नेतृत्वाखाली सातारा जिल्ह्यात रामोशी समाजाच्या लोकांनी उठाव केला.

2.संतू नाईक व उमाजी नाईक हे त्यांचे म्होरके होते. पुण्याहून मुंबईला जाणारा सावकारी ऐवज त्यांनी ताब्यात घेतला.

3.१८२४ मध्ये उमाजी नाईक यांनी पुण्याजवळील भांबुर्डे येथील सरकारी तिजोरी ताब्यात घेतली. त्यांनी इंग्रजांच्या नाकी दम आणला. या सगळ्या प्रकाराला आळा घालण्यासाठी उमाजी आणि त्यांचे सहकारी भुजबा, पांड्या व येसाजी यांच्यासाठी सरकारने प्रत्येकी ५ हजार रुपयांचे इनाम घोषित केले.

4. अखेर भोरजवळ इंग्रजांनी उमाजींना पकडले. उमाजी नाईक यांच्यावर खटला भरून त्यांना पुणे येथे फाशी देण्यात आली.

☞ **(क)** सावंतवाडीतील उठाव **:**

1. १८२८ मध्ये महादेवगडचा किल्लेदार फोंडसावंत तांदुळवाडीकर याने उठाव केला. मात्र, इंग्रजांनी हा उठाव मोडून काढला. इंग्रजांचे धोरण पाहून सावंतवाडीतील सरदारांनी एकत्र येऊन उठाव केला.
2.परंतु स्पूनर या पोलिटिकल एजंटने हा उठाव मोडून काढला. त्यानंतरही या उठावात सामील असलेल्या सरदारांपैकी काहींनी ब्रिटिशांविरुद्ध एक होऊन लढण्याचा प्रयत्न केला.
3.मात्र १८४५ मध्ये या परिसरात लष्करी कायदा पुकारण्यात आला. कॅप्टन औट्रॅम यानेहा उठाव पूर्णतः मोडून काढला.

◈ उपसंहार :

अशा प्रकारे १८५७ स्वातंत्र्यलढ्याच्या पूर्वी च्या लढ्यांची माहिती देता येईल.

(4) खालील समाज सुधारकांचे कार्य लिहा.

मुद्दे : (अ) राजा राममोहन रॉय
(ब) रामस्वामी नायकर

उत्तर:

◈ **प्रस्तावना :** राजा राममोहन रॉय व रामस्वामी नायकर या समाजसुधारकांचे कार्य पुढीलप्रमाणे

◈ मुख्य उत्तर :

☞ **(अ)** राजा राममोहन रॉय **:**

1. राजा राममोहन रॉय यांच्या वहिनीला सती जावे लागले. या घटनेचा त्यांच्या मनावर खोलवर परिणाम झाला.
2.रॉय यांनी सती प्रथेविरुद्ध एक पत्र इंग्रजी भाषेत लिहून प्रसिद्ध केले. धर्मग्रंथामध्ये सती जाणे हे धर्मकर्तव्य असल्याचा उल्लेख नाही, हे रॉय यांनीच सर्वप्रथम सिद्ध केले.
3.१८२९ मध्ये गव्हर्नर जनरल लॉर्ड विल्यम बेंटिंक याने सती प्रथा नष्ट केली. त्यामागे रॉय यांचे प्रयत्न कारणीभूत होते. बालविवाह आणि पडदा पद्धत यालाही त्यांचा विरोध होता.
4.त्यांनी इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू केली. बंगाली भाषेतील पहिले साप्ताहिक सुरू केले. पुढे त्यांनी पर्शियन भाषेतील दैनिक सुरू केले.
5. १८२४ मध्ये ईस्ट इंडिया कंपनी सरकारने वृत्तपत्रांवर कडक नियंत्रणाचा कायदा केला. रॉय यांनी चंद्रकुमार ठाकूर, द्वारकानाथ ठाकूर, हरचंद्र घोष, गौरीचरण बॅनर्जी आणि प्रसन्नकुमार ठाकूर यांच्या स्वाक्षऱ्यांचे एक निवेदन सरकारला पाठवले. गव्हर्नर जनरलने या निवेदनाकडे दुर्लक्ष केल्यावर रॉय यांनी इंग्लंडच्या राजाकडे अर्ज पाठवला.

☞ **(ब)** रामस्वामी नायकर **:**

1. रामस्वामी नायकर यांनी गांधीवादी विचारसरणीचा स्वीकार करून स्वदेशीचा प्रसार आणि सर्व जातींना मंदिरप्रवेश यासाठी ते कार्यरत होते.
2.अस्पृश्यांवरील निर्बंध दूर करण्यासाठी त्रावणकोरमध्ये झालेल्या 'वायकोम सत्याग्रहा'त त्यांनी भाग घेतला होता.
3. तमिळनाडूमध्ये त्यांनी स्वाभिमान आंदोलन सुरू केले. वर्णव्यवस्था, बालविवाह यांच्या विरोधात त्यांनी लढा उभारला.
4. या कामांमुळे लोक त्यांना पेरियार (महान आत्मा) म्हणून ओळखू लागले.
5. ते प्रभावी वक्ते आणि लेखक होते. त्यांनी स्त्रियांचे हक्क, संततीनियमन या विषयांवर क्रांतिकारक भूमिका घेतली.

◈ उपसंहार :

अशा प्रकारे, राजा राममोहन रॉय व रामस्वामी नायकर या समाजसुधारकांचे कार्य आहे.

**(5) देशी बियाणे संवर्धन कार्यात योगदान देणाऱ्या राहीबाई पोपेरे यांच्या कार्याची माहिती लिहा**

**मुद्दे : (अ) कार्याची सुरुवात :**

**(ब) कार्य :**

**(क) पुरस्कार :**

उत्तर:

◈ प्रस्तावना : देशी बियाणे संवर्धन कार्यात योगदान देणाऱ्या राहीबाई पोपेरे यांच्या कार्याची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे --

◈ मुख्य उत्तर :

☞ **(अ) कार्याची सुरुवात :**

1. संकरीत धान्य आणि भाजीपाला खाऊन राहीबाई पोपेरे यांचा नातू आजारी पडला. त्यावर उपाय शोधण्याच्या प्रयत्नातून राहीबाईंना देशी वाण वापरणे हा उपाय सुचला.
2. राहीबाई पोपेरे यांनी कुटुंबासाठी लागणारे धान्य आणि भाजीपाला देशी वाणातून निर्माण करण्याचे ठरवले. घरात खाण्यासाठी देशी वाण पिकवायचे आणि पीक आल्यावर त्यातून निवडक बिया साठवून ठेवायच्या असे काम त्यांनी सुरू केले.

☞ **(ब) कार्य :**

1. राहीबाई पोपेरे ह्या मातीच्या मडक्यात देशी वाणाचे बियाणे जतन करतात. मातीच्या मडक्याला शेणामातीने लिंपतात. त्यामुळे बियाणांना भुंगे किंवा मुंग्या लागत नाहीत. मडक्यात राखेचा व कडुनिंबाचा वापर करतात.
2. आता या बियाणे बँकेत ५० हून अधिक पिकांचे, ३० हून अधिक भाजीपाल्याचे वाण जमा झाले आहेत.
3. . कारले, पालक, तांदुळजा, गोड वाल, कडू वाल, घेवडा, भुईमूग, वरई, ढवूळ भात, काळभात, आंबेमोहोर, उडीद अशा विविध प्रकारच्या भाज्या, रानभाज्या आणि कडधान्यांचे वाण त्यांनी जपले आहे.
4. स्वतःच्या घरापासून सुरू झालेला उपक्रम त्यांनी बचतगटाच्या माध्यमातून सर्वत्र पोहचवायला सुरुवात केली. भारतीय ॲग्रो इंडस्ट्रीज फाऊंडेशनच्या (बाएफ) सहकार्यानेहा उपक्रम फोफावला आहे.

☞ **(क) पुरस्कार :**

1. बीबीसीने २०१८ मध्ये विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या जगभरातील १०० महिलांची निवड केली. त्यात राहीबाईं पोपेरेचा समावेश आहे.
2. ८ मार्च २०१८ रोजी भारताच्या राष्ट्रपतींनी महाराष्ट्रातील राहीबाई पोपेरे यांना नारी शक्ती पुरस्कार दिला. 'कळसुबाई परिसर बियाणे संवर्धन समिती'च्या माध्यमातून केलेल्या कामाबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात आला त्या बीजमाता (सीडमदर) या टोपण नावाने सर्वत्र ओळखल्या जातात.
3. सन २०२० मध्ये भारत सरकारने त्यांना पद्मश्री पुरस्कार देऊन गौरवले आहे.

◈ उपसंहार :

अशा प्रकारे] देशी बियाणे संवर्धन कार्यात योगदान देणाऱ्या राहीबाई पोपेरे यांच्या कार्याची माहिती देता येईल

◈◆◈◆◈◆◈◆◈◆

# नमुना प्रश्नपत्रिका – 3

**एकूण गुण : ८०**

**प्रश्न १ (अ ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा ...०६**

1) जर्मनीच्या बिस्मार्कने पश्चिम आफ्रिकेत जर्मनीची .............. ही पहिली वसाहत स्थापन केली.
अ) मोझांबिक ब) टोगोलँड क) कामरून ड) नैऋत्य आफ्रिका)
2) वास्को-द-गामा ............. या देशाचा दर्यावर्दी होता.
अ) पोलंड ब) इंग्लंड क) फ्रान्स ड) पोर्तुगाल
3) पानिपतचे तिसरे युद्ध मराठे आणि ................. यांच्यात झाले.
अ) इंग्रज ब) अब्दाली क) अहमद खानबंगश ड) नजीबखान
4) १९८६ च्या ................. येथील परिषदेतील आफ्रिकेच्या मदतीसाठी 'आफ्रिका फंड' स्थापन करण्यात आला.
(अ) जकार्ता (ब) हरारे (क) नामिबिया (ड) इंडोनेशिया
5) दुसऱ्या महायुद्धानंतर ................... या आंतरराष्ट्रीय संघटनेची स्थापना करण्यात आली.
अ) राष्ट्रसंघ ब) संयुक्त राष्ट्र क) पॅरिस शांतता परिषद ड) किग्ज कमिशन
6) 1947 च्या जिनिव्हा परिषदेत जो करार झाला तो ........... करार म्हणून ओळखला जातो.
अ) सिएटो ब) नाटो क) गॅट ड) सार्क

**(ब) पुढील प्रत्येक संचातील ब गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा ...०४**

**1)**

| 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|
| (अ) अमेरिका | -- | वुड्रो विल्सन |
| (ब) इंग्लंड | -- | विस्टन चर्चिल |
| (क) जर्मनी | -- | हिटलर |
| (ड) इटली | -- | लिनलिथगो |

2)

| 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|
| (अ) हैदराबाद संस्थानांचे विलीनीकरण | -- | स्वामी रामानंद तीर्थ |
| (ब) काश्मीर संस्थानाचे विलीनीकरण | -- | शेख अब्दूल्ला |
| (क) गोवा मुक्ती लढ्यातील मोलाचे योगदान | -- | मोहन रानडे |
| (ड) पुद्दुचेरी येथील कामगार | -- | व्ही. सुबय्या |

3)

| 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|
| (अ) स्त्री-पुरूष तुलना | -- | ताराबाई शिंदे |
| (ब) डिप्रेस्ड मिशन | -- | महर्षी विठ्ठलरामजी शिंदे |
| (क) वायकोम सत्याग्रह | -- | रामस्वामी नायकर |
| (ड) मुकनायक वृत्तपत्र | -- | महात्मा फुले |

4)

| 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|
| (अ) चिपको आंदोलन | -- | सुंदरलाल बहुगुणा |
| (ब) नर्मदा बचाव आंदोलन | -- | मेधा पाटकर |
| (क) जलसंधारण क्षेत्र | -- | अशोक मेहता |
| (ड) मुस्लीम सत्यशोधक समाज | -- | हमीद दलवाई |

**प्रश्न २ (अ ) ऐतिहासिक व्यक्ती, ठिकाण, घटना यासंबंधीची नावे लिहा ...०४**

1) इजिप्तची जीवनदायिनी ..............
2) फ्रेंचांच्या तालमीत तयार झालेल्या मराठ्यांच्या तोफखान्याचा प्रमुख ..............
3) ब्रिटिशांचा सुरतेचा प्रेसिडेंट ..............

4)  2002 मध्ये या शहरात मेट्रो सेवा सुरू झाली ...............

**(ब) दिलेल्या कारणांपैकी योग्य कारण निवडून विधाने पूर्ण करा …०४**


1) डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांनी अनेक वृत्तपत्र सुरू केली कारण ........
   i) त्यांना वृत्तपत्रांचा प्रसार करायचा होता.
   ii) वृत्तपत्र हे समूह संपर्क माध्यम आहे.
   iii) त्यांनी वृत्तपत्रांकडे चळवळीचे एक साधन म्हणून पाहीले.
   iv) वृत्तपत्र हे उत्पन्नाचे साधन होते.

2) 15 ऑगस्ट 1945 रोजी जपानने दुसऱ्या महायुद्धात शरणागती पत्करली : कारण ......
   i) जपानकडे लष्करी ताकद कमी होती.
   ii) अमेरिकेने हिरोशीमा व नागासाकी ह्या शहरांवर अणूबॉम्ब टाकले.
   iii) जर्मनीने जपानला मदत करण्याचे थांबवले
   iv) अमेरिकेने जपानच्या ताब्यातून फिलीपाईन्स परत घेतले.

3)  दुसऱ्या महायुद्ध काळात इंग्लंडच्या युद्धकार्यात सहभागी व्हायचे नाही असा निर्णय राष्ट्रीय सभेने घेतला; कारण
   i) महायुद्ध सुरू असेपर्यंत भारतासंबंधी कोणताही निर्णय इंग्लंडचे सरकार घेणार नाही असे लिनलिथगो यांनी जाहीर केले.
   ii) इंग्लंड व फ्रान्स यांच्याविरुद्ध जर्मनी व इटली असे युद्धाचे प्रारंभीचे स्वरूप होते.
   iii) दुसऱ्या महायुद्ध काळात इंग्रज व फ्रेंचांनी वसाहतींना काही अधिकार द्यायला सुरूवात केली.
   iv)  युद्धकाळात इंग्लंडला मनुष्यबळाची व पैशांची गरज निर्माण झाली.

4) भारताने जागतिक व्यापार संघटनेंचे सभासदस्व स्वीकारले, कारण.....
   i) भारताला इतर देशांशी व्यापारी स्पर्धा करण्याची होती.
   ii) भारत जागतिक अर्थव्यवस्थेपासून लांब राहू शकत नाही.
   iii) भारताला मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारायची होती.
   iv) भारताला जागतीक पातळीवर नेतृत्व करायचे होते.

**प्रश्न ३ (अ ) पुढील नकाशाचे निरीक्षण करून प्रश्नांची उत्तरे लिहा …०५**





1) कोणत्या दोन खलाशांनी युरोपातून अमेरिका खंडाकडे प्रवास केला.


2) आफ्रीका खंडाच्या दक्षिण टोकाला काय म्हणतात ?
3) जगाच्या दक्षिण दिशेला कोणता समुद्र आहे ?
4) मादागास्कर हे बेट कोणत्या महासागरात आहे ?
5)वास्को-दी-गामा भारतातील कोणत्या बंदरात उतरला ?

**(ब ) दिलेली संकल्पनाचित्रे पूर्ण करा (कोणतीही चार)** **...०८**

1)





**2) कालरेषा पुर्ण करा.**





**3) पुढील तक्ता पूर्ण करा.**

| **संस्था** | **संस्थापक** |
|---|---|
| रामकृष्ण मिशन | ......................................... |
| ......................................... | स्वामी दयानंद सरस्वती |
| ब्राह्मो समाज | ......................................... |
| सत्यशोधक समाज | ......................................... |


4)



5)




6)




**प्रश्न ४ (अ ) संक्षिप्त टिपा लिहा (कोणत्याही तीन) ...०६**

1) आर्थिक राष्ट्रवाद 2) प्रतिसरकार 3) राष्ट्रसंघ
4) बांडूंग परिषद 5) ब्रिक्स (BRICS)

**(ब ) पुढील विधाने सकारण स्पष्ट करा (कोणतीही तीन) ...०९**

1)युरोपातील 15 वे व 16 वे शतक हा प्रबोधनाचा उत्कर्षकाळ समजला जातो.
2)अमेरिकेतील वसाहतींनी वसाहतवादाविरूद्ध युद्ध पुकारले.
3)गोव्यातील हाताशी आलेल्या विजय सोडून छत्रपती संभाजी महाराजांना माघारी परतावे लागले.
4)हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले.
5)दुसरे महायुद्ध संपताच निर्वसाहतीकरणास चालना मिळाली.

**प्रश्न ५ खालील विधानांवर तुमचे मत नोंदवा (कोणतेही तीन) ...०९**

1) छत्रपती शिवाजी महाराजांनी आरमार दल उभारले.
2) 1857 चे स्वातंत्र्ययुद्ध हे स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या मते "भारतीयांचे पहिले स्वातंत्र्ययुद्ध" होते.
3) इ.स. 1961 पर्यंत गोव्यातील पोर्तुगीज राजवट अबाधित राहीली.
4) भारताने वसाहतवाद विरोधात नेहमीच भूमिका मांडली आहे.
5) पर्यटन स्थळांची काळजी सर्वांनी घ्यावी.

**प्रश्न ६. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही दोन) ...१०**

1)सर सय्यद अहमदखान यांनी केलेले कार्य लिहा.

2) पोर्तुगीजांनी भारतात  ज्या ठिकाणी सत्ता स्थापन केली तेथील लोकांवर कोणकोणती बंधने लादली ?
3) माहीतीचा अधिकार अधिनियमाची माहिती लिहा.

**प्रश्न ७.  खालील प्रश्नांची दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही  तीन)        ...१५**

1) म्यानमार वसाहतींच्या स्वातंत्र्याची माहिती लिहा.
मुद्दे : -   (अ)   पहिले ब्रह्मी युद्ध
(ब)  दुसरे ब्रह्मी मुद्दे
(क) तिसरे ब्रह्मी युद्ध

2) पहिल्या महायुद्धाची कारणे लिहा.
मुद्दे : -   (अ)   साम्राज्यवादी धोरणे
(ब)   शस्त्रास्त्र वाढ स्पर्धा
(क) तत्कालीन कारण

3) सशस्त्र क्रांतीतील क्रांतिकारी संघटनांचे योगदान स्पष्ट करा-
मुद्दे : - -  (अ)    अनुशीलन समिती
(ब)   इंडिया हाऊस
(क) गदर

4) सार्क संघटने विषयी खालील मुद्यांवरून माहिती लिहा-
मुद्दे : - -  (अ)     स्थापना
(ब)   उद्दिष्टे
(क)   घोषणापत्र ( सार्कच्या पहिल्या अधिवेशन)

5) ग्रामीण भागाच्या विकासाच्या योजना
मुद्दे : - -(अ)  प्रधानमंत्री योजना
(ब)    ग्रामीण स्वयंरोजकार योजना
(क)   कृषी व पशुधन

.................................................................................

# आदर्श उत्तरपत्रिका -प्रश्नपत्रिका – 3

**प्रश्न १ (अ ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा                              ...०६**

1) जर्मनीच्या बिस्मार्कने पश्चिम आफ्रिकेत जर्मनीची **<u>टोगोलँड</u>** ही पहिली वसाहत स्थापन केली.
2) वास्को-द-गामा **<u>पोर्तुगाल</u>** या देशाचा दर्यावर्दी होता.
3) पानिपतचे तिसरे युद्ध मराठे आणि **<u>अब्दाली</u>** यांच्यात झाले.
4) १९८६ च्या **हरारे** येथील परिषदेतील आफ्रिकेच्या मदतीसाठी 'आफ्रिका फंड' स्थापन करण्यात आला.
5) दुसऱ्या महायुद्धानंतर **<u>संयुक्तराष्ट्र</u>** या आंतरराष्ट्रीय संघटनेची स्थापना करण्यात आली.
6) 1947 च्या जिनिव्हा परिषदेत जो करार झाला तो **<u>गॅट</u>** करार म्हणून ओळखला जातो.

**(ब) पुढील प्रत्येक संचातील ब गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा                                    ...०४**

**1)** <u>चुकीची जोडी :</u> इटली -- लिनलिथगो
☛ दुरुस्त केलेली जोडी : **<u>इटली -- मुसोलिनी</u>**

**2)** चुकीची जोडी : काश्मीर संस्थानाचे विलीनीकरण -- शेख अब्दूल्ला

☛ दुरुस्त केलेली जोडी : **<u>काश्मीर संस्थानाचे विलीनीकरण -- राजा हरिसिंग</u>**

**3)** चुकीची जोडी : मुकनायक वृत्तपत्र --- महात्मा फुले

☛ दुरुस्त केलेली जोडी : **<u>मुकनायक वृत्तपत्र --- डॉ . बाबासाहेब आंबेडकर</u>**

**4)** चुकीची जोडी : जलसंधारण क्षेत्र -- अशोक मेहता

☛ <u>दुरुस्त केलेली जोडी : **जलसंधारण क्षेत्र -- डॉ. राजेंद्र सिंह**</u>

**प्रश्न २ (अ ) ऐतिहासिक व्यक्ती, ठिकाण, घटना यासंबंधीची नावे लिहा ...०४**

1) इजिप्तची जीवनदायिनी ---- **<u>नाईल नदी</u>**
2)फ्रेंचांच्या तालमीत तयार झालेल्या मराठ्यांच्या तोफखान्याचा प्रमुख – **इब्राहिमखान गारदी**
3) ब्रिटिशांचा सुरतेचा प्रेसिडेंट **– सर जॉर्ज ऑक्झिंडेन**
4)2002 मध्ये या शहरात मेट्रो सेवा सुरू झाली - **दिल्ली**

**(ब) दिलेल्या कारणांपैकी योग्य कारण निवडून विधाने पूर्ण करा ...०४**

1) डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांनी अनेक वृत्तपत्र सुरू केली कारण ........ **त्यांनी वृत्तपत्रांकडे चळवळीचे एक साधन म्हणून पाहीले.**

2) 15 ऑगस्ट 1945 रोजी जपानने दुसऱ्या महायुद्धात शरणागती पत्करली : कारण ......**अमेरिकेने हिरोशीमा व नागासाकी ह्या शहरांवर अणूबॉम्ब टाकले.**

3) दुसऱ्या महायुद्ध काळात आफ्रीकेतील स्वातत्र्य चळवळ अधिक तीव्र झाली; कारण...**दुसऱ्या महायुद्ध काळात इंग्रज व फ्रेंचांनी वसाहतींना काही अधिकार द्यायला सुरूवात केली.**


4) भारताने जागतिक व्यापार संघटनेंचे सभासदस्व स्वीकारले, कारण.....**भारताला मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारायची होती.**

**प्रश्न ३ (अ ) पुढील नकाशाचे निरीक्षण करून प्रश्नांची उत्तरे लिहा ...०५**

1) कोलंबस व अमेरिगो वेस्पुसी या दोन खलाशांनी युरोपातून अमेरिका खंडाकडे प्रवास केला.
2) आफ्रीका खंडाच्या दक्षिण टोकाला "केप आफ गुड होप" असे म्हणतात.
3) जगाच्या दक्षिण टोकाला "अंटार्क्टिका समुद्र आहे.
4) मादागास्कर हे बेट हिंदी महासागरात आहे.
5) वास्को-दी-गामा भारतातील कालिकत या बंदरात उतरला.


**(ब ) दिलेली संकल्पनाचित्रे पूर्ण करा (कोणतीही चार) ...०८**

1)




(या व्यतिरिक्त – माहे, मच्छलीपट्टण, बालासोर व राजापुर)


**2) कालरेषा पुर्ण करा.**




**3) पुढील तक्ता पूर्ण करा.**


| **संस्था** | **संस्थापक** |
|---|---|
| रामकृष्ण मिशन | **स्वामी विवेकानंद** |
| **आर्य समाज** | स्वामी दयानंद सरस्वती |
| ब्राह्मो समाज | **राजाराममोहन रॉय** |
| सत्यशोधक समाज | **महात्मा फुले** |

4)





(या व्यतिरिक्त – डॉ. डी. बी. शिरोडकर, डॉ. राम मनोहर लोहीया)

5)



6)




**प्रश्न ४ (अ ) संक्षिप्त टिपा लिहा (कोणत्याही तीन)** **...०६**

**1) आर्थिक राष्ट्रवाद -**

1. युरोपात औद्योगिक क्रांतीच्या उदयानंतर आर्थिक राष्ट्रवादाचा उदय झाला.
2. आर्थिक राष्ट्रवादात स्वत:च्या देशाचे आर्थिक हीत पाहीले जाते आणि इतर राष्ट्रांची आर्थिक नाकेबंदी करणे आवश्यक असते म्हणून जे आपले स्पर्धक राष्ट्रे आहेत त्यांच्या व्यापारावर आर्थिक निर्बंध कसे घालता येतील ह्याचा विचार होऊ लागला.
3.मग त्यात इतर देशांच्या आयात-निर्यातीवर बंदी घालणे, जबर जकात लादणे याचा समावेश केला. प्रतिस्पर्धी राष्ट्र जिथे वसाहती स्थापन करत आहे तिथे आपल्याही वसाहती स्थापन करणे, प्रसंगी युद्ध करणे, तह करणे ह्या बाबींचा ही आर्थिक राष्ट्रवादात समावेश होता.
4.औद्योगिक क्रांतीने ज्या अतिरिक्त उत्पादनाचा प्रश्न निर्माण झाला, त्यातूनच आर्थिक राष्ट्रवादाला – पर्यायाने साम्राज्य वादाला एक प्रकारे बळ मिळाले.

**2) प्रतिसरकार –**

1.1942 साली सुरू झालेल्या जन-आंदोलनाच्या काळातच देशाच्या विविध भागात भूमिगत चळवळी सुरू झाल्या आणि प्रतिसरकारे स्थापन झालीत बंगालमधील मिदनापुर, उत्तर प्रदेशातील बलिया व अझमगड, बिहारमधील भागलपुर व पूर्णीया येथे प्रतिसरकारे स्थापन झाली.
2.महाराष्ट्रात क्रांतिसिंह नाना पाटील यांनी सातारा जिल्ह्यात प्रतिसरकार स्थापन केले. आपल्या सहकार्यांच्या मदतीने तेथील ब्रिटीश संपुष्टात आणले आणि जनतेचे सरकार स्थापन केले. कर गोळा करणे, कायदा व सुव्यवस्था टिकवणे, खटल्यांचा निकाल देणे, गुन्हेगारांना शिक्षा करणे इ. कामे प्रतिसरकार करत असे.

**3) राष्ट्रसंघ –**

1.पहिल्या महायुद्धाचे जगावर भयानक परिणाम पाहून असे युद्ध पुन्हा होऊ नये त्यासाठी उपाययोजना कराव्यात असे सर्वच राष्ट्रांना वाटू लागले.
2.18 जानेवारी 1919 रोजी पॅरिस येथे भरलेल्या शांतता परिषदेत वुड्रो विल्सन या अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाने राष्ट्रसंघ स्थापन करण्याची कल्पना मांडली. शांतताप्रेमी व ध्येयवादी असलेले बुड्रो विल्सन ह्यांनी आपल्या पस्तावात राष्ट्रा-राष्ट्रातील कुलह समोपचाराच्या मार्गाने मिटवले जावे, जगात शांतता प्रस्थापित करावी, अशी भूमिका मांडली. ह्याला इतर राष्ट्रांनी संमती दर्शवली,
3.आंतरराष्ट्रीय शांतता, सुरक्षितता ह्या हेतूने काही राष्ट्रांनी एकत्र येऊन जागतिक पातळीवरील संस्था अस्तित्वात आली. तिलाच "राष्ट्रसंघ" असे म्हणतात. राष्ट्रसंघात मात्र अमेरिकेने सदस्यत्व घेतले नाही तर इंग्लंड व फ्रान्स या देशांचेच वर्चस्व राहीले.

**4) बांडूंग परिषद –**

1.आशिया खंडात भारताने 1947 मध्ये पहिली आशियाई परिषद घेतली होती या परिषदेत 25 राष्ट्रांचे प्रतिनिधी हजर होते. ह्या परिषदेत झालेल्या चर्चेतून "आशियाई प्रादेशिकतावादाची संकल्पना पुढे आली.
2.आशियातील जनतेचे प्रश्न, आशियाच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक समस्यांकडे लक्ष वेधणे, परस्पर सहकार्यावर भर देणे, ह्यावर विचार विनिमय झाला.

3.या पार्श्वभूमीवर 1955 मध्ये इंडोनेशियातील बांडूंग येथे पहिली आशियाई-आफ्रीकन राष्ट्रांची परिषद भरली.या परिषदेत आफ्रो-आशियाई जनतेच्या प्रश्नांची चर्चा, जागतिक शांततेस प्राधान्य आणि सहकार्यावर भर देण्याचे ठरले. ह्या परिषदेमुळे नव्याने स्वतंत्र झालेल्या आशिया आफ्रीका खंडातील जनतेचे प्रश्न  मार्गी  लागण्यास मदत झाली.

**5) ब्रिक्स (BRICS) –**

1.2006 मध्ये ब्रिक्स या आंतरराष्ट्रीय संघटनेची स्थापना झाली.

2.ह्यात ब्राझील, रशिया, भारत, चीन व दक्षीण आफ्रीका ह्या पाच देशांचा समावेश होता.

3. या देशांच्या इंग्रजी अद्याक्षरावरून BRICS ब्रिक्स हे नाव तयार झाले. या राष्ट्रांमधील व्यापार वाढवणे, व्यापारातील अडचण दूर करणे. ह्या उद्देशातून ही संघटना स्थापन झाली.

4.2019 मध्ये ब्राझील येथे अकरावी परिषद झाली. ह्या परिषदेत वैज्ञानिक सहकार्य, तंत्रज्ञान, डिजीटल अर्थव्यवस्था बहुराष्ट्रीय गुन्हेगारी, आर्थिक 'गैरव्यवहार', इ. विषयांवर चर्चा झाली.

**(ब ) पुढील विधाने सकारण स्पष्ट करा (कोणतीही तीन)** **...०९**

1) युरोपातील 15 वे व 16 वे शतक हा प्रबोधनाचा उत्कर्षकाळ समजला जातो. कारण....

1.15 व्या व 16 व्या शतकात युरोपात बुद्धीवाद आणि वैज्ञानिक विचारसरणीचा विकास झाला. विज्ञानात नवनवे प्रयोग सुरू झाले.

2.माणसाच्या बुद्धीला, प्रतिमेला आणि जीवन पद्धतीला नवी दिशा मिळाली.

3.वैज्ञानिक पद्धतीने विश्वाची रहस्ये उलगडता येतील हे समजून घेण्यात लोकांना रूची वाटू लागली.

4.काव्य, नाटक, साहित्य, कला हे विषय हाताळण्यात येऊ लागले आणि विश्वाच्या अस्तित्त्वाचा विचार करता ईश्वर हा केंद्रबिंदू मानण्या ऐवजी मोनव हा केंद्रबिंदू बनला. मानवाच्या झालेल्या वैचारिक बदलामुळे हा काळ प्रबोधनाचा उत्कर्ष काळ समाजला जातो.

2) अमेरिकेतील वसाहतींनी वसाहतवादाविरूद्ध युद्ध पुकारले. कारण....

1. वसाहतवादात इंग्लंडने अमेरिकेत इ.स. 1496 पासून ते इ.स. 1774 पर्यंत अनेक वसाहती स्थापन केल्या.
2. इंग्लंडने वसाहतींची नाकेबंदी केली यातून जल वाहतूकीचा कायदा केला. मालाची वाहतुक करण्याची मक्तेदारी फक्त इंग्लंडमधील कंपन्यांची राहीली.
3. 1765 मध्ये स्टॅम्प ॲक्ट केला.
4. ब्रिटिश संसदेने अमेरिकेतील वसाहतीत चहा विकण्याची मक्तेदारी फक्त ईस्ट इंडिया कंपनीला दिली.
5. तेव्हा अमरिकन वसाहतीतील लोकांनी वसाहतीवरील निर्बंध इंग्लंडने रद्द करावेत, वसाहतींना स्वायत्तता द्यावी अशी मागणी केली.
6. इंग्लंडने नकार दिला 1773 मध्ये "बोस्टन टी पार्टी" घडून आली शेवटी 1774 च्या फिलाडेल्फिया येथे भरलेल्या अधिवेशनात ब्रिटनच्या मालाच्या आयात व निर्यातीला विरोध केली, यातून अमेरिकेतील वसाहतींनी वसाहतवादाविरूद्ध लढा पुकारला.

3) गोव्यातील हाताशी आलेल्या विजय सोडून छत्रपती संभाजी महाराजांना माघारी  परतावे लागले कारण....

1.मुघल बादशाह औरंगजेब यांच्याशी गोव्याच्या पोतुगीतांशी छत्रपती संभाजी महाराजांच्या विरूद्ध हातमिळवणी केली. त्यामुळे पोतुगीजांना अद्दल घडवणे आवश्यक होते.

2.संभाजी महाराजांनी पोर्तुगीजांच्या रेवदंडा बंदरावर हल्ला केला. त्याला प्रत्युत्तर म्हणून पोर्तुगीजांनी गोव्याच्या सीमेवरील मराठ्यांच्या फोंडा किल्ल्यास वेढा दिला.

3.मराठ्यांनी हा वेढा मोडून काढून गोव्यावर हल्ला केला. ह्या हल्ल्यात पोर्तुगीज गव्हर्नर जखमी झाला.

4.पोर्तुगीजांना माघार  घ्यावी लागली. गोवा मराठ्यांच्या हाती पडणार तोवर मुघलांनी स्वराज्यावर आक्रमण केल्याची बातमी आली. मुघलांना प्रतिकार करून स्वराज्याचे रक्षण करण्यासाठी गोव्याची यशस्वी होत असलेली मोहीम अर्धवट सोडून छत्रपती संभाजी महाराजांना माघारी परतावे लागले.

4) हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले. कारण....

1.हैदराबादवर निजामाची सत्ता होती. निजाम हा गुलामी व अत्याचारी असल्याने तेथील जनतेने निजामाच्या

जोखडातून मुक्त होण्यासाठी प्रयत्न सुरू केले.
2.निजामाचा कल पाकिस्तानकडे असल्याने त्याने जनतेच्या नागरी हक्कांवर बंदी आणली. निजामाच्या पाठींब्याने स्थापन झालेल्या रझाकार संघटनेने हिंदूंवर व मुस्लीमांवरही अत्याचार केले.
3.भारत सरकारने निजामाशी समोपचाराची बोलणी करण्याचा प्रयत्न केला पण तो अयशस्वी झाला.
4.शेवटी भारत सरकारने निजामाविरूद्ध पोलीस कारवाई केली. हैदराबाद येथे सैन्य पाठवले. "ऑपरेशन पोलो" यशस्वी होऊन निजामाने शरणागती पत्करली आणि हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले.

5) दुसरे महायुद्ध संपताच निर्वसाहतीकरणास चालना मिळाली. कारण
1.विसाव्या शतकाच्या प्रारंभी निर्वसाहतीकरणाला चालना मिळाली.
2.दुसऱ्या महायुद्धामुळे युरोपीय राष्ट्रांची अवस्था दयनीय झाली. त्यांचे वसाहतींवरील नियंत्रण कमकुवत झाले.
3.भारतात म. गांधीजींच्या नेतृत्वात स्वातंत्र्य चळवळ सुरू झाली. आशिया खंडातील राष्ट्र जागृतीने आफ्रीका खंडातील राष्ट्र भावनेस प्रोत्साहन दिले. स्वातंत्र्य लढे प्रखर झाले.
4.पाश्चात्य शिक्षणाचा प्रभाव, त्यातून मिळालेली स्वातंत्र्य – समानता इ. मुल्ये ह्यातून जनतेत जागृती निर्माण झाली.
5.वसाहतींना "स्वयंनिर्णयाचा अधिकार असतो" व तो मिळाला पाहिजे. ह्यातून चळवळी तीव्र झाल्या. शेवटी इंग्लंड फ्रान्स ने ह्या देशांना अधिकार देण्यास सुरूवात केली. निर्वसाहतीकरणाचा वेग वाढला.

**प्रश्न ५ खालील विधानांवर तुमचे मत नोंदवा (कोणतेही तीन) ...०९**

**1) छत्रपती शिवाजी महाराजांनी आरमार दल उभारले.**

छत्रपती शिवाजी महाराजांनी आरमार दल उभारले, माझ्या मते

- युरोपीय व्यापाऱ्याच्या निमित्ताने भारतात आले, संधी मिळाली तेव्हा येथील प्रदेशही काबीज केले. संरक्षणासाठी तटबंदी व किल्लेही बांधले.
- युरोपीय राष्ट्रांचा हा प्रवास तराजू-तलवार व तख्त असा चाललेला आहे हे शिवरायांनी वेळीच ओळखले.
- प्रथम झालेल्या पोर्तुगीजांचे आरमार प्रबळ होते. अशा परकीय सत्तांपासून स्वराज्याचे रक्षण करण्यासाठी प्रबळ आरमारांची आवश्यकता राजांनी ओळखली.
- "ज्याचे आरमार त्याचा समुद्र" हे लक्षात घेऊन त्यांनी आरमार दल उभारले. त्यांच्या ह्या दूरदृष्टीमुळे त्यांना भारताच्या आरमाराचे जनक म्हणून ओळखले जाते.

**2) 1857 चे स्वातंत्र्ययुद्ध हे स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या मते "भारतीयांचे पहिले स्वातंत्र्ययुद्ध" होते** माझ्या मते---

- 1857 चे स्वातंत्र्ययुद्ध हे स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या मते, "भारतीयांचे पहिले स्वातंत्र्ययुद्ध होते.
- 1857 च्या स्वातंत्र्य लढ्याला इंग्रज "शिपायांचे बंड" असे म्हणत.
- लंडल येथे असताना स्वातंत्र्यवीर सावरकरांनी "1857 चे स्वातंत्र्य समर" हा ग्रंथ लिहीला. ह्या ग्रंथातच त्यांनी इंग्रजांचया युक्तीवादाला जोरदार प्रत्युत्तर दिले. 1857 बंड हे शिपायांचे बंड नसून पहिले स्वातंत्र्य समर होते असे म्हटले.
- ह्या लढ्यात देशभरातील सर्वच लोक जातीभेद विसरून स्थानिक स्वरूपात लढत होते, ह्या लढ्यात सामान्य जनता, शेतकरी, सैनिक तसेच भिल्ल, रामोशी, आदिवासी सर्वच होते.
- ब्रिटीशांच्या जुलमी राजवटीतून त्यांना मुक्त व्हायचे होते. ह्या लढ्यामुळेच जनतेत राष्ट्रीय भावना उदय पावत गेली. म्हणून स्वातंत्र्यवीर सावरकरांचे असे मत होते.

**3) इ.स. 1961 पर्यंत गोव्यातील पोर्तुगीज राजवट अबाधित राहीली.** माझ्या मते---

- भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर पोतुगीजांनी भारतातील वसाहतींना स्वातंत्र्य देणे अपेक्षित होते; परंतू गोवा सोडण्यास त्यांनी नकार दिला.
- स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच गोव्यातील पोर्तूगीजांचे राज्य झुगारून देण्यासाठी प्रयत्न सुरू झाले होते. गोवा मुक्ती साठी तेथील जनतेने काही संघटना स्थापन केल्यात. डॉ. टी. बी. कुन्हा सारख्या अनेक नेत्यांनी सत्याग्रह केले, आंदोलन केले.
- 1946 मध्ये डॉ. राम मनोहर लोहीया यांच्या नेतृत्त्वाखाली सविनय कायदेभंग आंदोलन सुरू केले.
- आझाद गोवा व स्वतंत्र गोवा ही दोन वृत्तपत्रे काढली.
- भारत स्वतंत्र झाल्यावर गोवा मुक्तीलढा महाराष्ट्रातील चळवळीचा एक भाग बनला. 1954 मध्ये पुण्यात गोवा विमोचक सहाय्यक समितीची स्थापना झाली. अनेक कार्यकर्त्यांनी यात सहभाग घेतला तरी गोव्यातील पेर्तूगीज सत्ता अबाधीत राहीली.
- अखेरीस केंद्र सरकारने याकडे लक्ष दिले. त्यांनी "ऑपरेश विजय" ही लष्करी कारवाई करून गोवा पोर्तुगीजांच्या ताब्यातून मुक्त केले. 19 डिसेंबर 1961 मध्ये गोवा भारतीय संघराज्यात विलीन झाले. गोव्याचे 450 वर्षांचे पारतंत्र्य संपुष्टात आले.

**4) भारताने वसाहतवाद विरोधात नेहमीच भूमिका मांडली आहे.** माझ्या मते---

- भारताने स्वातंत्र्य मिळण्याआधी पासूनच साम्राज्यवाद विरोधात आवाज उठवलेला आहे कारण भारत लोकशाही मुल्ये पाळणारा देश आहे.
- सहजीवन व शांततेत तत्व मान्य करून "जगा व जगू द्या" यावर भारताने भर दिला.
- भारताने कोणत्याही लष्करी गटाला बांधून घेतलेले नाही, त्याने ह्या बाबतीत अलिप्ततावादी धोरण स्वीकारले आहे.
- विश्वस्त राष्ट्रांच्या ताब्यातील प्रदेशांना लवकर स्वातंत्र्य द्यावे अशी मागणी भारत सरकारने संयुक्त राष्ट्रांकडे केली आहे.
- परकीय सत्तांनी वसाहती मधून निघून जाण्याचा आग्रह भारताने नेहमीच धरला.
- 1949 मध्ये दिल्ली येथे भरलेल्या परिषदेत इंडोनेशियाच्या स्वातंत्र्य मिळावे म्हणून महात्मा गांधींनी सत्याग्रहाचा मार्ग दाखवला. अशा रितीने भारत वसाहत वाद विरोधात नेहमीच आपली भूमिका मांडत आला आहे.

**5) पर्यटन स्थळांनी काळजी सर्वांनी घ्यावी.** माझ्या मते---

- देशाच्या विकासात पर्यटन स्थळांचे योगदान महत्त्वपूर्ण आहेत. पर्यटन स्थळे आपल्या देशाचा वारा जतन करून सांगत असतात.
- पर्यटन स्थळांमुळे आपल्याला त्या काळातील इतिहास समजण्यास मदत होते. आपल्या पुर्वजांची महती सांगतात.
- आपले किल्ले-वास्तु-लेणी येथील निसर्ग या गोष्टी आपल्या इतिहासाची साक्ष देतात.
- हे वैभव पाहण्यासाठी देश-विदेशांतील हजारो पर्यटक येतात. विदेशी पर्यटकांच्या पर्यटनातून आपल्याला परकीय चलन मिळते. राष्ट्रीय उत्पन्नात भर पडते.
- स्थानिक व्यवसाय विकसित होतात. त्यातून रोजगार निर्माण होतात. कला-उद्योगांना चालना.
- पर्यटन स्थळाची काळजी केवळ सरकारने घेऊन चालणर नाही. तर ती प्रत्येकाने घेतली पाहीजे. ती आपली महत्त्वाची जबाबदारी आहे.

**प्रश्न ६. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही दोन) ...१०**

**1) सर सय्यद अहमदखान यांनी केलेले कार्य लिहा.**

**उ-** 19 व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतात समाज प्रबोधन झाले. अनेक समाज सुधारक समाजिक-धार्मिक कार्य करत होते, प्रसिद्ध मुस्लीम विचारवंत, शिक्षण व राजनीतज्ञ सर सय्यद अहमदखान ह्यांनी मुस्लीम समाजात सामाजिक सुधारणेचे कार्य केले.

- त्यांचा जन्म दिल्ली मध्ये 17 ऑक्टोबर 1817 रोजी झाला.
- उर्दू, पर्शियन, अरेबिक व इंग्रजी भाषेवर त्यांचे प्रभुत्व होते.
- 1864 मध्ये मुस्लीमांसाठी सायंटिफीक सोसायटीची स्थापना केली. ह्या सोसायटीचे सदस्य इतिहास, विज्ञान, राजकीयअर्थशास्त्र अभ्यास करत.
- 1875 मध्ये इंग्लंडहून आल्यानंतर त्यांनी मुस्लीम तरूणांना आधूनिक शिक्षणाची ओळख व्हावी. त्यातून त्यांची व समाजाची उन्नती व्हावी म्हणून "मुहम्मदन ॲग्लो ओरिएन्टल कॉलेज" ची स्थापना केली. पुढे ह्याच कॉलेजचे रूपांतर "अलिगड मुस्लीम युनिव्हर्सिटी मध्ये झाले.
- त्यांनी "मोहम्मद सोशल रिफॉर्मर" नावाचे नियतकालीक सुरू केले.
- त्यांनी अबुलफजल याने सम्राट अकबरच्या प्रशासन पद्धतीवर लिहीलेल्या "आइए-ई-अकबरी ह्या ग्रंथाचे संपादन केले. त्यांनी पश्चिमात्य विज्ञान-तंत्रज्ञानाचा पुरस्कार केला.
- अशा पद्धतीने त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य मुसलमानांच्या सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक उन्नतीसाठी वेचले.

**2) पोर्तुगीजांनी भारतात ज्या ठिकाणी सत्ता स्थापन केली तेथील लोकांवर कोणकोणती बंधने लादली**?

- पोर्तुगीजांनी दयावर्दी अनेक वास्को -द-गामा इ.स. 1498 मध्ये कालिकत येथे पोचला, पोर्तुगीजीनी अरब आरमाराचा पराभव करुन भारताच्या समुद्रकिनाऱ्यांवर आपले वर्चस्व निर्माण करण्यास सुरुवात केली.
- भारतात दमण, वसई-गोवा येथे आपली सत्ता निर्माण केली. ह्या प्रदेशात त्यांनी अनेक बंधने लादली.
- ह्या प्रदेशात खिस्ती धर्माचीच प्रार्थना स्थळे बघण्यात यावी इतर धर्मियांची प्रार्थनास्थळे बांधू नये.
- स्थानिक लोकांना त्यांच्या पद्धतीने धार्मिक उत्सव साजरे करता येणार नाही.
- लोकांच्या स्थानिक भाषेच्या वापरावरही बंदी घातली.
- ह्या प्रदेशातील लोकांनी खिस्ती धर्म स्वीकारल्यास पोर्तूगिजांनी नोकऱ्या देण्यास सुरुवात केली. एवढेच नव्हे तर सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातील, असे स्पष्ट केले.
  अशाप्रकारे आपले वर्चस्व लादले,

**3) माहीतीचा अधिकार अधिनियमाची माहिती लिहा.**

- जगात सर्वप्रथम स्वीडन या देशाने 1776 मध्ये माहीतीचा अधिकार लागू केला.
- भारतात जयपुर शहरात 1982 मध्ये ए. के. कुलवाल यांनी जयपुर शहरातील अस्वच्छतेविषयी नगरपालीका काय काम करते हे माहीत करून घेण्यासाठी एक अर्ज केला.
- या संदर्भात उच्च न्यायालयाने जो निकाल दिला त्यात "माहितीचा अधिकार" हा नागरीकांचा मुलभूत अधिकार आहे असे स्पष्ट केले. येथूनच भारतात महितीच्या अधिकाराची चळवळ सुरू झाली.
- 1990 मध्ये श्रीमती अरुणा रॉय यांनी मजदूर किसान शक्ती संघटन चळवळ चालवली. तर बिलासपुरचे तात्कालीन विभागीय आयुक्त हर्ष मंडर यांनी सन 1996 मध्ये 'अन्नधान्य वितरण व्यवस्था' व 'रोजगार विनिमय' याबाबतची माहिती उघड केली.
- पुढे महाराष्ट्रात अण्णा हजारे यांनी 2001 मध्ये महितीच्या अधिकारासाठी आंदोलन केले. केंद्र शासनाचा महितीचा अधिकार कायदा 12 ऑक्टोंबर 2005 पासून महाराष्ट्रात लागू झाला.

- ह्या कायदयानुसार, शासनाचे दस्तऐवज, मेमो, ई-मेल, अभिप्राय सल्ला, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, निविदा, अहवाल, पत्रव्यवहार, डेटा, प्रतिमाने, नमुने, सार्वजनिक प्राधीकरण, खाजगी संस्था व त्यात काम करणाऱ्या व्यक्तीविषयीची माहिती मिळवता येईल.
- माहितीचा अधिकार (राईट-टू-इन्फरमेशन) अंतर्गत, दस्तऐवजीची किंवा अभिलेखांची पाहणी करणे, त्यांच्या प्रती मिळवणे, त्याची टिपणे काढणे, उतारे मिळवणे, सीडी, फ्लॉपी-टेप, व्हीडीओ कैसेट इ. ची माहिती, मुद्रीत प्रत मिळवण्याचा अधिकार व्यक्तींना मिळाला आहे. सार्वजानिक प्राधीकरणाची माहिती अधिकाऱ्यांकडे लेखी अर्ज करुन मिळण्याचा हक्क आहे.

**प्रश्न ७. खालील प्रश्नांची दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही तीन) ...१५**

**1) म्यानमार वसाहतींच्या स्वातंत्र्याची माहिती लिहा.**

भारताचे ईशानेकडील शेजारी राष्ट्र म्हणजे म्यानमार त्याचे पुर्वीचे नाव ब्रह्मदेश (बर्मा) असे होते. म्यानमार मधील नैसर्गिक संपत्ती आणि बाजारपेठेची उपलब्धता यामुळे त्या देशावर कब्जा मिळवणे हा इंग्रजांचा हेतू होता.

- म्यानमारमधील राज्यकर्त्यांनी 1760 पर्यंत म्यानमार एकछत्री अंमलाखाली आणला होता.
- 19 व्या शतकात म्यानमारने मणिपुर जिंकून आसामवर स्वारी केली. त्यामुळे भारतातील ब्रिटिश गव्हर्नर लॉर्ड ॲम्हर्स्ट याने म्यानमार विरूद्ध युद्ध पुकारले. हे पहिले ब्रह्मी युद्ध होय.
- ह्या युद्धात इंग्रजांचा विजय होवून त्याने रंगून (यॉंगॉन) आपल्या ताब्यात घेतले. अखेरिस तह होऊन इंग्रजांनी मणिपूर परत घेतले, तेथील किनारी प्रदेश व जंगले, खनिज संपत्ती ताब्यात घेतली. लष्करी भरपाई वसूल केली तसेच इंग्रजांनी ब्रह्मीदेशाची राजधानी ॲव्हा येथे आपला इंग्रज रेसिडेंट नेमला.
- दुसरे ब्रह्मी मुख्य लॉर्ड डलहौसीच्या काळात झाले. कारण म्यानमार मध्ये राहणाऱ्या दोन इंग्रज नागरिकांनी म्यानमार प्रशासनाने दंड ठोठावला. हे निमित्त करुन त्याने सेनापती जॉर्ज लम्बर्टच्या नेतृत्त्वाखाली म्यानमारमध्ये फौज पाठवली. युद्ध होवून म्यानमारचा पराभव झाला.
- इंग्रजांना रंगून, पेगू, प्रोम व इतर ठिकाणे मिळाली.
- 1885 मध्ये इंग्रज-म्यानमार यांच्यात तिसरे ब्रह्मी युद्ध झाले. याचे कारण ब्रह्मदेश सरकारचा फ्रान्स देशाशी वाढत चाललेला संबंध, फॉन्सने इंडो-चायनामध्ये स्वतःचे वर्चस्व निर्माण केले. ही बाब इंग्रजांना धोक्याची वाटली. तसेच म्यानमारचा राजा थिंबा राजाने "बॉम्बे-बर्मा ट्रेडिंग कार्पोरेशन" या ब्रिटिश व्यापारी संस्थेला दंड ठोठावला. लॉर्ड डफरीनने सैन्य पाठवले, मंडाले शहर जिंकले, थिंबाराजा शरण गेला. उत्तर म्यानमार इंग्रज साम्राज्याचा भाग बनले, 1935 च्या कायद्याने इंग्रजांनी म्यानमार भारतापासून वेगळा केला.

**2) पहिल्या महायुद्धाची कारणे लिहा.**

मुद्दे : साम्राज्यवादी धोरणे,
-शस्त्रास्त्र वाढ स्पर्धा,
-तत्कालीन कारण

विसाव्या शतकात दोन महायुद्ध झालीत. महायुद्धांमुळे जग बदललेः पहिले महायुद्ध इ.स. 1914 मध्ये सुरु झाले; ते एकाएकी उद्भवले; युरोपमधील राजकारण तसेच साम्राज्य वाढवू इच्छीणाऱ्या युरोपीय राष्ट्रामधील स्पर्धा ह्याचाच परिपाक म्हणजे है युद्ध होय.

- **साम्राज्यवादी धोरणे** 19 व्या शतकाच्या उत्तरार्थात औद्योगिक क्षेत्रात लागलेल्या नव्या शोधांमुळे उत्पादनासाठी यंत्राचा वापर सुरु झाला. उत्पादनासाठी कच्चा माल आणि उत्पादन विकण्यासाठी हक्कांच्या बाजारपेठांची गरज युरोपीय राष्ट्रांना वाटू लागली.

* या दोन्हीची गरज भागवण्यासाठी नवनवे प्रदेश काबीज करुन त्यावर आपली पकड मजबूत करणे-ह्या साम्राज्यवाद धोरणातून युरोपीय राष्ट्रांमध्ये साम्राज्यवादी स्पर्धा सुरु झाली.

**- शस्त्रास्त्र वाढ स्पर्धा** – इंग्लंड, फ्रान्स, स्पेन, पोर्तुगाल इ. राष्ट्रांचा आशिया-आफ्रीका खंडात साम्राज्यविस्तार झालेला होता.

* जर्मनी, इटली, ऑस्ट्रीया हंगेरी अशी राष्ट्र साम्राज्यविस्तार करू पाहत होती.

* परस्पर विरोधी हित असणाऱ्या राष्ट्रांचे दोन गट निर्माण झाले आणि प्रत्येक राष्ट्र आपले सैन्यबळ, नाविक दळ वाढवू लागले. शस्त्रांच्या निर्मितीची स्पर्धा सुरु झाली. त्यामुळे युरोपात युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली.
**- तात्कालीन कारण** ऑस्ट्रीयन राजपुत्र आर्च ड्यूक फर्डिनांड आणि त्याची पत्नी यांचा सर्बियामधे एका सर्बियन माथेफिरूने खून केला.
* या प्रकरणात सार्बियाचा हात आहे, याची खात्री वाटल्याने आस्ट्रीयाने सर्बियावर आक्रमण केले.
* सार्बियाच्या मदतीला रशिया धावून आला, म्हणजे या दोन लढावू राष्ट्रानी बाजू युरोपातील बड्या राष्ट्रांनी घेतली. दोन गट पडले. दोस्त पक्ष आणि अक्ष राष्ट्रे. युद्धाची व्याप्ती वाढली त्याचे रूपांतर जागतिक महायुद्धात झाले. तेच हे 1914 चे जागतिक पहिले महायुद्ध होय.

**3) सशस्त्र क्रांतीतील क्रांतिकारी संघटनांचे योगदान स्पष्ट करा-**

मुद्दे : - अनुशीलन समिती,
-इंडिया हाऊस,
-गदर

ब्रिटिश साम्राज्यशाहीविरूद्ध भारतात विविध मार्गांनी आंदोलने झालीत, त्यातील एक मार्ग सशस्त्र क्रांतीचा होता. शासन यंत्रणा खिळखिळी करणे, सरकारचा लोकांना वाटणारा दरारा नाहीसा करणे अशा मार्गांनी सत्ता उधळून लावणे हे सशस्त्र क्रांतीकारकांचे प्रमुख उद्दिष्ट होते. त्यासाठी अनेक संघटनांची स्थापना झाली. त्यातील

**- अनुशीलन समिती** – बंगालमध्ये 'अनुशीलन समिती' ही संघटना कार्य करत होते. कोलकत्याजवळ माणिकताळा येथे या समितीचे बाँब तयार करण्याचे केंद्र होते. 1908 मध्ये खुदीराम बोस व प्रफुल्लकुमार चाकी यांनी किंग्जफोर्ड या न्यायाधिशाला ठार करण्याची योजना केली. ह्यात दोन इंग्लीश स्त्रियाच मृत्यूमुखी पडल्या तेव्हा खुदीराम बोस पोलीसांच्या हाती लागले, त्यांना फाशी देण्यात आली.

**- इंडिया हाऊस –** 'श्यामजी कृष्ण वर्मा ह्यांनी लंडन येथे इंडिया हाऊस ची स्थापना केली. या संस्थेमार्फत भारतीय तरूणांना इंग्लंडमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती दिल्या जात. मादाम कामा यांनी जर्मनीत स्टुटगार्ड येथील परिषदेत भारताच्या स्वातंत्र्याचा प्रश्न मांडून भारताचा ध्वज फडकावला होता तर पंजाबमधील मदनलाल धिंग्रा यांनी कर्झन वायली या इंग्रज अधिकाऱ्याला ठार केले म्हणून त्यांना फाशी झाली.

**- गदर –** अमेरिका व कॅनडा येथील भारतीयांनी गदर या संघटनेची स्थापना केली. त्याला हरदयाळ भाई परमानंद, डॉ. पांडूरंग सदाशिव खानखोजे इत्यादी क्रांतीकारक ह्या संघ्टनेचे प्रमुख होते. ह्या संघटनेच्या मुखपृष्ठाचे नाव गदर- गदर म्हणजे विद्रोह ह्यातूनच राष्ट्रप्रेम व सशस्त्र क्रांती याचा संदेश भारतीयांना दिला. हुतात्मा विष्णू गणेश पिंगळे यांचा या कार्यात विशेष सहभाग होता.
थोडक्यात भारतीय स्वातंत्र्य संग्रामासाठी क्रांतीकारी चळवळींनी महत्त्वाचे योगदान दिले. ह्यातून साहस व निर्धाराचे दर्शन घडवले. तयांचे राष्ट्रप्रेम व समर्पणवृत्ती अजोड होती. त्यांचे कार्य-बलिदान भारतीयांना स्फूर्तीदायी ठरले आहे.

**4) सार्क संघटने विषयी खालील मुद्यांवरून माहिती लिहा-**

मुद्दे : स्थापना,
-उद्दिष्टे,
घोषणापत्र (सार्कच्या पहिल्या अधिवेशन

**- स्थापना -** आशिया खंडात आर्थिक, सामाजिक विकासासाठी एखादी संघटना असावी असे बांग्लादेशाचे तत्कालीन प्रमुख झिया-उर-रहमान यांना वाटत होते. त्यांच्या कल्पनेतून बांग्लादेश, भारत, भूतान, पाकिस्तान, श्रीलंका, मालदीव, नेपाळ या देशांच्या परराष्ट्र सचिवांची 1981 मध्ये एक बैठक झाली. झालेल्या चर्चेतून 1983 मध्ये दिल्ली येथे ह्या देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांची बैठक झाली. या बैठकीत सार्क चा जाहीरनामा तयार होऊन 1985 मध्ये ढाका येथे सार्कची स्थापना झाली. "दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार संघटना" म्हणजे SAARC-South Asian Association for Regional Cooperation
**- उद्दीष्टे – *** स्वातंत्र व प्रदोशिक एकात्मता यांना धक्का न लावता परस्परांना सहकार्य करणे.
*सदस्य राष्ट्रांच्या सर्वांगीण विकासासाठी सहकार्य करणे.

*दहशतवाद, अमली पदार्थांची तस्करी अशा विघातक गोष्टींना विरोध करणे.
* परस्पर विश्वास वाढवून आपापसातील समस्या सोडवणे.
* आंतरराष्ट्रीय पातळीवर सामायीक हितासाठी प्रयत्न करणे
* सदस्य देशातील नागरीकांचे कल्याणकारी कार्यक्रमाद्वारे जीवनमान उंचावणे.
* आर्थिक वृद्धी, सामाजिक प्रगती आणि सांस्कृतिक विकास कार्यक्रमांना चालना देणे.

**घोषणापत्र-**

* सार्कच्या पहिल्या अधिवेशनात सहभागी राष्ट्रांनी घोषणापत्र तयार केले.
* राष्ट्रीय स्वातंत्र्य, भौगोलिक एकता, समानता, अंतर्गत वादात बळाचा न करणे, अंतर्गत बाबीत हस्तक्षेप न करणे आणि परस्पर संघर्ष शांततामय मार्गाने सोडवणे ह्या तत्त्वांचे पालन सर्व सदस्य राष्ट्र करतील याची हमी दिलेली आहे. संयुक्त संघटनेच्या सनदेनुसार व अलिप्तवादाच्या सिद्धांतानुसार बनवण्यात आले. घोषणापत्र प्रत्यक्षात उतरवण्याचे काम सार्क राष्ट्रांची मंत्री परिषद व स्वामी समिती करेल.

**5) ग्रामीण भागाच्या विकासाच्या योजना**

मुद्दे : प्रधानमंत्री योजना,
ग्रामीण स्वयंरोजकार योजना
कृषी व पशुधन

जागतिकीकरणाच्या प्रभावाखाली ग्रामीण भागाची उपेक्षा दुर्लक्ष होऊ नये, शहरे व ग्रामीण भाग यांच्या विकासात असमतोल निर्माण होऊ नये तसेच वाढत्या लोकसंख्येच्या प्रश्नातून रोजगाराचा तो प्रश्न निर्माण झाला तो साडेवण्याचा प्रयत्न विविध योजना राबवून करण्यात आला. जसे,

* **पंतप्रधानमंत्री रोजगार योजना –** ग्रामीण व शहरी भागातील तरूणांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने वाणिज्य व उद्योग मंत्रालयाने ही योजना सुरू केली. (2 ऑक्टोबर, 1993) या योजनेद्वारे बेरोजगार तरूण-तरूणींना बँकेकडून कर्ज उपलब्ध करून स्वत:चा व्यवसाय करण्याची संधी दिली.
* **ग्रामीण स्वयंरोजगार योजना –** 1999 मध्ये ही योजना सुरू करण्यात आली. एकात्मिक ग्रामीण विकास योजना स्वयंरोजगारासाठी ग्रामीण युवकांकरिता प्रशिक्षण कार्यक्रम ग्रामीण महिला व बालविकास कार्यक्रम, ग्रामीण कामगीरांना आधुनिक अवजारांच्या वाटपाच्या कार्यक्रम गंगा कल्याण योजना अशा अनेक योजनांचा समावेश ह्यात करण्यात आला.
* **कृषी व पशुधन –** बदलत्या भारताबरोबर कृषीक्षेत्र ही बदलत आहे. भारतातील 54% लोकसंख्या ही शेती व शेतीपुरक व्यवसायांशी निगडीत आहे. त्या दृष्टीने कृषी क्षेत्रात सुधारणा व्हावी म्हणून, "मृदा स्वास्थ कार्ड योजना, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, कृषी विकास योजना, प्रधानमंत्री पीक विमा योजना करण्यात आली. 2007 मध्ये शेतकऱ्यांसाठी एक राष्ट्रीय धोरण आखण्यात आले. भारतीय कृषी संशोधन परिषदे अंतर्गत कृषी विज्ञान केंद्रांना प्रोत्साहन देणे, कृषी विषयक प्रदर्शन तसेच देशी वाणाची बीजे यांना प्राध्यान्य देणे तसेच पशुधन विकासाचे कार्यक्रमांतर्गत शेळी संगोपन कुक्कुटपालन, पशुपालन यावर लक्ष देणे, दूध उत्पादन डेअरी विकास, मत्स्यपालन, अंडी, लोकर उत्पादन, मास उत्पादन प्रगती करणे, तसेच पशुंची गणना कार्यक्रम राबवला, भारतात पशूंची गणना सर्वप्रथम 1919-20 मध्ये झाली.

# नमुना प्रश्नपत्रिका – 4

**एकूण गुण : 80**

**प्रश्न १ (अ ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा. ...०६**

(१) इ.स. १६०९ मध्ये..... ................. याने अधिक सुधारित दुर्बीण तयार केली.
(अ) जॉन के (ब) कोपर्निकस (क) गॅलिलिओ (ड) केपलर

(२) ................ नदीला इजिप्तची जीवनदायिनी म्हणतात.
(अ) अमेझॉन (ब) युक्रेटिस (क) नाईल (ड) टायग्रिस

(३) मराठ्यांनी पोर्तुगिजांना................. वेढ्यात पराभूत केले.
(अ) वेंगुर्लाच्या (ब) फोंड्या (क) सुरतच्या (ड) राजापूरच्या

(४) अमेरिकेने ...........या शहरावर पहिला अणुबॉम्ब टाकला.
(अ) नागासाकी (ब) हिरोशिमा (क) पर्ल हार्बर (ड) स्टॅलिनग्राड

(५) रिचर्ड निक्सन आणि ब्रेझनेव्ह यांच्या ..........आण्विक क्षेपणास्त्रांच्या संख्येवर मर्यादा येथील शिखर परिषदेत आणण्यावर एकमत झाले.
(अ) कॅम्प डेव्हिड (ब) मॉस्को (क) न्यूयॉर्क (ड) हेलसिंकी

(६) १७७६ मध्ये जगात सर्वप्रथम ..........या देशात माहितीचा कायदा लागू झाला.
(अ) स्वीडन (ब) फ्रान्स (क) इंग्लंड (ड) भारत

**(ब) पुढील प्रत्येक संचातील ब गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा . ...०४**

| (१) | ‘अ’ गट | | ‘ब’ गट |
|---|---|---|---|
| (अ) | जॉन कॅबट | -- | उत्तर अमेरिकेत इंग्लंडची वसाहत स्थापन केली |
| (ब) | थॉमस जेफरसन | -- | अमेरिकेचा पहिला राष्ट्राध्यक्ष |
| (क) | जॉर्ज वॉशिंग्टन | -- | अमेरिकन वसाहतींचा प्रमुख सेनापती |
| (ड) | लॉर्ड कॉर्नवॉलिस | -- | इंग्रजांच्या सैन्याचा सेनापती |

| (२) | ‘अ’ गट | | ‘ब’ गट |
|---|---|---|---|
| (अ) | गोवा | -- | पोर्तुगिजांच्या पूर्वेकडील साम्राज्याची राजधानी |
| (ब) | सुरत व मद्रास | -- | ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचा कारभार बेधून चालत असे |
| (क) | मच्छलीपट्टण | -- | डचांची भारतातील पहिली वसाहत |
| (ड) | पाँडिचेरी | -- | स्पेनचे भारतातील मुख्य ठाणे |

| (३) | ‘अ’ गट | | ‘ब’ गट |
|---|---|---|---|
| (अ) | आर्च ड्यूक फ्रान्सिस फर्डिनांड | -- | ऑस्ट्रियन राजपुत्र |
| (ब) | मार्शल जॉर्जी झुकॉव्ह | -- | रशियन सेनानी |
| (क) | नेव्हिल चैवलेंन | -- | इंग्लंडचे पंतप्रधान |
| (ड) | जोसेफ स्टॅलिन | -- | फ्रान्सचे पंतप्रधान |

| (४) | ‘अ’ गट | | ‘ब’ गट |
|---|---|---|---|
| (अ) | राष्ट्रीय मानवाधिकार आयोग | -- | मानवी हक्कांचे संरक्षण |
| (ब) | सेंटर फॉर सायन्स अँड एन्व्हायर्नमेंट | -- | दिल्लीतील प्रदूषणाचा अभ्यास |
| (क) | सी-स्कॅप | -- | कासवांचे जतन करणारी संस्था |
| (ड) | इंटॅक | -- | वारशाविषयी जतन व जागृती करणारी संस्था |

**प्रश्न २ (अ ) ऐतिहासिक व्यक्ती, ठिकाण, घटना यासंबंधीची नावे लिहा ...०४**

(१) वास्को-द-गामा भारतात या बंदरात येऊन पोहोचला --
(२) गोवा काँग्रेस कमिटीचे प्रमुख ---
(३) कोणत्याही राष्ट्रगटात सामील न होण्याचे भारताचे धोरण --

(४) मानव अधिकार संरक्षण कायदयान्वये स्थापन झालेला आयोग ---

**(ब) दिलेल्या कारणांपैकी योग्य कारण निवडून विधाने पूर्ण करा ...०४**

(१) युरोपातील विद्यापीठांच्या अभ्यासक्रमांत नाटके, विचारवंतांचे साहित्य, कला इत्यादी विषयांचा समावेश झाल्यामुळे,

(अ) सामान्य लोकांना हे साहित्य वाचायला मिळाले.

(ब) विद्यापीठांची प्रतिष्ठा वाढली

(क) सर्वसामान्य माणूस ज्ञानी झाला.

(ड) हे विषय अभ्यासून लोक स्वतंत्रपणे विचार करू लागले.

(२) छत्रपती शिवाजी महाराजांनी मिठाच्या व्यापारावर संरक्षक जकाती उभारल्या. कारण –

(अ)पोर्तुगिजांना विरोध करण्यासाठी

(ब) इंग्रजांचा मिठाचा व्यापार मोडून काढण्यासाठी

(क) स्वराज्यात पैसा उभा करण्यासाठी

(ड) वसाहतवाद्यांना विरोध करण्यासाठी

(३) पहिल्या महायुद्धानंतर 'राष्ट्रसंघ' ही संस्था स्थापन करण्यात आली, कारण -

(अ) युद्धातील सहभागी राष्ट्रांना आर्थिक मदत करण्यासाठी.

(ब) युद्धखोर राष्ट्रांना अद्दल घडवण्यासाठी

(क) जगात शांतता प्रस्थापित करण्याची गरज होती.

(ड) दुर्बल राष्ट्रांचे संरक्षण करण्यासाठी.

(४) दुसऱ्या महायुद्धकाळात आफ्रिकेतील स्वातंत्र्य चळवळ अधिक तीव्र झाली, कारण -


(अ) आफ्रिकेतील वसाहतींनी परकीयांचे वर्चस्व झुगारून दिले.

(ब) आफ्रिकेत पाश्चात्त्य शिक्षणपद्धती होती.

(क) दुसऱ्या महायुद्धकाळात इंग्रजांनी व फ्रेंचांनी वसाहतींना काही अधिकार दयायला सुरुवात केली.

(ड) पाश्चात्त्य देश दुसऱ्या महायुद्धात गुंतले होते, याचा फायदा घेण्यासाठी.


**प्रश्न ३ (अ ) पुढील नकाशाचे निरीक्षण करून प्रश्नांची उत्तरे लिहा ...०५**




(१) महाराष्ट्रातील उठावाची ठिकाणे कोणती होती ?
(२) भारताच्या वायव्येकडील भागात आताच्या वर्तमान सीमांच्या बाहेरील उठावाची ठिकाणे लिहा.
(३) उठाव प्रामुख्याने भारताच्या कोणत्या भागात एकवटलेला दिसतो ?
(४) उत्तर भारतातील उठावाची प्रमुख ठिकाणांपैकी कोणतेही एक ठिकाण लिहा ?
(५) आताच्या बांग्लादेशातील उठावाची ठिकाणे कोणती होती ?

**प्रश्न ३ (ब ) दिलेली संकल्पनाचित्रे पूर्ण करा (कोणतीही चार)** **...०८**


**(1)**




(2)





(3)




(4)

| | |
|---|---|
| **दुसऱ्या महायुद्धाची कारणे** | **राष्ट्रसंघाचे अपयश** |
| | ................................. |
| | ................................. |
| | ................................. |
| | ................................. |

(5)




(6)




**प्रश्न ४ (अ ) संक्षिप्त टिपा लिहा (कोणत्याही तीन)** **...०६**

(१) कर्नाटक युद्धे.
(२) सत्यशोधक समाज
(३) संस्थानांच्या विलीनीकरणातील सरदार वल्लभभाई पटेल यांचे योगदान
(४) अटलांटिक सनद
(५) गॅट करार

**(ब ) पुढील विधाने सकारण स्पष्ट करा (कोणतीही तीन)** **...०९**

(१) औदयोगिक क्रांतीची सुरुवात सर्वप्रथम इंग्लंडमध्ये झाली.
(२) युरोपीय राष्ट्रांनी अमेरिकेत वसाहती स्थापन केल्या.
(३) छत्रपती संभाजी महाराजांनी सिद्दी विरोधातील मोहीम अर्धवट सोडली
(४) सार्क संघटनेला काही प्रमाणात यश मिळाले आहे.
(५) पर्यटन स्थळांची काळजी सर्वांनी घ्यावी

**प्रश्न ५ : खालील विधानांवर तुमचे मत नोंदवा (कोणतेही तीन)** **...०९**

(१) सर्व धर्मीयांसाठी पोर्तुगिजांची वागणूक सहिष्णू वृत्तीची नव्हती.
(२) राजा राममोहन रॉय यांनी भारतात आधुनिकतेची पायाभरणी केली.
(३) इंग्रजांविरुद्ध पाइकांनी सशस्त्र उठाव केला.
(४) इसवी सन १९६१ पर्यंत गोव्यातील पोर्तुगीज राजवट अबाधित राहिली
(५) वसाहतवादाच्या माध्यमातून वसाहतींच्या शोषणाचे समर्थन करणे युरोपला शक्य नव्हते

**प्रश्न ६ : पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही दोन)** **...१०**

(१) पोर्तुगीज आणि मराठे यांचे परस्परांसंबंधीचे राजकीय धोरण लवचीक होते. हे विधान उदाहरणे देऊन स्पष्ट करा.
(२) पहिल्या महायुद्धाचे भारतावर झालेले परिणाम स्पष्ट करा.
(३) भारत सरकारचे क्रीडा धोरण स्पष्ट करा.

**प्रश्न ७. : खालील प्रश्नांची दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही तीन)** **...१५**

(1) युरोपातील धर्मयुद्धाची माहिती लिहा
मुद्दे : (अ) अपयशाची कारणे
(ब) धर्मयुद्धांचे परिणाम

(2) निर्वसाहतीकरण : आशिया माहिती लिहा
मुद्दे: (अ) मालदीव
(ब) श्रीलंका
(क) म्यानमार (ब्रह्मदेश)

(3) भारतीय राष्ट्रीय सभेच्या पहिल्या अधिवेशनाची माहिती लिहा.
मुद्दे : (अ) पहिले अधिवेशन
(ब) हजर प्रतिनिधी
(क) संमत झालेले ठराव.

(4) 'राष्ट्रकुल' संघटनेची माहिती लिहा.
मुद्दे : (अ) उद्देश
(ब) स्थापना
(क) फायदे

(5) माहितीचा अधिकार अधिनियमाची माहिती लिहा.
मुद्दे : (अ) भारतात ही चळवळ कशी सुरू झाली?
(ब) माहितीची व्याख्या
(क) माहितीचा अधिकार या अंतर्गत नागरिकांचे हक्क.

---

# आदर्श उत्तरपत्रिका प्रश्नपत्रिका – 4

**<u>प्रश्न १ (अ ) :</u> दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा ...०६**

1) इ.स. १६०९ मध्ये **<u>गॅलिलिओ</u>** याने अधिक सुधारित दुर्बीण तयार केली
2) **<u>नाईल</u>** नदीला इजिप्तची जीवनदायिनी म्हणतात.
3) मराठ्यांनी पोर्तुगिजांना **फोंड्या**च्या वेढ्यात पराभूत केले.
4) अमेरिकेने **<u>हिरोशिमा</u>** या शहरावर पहिला अणुबॉम्ब टाकला.
5) रिचर्ड निक्सन आणि ब्रेझनेव्ह यांच्या **<u>मॉस्को</u>** येथील शिखर परिषदेत आण्विक क्षेपणास्त्रांच्या संख्येवर मर्यादा आणण्यावर एकमत झाले
6) इ.स. १७७६ मध्ये जगात सर्वप्रथम **<u>स्वीडन</u>** या देशात माहितीचा कायदा लाग झाला

**<u>प्रश्न १ (ब ) :</u> पुढील प्रत्येक संचातील ब गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा ...०४**

**१)** <u>चुकीची जोडी :</u> थॉमस जेफरसन -- अमेरिकेचा पहिला राष्ट्राध्यक्ष
☛ दुरुस्त केलेली जोडी : **थॉमस जेफरसन -- अमेरिकेच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा तयार केला**

२) चुकीची जोडी : पाँडिचेरी -- स्पेनचे भारतातील मुख्य ठाणे
☛ दुरुस्त केलेली जोडी : **पाँडिचेरी -- फ्रेंचांचे भारतातील मुख्य ठाणे**

३) चुकीची जोडी : जोसेफ स्टॅलिन -- सोव्हिएट रशियाचा हुकूमशहा
☛ दुरुस्त केलेली जोडी : **जोसेफ स्टॅलिन -- सोव्हिएट रशियाचा हुकूमशहा**

४) चुकीची जोडी : सी-स्कॅप -- गिधाडांचे संरक्षण करणारी संस्था
☛ <u>दुरुस्त केलेली जोडी :</u> **<u>सी-स्कॅप -- गिधाडांचे संरक्षण करणारी संस्था</u>**

**<u>प्रश्न २ (अ ) :</u> ऐतिहासिक व्यक्ती, ठिकाण, घटना यासंबंधीची नावे लिहा. ...०४**

१) बृहत्संहिता कालिकत (कोझिकोडे)
२) डॉ. टी. बी. कुन्हा
३) अलिप्ततावादी धोरण
४) राष्ट्रीय मानवाधिकार आयोग.

**<u>प्रश्न २ (ब) :</u> दिलेल्या कारणांपैकी योग्य कारण निवडून विधाने पूर्ण करा. ...०४**

(1) युरोपातील विद्यापीठांच्या अभ्यासक्रमांत नाटके, विचारवंतांचे साहित्य, कला इत्यादी विषयांचा समावेश झाल्यामुळे, **<u>हे विषय अभ्यासून लोक स्वतंत्रपणे विचार करू लागले.</u>**

(2) छत्रपती शिवाजी महाराजांनी मिठाच्या व्यापारावर संरक्षक जकाती उभारल्या; कारण -- **<u>इंग्रजांचा मिठाचा व्यापार मोडून काढण्यासाठी</u>**

(3) पहिल्या महायुद्धानंतर 'राष्ट्रसंघ' ही संस्था स्थापन करण्यात आली, कारण -- **जगात शांतता प्रस्थापित करण्याची गरज होती.**


(4) दुसऱ्या महायुद्धकाळात आफ्रिकेतील स्वातंत्र्य चळवळ अधिक तीव्र झाली; कारण -- **दुसऱ्या महायुद्धकाळात इंग्रजांनी व फ्रेंचांनी वसाहतींना काही अधिकार दघायला सुरुवात केली.**

**<u>प्रश्न ३ (अ ) :</u> पुढील नकाशाचे निरीक्षण करून प्रश्नांची उत्तरे लिहा ...०५**


(1) औरंगाबाद, सातारा, कोल्हापूर, नरगुंद, नागपूर
(2) पेशावर, लाहोर, शिकारपूर, कराची
(3) उठाव प्रामुख्याने उत्तर भारतात एकवटलेला दिसतो.
(4) अयोध्या, लखनौ, कानपूर, झासी, बनारस
(5) चितगाव, ढाका

**प्रश्न ३ (ब ) दिलेली संकल्पनाचित्रे पूर्ण करा. (कोणतीही चार)** **...०८**


उत्तर : 1)




उत्तर : 2)




उत्तर : 3)





उत्तर : 4)

| | |
|---|---|
| **दुसऱ्या महायुद्धाची कारणे** | **राष्ट्रसंघाचे अपयश** |
| | **राष्ट्राराष्ट्रांतील कलह व वाद** |
| | **व्हर्सायचा अपमानकारक तह** |
| | **जर्मनीच्या आक्रमक धोरणाकडे इंग्लंड व फ्रान्सचे दुर्लक्ष** |
| | **हिटलरचा पोलंडवर हल्ला** |

उत्तर : 5)



उत्तर : 6)




**प्रश्न ४ (अ ) संक्षिप्त टिपा लिहा. (कोणत्याही तीन) ...०६**

(1) कर्नाटक युद्धे

उत्तर: 1. कर्नाटकच्या प्रदेशावर नवाबाची सत्ता होती व हे नवाबपद मिळवण्यासाठी नवाबाच्या घराण्यात सत्तासंघर्ष चालू होता.

2.या प्रदेशात आपला प्रभाव वाढवण्यासाठी ही संधी आहे, हे ओळ ब्रिटिशांनी आणि फ्रेंचांनी या सत्तासंघर्षात हस्तक्षेप सुरू केला.

3.त्यातूनच इसवी सन १७४४ ते १७६३ या काळात इग्रज व फ्रेंच यांच्यात ती युद्धे झाली. या युद्धांनाच 'कर्नाटक युद्दे' असे म्हणतात.

4.तिसऱ्या कर्नाटक युद्धात फ्रेंचांचा पराभव झाल्याने इंग्रजांना भारतात प्रथा असा युरोपीय स्पर्धक उरला नाही.

(2) सत्यशोधक समाज

उत्तर: 1. महात्मा जोतीराव फुले यांनी १८७३ साली पुणे येथे सत्यशोधक समाजाची स्थापना केली.

2.सत्यशोधक समाजाने पुढील विचारसरणीचा पुरस्कार केला – 1)एकेश्वरवाद आणि मूर्तिपूजेला विरोध.

2.वेद आणि पुराणांची सत्यता नाकारून टीकात्मक बुद्धीची सत्यता स्वीकारा.

3.पुरोहितांच्या वर्चस्वाला व मध्यस्थीला विरोध

4.चमत्कारांवर अविश्वास व तीर्थयात्रेला विरोध.

5.परलोक कल्पनेला विरोध

(3)संस्थानांच्या विलीनीकरणातील सरदार वल्लभभाई पटेल यांचे योगदान

उत्तर: 1. असहकार आंदोलनाच्या प्रभावामुळे संस्थानी प्रजेत राजकीय जागृती होऊन स्वातंत्र्य चळवळींना प्रारंभ झाला होता. देश स्वतंत्र होऊनही संस्थानी प्रजेत्ता स्वातंत्र्य मिळालेले नव्हते.

2.संस्थानाच्या विलीनीकरणाचा प्रश्न सोडवण्यासाठी सरदार वल्लभभाई पटेल प्र यांनी मुत्सद्दीपणाने मार्ग काढला. संस्थानिकांना विश्वासात घेऊन सर्वांना मान्य होईल असा 'सामीलनामा' त्यांनी तयार केला.

3. जुनागढ़, काश्मीर व हैदराबाद ही संस्थाने वगळता अन्य संस्थाने सामीलनाम्याला प्रमाण मानून भारतात विलीन झाली.

4.जुनागढ़, हैदराबाद आणि काश्मीर या संस्थानांबाबत वल्लभभाईंनी घेतलेल्या कणखर भूमिकेमुळे ही संस्थाने भारतात विलीन झाली.

(४) अटलांटिक सनद :

उत्तर: 1. जगाची रचना कशी असावी या संदर्भात दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकेचे अध्यक्ष फ्रँकलीन रूझवेल्ट आणि ब्रिटनचे प्रधानमंत्री विन्स्टन चर्चिल यांनी जी घोषणा केली तिला 'अटलांटिक सनद' असे म्हणतात.

2.'इंग्लंड-अमेरिकादी दोस्त राष्ट्रांना कोणाचेही राज्य लुबाडायचे नाही, युद्धोत्तर काळात होणारे राजकीय व भौगोलिक फरक स्थानिक लोकांच्या इच्छेनुसारच करण्यात येतील व जगातील सर्वलोकांना स्वयंनिर्णयाचा हक्क राहील' असे या घोषणेत म्हटले होते.
3.निर्वसाहतीकरणास चालना मिळण्यास अटलांटिक सनद कारणीभूत आहे.

(५) गॅट करार :
उत्तर: 1. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात अनेक राष्ट्रांनी आपल्या राष्ट्राच्या हितासाठी संरक्षण जकात कर लावल्याने व्यापारात घट झाली.
2. या समस्येवर चर्चा करण्यासाठी क्यूबामध्ये बोलावलेल्या ५४ देशांच्या बैठकीत एक कायमस्वरूपी आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.
3.त्यानंतर १९४७ मध्ये भरलेल्या जिनिव्हा परिषदेत जो करार संमत झाला, त्या करारास 'गॅट करार असे म्हणतात.
4. गॅट करार हा जगातील पहिला बहुउद्देशीय करार होय. या करारानुसार उत्पादन आणि विनिमय या मार्गाद्वारे आर्थिक विकास करणे, परममित्र राष्ट्रोचित व्यवहार (मोस्ट फेव्हर्ड नेशन्स ट्रिटमेंट) करणे या गोष्टींना प्राधान्य देण्यात आले.
5. गॅट कराराचे पुढे जागतिक व्यापार संघटनेत (WTO) रूपांतर झाले.

**(ब ) पुढील विधाने सकारण स्पष्ट करा (कोणतीही तीन) ...०९**
(1) औदयोगिक क्रांतीची सुरुवात सर्वप्रथम इंग्लंडमध्ये झाली
**उत्तर:** औदयोगिक क्रांतीची सुरुवात सर्वप्रथम इंग्लंडमध्ये झाली, कारण—
1.औदयोगिकीकरणासाठी आवश्यक असलेले लोहखनिज व कोशाचे स इंग्लंडमध्ये मोठ्या प्रमाणात उपलब्ध होते.
2.दमट हवामानामुळे सुती धागे बनवणे सोपे जात असल्यामुळे इंग्लंडमध्ये सुती कापडाचा उद्धोग भरभराटीस आला.
3. इंग्लंडचा साम्राज्यविस्तार मोठा असल्यामुळे वसाहतींमधून मोठ्या प्रमाणात कच्चा माल मिळणे शक्य झाले.
4.कच्च्या मालाचे रूपांतर पक्क्या मालात करून तो माल वसाहतींमध्ये विकणे इंग्लंडला त्याच्या नाविक सामर्थ्यांमुळे शक्य झाले.
5. व्यापारातून झालेल्या नफ्यातून इंग्लंडमधील व्यापाऱ्यांकडे अतिरिक्त भांडवल उपलब्ध झाले.
6. कमी मोबदल्यात कामगारांचे श्रम उपलब्ध झाल्यामुळे वस्तूंच्या किंमती आटोक्यात ठेवणे शक्य झाले, त्यामुळे त्यांची विक्री मोठ्या प्रमाणात वाढली. अशा रितीने ओदधोगिक क्रांतीला अनुकूल असणारे सर्व घटक इंग्लंडकडे उपलब्ध असल्यामुळे औदयोगिक क्रांतीची सुरुवात सर्वप्रथम इंग्लंडमध्ये झाली.

(2) युरोपीय राष्ट्रांनी अमेरिकेत वसाहती स्थापन केल्या.
**उत्तर:** युरोपीय राष्ट्रांनी अमेरिकेत वसाहती स्थापन केल्या, कारण—
1.अमेरिका खंडाचा शोध लागल्यानंतर तेथे वसाहती स्थापन करण्यासाठी युरोपीय राष्ट्रांत विविध कारणांसाठी चढाओढ सुरू झाली.
2. पोर्तुगाल आणि स्पेन यांना तेथे सोन्याचे साठे सापडले, खाणींमधून अफाट खनिज संपत्ती मिळू लागली.
3. स्थानिक रेड इंडियन्स आणि आफ्रिकेतून आणलेले गुलाम यांच्याकडून ते ऊस, तंबाखू यांचे उत्पादन तयार करून घेऊ लागले.
4. स्पेन, पोर्तुगाल यांची झालेलो भरभराट पाहून इंग्लंड, हॉलंड व फ्रान्स यांनीही अमेरिका खंडात आपल्या वसाहती स्थापन करण्यास सुरुवात केली.
5.अमेरिकेतून कच्चा माल आपल्या देशात नेऊन तेथून पक्का माल तयार करून अमेरिकन वसाहतीत विकला जाऊ लागला. हक्काची बाजारपेठ म्हणून युरोपियनांनी अमेरिकेत आपल्या वसाहती स्थापन केल्या.

(3) छत्रपती संभाजी महाराजांनी सिद्दी विरोधातील मोहीम अर्धवट सोडली
**उत्तर:** छत्रपती संभाजी महाराजांनी सिद्दी विरोधातील मोहीम अर्धवट सोडली, कारण—
1.मुरुड-जंजिराचा सिद्धी शिवरायांपासून मराठ्यांविरुद्ध इंग्रजांना मदत करीत असे.
2.स्वराज्याला त्याचा अति त्रास झाल्यावर छत्रपती संभाजी महाराजांनी सिद्दीला बडा शिकवण्याचे ठरवले.

3.उंदेरी, आपटे, नागोठणे आणि जंजिरा या परिसरांत मराठ्यांनी सिद्दीला जेरीस आणले.
4. सिद्दीचा पुरता बीमोड होत असतानाच मुघलांनी स्वराज्यावर आक्रमण केले.

(4) सार्क संघटनेला काही प्रमाणात यश मिळाले आहे.
**उत्तर:** सार्क संघटनेला काही प्रमाणात यश मिळाले आहे, कारण—
1. सार्क संघटनेमार्फत शेती, बी-बियाणे, पशुधन, मत्स्योत्पादन या क्षेत्रांत विशेष संशोधन केले गेले.
2. सार्क देशांतर्गत पर्यटनाला चालना दिली. व्यापारवृद्धीसाठी प्रयत्न केले.
3. गरीबी, आर्थिक प्रश्न, अमली पदार्थांचा बोरटा व्यापार इत्यादी समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला. अनेक आव्हाने असली तरीही या संघटनेने आतापर्यंत वरील काही क्षेत्रात काही प्रमाणात यश मिळवले आहे.

(5) पर्यटन स्थळांची काळजी सर्वांनी घ्यावी
**उत्तर:** पर्यटन स्थळांची काळजी सर्वांनी घ्यावी, कारण—
1. देशाच्या विकासात पर्यटन स्थळांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे हे महत्त्व प्रत्येकाने लक्षात घेणे आवश्यक आहे.
2.पर्यटन स्थळे हा आपल्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाचा ठेवा आहे.
3. आपले किल्ले, वास्तु, लेणों, येथील निसर्ग या गोष्टी आपल्या इतिहासाची माक्ष देतात. हे वैभव पाहण्यासाठी देशविदेशातील हजारी पर्यटक येतात.
4. विदेशी पर्यटकांच्या पर्यटनातून आपल्याला फार मोठे परकीय चलन मिळते
5.पर्यटनामुळे हजारो व्यवसाय निर्माण होतात व त्यातून रोजगार निर्माण होतात.
6. स्थानिक व्यवसाय मोठ्या प्रमाणात विकसित होतात. कला-उदद्योगांना चालना मिळते.
7.पर्यटन स्थळांची काळजी केवळ सरकारने घेऊन चालणार नाही. ती प्रत्येकानेच घेतली पाहिजे. अन्यथा पर्यटनाचे बरील सर्व फायदे आपल्याला व देशाला होणार नाहीत.

**प्रश्न ५ : खालील विधानांवर तुमचे मत नोंदवा (कोणतेही तीन) ...०९**
(1)सर्व धर्मीयांसाठी पोर्तुगिजांची वागणूक सहिष्णू वृत्तीची नव्हती.
**उत्तर:** माझ्या मते,
1. पोर्तुगिजांनी त्यांच्या सत्तेखालील प्रदेशात ख्रिस्ती धर्माखेरीज इतर धर्मांची प्रार्थना स्थळे बांधण्यास वा दुरुस्त करण्यास बंदी केली.
2. पोर्तुगिजांनी अन्य धर्मियांना त्यांच्या पद्धतीने धार्मिक उत्सव साजरे करण्यास वा लग्न समारंभ साजरे करण्यास बंदी घातली.
3. स्थानिक भाषांचीही गळचेपी केली. धर्मांतर करणाऱ्यांना पोर्तुगिजांनी नोकऱ्या देण्यास सुरुवात केली.
........ म्हणून सर्व धर्मीयांसाठी पोर्तुगिजांची वागणूक सहिष्णू वृत्तीची नव्हती.

(2)राजा राममोहन रॉय यांनी भारतात आधुनिकतेची पायाभरणी केली.
**उत्तर:** माझ्या मते,
**1.** राजा राममोहन रॉय यांनी सर्व धर्माचा अभ्यास करून त्यांतील समान तत्वे शोधण्याचा प्रयत्न केला. समाजातील अंधश्रद्धा, बुरसटलेले विचार यांच्यावर कोरडे ओढले.
2.सती प्रथेला कोणत्याही धर्मग्रंथात आधार नसल्याचे सांगून, ही प्रथा बंद करण्यासाठी इंग्रज सरकारकडे तगादा लावला, त्यामुळे १८२९ साली गव्हर्नर जनरान लॉर्ड विल्यम बेटिंक याने सती प्रथा बंदीचा कायदा केला.
3.बंगाली, पर्शियन भाषांमध्ये साप्ताहिक व दैनिक सुरू करून नवे विचार लोकांपर्यंत पोहोचवले.
4.वृत्तपत्रांवरील निर्बंधांना विरोध करून वृत्तपत्राचे स्वातंत्र्य टिकवण्याचा प्रयत्न केला.
5. वसाहतींमध्ये चाललेल्या स्वातंत्र्य चळवळींना पाठिंबा दिला.
6. अशा रितीने राजा राममोहन रॉय यांनी जुन्या अन्यायी रूढी, परंपरांना विरोध करतानाच दुसरीकडे नवीन विचार, स्वातंत्र्य यांचा स्वीकार केला.
........ म्हणून राजा राममोहन रॉय यांनी भारतात आधुनिकतेची पायाभरणी केली.

(3) इंग्रजांविरुद्ध पाइकांनी सशस्त्र उठाव केला.
**उत्तर:** माझ्या मते,

1. ओडिशात मध्ययुगीन काळापासून पाइक पद्धती अस्तित्वात होती. तिथल्या निरनिराळ्या स्वतंत्र राजांचे जे खडे सैनिक होते, त्यांना 'पाइक' असे म्हणत.
2.राजांनी या पाइकांना जमिनी मोफत कसण्यास दिल्या होत्या. त्या कसून ते आपला उदरनिर्वाह करत. त्या बदल्यात युद्धाचा प्रसंग उद्भवला तर त्यांनी आपल्या राजांच्या बाजूनेलढाईला उभे राहायचे अशी अट होती.
3.इ.स.१८०३ मध्ये इंग्रजांनी नागपूरकर भोसल्यांकडून ओडिशा जिंकून घेतले.
4.इंग्रजांनी पाइकांच्या वंशपरंपरागत जमिनी काढून घेतल्या. त्यामुळे पाइक संतापले.
5.तसेच इंग्रजांनी लावलेल्या करांमुळे मिठाच्या किमतीत वाढ होऊन सामान्य लोकांचेजीवन असह्य झाले.
........ म्हणून इंग्रजांविरुद्ध पाइकांनी सशस्त्र उठाव केला.

(4)इसवी सन १९६१ पर्यंत गोव्यातील पोर्तुगीज राजवट अबाधित राहिली
**उत्तर:** माझ्या मते,
1. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर पोर्तुगिजांनी भारतातील वसाहतीत स्वातोय देणे अपेक्षित होते; परंतु गोवा सोडण्यास त्यांनी नकार दिला.
2.गोवा मुक्तीसाठी तेथील जनतेने काही संघटना स्थापन केल्या डॉ. टी. बी. कुन्हांसारख्या अनेक नेत्यांनी सत्याग्रह केले, आंदोलने केली.
3. पोर्तुगीज सरकारने या नेत्यांना तुरुंगात टाकले, जनतेवर अत्याचार केला
4.अखेरीस गोव्यातील लोकभावनेची दखल केंद्र सरकारला म्हणजेच प्रहित जवाहरलाल नेहरूंना घ्यावी लागली.
5. त्यांनी 'ऑपरेशन विजय' ही लष्करी कारवाई करून गोवा पोर्तुगिजांच्या ताब्यातून मुक्त केला.
........ म्हणून इसवी सन १९६१ पर्यंत गोव्यातील पोर्तुगीज राजवट अबाधित राहिली

(5) वसाहतवादाच्या माध्यमातून वसाहतींच्या शोषणाचे समर्थन करणे युरोपला शक्य नव्हते
**उत्तर:** माझ्या मते,
1. व्यापारवाढ आणि हक्काच्या बाजारपेठा मिळवण्यासाठी युरोपीय राष्ट्रा वसाहतवादी स्पर्धा वाढली. युरोपीय राष्ट्रांनी जगभर वसाहती स्थापन केल्या.
2.अधिकाधिक नफा कमावण्यासाठी या राष्ट्रांनी वसाहतींचे आर्थिक शोषण
केले. आपली इंग्रजी शिक्षणपद्धती त्यांच्यावर लादली.
3.इंग्रजी शिक्षणाने स्वातंत्र्य, लोकशाही, समता, न्याय या मूल्यांची ओळख वसाहतींना झाली. त्यातूनच वसाहतींमध्ये स्वातंत्र्य चळवळी सुरू झाल्या.
4.वसाहतवादविरोधी चळवळींमुळे युरोपीय राष्ट्रांना आपल्या सर्व प्रकारच्या शोषणाचे समर्थन करणे वैचारिकदृष्ट्या अवघड जाऊ लागले.
........ म्हणून वसाहतवादाच्या माध्यमातून वसाहतींच्या शोषणाचे समर्थन करणे युरोपला शक्य नव्हते

**प्रश्न ६. : पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही दोन) ...१०**
(1) पोर्तुगीज आणि मराठे यांचे परस्परांसंबंधीचे राजकीय धोरण लवचीक होते. हे विधान उदाहरणे देऊन स्पष्ट करा.
उत्तर: ◈ प्रस्तावना : पोर्तुगीज आणि मराठे यांचे परस्परांसंबंधीचे राजकीय धोरण पुढीलप्रमाणे --
**◈ मुख्य उत्तर :**
1.पोर्तुगिजांच्या वसाहतवादी धोरणाला छत्रपती शिवरायांनी नेहमीच विरोध केला. या दोघांत नेहमी कधी संघर्षाचे तर कधी सहकार्याचे संबंध राहिले.
2.सुरुवातीस मराठ्यांना तंत्रज्ञानाची मदत करणाऱ्या पोर्तुगिजांनी सिद्दीविरोधात मराठ्यांनी केलेल्या कारवाईत सिद्दीला मदत केली.
3. १६६५ मध्ये कर्नाटकच्या सागरी प्रदेशातून जाणाल्या मराठ्यांची १३ जहाजे पोर्तुगिजांनी जप्त केली व मराठ्यांच्या धाकामुळे पुढे ती सोडूनही दिली.
4.१६६६ साली मराठ्यांनी आदिलशाहाच्या फोंडा किल्ल्याला वेढा दिलेला असताना पोर्तुगिजांनी किल्लेदाराला दारूगोळा दिला. परंतु सुरतेच्या स्वारीप्रसंगी याच पोर्तुगिजांनी शिवरायांना त्यांच्या प्रदेशातून सुखरूप स्वराज्यात येऊ दिले.
5.मिर्झाराजे जयसिंग याच्या आक्रमणावेळी पोर्तुगिजांनी शिवाजी महाराजांना सहानुभूती दाखवली.


6. शिवाजी महाराजांच्या परवानगीने पोर्तुगिजांनी दाभोळ येथे वखार उघडली, मात्र पोर्तुगिजांनी आपल्या वसाहतीत धर्मांतराला पोषक कायदे केल्यामुळे शिक्रायांनी त्यांच्या बारदेशवर स्वारोही केली.
7.आदिलशाही मराठे संघर्षांत आदिलशाहाला मदत करणाऱ्या पोर्तुगिजांनी आपला वकील रायगडावर पाठवून संघर्ष टाळला.
◈ उपसंहार :
अशा अनेक उदाहरणांवरून हे लक्षात येते की, पोर्तुगीज आणि मराठे यांच्या संबंधात परिस्थितीनुरूप बदल होत असत.

(2)पहिल्या महायुद्धाचे भारतावर झालेले परिणाम स्पष्ट करा.
उत्तर: ◈ प्रस्तावना : १९१४ ते १९१८ या कालावधीत युरोपात लढल्या गेलेल्या पहिल्या महायुद्धाचे भारतावर पुढील परिणाम झाले --
**◈ मुख्य उत्तर :**
1.भारत ही ब्रिटिशांची वसाहत असल्यामुळे इंग्रजांनी युद्धोपयोगी सामग्रीचा पुरवठा करण्याची भारतावर सक्ती केली.
2. याचा परिणाम भारताच्या आर्थिक धोरणांवर, उदद्योगधदधांवर आणि शेती उत्पादनांवर झाला.
3. भारताच्या औदयोगिकीकरणाला चालना मिळाली. मोटार वाहतूक, गाड्यांच्या संख्या, खाणउदधोग पांत वाढ झाली, परंतु याचा फायदा भारताला झाला नाही.
4.शेतीमालाला मंदी आली तर औदयोगिक मालाच्या किमती वाढल्या.
5.अन्नधान्याची निर्यात इंग्लंड व युरोपीय राष्ट्रांना केली जाऊ लागली, त्यामुळे भारतीयांची अन्नधान्याची गरज भागणे कठीण झाले. अन्नधान्याच्या किमती वाढल्या.
6. युद्धमदत माणून इंग्लंडने भारतातून अकरा लाख सैन्य युद्धआघाडीवा पाठवले. यांतील काही सैनिक मारले गेले.
7. जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा निर्माण झाल्याने आर्थिक मंदी येऊन महागाई वाढली.
8. सक्तीच्या युद्धमदतीच्या धोरणामुळे ब्रिटिशांची सत्ता कशी शोषक आहे, याची जाणीव लोकांना झाली.
9. भारतातील कामगार, शेतकरी, मध्यमवर्ग ब्रिटिशांच्या विरोधात एकवटून भारतीय स्वातंत्र्याचा लढा तीव्र झाला.

◈ उपसंहार :
अशा प्रकारे, पहिल्या महायुद्धाचे भारतावर झालेल्या परिणामाची सविस्तर माहिती देता येईल.

(3)
भारत सरकारचे क्रीडा धोरण स्पष्ट करा.
उत्तर: ◈ प्रस्तावना : कबड्डी, हॉकी, क्रिकेट, जलतरण, बॅडमिंटन, भारोत्तोलन (वेटलिफ्टिंग), नेमबाजी, बुद्धिबळ, मोटर स्पोर्टस्, स्काय डायव्हिंग, मुष्टियुद्ध, तिरंदाजी, कुस्ती, फुटबॉल, टेनिस, टेबल-टेनिस, बिलियर्डस, मल्लखांब अशांसारखे अनेक खेळ आज खेळले जातात. रोज नवे-नवेविक्रम घडत आहेत. खेळाचे स्वरूप बदलत चालले आहे. त्या अनुषंगाने भारत सरकारच्या क्रीडा धोरणाची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे --
**◈ मुख्य उत्तर :**
1. आंतरराष्ट्रीय पातळीवर भारतीय खेळाडूंचा वाढत चाललेला सहभाग, खेळात विज्ञानाचा वाढता वापर आणि आधुनिक तंत्रज्ञान यांमुळे प्रत्येक देश आपल्या क्रीडा धोरणाबद्दल दक्ष आहे.
2. भारत सरकारने २००१ मध्ये क्रीडा धोरणाची घोषणा केली. खेळांचा विस्तार करणे, खेळाडूंना खेळांमध्ये प्रावीण्य मिळवण्यास मदत करणे, खेळांसाठी पूरक आणि मूलभूत सोयी उभारणे, राष्ट्रीय क्रीडा फेडरेशन आणि सहयोगी संस्थांना मदत करणे व खेळाडूंचा शोध घेणे, खेळांच्या प्रसारासाठी लोकसहभाग व जागृती करणे ही क्रीडा धोरणाची प्रमुख उद्दिष्टे आहेत.
3. २०११ मध्ये भारत सरकारने 'या आणि खेळा' ही योजना सुरू केली. या योजनेच्या अंतर्गत स्पोर्ट ॲथोरिटी ऑफ इंडियानेजवाहरलाल नेहरू स्टेडिअम, डॉ.करणसिंह शुटींग रेंज, डॉ.एस.पी.एम. स्विमिंग पूल संकुल, मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियम, इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियम ही दिल्लीतील पाच क्रीडा संकुले खेळाडूंसाठी उपलब्ध करून देण्यात आली.

4. याखेरीज येथे खेळायला येणाऱ्या मुलांसाठी SAI च्या तज्ज्ञ प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली शिकण्याची संधी मिळू लागली.
5. याच्याच पुढचा टप्पा म्हणजे मणिपूरमध्ये 'नॅशनल स्पोर्टस् युनिव्हर्सिटी'ची स्थापना होय. येथे खेळांचे प्रशिक्षण, खेळांचे व्यवस्थापन, क्रीडा मानसशास्त्र इत्यादी विषयांचे पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.
6. याशिवाय संशोधनालाही प्रोत्साहन दिले जाते. २०१८-१९ पासून एम.एस्सी. (खेळांचे प्रशिक्षण) व एम.ए. (खेळांचे मानसशास्त्र) यांचे अभ्यासक्रम विद्यापीठात सुरू झाले.
7. २०१७ पासून भारत सरकारने पूर्वीच्या काही योजना आणि नवी उद्दिष्टे एकत्र करून खेलो इंडिया ही योजना सुरू केली. खेळांना व्यापक जनाधार देणे आणि खेळांमध्ये उत्तम दर्जा गाठणे यासाठी ही योजना सुरू झाली. या योजनेचे १२ घटक आहेत.
8.खेळांच्या विकासासाठी राष्ट्रीय खेळ विकास कोष (National Sports Development Fund) स्थापन करण्यात आला. त्या कोषाला देणगी दिल्यास त्या रकमेवर आयकरात १००% सूट आहे.
9.ऑलिंपिक खेळात सुवर्णपदक मिळवणाऱ्या खेळाडूस भारत सरकार ७५ लाख रुपयांचे बक्षिस देते. पॅरा ऑलिंपिक, एशियाड, राष्ट्रकुल, विश्वकप, आशियाई चॅम्पियनशिप, आंतरराष्ट्रीय विद्यापीठ स्पर्धा, दिव्यांगांच्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील विविध स्पर्धा, दृष्टीहीन खेळाडूंची क्रिकेट स्पर्धा अशा विविध स्पर्धांमध्ये सुवर्ण, रौप्य आणि कांस्यपदक अथवा विजेतेपद मिळवणाऱ्या संघास रोख बक्षिसे, खेळाडूंना नोकऱ्या दिल्या जातात
10.खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार अर्जुन पुरस्कार, ध्यानचंद लाईफटाईम अचिव्हमेंट पुरस्कार, द्रोणाचार्य पुरस्कार, मौलाना अबुल कलाम आझाद ट्रॉफी, राष्ट्रीय खेल प्रोत्साहन इत्यादी पुरस्कार दिले जातात.




11. एप्रिल २०१८ पासून ऑलिंपिक खेळातील विजेत्यास दर महिना २० हजार रूपये तर आशियाई खेळातील विजेत्यास बारा हजार रुपये दरमहा देण्यात येतात. याशिवाय विजेत्या खेळाडूंना निवृत्त झाल्यावर पेन्शन दिली जाते.
◈ उपसंहार : अशा प्रकारे, भारत सरकारच्या क्रीडा धोरणाची सविस्तर माहिती देता येईल.

**प्रश्न ७. : खालील प्रश्नांची दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही तीन) ...१५**

(१) युरोपातील धर्मयुद्धाची माहिती लिहा
मुद्दे : (अ) अपयशाची कारणे
(ब) धर्मयुद्धांचे परिणाम


उत्तर ◈ प्रस्तावना : जेरुसलेम आणि बेथेलहॅम ही शहरे ज्यू, ख्रिश्चन आणि इस्लाम या धर्मांच्या अनुयायांसाठी अत्यंत पवित्र आहेत. अकराव्या शतकात ही शहरे इस्लामी सत्ताधीशांच्या ताब्यात होती. ही शहरे परत मिळवण्यासाठी ख्रिश्चन धर्माच्या अनुयायांनी वेळोवेळी केलेल्या लढायांना धर्मयुद्धे (क्रुसेडस्) म्हणतात.

◈ मुख्य उत्तर :

☞ **(अ) अपयशाची कारणे :**

1.युरोपीय धर्मयुद्धामध्ये ख्रिस्ती धर्मयोद्ध्यांना अपयश आले, कारण पोप आणि युरोपातील सत्ताधीश यांनी या

युद्धांकडे संकुचित हेतूंनी पाहिले.
2. धर्मावरील कमी झालेली श्रद्धा, पोप व जर्मन सम्राटातील वितुष्ट, बायझॅन्टाईन सम्राटांच्या सहकार्याचा अभाव या बाबी धर्मयुद्धांच्या अपयशास कारणीभूत होत्या.
3. युरोपातील विविध राजांमधील एकीचा अभाव होता.




☞ **<u>धर्मयुद्धांचे परिणाम</u>**
1.धर्मयुद्धांमुळे सरंजामशाहीचा अस्त झाला.
2.लोकांची पोपवरील श्रद्धा कमी झाली.
3. मध्य आशियाबरोबर वाढलेल्या व्यापारामुळे इटली आणि जर्मनीतील शहरांना नवी क्षेत्रे खुली झाली.
4.नवा व्यापारी वर्ग उदयाला आला. युरोपीय युद्धतंत्रात अनेक बदल घडून आले.
5.किल्लेबांधणी, किल्ल्यांचा लढाईचे ठाणे म्हणून उपयोग, लष्कराच्या वाहतुकीसाठी पूलबांधणी, शत्रूचे मार्ग उद्ध्वस्त करणे इत्यादी गोष्टींमध्ये युरोपीय राष्ट्रांनी प्राविण्य मिळवले.
6.लढाईचा खर्च भागवण्यासाठी युरोपमधील राजांनी नवीन कर लागू केले.

◈ उपसंहार :
अशा प्रकारे युरोपातील धर्मयुद्धाच्या अपयशाची कारणे व परिणाम होते

(2) निर्वसाहतीकरण : आशिया माहिती लिहा
मुद्दे: (अ) मालदीव
(ब) श्रीलंका
(क) म्यानमार (ब्रह्मदेश)

उत्तर : ◈ प्रस्तावना : म्यानमार वसाहतीच्या स्वातंत्र्याची माहिती पुढीलप्रमाणे --

◈ मुख्य उत्तर :
☞ **(अ)** मालदीव **:**
1. मालदीवमध्ये १५०७ मध्ये पोर्तुगिजांनी प्रवेश केला. तेव्हापासून मालदीव गोव्यातील पोर्तुगिजांकडे खंडणी पाठवूलागले.
2.१५७३ मध्ये पोर्तुगिजांची सत्ता मलबार येथील मुहम्मद ठाकुरूफानु अल आझम याने संपुष्टात आणली. तो सुलतान झाल्यावर त्याने डचांशी करार करून या बेटांची जबाबदारी त्यांच्याकडे सोपवली.
3.तेव्हापासून मालदीवचा सुलतान डचांची सत्ता असणाऱ्या श्रीलंकेकडे (सिलोन) खंडणी पाठवूलागला.
4.त्यानंतर हा प्रदेश ब्रिटिशांनी ताब्यात घेतला. ब्रिटिशांनी येथे हवाई तळ आणि रेडिओ केंद्र उभारले.
5.ब्रिटिशांनी भातशेती करण्यासाठी भारतातील मजूर तेथे नेले होते.
6.२६ जुलै १९६५ रोजी कोलंबो येथे झालेल्या करारानुसार मालदीवला स्वातंत्र्य मिळाले.
☞ **(ब)** श्रीलंका **:**

1. ब्रिटिशांनी श्रीलंका (सिलोन) येथे १७९८ ते १९४८ पर्यंत राज्य केले.
2.डच आणि पोर्तुगीज यांचा पराभव करून ब्रिटिशांनी श्रीलंका ताब्यात घेतले. ब्रिटिश सत्तेविरोधात श्रीलंकेमध्ये उठाव झाले.
3.श्रीलंकेमध्ये कॉफी लागवडीच्या क्षेत्रात काम करण्यासाठी ब्रिटिशांनी अनेक तमिळ मजूर दक्षिण भारतातून नेले.
4.कॉफी, चहा, रबर आणि नारळ यांच्या उत्पादन व विक्रीत ब्रिटिशांनी व्यापारी वर्चस्व मिळवले.
5.ब्रिटिशांनी कोलंबो हेजागतिक बंदर म्हणून नावारूपास आणले. श्रीलंकेत ब्रिटिशांनी महाविद्यालये, विद्यापीठे स्थापन केली आणि बौद्ध धर्माच्या अभ्यासाला प्रोत्साहन दिले.
6.१९४८ मध्ये श्रीलंका हा देश ब्रिटिश वर्चस्वातून पूर्णपणे मुक्त झाला

**(क)** म्यानमार (ब्रह्मदेश) **:**

1. इ.स.१५९९ मध्ये पोर्तुगिजांनी म्यानमारच्या राजाचा पराभव केला. या पराभवामुळे पोर्तुगिजांना म्यानमारमध्ये प्रवेश करणे सोपे झाले. इ.स.१६११ मध्ये म्यानमारमधील विविध राजघराण्यांनी एकत्र येऊन पोर्तुगिजांचा पराभव केला आणि देशाचे एकत्रीकरण केले. पुढे त्यांनी विस्तारवादाचा आश्रय घेऊन मणिपूर आणि आसामच्या भागावर ताबा मिळवला.
2.ब्रिटिशांच्या अंमलाखालील प्रदेशास धोका उत्पन्न झाल्यामुळेब्रिटिश आणि म्यानमार यांच्यात तीन युद्धे झाली. १८२६ च्या पहिल्या युद्धात ब्रिटिशांनी म्यानमारचा पराभव करून आसाम, मणिपूर ही राज्ये जिंकून घेतली. तसेच दुसऱ्या युद्धातही त्यांनी म्यानमारचा पराभव केला. याच दरम्यान फ्रान्सने म्यानमारमधील 'अप्पर बर्मा' या भागाचा ताबा घेतला. तिसऱ्या युद्धात इंग्लंडने मंडाले या भागाचा ताबा घेतला. पुढे ब्रिटिशांनी संपूर्ण म्यानमार आपल्या वर्चस्वाखाली आणले.
3.ब्रिटिशांनी म्यानमार ब्रिटिश भारताचा एक प्रांत म्हणून भारतात समाविष्ट केला. त्यानंतर १९३५ च्या कायद्यानुसार म्यानमार (ब्रह्मदेश) भारतापासून वेगळा करण्यात आला. ४ जानेवारी १९४८ रोजी ब्रिटिशांनी म्यानमारला स्वातंत्र्य दिले.

## ◈ उपसंहार :

अशा प्रकारे, निर्वसाहतीकरण : आशिया माहिती देता येईल.

**(3) भारतीय राष्ट्रीय सभेच्या पहिल्या अधिवेशनाची माहिती लिहा.**

**मुद्दे : (अ) पहिले अधिवेशन (ब) हजर प्रतिनिधी (क) संमत झालेले ठराव**

## उत्तर : ◈ प्रस्तावना : भारतीय राष्ट्रीय सभेच्या पहिल्या अधिवेशनाची माहिती पुढीलप्रमाणे --

## ◈ मुख्य उत्तर :

☞ **(अ)** पहिले अधिवेशन **:**

1. २८ डिसेंबर १८८५ रोजी मुंबईच्या गोकुळदास तेजपाल संस्कृत विद्यालयाच्क सभागृहात राष्ट्रीय सभेचे पहिले अधिवेशन सुरू झाले.
2.व्योमेशचंद्र बॅनर्जी हे राष्ट्रीय सभेच्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते
3.ॲलन ऑक्टोव्हियन हयूम या ब्रिटिश अधिकाऱ्याने राष्ट्रीय सभेच्या स्थापनेसाठी पुढाकार घेतला होता.

☞ **(ब)** हजर प्रतिनिधी **:**

1. राष्ट्रीय सभेच्या या पहिल्या अधिवेशनाला देशभरातून एकूण ७२ प्रतिनिधी हजर होते.
2. फिरोजशहा मेहता, दादाभाई नौरोजी, रहीमतुल्ला सयानी, काशीनाथ त्र्यंबक तेलंग, गोपाळ कृष्ण गोखले असे दिग्गज या अधिवेशनाला हजर होते.

☞ **(क)** संमत झालेले ठराव **:** राष्ट्रीय सभेच्या पहिल्या अधिवेशनात पुढील ठराव संमत झाले –

1. इंग्रजांच्या राज्यकारभाराची चौकशी करण्यासाठी एक आयोग नेमण्यात यावा.
2. मध्यवर्ती व प्रांतिक कायदेमंडळांत मोठ्या प्रमाणावर लोकनियुक्त प्रतिनिधी असावेत.
3. प्रशासकीय सेवांमध्ये भारतीय लोकांना वाव द्यावा.
4. सनदी नोकरीच्या परीक्षा हिंदुस्थानात घ्याव्यात.
5.लष्करी खर्च वाढवू नये.
6. उच्च शिक्षणावर अधिक खर्च करावा.

7.तांत्रिक शिक्षणांची सोय करावी.

◈ उपसंहार : अशा प्रकारे, भारतीय राष्ट्रीय सभेच्या पहिल्या अधिवेशनाची माहिती देता येईल.

**(4) 'राष्ट्रकुल' संघटनेची माहिती लिहा.**

**मुद्दे : (अ) उद्देश**
**(ब) स्थापना**
**(क) फायदे**

उत्तर :◈ प्रस्तावना : इंग्लंडच्या साम्राज्यात असणाऱ्या, परंतु नंतरच्या काळात स्वतंत्र झालेल्या काही राष्ट्रांची स्थापन झालेली आंतरराष्ट्रीय संघटना म्हणजे 'राष्ट्रकुल' (कॉमनवेल्थ) होय. ) 'राष्ट्रकुल' संघटनेची माहिती पुढीलप्रमाणे --

◈ मुख्य उत्तर :

☞ **(अ)** उद्देश **:**

1. ब्रिटिश साम्राज्यांतर्गत असलेल्या विविध वसाहतींतील गव्हर्नर आणि प्रशासक यांच्या अनुभवांची एकमेकांमध्ये देवाणघेवाण करावी.
2. या राष्ट्रांच्या राजकीय आणि प्रशासकीय धोरणांत एकसूत्रता आणण्याचा प्रयत्न करावा.

☞ **(ब)** स्थापना **:**

1. १९७१ मध्ये कॅनडा, ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड या वसाहतींना इंग्लंडने ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वायत्त राज्यांचा दर्जा दिला.
2. १९३१ मध्ये आपल्या सर्व वसाहतींना क्रमाक्रमाने स्वायत्तता देण्याचे इंग्लंडने जाहीर केले.
3. इंग्लंडच्या संसदेने केलेल्या 'स्टॅच्यूट ऑफ वेस्टमिन्स्टर' या कायदयानुसार राष्ट्रकुलास मान्यता देण्यात आली.
4. लंडन येथे राष्ट्रकुलाचे स्वतंत्र सचिवालय स्थापन करण्यात आले.
5. इंग्लंडचा राजा किंवा राणी प्रथेनुसार राष्ट्रकुल संघटनेच्या प्रमुखपदी असतात.

☞ **(क)** फायदे **:**

1. राष्ट्रकुल संघटनेच्या सदस्य राष्ट्रांना आर्थिक, राजकीय, क्रीडा अशा विविध क्षेत्रांत फायदे झाले.
2.दुसऱ्या महायुद्धानंतर आशिया आफ्रिका खंडांतील इंग्लंडच्या वसाहतींना स्वातंत्र्य मिळण्यात राष्ट्रकुलाचा वाटा महत्त्वाचा होता.
3. वसाहतवादविरोधी चळवळींना राष्ट्रकुल संघटनेच्या अस्तित्वामुळे चालना मिळाली.
4. ब्रिटिश सत्तेच्या वर्चस्वाखालील वसाहतींना स्वातंत्र्य देण्याबाबत इंग्लंडमध्ये काही वर्गात असणारा विरोध कमी करण्यात राष्ट्रकुल संघटना यशस्वी ठरली.
5.राष्ट्रकुल संघटनेमार्फत होणाऱ्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांमुळे सभासद राष्ट्रांना आआंतरराष्ट्रीय खेळांत भाग घेण्याची संधी मिळाली

◈ उपसंहार :

अशा प्रकारे, 'राष्ट्रकुल' संघटनेची माहिती माहिती देता येईल.

**(5) माहितीचा अधिकार अधिनियमाची माहिती लिहा.**

**मुद्दे : (अ) भारतात ही चळवळ कशी सुरू झाली?**
**(ब) माहितीची व्याख्या**
**(क) माहितीचा अधिकार या अंतर्गत नागरिकांचे हक्क.**

**उत्तर :** ◈ प्रस्तावना : 'माहितीचा कायदा' जगात सर्वप्रथम स्वीडन या देशाने १७७६ मध्ये लागू केला. संयुक्त राष्ट्रसंघाने इ.स.१९४६ मध्ये 'माहितीचा अधिकार' हा मानवाचा मूलभूत अधिकार असल्याचे सांगितले. माहितीचा अधिकार अधिनियमाविषयी सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे --

**◈ मुख्य उत्तर :**

☞ **(अ) भारतात ही चळवळ कशी सुरू झाली ? :**

1. १९८२ मध्ये जयपूर शहरातील एल.के.कुलवाल यांनी या कामी पुढाकार घेतला. जयपूर शहरातील अस्वच्छतेच्या संदर्भात नगरपालिका काय कार्यवाही करते हे समजून घेण्यासाठी कुलवाल यांनी एक अर्ज केला.

2. या संदर्भात उच्च न्यायालयातील खटल्यात न्यायाधीशांनी आपल्या निकालपत्रात 'माहितीचा अधिकार हा नागरिकांचा मूलभूत अधिकार' असल्याचे स्पष्ट केले.
3.श्रीमती अरूणा रॉय यांनी १९९० मध्ये राजस्थानमध्ये 'मजदूर किसान शक्ती संघटन' चळवळ चालवली. या चळवळीने माहिती अधिकाराची गरज व्यक्त केली.
4. बिलासपूरचे तत्कालीन विभागीय आयुक्त हर्ष मंडर यांनी सप्टेंबर १९९६ मध्ये 'अन्नधान्य वितरण व्यवस्था व रोजगार विनिमय' याबाबतची माहिती उघड करण्याचे धाडस दाखवले.
5.अण्णा हजारे यांचे महाराष्ट्रातील माहितीच्या अधिकाराबाबतचे २००१ चे आंदोलन निर्णायक ठरले. केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार कायदा १२ ऑक्टोबर २००५ पासून महाराष्ट्रात लागू झाला.

☞ **(ब) माहितीची व्याख्या :**

1. या कायद्यानुसार माहितीचा अर्थ अभिलेख (रेकार्ड), दस्तावेज (डॉक्युमेंटस्), ज्ञापने (मेमो), ई-मेल, अभिप्राय, सल्ला, प्रसिद्धीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या (लॉगबुक), निविदा (टेंडर्स), अहवाल, पत्रव्यवहार, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), इलेक्ट्रॉनिक स्वरूपात साठवलेली आधारसामग्री (डेटा), इतकेच नव्हे तर सार्वजनिक प्राधिकरणात अस्तित्वात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याखाली उपलब्ध होऊ शकणारी एखाद्या खासगी संस्थेविषयीची वा व्यक्तिविषयक माहिती या सगळ्याचा माहिती (इन्फरमेशन) या व्याख्येत समावेश होतो.

☞ **(क)माहितीचा अधिकार या अंतर्गत नागरिकांचे हक्क :**

1. माहितीचा अधिकार' (राईट टू इन्फरमेशन) या शब्दात माहिती मिळवण्याचे नागरिकांचे हक्क दिलेले असून त्यामध्ये कामाची, दस्तावेजांची वा अभिलेखांची पाहणी करणे, त्यासाठी दस्तवेजांच्या किंवा अभिलेखांच्या अण्णा हजारे 88 अधिकृत प्रती मिळवणे, टिपणे काढणे, उतारेमिळवणे, प्रमाणित सामग्रीचे नमुनेमिळवणे आणि सीडी, फ्लॉपी, टेप, व्हिडिओ कॅसेट या व अशा स्वरूपात किंवा ही माहिती जर संगणकात साठवलेली असेल तर तिच्या मुद्रित प्रती मिळवण्याचा अधिकार अधोरेखित झाला आहे.
2. नागरिक सार्वजनिक प्राधिकरणाच्या माहिती अधिकाऱ्याकडे लेखी अर्ज करून माहिती मागवू शकतात.

◈ उपसंहार :

अशा प्रकारे, माहितीचा अधिकार अधिनियमाची विषयी सविस्तर माहिती देता येईल.

◈◆◈◆◈◆◈◆◈◆

# प्रकरणानिहाय प्रश्नपेढी

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरणानिहाय प्रश्नपेढी<br>प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| 1] | **प्रकरण 1 ले :** युरोपातील प्रबोधन आणि विज्ञानाचा विकास | 73 ते 77 |
| 2] | **प्रकरण 2 रे :** युरोपीय वसाहतवाद | 78 ते 84 |
| 3] | **प्रकरण 3 रे :** भारत आणि युरोपीय वसाहतवाद | 85 ते 88 |
| 4] | **प्रकरण 4 थे :** वसाहतवाद आणि मराठे | 89 ते 95 |
| 5] | **प्रकरण 5 वे :** भारत : सामाजिक व धार्मिक सुधारणा | 96 ते 100 |
| 6] | **प्रकरण 6 वे :** वसाहतवादाविरुद्ध भारतीयांचा संघर्ष | 101 ते 106 |
| 7] | **प्रकरण 7 वे :** भारत : निर्वसाहतीकरण ते एकीकरण | 107 ते 111 |
| 8] | **प्रकरण 8 वे :** जागतिक महायुद्धे आणि भारत | 112 ते 116 |
| 9] | **प्रकरण 9 वे :** जग : निर्वसाहतीकरण | 117 ते 119 |
| 10] | **प्रकरण 10 वे :** शीतयुद्ध | 120 ते 124 |
| 11] | **प्रकरण 11 वे :** बदलता भारत- भाग १ | 125 ते 131 |
| 12] | **प्रकरण 12 वे :** बदलता भारत - भाग २ | 132 ते 139 |

संविधान तक्ता नुसार एकूण गुण : **10**

# प्रकरण 1 ले- युरोपातील प्रबोधन आणि विज्ञानाचा विकास

## प्रश्न - दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.

1] इ.स.१६०९ मध्ये ..............ने अधिक सुधारित दुर्बीण तयार केली.

(अ) जॉन के (ब) कोपर्निकस (क) गॅलिलिओ (ड) केपलर

**उत्तर :** इ.स.१६०९ मध्ये **गॅलिलिओ** ने अधिक सुधारित दुर्बीण तयार केली.

2] इ.स.१४४० मध्ये ................ याने छापखाना सुरू केला.

(अ) जेम्स वॅट (ब) गुटेनबर्ग (क) ॲरिस्टॉटल (ड) होमर

**उत्तर :** इ.स.१४४० मध्ये **गुटेनबर्ग** याने छापखाना सुरू केला.

## प्रश्न - ऐतिहासिक ठिकाण, व्यक्ती, घटना यांसंबंधी नावे लिहा.

1] आधुनिक विज्ञानाचा जनक -- **गॅलिलिओ**

2] वराहमिहीर यांनी लिहिलेला ग्रंथ -- **बृहत्संहिता**

3] ग्रहमाला सूर्यकेंद्रित आहे, असे प्रतिपादित करणारा शास्त्रज्ञ -- **निकोलस कोपर्निकस**

4] इ.स.१४४० मध्ये याने छापखाना सुरू केला -- **गुटेनबर्ग**

## प्रश्न : – ब' गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.

◈ (1)

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (अ) | जॉन के | -- | धावता धोटा |
| (ब) | सॅम्युएल क्रॉम्प्टन | -- | कॉटन जीन |
| (क) | एडमंड कार्टराईट | -- | यंत्रमाग |
| (ड) | जेम्स वॅट | -- | स्टीम इंजिन |

उत्तर : चुकीची जोडी : सॅम्युएल क्रॉम्प्टन -- कॉटन जीन

**दुरुस्त केलेली जोडी : सॅम्युएल क्रॉम्प्टन -- 'म्यूल' यंत्र**

◈ (2)

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (अ) | फर्डिनंड मॅगेलन | -- | भारतात आलेला पहिला दर्यावर्दी |
| (ब) | सॅम्युअल डी शॅम्प्लेन | -- | उत्तर अमेरिकेत फ्रेंच वसाहती स्थापन करणारा |
| (क) | कॅप्टन जेम्स कुक | -- | न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलिया जिंकणारा इंग्लंडचा सेनानी |
| (ड) | लुई ॲन्टोनी द बोगनविले | -- | पॅसिफिक महासागर पार करून 'ताहिती' येथे पोहोचलेला दर्यावर्दी |

उत्तर : चुकीची जोडी : फर्डिनंड मॅगेलन -- भारतात आलेला पहिला दर्यावर्दी

**दुरुस्त केलेली जोडी :** फर्डिनंड मॅगेलन **-- पृथ्वी प्रदक्षिणेला निघालेला पहिला प्रवासी**

## प्रश्न - संकल्पना चित्र पूर्ण करा

**(1)**

सामाज्यवादाच्या वाढीची कारणे →
- 
- 
- 
- 

**उत्तर :**

सामाज्यवादाच्या वाढीची कारणे →
- **औद्योगिक क्रांती**
- **कच्च्या मालाची गरज**
- **खनिज साठे**
- **वंशश्रेष्ठत्वाची कल्पना**

## प्रश्न - संक्षिप्त टिपा लिहा

**(1) युरोपातील धर्मयुद्धे :**

**उत्तर :** 1. जेरुसलेम आणि बेथेलहॅम ही शहरे ज्यू, ख्रिश्चन आणि इस्लाम या धर्मांच्या अनुयायांसाठी अत्यंत पवित्र आहेत. अकराव्या शतकात ही शहरे इस्लामी सत्ताधीशांच्या ताब्यात होती. ही शहरे परत मिळवण्यासाठी ख्रिश्चन धर्माच्या अनुयायांनी वेळोवेळी केलेल्या लढायांना धर्मयुद्धे (क्रुसेडस्) म्हणतात.

2. मध्ययुगात धर्मयुद्धाच्या कल्पनेने युरोपमधील सामान्य जनता भारावून गेली होती.

3. इ.स.१०९६ मध्ये पहिले धर्मयुद्ध झाले. दुसऱ्या धर्मयुद्धाच्या दरम्यान पोप युजिनिअस (तिसरा) याने फ्रेंच राजा सातवा लुई आणि जर्मन सत्ताधीश तिसरा कॉनरॅड यांना मदतीस घेतले. तुर्कांनी त्यांचा पराभव केला.

**(2) युरोपातील धातुविज्ञान :**

**उत्तर :** 1. इंग्लंडमध्ये लोखंडाच्या खाणी होत्या. तिथे मिळणाऱ्या लोहखनिजापासून शुद्ध लोखंड निर्माण करण्याच्या तंत्रात सुधारणा करण्याची गरज होती.

2.हे खनिज वितळवण्यासाठी लाकडाऐवजी दगडी कोळसा वापरण्यात येऊ लागला. त्यामुळे उच्चतम तापमान असणाऱ्या भट्ट्या तयार करता आल्या. परिणामी लोखंडाचे उत्पादन वाढले. पुढे कोळशाच्या भट्ट्या रसरशीतपणे तापवणे आणि कोळशाच्या भट्टीत हवा खेळवणे या कामासाठीही स्वतंत्र यंत्रेनिर्माण केली गेली.
3.याच दरम्यान १७८३ मध्ये लोखंडाचा रस साच्यात ओतून लोखंडी पट्टिका (उदा., रेल्वे रूळ) तयार करण्याची पद्धत आली. १८६५ मध्ये लोखंड रसाचे रूपांतर पोलादात करण्याच्या प्रक्रियेचा शोध लागला आणि धातुउद्योग बदलून गेला.

## प्रश्न - पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.

**(1) औद्योगिक क्रांतीची सुरुवात सर्वप्रथम इंग्लंडमध्ये झाली**
**उत्तर : औद्योगिक क्रांतीची सुरुवात सर्वप्रथम इंग्लंडमध्ये झाली, कारण--**
1. इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती घडून येण्यासाठी अनुकूल पार्श्वभूमी होती. तेथे लोहखनिज व कोळशाचे साठे मोठ्या प्रमाणात उपलब्ध होते.
2. दमट हवामानामुळे सुती धागे बनवणे तुलनेने सोपे जाते. त्यामुळे सुती कापडाचा उद्योग तेथे भरभराटीस आला. इंग्लंडच्या ताब्यात वसाहतींचा मोठा प्रदेश होता.
3.उत्पादनासाठी लागणारा कच्चा माल या प्रदेशातून मोठ्या प्रमाणावर आयात करणे इंग्लंडला सहज शक्य झाले.
4.नाविक सामर्थ्याच्या जोरावर हा कच्चा माल प्रक्रिया करून पुन्हा पक्क्या मालाच्या रूपात इंग्रजांच्या ताब्यात असलेल्या वसाहतींमध्ये विक्रीसाठी पाठवता येऊ लागला.
5.मिळणाऱ्या नफ्यातून इंग्लिश व्यापाऱ्यांना मोठ्या प्रमाणावर अतिरिक्त भांडवल उपलब्ध झाले. याच्याच जोडीला कमी मोबदल्यात कामगारांचे श्रम उपलब्ध असल्याने वस्तूंच्या किमती प्रमाणाबाहेर वाढू न देणे शक्य झाले. या पार्श्वभूमीवर इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीची सुरुवात झाली.

**(2) युरोपातील १५-१६ वे शतक हा प्रबोधनाचा उत्कर्षकाळ समजला जातो.**
**उत्तर : युरोपातील १५-१६ वे शतक हा प्रबोधनाचा उत्कर्षकाळ समजला जातो, कारण —**
1.युरोपातील या तीनशे वर्षांत बुद्धिवाद आणि वैज्ञानिक विचारसरणीवर आधारित असलेल्या संस्कृतीचा पाया घातला गेला.
2.या कालखंडात माणसाच्या बुद्धीला, प्रतिभेला आणि जीवन पद्धतीला नवी दिशा मिळाली. विश्वाची रहस्ये वैज्ञानिक पद्धतीने कशी उलगडता येतात हे समजून घेण्यात लोकांना स्वारस्य निर्माण झाले. काव्य, नाटक, साहित्य इत्यादी क्षेत्रांमध्ये आजवर दुर्लक्षित राहिलेलेविषय हाताळण्यात येऊ लागले.
3.विज्ञानात नवे नवे प्रयोग करण्यास सुरुवात झाली. विश्वाच्या अस्तित्वाचा विचार करताना पूर्वी ईश्वर हा केंद्रबिंदू होता. आता मात्र मानव हा या विचाराचा केंद्रबिंदू बनला.

## प्रश्न - तुमचे मत नोंदवा

**(1) युरोपात सतराव्या शतकात निसर्गाचा अभ्यास करणाऱ्या शास्त्रज्ञांनीच आधुनिक वैज्ञानिक ज्ञानाचा पाया रचला.**
**उत्तर : माझ्या मते,**
1. **सतराव्या शत**कातील शास्त्रज्ञांचा पुढील गोष्टींवर भर होता; प्रत्यक्ष प्रयोगाद्वारे वैज्ञानिक सिद्धान्तांना स्थलकालातीत महत्त्व आहे हे सिद्ध करणे, नव्याने शोधून काढलेले नियम सूत्रबद्ध करणे, नवी वैज्ञानिक परिभाषा तयार करणे. या प्रयत्नांतून आधुनिक विज्ञान प्रगत होत गेले.
2. विज्ञानातील संशोधनासाठी युरोपात काही संस्थाही स्थापन करण्यात आल्या होत्या.
3. इंग्लंड-फ्रान्समध्ये शास्त्रज्ञांचे लेख प्रकाशित करणारी नियतकालिके चालवणे आणि पत्रव्यवहार, शंका समाधान, वैचारिक देवाण-घेवाण यांसाठी या संस्था काम करत.


4. होकायंत्र, दुर्बिण, सूक्ष्मदर्शक यंत्र, तपमापक यंत्र तसेच भारमापक यंत्र यांचा शोध या काळात लागला.
**.... म्हणून, युरोपात सतराव्या शतकात निसर्गाचा अभ्यास करणाऱ्या शास्त्रज्ञांनीच आधुनिक वैज्ञानिक ज्ञानाचा पाया रचला.**

## प्रश्न - दिलेल्या कारणांपैकी योग्य कारण निवडून विधान पूर्ण करा.

(1) गॅलिलिओला आधुनिक प्रायोगिक विज्ञानाचा जनक म्हटले जाते, कारण –
(अ) त्याने प्रथमच मोठी दुर्बीण तयार केली होती
(ब) त्याने आधुनिक प्रायोगिक विज्ञानाचा शोध लावला
(क) त्याने निरीक्षण करणे व सिद्धान्त तर्कशुद्ध पद्धत रूढ केली.
(ड) म्यानमारचा राजा थिबा याला त्यांना धडा शिकवायचा होता.
उत्तर : गॅलिलिओला आधुनिक प्रायोगिक विज्ञानाचा जनक म्हणतात, कारण **— त्याने निरीक्षण करणे व सिद्धान्त तर्कशुद्ध पद्धत रूढ केली.**

## प्रश्न - पुढील नकाशाचे निरीक्षण करून प्रश्नांची उत्तरे लिहा

**पाठ्यपुस्तक पान नं 5**




1] वास्को-द-गामा समुद्र मार्गे भारतात कोणत्या बंदरात उतरला ?
उत्तर : **कालिकत**
2] दक्षिण आफ्रिकेच्या दक्षिण टोकाचे नाव लिहा ?
उत्तर : **केप ऑफ गुड होप**
3] फर्डिनंड मॅगेलन याने कोणकोणत्या महासागरातून प्रवास केला ? कोणतेही एक नाव लिहा
उत्तर : **हिंदी महासागर**
4] मेक्सिको हा देश कोणत्या खंडात आहे ?
उत्तर : **उत्तर अमेरिका**
5] या नकाशाच्या मदतीने कोणती माहिती मिळते ?
उत्तर : **सागरी सफरीचा मार्ग**
उत्तर : **उत्तर अमेरिका**

6] 'जपान' हा देश कोणत्या खंडात आहे ?
उत्तर : **आशिया**
7] 'वास्को-द-गामा' याने कोणकोणत्या महासागरातून प्रवास केला ? कोणतेही एक नाव लिहा
उत्तर : **हिंदी महासागर**

## प्रश्न - खालील प्रश्नांची दिलेल्या मुद्द्याच्या आधारे सविस्तर उत्तरे लिहा


(1) युरोपातील धर्मयुद्धाची माहिती लिहा
मुद्दे : (अ) अपयशाची कारणे (ब) धर्मयुद्धांचे परिणाम

उत्तर %◈ प्रस्तावना % जेरुसलेम आणि बेथेलहॅम ही शहरे ज्यू, ख्रिश्चन आणि इस्लाम या धर्मांच्या अनुयायांसाठी अत्यंत पवित्र आहेत. अकराव्या शतकात ही शहरे इस्लामी सत्ताधीशांच्या ताब्यात होती. ही शहरे परत मिळवण्यासाठी ख्रिश्चन धर्माच्या अनुयायांनी वेळोवेळी केलेल्या लढायांना धर्मयुद्धे (क्रुसेडस्) म्हणतात.

### ◈ मुख्य उत्तर :

☞ **(अ) अपयशाची कारणे :**

1.युरोपीय धर्मयुद्धामध्ये ख्रिस्ती धर्मयोद्ध्यांना अपयश आले, कारण पोप आणि युरोपातील सत्ताधीश यांनी या युद्धांकडे संकुचित हेतूंनी पाहिले.
2. धर्मावरील कमी झालेली श्रद्धा, पोप व जर्मन सम्राटातील वितुष्ट, बायझॅन्टाईन सम्राटांच्या सहकार्याचा अभाव या बाबी धर्मयुद्धांच्या अपयशास कारणीभूत होत्या.
3. युरोपातील विविध राजांमधील एकीचा अभाव होता.




☞ **धर्मयुद्धांचे परिणाम**

1.धर्मयुद्धांमुळे सरंजामशाहीचा अस्त झाला.
2.लोकांची पोपवरील श्रद्धा कमी झाली.
3. मध्य आशियाबरोबर वाढलेल्या व्यापारामुळे इटली आणि जर्मनीतील शहरांना नवी क्षेत्रे खुली झाली.
4.नवा व्यापारी वर्ग उदयाला आला. युरोपीय युद्धतंत्रात अनेक बदल घडून आले.
5.किल्लेबांधणी, किल्ल्यांचा लढाईचे ठाणे म्हणून उपयोग, लष्कराच्या वाहतुकीसाठी पूलबांधणी, शत्रूचे मार्ग उद्ध्वस्त करणे इत्यादी गोष्टींमध्ये युरोपीय राष्ट्रांनी प्राविण्य मिळवले.
6.लढाईचा खर्च भागवण्यासाठी युरोपमधील राजांनी नवीन कर लागू केले.

### ◈ उपसंहार :

अशा प्रकारे युरोपातील धर्मयुद्धाच्या अपयशाची कारणे व परिणाम होते

संविधान तक्ता नुसार एकूण गुण : **10**

# प्रकरण 2 रे : *युरोपीय वसाहतवाद*

वसाहतवाद हा साम्राज्यवादाचा एक प्रकार आहे. इंग्लंड, फ्रान्स, पोर्तुगाल, स्पेन इत्यादी देशांनी अमेरिका, ऑस्ट्रेलिया, आशिया आणि आफ्रिका या खंडांतील देशांवर कब्जा करून तेथे आपल्या वसाहती स्थापन केल्या. भारत ही इंग्लंडची वसाहत होती. वसाहतीमधील कच्चा माल आपल्या देशात नेऊन पक्क्या मालासाठी वसाहतींचा बाजारपेठ म्हणून उपयोग करणे हे वसाहतवादाचे प्रमुख लक्षण आहे.

## प्रश्न - दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.

1] अमेरिकेतील .................... ब्रिटिश वसाहतींनी एकत्र येऊन आपण इंग्लंडच्या सत्तेपासून स्वतंत्र झाल्याचे जाहीर केले.

(अ) तेरा (ब) बारा (क) दहा (ड) पंचवीस

**उत्तर :** अमेरिकेतील **तेरा** ब्रिटिश वसाहतींनी एकत्र येऊन आपण इंग्लंडच्या सत्तेपासून स्वतंत्र झाल्याचे जाहीर . केले.

2] दुसरे ब्रह्मी युद्ध .............. च्या काळात लढले गेले.

(अ) लॉर्ड ॲम्हर्स्ट (ब) लॉर्ड डफरीन (क) लॉर्ड डलहौसी (ड) ॲशले एडन

**उत्तर :** दुसरे ब्रह्मी युद्ध **लॉर्ड डलहौसी** च्या काळात लढले गेले.

3] 'स्वातंत्र्याचा जाहिरनामा' ....................याने तयार केला.

(अ) जॉर्ज वॉशिंग्टन (ब) थॉमस जेफरसन (क) लॉर्ड ॲमहर्स्ट (ड) लॉर्ड कॉर्नवॉलिस

**उत्तर :** 'स्वातंत्र्याचा जाहिरनामा' **थॉमस जेफरसन** याने तयार केला.

4] ................ यांनी 'गीतारहस्य' हा ग्रंथ रचला.

(अ) नेताजी सुभाषचंद्र बोस (ब) बहादुरशाह (क) राजा थिबा (ड) लोकमान्य टिळक

**उत्तर : लोकमान्य टिळक** यांनी 'गीतारहस्य' हा ग्रंथ रचला

5] इजिप्तची जीवनदायिनी ............... नदी होय.

(अ) सुएझ (ब) नाईल (क) कांगो (ड) जेम्स

उत्तर : इजिप्तची जीवनदायिनी **नाईल नदी** होय.

## प्रश्न - ऐतिहासिक ठिकाण, व्यक्ती, घटना यांसंबंधी नावे लिहा.

1] अमेरिकेच्या दक्षिण किनाऱ्यावरील फ्लोरिडा ते कॅलिफोर्नियाचा प्रदेश या सत्तेच्या ताब्यात होता --**स्पॅनिश सत्ता**

2] या राणीच्या काळात इंग्लंडच्या सागरी मोहिमांना प्रोत्साहन मिळाले ---**राणी एलिझाबेथ पहिली**

## **प्रश्न : –** ब' गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.

| | **'अ' गट** | | **'ब' गट** |
|---|---|---|---|
| (1) | टोगोलँड - | -- | जर्मन वसाहत |
| (2) | इजिप्त | -- | ब्रिटिश वसाहत |
| (3) | ऑरेंज फ्री स्टेट | -- | डच वसाहत |
| (4) | आयव्हरी कोस्ट | -- | पोर्तुगीज वसाहत |

उत्तर : चुकीची जोडी : आयव्हरी कोस्ट -- पोर्तुगीज वसाहत

**दुरुस्त केलेली जोडी : आयव्हरी कोस्ट -- फ्रेंच वसाहत**

## प्रश्न - संकल्पना चित्र पूर्ण करा

**(1)**

वसाहतवाद फोफावण्याची कारणे
- →
- →
- →
- →

**उत्तर :**

वसाहतवाद फोफावण्याची कारणे
- → **औद्योगिक क्रांती**
- → **कच्च्या मालाची गरज**
- → **खनिज साठे**
- → **वंशश्रेष्ठत्वाची कल्पना**

## प्रश्न - संक्षिप्त टिपा लिहा

**(1) वसाहतवादाचे स्वरूप :**

**उत्तर :** 1. प्रगत देशाने आपल्या सामर्थ्याच्या बळावर एखादा भूप्रदेश ताब्यात घेऊन त्यावर आपले राज्य स्थापन करणे, या प्रक्रियेला 'वसाहतवाद' असे म्हणतात.

2. वसाहतवाद हा निव्वळ राजकीय व आर्थिक गुलामगिरीच निर्माण करतो असे नसून तो मानसिक गुलामगिरीही निर्माण करतो.

3. वसाहतवादी देशांची वंशश्रेष्ठत्ववादी विचारसरणी आणि वागणूक यांमुळे वसाहतीतील लोकांच्या मनात न्यूनगंड निर्माण झाला, त्यांना स्वतःच्या संस्कृती व इतिहासाबद्दल कमीपणा वाटायला लागला, त्यांचा आत्मविश्वास नष्ट झाला.

4.वसाहतवाद हा साम्राज्यवादाचा एक प्रकार आहे.

**(2)अमेरिकन स्वातंत्र्य युद्ध :**

**उत्तर :** 1. अमेरिकेतील तेरा ब्रिटिश वसाहतींनी एकत्र येऊन आपण इंग्लंडच्या सत्तेपासून स्वतंत्र झाल्याचे जाहीर केले. त्यास ' अमेरिकन स्वातंत्र्ययुद्ध ' असे म्हणतात.

2. स्वातंत्र्याचा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यावर ब्रिटिश सैन्य आणि १३ वसाहतींमधील नागरिक यांच्यात लढाया होत राहिल्या. सरतेशेवटी सॅराटोगा येथील लढाईत ब्रिटिश सैन्याचा निर्णायक पराभव झाला.

3.फ्रेंचांनीही वसाहतींच्या संघर्षात अमेरिकनांना मदत केली. १७७९ मध्ये स्पेन अमेरिकेच्या बाजूने युद्धात उतरले. वसाहतींचा प्रमुख सेनापती जॉर्ज वॉशिंग्टनने इंग्रजांचा पराभव केला.

## प्रश्न - पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.

**(1) औद्योगिक क्रांतीमुळे वसाहतवादाला चालना मिळाली.**

**उत्तर :** औद्योगिक क्रांतीमुळे वसाहतवादाला चालना मिळाली, कारण--

1. आधुनिक यंत्रांमुळे उत्पादनात प्रचंड वाढ झाली.
2. देशांतर्गत बाजारपेठेत सगळे उत्पादन खपणे शक्य नव्हते.
3.अतिरिक्त उत्पादन खपवण्यासाठी नव्या बाजारपेठांची गरज होती.
4.यासाठी हक्काची बाजारपेठ आणि हुकमी वर्चस्व आवश्यक होते.

**(2) युरोपीय राष्ट्रांनी अमेरिकेत वसाहती स्थापन केल्या**

**उत्तर :** युरोपीय राष्ट्रांनी अमेरिकेत वसाहती स्थापन केल्या, कारण —

1. युरोपीय राष्ट्रांमध्ये वसाहती स्थापन करण्याची स्पर्धा सुरू झाल्यावर पोर्तुगाल आणि स्पेन या देशांनी त्यात पुढाकार घेतला.
2.पोर्तुगालने अमेरिका खंडातील ब्राझील आणि स्पेनने मेक्सिको ताब्यात घेतले. तेथे त्यांना सोन्याचे साठे सापडले. अमेरिकेच्या भूमीवर ऊस आणि तंबाखू पिकवण्यासाठी स्पॅनिश लोकांनी आफ्रिकेतून गुलाम आणले.
3.पेरू, मेक्सिको आणि व्हेनेझुएला येथे सोन्या-चांदीचे साठे सापडताच स्पेनने शेतीपेक्षा सोने मिळवण्यावर लक्ष केंद्रित केले. त्यांनी दक्षिण अमेरिकेमध्ये संपूर्ण किनारपट्टीवर प्रभुत्व स्थापन केले. दक्षिण किनाऱ्यावरील फ्लोरिडा ते कॅलिफोर्नियाचा प्रदेश स्पॅनिश लोकांनी ताब्यात घेतला.
4.स्पेनची भरभराट पाहून इंग्लंड, हॉलंड आणि फ्रान्स यांनीही अमेरिका खंडात आपल्या वसाहती स्थापण्यास सुरुवात केली.

**(3) 1884 मध्ये बर्लिन येथे युरोपीय राष्ट्रांची परिषद आयोजित करण्यात आली होती**

**उत्तर :** 1884 मध्ये बर्लिन येथे युरोपीय राष्ट्रांची परिषद आयोजित करण्यात आली होती, कारण —

1. आफ्रिकेत आपल्यासाठी कोणत्या संधी आहेत याचा विचार करण्यासाठी १८८४ मध्ये बर्लिन येथे युरोपीय राष्ट्रांची एक परिषद भरली.
2.प्रत्यक्षात मात्र ही परिषद युरोपीय राष्ट्रांनी आफ्रिकेचा प्रदेश आपापसात शांततापूर्ण रीतीने कसा वाटून घ्यावा हे ठरवण्यासाठी बोलावली होती. बर्लिन परिषदेत बेल्जियमच्या कांगोवरील प्रभुत्वाला मान्यता देऊन तो प्रदेश 'कांगो फ्री स्टेट' म्हणून ओळखण्यास मान्यता देण्यात आली.
3.स्वतःच्या प्रभुत्वाखाली असलेल्या आफ्रिकन वसाहतीमधील मानवी आणि नैसर्गिक संपत्तीचा पूर्ण विनियोग करण्यात एखादे युरोपियन राष्ट्र अयशस्वी ठरले तर त्या राष्ट्राने तो प्रदेश दुसऱ्या सक्षम राष्ट्राच्या हवाली करावा असे या परिषदेत ठरले.

## प्रश्न - तुमचे मत नोंदवा

**(1)अमेरिकेतील वसाहतींमुळे स्पेनची भरभराट झाली**

**उत्तर : माझ्या मते,**

1.युरोपीय राष्ट्रांमध्ये वसाहती स्थापन करण्याची स्पर्धा सुरू झाल्यावर पोर्तुगाल आणि स्पेन या देशांनी त्यात पुढाकार घेतला.
2.स्पेनने अमेरिका खंडातील मेक्सिको ताब्यात घेतले. तेथे त्यांना सोन्याचे साठे सापडले. अमेरिकेच्या भूमीवर ऊस आणि तंबाखू पिकवण्यासाठी स्पॅनिश लोकांनी आफ्रिकेतून गुलाम आणले.
3.पेरू, मेक्सिको आणि व्हेनेझुएला येथे सोन्या-चांदीचे साठे सापडताच स्पेनने शेतीपेक्षा सोने मिळवण्यावर लक्ष केंद्रित केले.

4. त्यांनी दक्षिण अमेरिकेमध्ये संपूर्ण किनारपट्टीवर प्रभुत्व स्थापन केले. दक्षिण किनाऱ्यावरील फ्लोरिडा ते कॅलिफोर्नियाचा प्रदेश स्पॅनिश लोकांनी ताब्यात घेतला.

**.... म्हणून, अमेरिकेतील वसाहतींमुळे स्पेनची भरभराट झाली**

## प्रश्न - दिलेल्या कारणांपैकी योग्य कारण निवडून विधान पूर्ण करा.

(1) म्यानमारवर कब्जा मिळवणे हे ब्रिटिशांचे उद्दिष्ट होते, कारण –

(अ) ब्रिटिशांना साम्राज्यविस्तार करायचा होता.


(ब) म्यानमारमधील नैसर्गिक साधनसंपत्ती आणि हक्काची बाजारपेठ यावर ताबा मिळवणे ब्रिटिशांच्या दृष्टीने महत्त्वाचे होते.

(क) ब्रिटिशांना युरोपीय वसाहतवादी स्पर्धेत पुढे राहायचेहोते.

(ड) म्यानमारचा राजा थिबा याला त्यांना धडा शिकवायचा होता.

उत्तर : म्यानमारवर कब्जा मिळवणे हे ब्रिटिशांचे उद्दिष्ट होते, कारण – **म्यानमारमधील नैसर्गिक साधनसंपत्ती आणि हक्काची बाजारपेठ यावर ताबा मिळवणे ब्रिटिशांच्या दृष्टीने महत्त्वाचे होते.**

## प्रश्न - पुढील नकाशाचे निरीक्षण करून प्रश्नांची उत्तरे लिहा




**पाठ्यपुस्तक पान नं 12**

] ब्रिटिशांनी उभारलेली 'जेम्सटाऊन' ही वसाहत प्रस्तुत नकाशात कोणत्या नावाने दर्शवली आहे ?
उत्तर : **व्हर्जिनिया**
2] अमेरिकेच्या पूर्वेला कोणता महासागर आहे ?
उत्तर : **अटलांटिक महासागर**
3] प्रस्तुत नकाशातील कोणत्या वसाहतींनी इंग्लंडला प्रथम विरोध केला होता ?
उत्तर : **व्हर्जिनिया, मॅसॅच्युसेटस्**
4] प्रस्तुत नकाशातील कोणत्या ठिकाणी इ . स. १९७४ मध्ये अमेरिकन वसाहतींचे अधिवेशन भरले ?
उत्तर : **फिलाडेल्फिया**
5] या नकाशाच्या मदतीने कोणती माहिती मिळते ?
उत्तर : **अमेरिकेच्या तेरा वसाहती बाबत माहिती**

## प्रश्न - खालील प्रश्नांची दिलेल्या मुद्द्याच्या आधारे सविस्तर उत्तरे लिहा

(1) वसाहतवाद उदयाची कारणे विशद करा
मुद्दे : (अ) औद्योगिक क्रांती
(ब) कच्च्या मालाची गरज :
(क) अतिरिक्त भांडवलाची गुंतवणूक

उत्तर : ◈ प्रस्तावना - वसाहतवाद हा साम्राज्यवादाचा एक प्रकार आहे. इंग्लंड, फ्रान्स, पोर्तुगाल, स्पेन इत्यादी देशांनी अमेरिका, ऑस्ट्रेलिया, आशिया आणि आफ्रिका या खंडांतील देशांवर कब्जा करून तेथे आपल्या वसाहती स्थापन केल्या. भारत ही इंग्लंडची वसाहत होती. वसाहतीमधील कच्चा माल आपल्या देशात नेऊन पक्क्या मालासाठी वसाहतींचा बाजारपेठ म्हणून उपयोग करणे हे वसाहतवादाचे प्रमुख लक्षण आहे.

◈ मुख्य उत्तर :

☞ **(अ) औद्योगिक क्रांती :**
1. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्लंडचा व्यापार औद्योगिक क्रांतीमुळे भरभराटीस आला होता.
2. औद्योगिक क्रांतीमुळे वसाहतवादाला चालना मिळाली. आधुनिक यंत्रांमुळे उत्पादनात प्रचंड वाढ झाली.
3.देशांतर्गत बाजारपेठेत सगळे उत्पादन खपणे शक्य नव्हते.
4.अतिरिक्त उत्पादन खपवण्यासाठी नव्या बाजारपेठांची गरज होती. यासाठी हक्काची बाजारपेठ आणि हुकमी वर्चस्व आवश्यक होते.

☞ **(ब) कच्च्या मालाची गरज :**
1. व्यापारी स्पर्धेत अन्य स्पर्धक राष्ट्रांपेक्षा स्वतःच्या मालाचा उत्पादन खर्च कमी ठेवणे आवश्यक होते.
2.स्वतःची मक्तेदारी निर्माण करण्याची आवश्यकता, मालाचा उत्पादन खर्च कमी व्हावा म्हणून कच्चा माल स्वस्त किंमतीत मिळवणे गरजेचे होते.
3.त्यासाठी वसाहतींवर निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित करणे युरोपातील राष्ट्रांना आवश्यक होते.

☞ **(क) अतिरिक्त भांडवलाची गुंतवणूक :**
1. औद्योगिक क्रांतीनंतर युरोपातील भांडवलदार वर्ग अधिकच श्रीमंत झाला.
2.अतिरिक्त भांडवल गुंतवण्यासाठी त्याने सुरक्षित बाजारपेठांचा शोध घ्यायला सुरुवात केली.
3.याद्दष्टीने आर्थिकदृष्ट्या अप्रगत वसाहतींमधील बाजारपेठ अधिक सुरक्षित होती.
4. अतिरिक्त भांडवलाने वसाहतवादाच्या उदयाला आणि विकासाला चालना दिली.

◈ उपसंहार :
अशा प्रकारे वसाहतवाद उदयाची काही कारणे विशद करता येतील.

**(2) ब्रिटिशांच्या आशिया खंडातील वसाहतवादाची माहिती लिहा**
मुद्दे : (अ) नेपाळ : (ब) भूटान :

उत्तर : ◈ प्रस्तावना : वसाहतवाद हा निव्वळ राजकीय व आर्थिक गुलामगिरीच निर्माण करतो असे नसून तो मानसिक गुलामगिरीही निर्माण करतो. वसाहतवादी देशांची वंशश्रेष्ठत्ववादी विचारसरणी आणि वागणूक यांमुळे

वसाहतीतील लोकांच्या मनात न्यूनगंड निर्माण झाला, त्यांना स्वतःच्या संस्कृती व इतिहासाबद्दल कमीपणा वाटायला लागला, त्यांचा आत्मविश्वास नष्ट झाला, यात नेपाळ व भूटान सारखे आशियन देशही होते.

◈ मुख्य उत्तर :

☞ **(अ) नेपाळ :**

1. हिमालयाच्या कुशीत वसलेले नेपाळ हे एक छोटे राष्ट्र आहे. ब्रिटिशांनी आपले प्रतिनिधी नेपाळमध्ये पाठवलेहोते. परंतु ब्रिटिशांना फारसा प्रतिसाद मिळाला नाही.

2.त्यातूनच इंग्लंडविरुद्ध नेपाळ अशी दोन युद्धे झाली. नेपाळी १० ते १२ हजार तर इंग्रजांची फौज ३० हजाराच्या पुढेहोती. नेपाळवर इंग्रजांनी आक्रमण केले.

3.नेपाळी सैन्याने इंग्रजांना जेरीस आणले. इंग्रजांनी १८१६ मध्ये नेपाळचा मकवानपूर येथे पराभव केला. त्यानंतर झालेल्या तहानुसार इंग्रजांनी तराई, कुमाऊँ, गढवाल हे प्रदेश ताब्यात घेतले.

4. काठमांडू येथे इंग्रज रेसिडेंट नेमला गेला. १९२३ मध्ये इंग्रजांनी नेपाळच्या सार्वभौमत्वाला मान्यता दिली.

☞ **(ब) भूटान :**

1. भारताच्या उत्तर सीमा भागात आणि सिक्कीमच्या पूर्वेला भूटान हा देश आहे. या प्रदेशाचे भौगोलिक आणि व्यापारी महत्व जाणून वॉरन हेस्टिंग्ज याने भूटानशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले.

2.त्यामुळे बंगाल तेतिबेट हा भूटानच्या प्रदेशातून जाणारा व्यापारी मार्ग खुला झाला. १८४१ मध्ये ॲशले एडन याने भूटानविरुद्ध आक्रमक पवित्रा घेतला.

3. १८६५ मध्ये भूटान विरुद्ध इंग्रज असे युद्ध झाले. त्यानंतर झालेल्या तहानुसार भूटानने जिंकून घेतलेले प्रदेश ब्रिटिशांच्या हवाली करणे आणि त्या मोबदल्यात ब्रिटिशांनी भूटानच्या राजाला वार्षिक तनखा देणे या दोन गोष्टी ठरवल्या गेल्या.

4.१९१० च्या तहानुसार भूटानच्या राजाने संरक्षण व परराष्ट्र धोरणाचे अधिकार इंग्रजांना दिले. इंग्रजांनी भूटानच्या अंतर्गत कारभारात ढवळाढवळ न करण्याचे मान्य केले.

◈ उपसंहार :

अशा प्रकारे ब्रिटिशांच्या आशिया खंडातील वसाहतवादाची माहिती देता येईल.

3) वसाहतवादाचे स्वरूप स्पष्ट करा

मुद्दे : (अ) वसाहतवादाचा अर्थ

(ब) वसाहतवादाची कारणे

(क) वसाहतवादाचे परिणाम

उत्तर : ◈ प्रस्तावना - वसाहतवाद हा साम्राज्यवादाचा एक प्रकार आहे. इंग्लंड, फ्रान्स, पोर्तुगाल, स्पेन इत्यादी देशांनी अमेरिका, ऑस्ट्रेलिया, आशिया आणि आफ्रिका या खंडांतील देशांवर कब्जा करून तेथे आपल्या वसाहती स्थापन केल्या. भारत ही इंग्लंडची वसाहत होती. वसाहतीमधील कच्चा माल आपल्या देशात नेऊन पक्क्या मालासाठी वसाहतींचा बाजारपेठ म्हणून उपयोग करणे हे वसाहतवादाचे प्रमुख लक्षण आहे.

◈ मुख्य उत्तर :

☞ **(अ)** वसाहतवादाचा अर्थ **:**

1. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्लंडचा व्यापार औद्योगिक क्रांतीमुळे भरभराटीस आला होता.

2. औद्योगिक क्रांतीमुळे वसाहतवादाला चालना मिळाली. आधुनिक यंत्रांमुळे उत्पादनात प्रचंड वाढ झाली.
3.देशांतर्गत बाजारपेठेत सगळे उत्पादन खपणे शक्य नव्हते.

4.अतिरिक्त उत्पादन खपवण्यासाठी नव्या बाजारपेठांची गरज होती. यासाठी हक्काची बाजारपेठ आणि हुकमी वर्चस्व आवश्यक होते.

☞ **(ब)** वसाहतवादाची कारणे **:**

1. व्यापारी स्पर्धेत अन्य स्पर्धक राष्ट्रांपेक्षा स्वतःच्या मालाचा उत्पादन खर्च कमी ठेवणे आवश्यक होते.

2.स्वतःची मक्तेदारी निर्माण करण्याची आवश्यकता, मालाचा उत्पादन खर्च कमी व्हावा म्हणून कच्चा माल स्वस्त किंमतीत मिळवणे गरजेचे होते.

3.त्यासाठी वसाहतींवर निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित करणे युरोपातील राष्ट्रांना आवश्यक होते.

☞ **(क)** वसाहतवादाचे परिणाम**:**


1. औद्योगिक क्रांतीनंतर युरोपातील भांडवलदार वर्ग अधिकच श्रीमंत झाला.

2.अतिरिक्त भांडवल गुंतवण्यासाठी त्याने सुरक्षित बाजारपेठांचा शोध घ्यायला सुरुवात केली.

3.याद्दष्टीने आर्थिकद्दष्ट्या अप्रगत वसाहतींमधील बाजारपेठ अधिक सुरक्षित होती.
4. अतिरिक्त भांडवलाने वसाहतवादाच्या उदयाला आणि विकासाला चालना दिली.
◈ उपसंहार :
अशा प्रकारे वसाहतवाद उदयाची काही कारणे विशद करता येतील.

## प्रश्न - पुढील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा

(1)स्पेनने अमेरिकेत आपल्या वसाहती कश्या निर्माण केल्या .
उत्तर : ◈ प्रस्तावना : इंग्लंड, फ्रान्स, पोर्तुगाल, स्पेन इत्यादी देशांनी अमेरिका, ऑस्ट्रेलिया, आशिया आणि आफ्रिका या खंडांतील देशांवर कब्जा करून तेथे आपल्या वसाहती स्थापन केल्या. स्पेनने अमेरिकेत आपल्या वसाहती कश्या निर्माण केल्या, याची माहिती पुढीलप्रमाणे :
◈ ◈ मुख्य उत्तर :
1. युरोपीय राष्ट्रांमध्ये वसाहती स्थापन करण्याची स्पर्धा सुरू झाल्यावर पोर्तुगाल आणि स्पेन या देशांनी त्यात पुढाकार घेतला.
2.पोर्तुगालने अमेरिका खंडातील ब्राझील आणि स्पेनने मेक्सिको ताब्यात घेतले.
3.तेथे त्यांना सोन्याचे साठे सापडले.
4.अमेरिकेच्या भूमीवर ऊस आणि तंबाखू पिकवण्यासाठी स्पॅनिश लोकांनी आफ्रिकेतून गुलाम आणले.
5. पेरू, मेक्सिको आणि व्हेनेझुएला येथे सोन्या-चांदीचे साठे सापडताच स्पेनने शेतीपेक्षा सोने मिळवण्यावर लक्ष केंद्रित केले.




6. स्पेनने दक्षिण अमेरिकेमध्ये संपूर्ण किनारपट्टीवर प्रभुत्व स्थापन केले.
7.दक्षिण किनाऱ्यावरील फ्लोरिडा ते कॅलिफोर्नियाचा प्रदेश स्पॅनिश लोकांनी ताब्यात घेतला.
8.अमेरिकेतील रेड इंडियन लोक आणि आफ्रिकेतून आणलेले गुलाम यांच्याकडून स्पेनने शेती करून घ्यायला सुरुवात केली. शेतीबरोबर खाणींमधून अफाट खनिज संपत्ती त्यांच्या हाती लागली.
9.स्पेनने या भागात आपला कारभार सुरळीत चालवण्यासाठी गव्हर्नर नेमले.
10.स्पेनचा राजा हा या वसाहतींचा सर्वोच्च सत्ताधीश होता. 'कौन्सिल ऑफ दी इंडिज' या संघटनेद्वारे सत्ता राबवण्यात येऊ लागली. ही कौन्सिल वसाहतींमधील व्यापारही सांभाळत होती. या वसाहतींमधून कच्चा माल स्पेनला नेला जाई. त्यापासून बनवलेला पक्का माल स्पेनमधून वसाहतींच्या बाजारपेठेत विक्रीसाठी आणला जाई. या प्रदेशातील सोने आणि चांदीच्या व्यापारात राजाला मोठा नफा मिळत असे. स्पेनची भरभराट पाहून इंग्लंड, हॉलंड आणि फ्रान्स यांनीही अमेरिका खंडात आपल्या वसाहती स्थापण्यास सुरुवात केली.
◈ उपसंहार : अशा प्रकारे, स्पेनने अमेरिकेतील ताब्यात घेतलेले प्रदेश होते.

संविधान तक्ता नुसार एकूण गुण : **09**

# प्रकरण 3 रे : भारत आणि युरोपीय वसाहतवाद

युरोपीय वसाहतवादाचा जसा जागतिक इतिहासावर दूरगामी परिणाम घडून आला तसाच भारतावरही दुरगामी परिणाम घडून आला.

## प्रश्न - दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.

1] वास्को-द-गामा हा ......................या देशाचा दर्यावर्दी होता.
(अ) पोलंड (ब) इंग्लंड (क) फ्रान्स (ड) पोर्तुगाल
उत्तर : वास्को-द-गामा हा **पोर्तुगाल** या देशाचा दर्यावर्दी होता.
2] इंग्लंडच्या ....................ने कंपनीला पूर्वेकडील देशांशी व्यापार करण्याचा परवाना दिला.
(अ) सर जॉर्ज ऑक्झिंडेन (ब) एलिझाबेथ राणी (क) राजकन्या ब्रॅगंझा (ड) दुसरा चार्ल्स
उत्तर : इंग्लंडच्या **एलिझाबेथ राणी** ने कंपनीला पूर्वेकडील देशांशी व्यापार करण्याचा परवाना दिला.
3] पोर्तुगिजांच्या या पूर्वेकडील साम्राज्याची राजधानी .................... येथे होती.
(अ) गोवा (ब) मच्छलीपट्टण (क) वसई (ड) दमण
उत्तर : पोर्तुगिजांच्या या पूर्वेकडील साम्राज्याची राजधानी **गोवा** येथे होती.
4] इ.स.१६६४ मध्ये फ्रान्सचा अर्थमंत्री ...................... याच्या पुढाकाराने 'फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनी' स्थापण्यात आली.
(अ) सर जॉर्ज ऑक्झिंडेन (ब) कोल्बेर (क) झामोरीन (ड) वास्को-द-गामा
उत्तर : इ.स.१६६४ मध्ये फ्रान्सचा अर्थमंत्री **कोल्बेर** याच्या पुढाकाराने 'फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनी' स्थापण्यात आली.

## प्रश्न - ऐतिहासिक ठिकाण, व्यक्ती, घटना यांसंबंधी नावे लिहा.

1] डचांची पहिली वसाहत --- **मच्छलीपट्टण**
2] ब्रिटिशांचा सुरतेचा प्रेसिडेंट --- **सर जॉर्ज ऑक्झिंडेन**

## **प्रश्न : –** ब' गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.

◈

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (1) | अर्सबिश्पु | -- | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| (2) | शान्सेलर | -- | न्यायाधीश |
| (3) | वेदोर द फझेंद | -- | मालमत्तेवरील अधिकारी |
| (4) | कपितांव | -- | कॅप्टन |

उत्तर : चुकीची जोडी : अर्सबिश्पु -- मुख्य कार्यकारी अधिकारी
☛ दुरुस्त केलेली जोडी : अर्सबिश्पु -- मुख्य धर्मगुरु

◈

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (1) | वखार | -- | मालाच्या साठवणुकीचे ठिकाण |
| (2) | कार्ताझ | -- | परवान्याचा दस्तऐवज |
| (3) | फॅक्टर्स | -- | वखारीत काम करणारे नोकर |
| (4) | टांकसाळ | -- | जिंकून घेतलेला प्रदेश |

उत्तर : चुकीची जोडी : टांकसाळ -- जिंकून घेतलेला प्रदेश
☛ दुरुस्त केलेली जोडी : **टांकसाळ -- नाणी पाडण्याचे ठिकाण**

# प्रश्न - संक्षिप्त टिपा लिहा

**(1) कार्ताझ :**

उत्तर : 1. पोर्तुगीजांचा नाविक परवाना ' कार्ताझ ' होय

2. कार्ताझच्या दस्तऐवजांमध्ये सामान्यतः जहाजाचे नाव, तांडेलाचे नाव, कोठून कोठे जाणार, त्यात स्वसंरक्षणार्थ असलेली शस्त्रास्त्रे इत्यादी तपशील असे.

3. हिंदी महासागरावर पोर्तुगिजांनी वर्चस्व स्थापल्यावर भारतीय राजांना हिंदी महासागरात जहाजे पाठवायची असतील तर पोर्तुगिजांचे परवाने (कार्ताझ) घेणे आवश्यक झाले.

**(2) पोर्तुगीजांची युद्धनीती :**

उत्तर : 1. पोर्तुगिजांनी अरब आरमाराचा पराभव करून भारताच्या समुद्रकिनाऱ्यांवर आपले वर्चस्व निर्माण करण्यास सुरुवात केली.

2.दक्षिण हिंदुस्थानातील राज्यंामध्ये असणाऱ्या आपापसातील भांडणांचा त्यंानी फायदा घेतला.

3.पश्चिम किनाऱ्यावर त्यांनी आपल्या वसाहती स्थापल्या. पोर्तुगिजांनी वसाहतींच्या रक्षणासाठी किल्ले उभारले. किल्ल्यांच्या आधारे बाह्य हल्ल्यांपासून आपल्या वसाहतींचे रक्षण करायचे आणि समुद्रमार्गेकिल्ल्यांना रसद पुरवायची ही पोर्तुगिजांची युद्धनीती होती.

**(3)वखार :**


उत्तर : 1. इंग्रज वखारीसाठी मोठ्या जागा घेत असत. मालाचे कोठार, निवासस्थाने, कार्यालय यासाठी ही जागा असे. वखारीवर इंग्रजांचा झेंडा (पांढऱ्या पार्श्वभूमीवर तांबडा क्रॉस) असे.

2.वखारीतील जेवणात पाव, मांस, भात, डाळ-तांदुळाची खिचडी, लोणचे यांचा समावेश असे.


3.मनोरंजन किंवा नोकरांच्या श्रमपरिहारासाठी कंपनीने सुरत, कारवार, मच्छलीपट्टण, पेतापोली, चेन्नई आणि मुंबई येथे बागा उभारल्या होत्या.

# प्रश्न - संकल्पना चित्र पूर्ण करा

**(1)**




उत्तर :



(2)

| | | | |
|---|---|---|---|
| ३१ डिसेंबर १६०० | ------------------------- | इ.स.१६६४ | ---------------------- |
| ---------------------- | युनायटेड ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना | ---------------------- | फ्रेंचांची सुरत येथे पहिली वखार स्थापन |

उत्तर :

| | | | |
|---|---|---|---|
| ३१ डिसेंबर १६०० | **इ.स.१६०२** | इ.स.१६६४ | **इ.स.१६६८** |
| **ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना** | युनायटेड ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना | **फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना** | फ्रेंचांची सुरत येथे पहिली वखार स्थापन |

## प्रश्न - दिलेल्या कारणांपैकी योग्य कारण निवडून विधान पूर्ण करा.

(1) दुसऱ्या चार्ल्सने मुंबई बेट ईस्ट इंडिया कंपनीला भाड्याने दिले, कारण –

(अ) कंपनीकडून राजाला जास्त भाडे मिळणार होते

(ब) ईस्ट इंडिया कंपनीला व्यापारासाठी हे बेट हवे होते

(क) या बेटाच्या कारभारासाठी जेवढा खर्च व्हायचा, त्यामाने उत्पन्न कमी येत होते

(ड) दुसरा चार्ल्स मुंबईत येऊन स्वतः कारभार करू शकत नव्हता

उत्तर : दुसऱ्या चार्ल्सने मुंबई बेट ईस्ट इंडिया कंपनीला भाड्याने दिले, कारण – **या बेटाच्या कारभारासाठी जेवढा खर्च व्हायचा, त्यामाने उत्पन्न कमी येत होते**

## प्रश्न - पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.

**(1) भारतीय सत्ताधीशांना कार्ताझ घेणे गरजेचे होते.**

उत्तर : भारतीय सत्ताधीशांना कार्ताझ घेणे गरजेचे होते., कारण--

1. पोर्तुगिजांनी अरब आरमाराचा पराभव करून भारताच्या समुद्रकिनाऱ्यांवर आपले वर्चस्व निर्माण करण्यास सुरुवात केली

2.त्यांचे आरमार प्रबळ होते. किनाऱ्यावर आरमारी छापा घालून शत्रूचा मुलुख ते उद्ध्वस्त करत असत.

3.या आरमाराचा सामना करणे स्थानिक भारतीय सत्तांना शक्य झाले नाही.

4. पुढे हिंदी महासागरावर पोर्तुगिजांनी वर्चस्व स्थापल्यावर भारतीय राजांना हिंदी महासागरात जहाजे पाठवायची असतील तर पोर्तुगिजांचे परवाने (कार्ताझ) घेणे आवश्यक झाले.

**(2) पोर्तुगिजांशी लढा देणे भारतीयांना अवघड झाले होते.**

उत्तर : पोर्तुगिजांशी लढा देणे भारतीयांना अवघड झाले होते, कारण —

1. सतराव्या शतकाच्या पूर्वार्धात दरवर्षी पोर्तुगालमधून सरासरी पाच जहाजे भारतात येत होती. या जहाजांवर तोफा असत.

2. पोर्तुगीज दमण, वसई आणि गोवा येथे जहाजे बांधत. त्यासाठी लागणारे सागाचे उत्तम, टिकाऊ लाकूड येथे उपलब्ध होते.

3.पोर्तुगीज आरमारातील सैनिक पोर्तुगालहून भारतात पाठवले जात. सतराव्या शतकात हिंदी महासागरात झालेल्या नाविक लढायांमध्ये डच व इंग्रजांनी पोर्तुगिजांचा पराभव केला.

4.या काळात छत्रपती शिवाजी महाराजांचा अपवाद वगळल्यास इतर भारतीय सत्तांकडेस्वतःचे आरमार नव्हते. त्यामुळे पोर्तुगिजांशी सामना करणे भारतीयांना अवघड होते.

**(3) पोर्तुगीजांचे भारतातील धोरण असहिष्णू वृत्तीचे होते**

उत्तर : पोर्तुगीजांचे भारतातील धोरण असहिष्णू वृत्तीचे होते, कारण —

1. पोर्तुगिजांनी त्यांच्या सत्तेखालील प्रदेशात ख्रिस्ती धर्माखेरीज इतर धर्मांची प्रार्थना स्थळे बांधण्यास वा दुरुस्त करण्यास बंदी केली.

2. पोर्तुगिजांनी अन्य धर्मियांना त्यांच्या पद्धतीने धार्मिक उत्सव साजरे करण्यास वा लग्न समारंभ साजरे करण्यास बंदी घातली.

3. स्थानिक भाषांचीही गळचेपी केली. धर्मांतर करणाऱ्यांना पोर्तुगिजांनी नोकऱ्या देण्यास सुरुवात केली.

## प्रश्न - खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा

(1) डच सरकारने युनायटेड ईस्ट इंडिया कंपनीला कोणकोणते अधिकार दिले ?


उत्तर :

◈ प्रस्तावना :

इ.स.१६०२ मध्ये अनेक डच कंपन्यांनी एकत्र येऊन 'युनायटेड ईस्ट इंडिया' कंपनी स्थापन केली. मच्छलीपट्टण येथे डचांची पहिली वसाहत स्थापन झाली.

◈ मुख्य उत्तर :

1.'युनायटेड ईस्ट कंपनीला पूर्वेकडील देशांशी व्यापार करण्याचा अधिकार डच सरकारने दिला. त्याअंतर्गत कंपनीला नोकर ठेवणे, वखारी स्थापणे, किल्ले बांधणे, नाणी पाडणे, पौर्वात्य देशांशी युद्ध वा तह करणे असे अधिकार मिळाले.




2.कंपनीने त्यासाठी गव्हर्नर जनरल हा अधिकारी नेमला.

3.१७ व्या शतकाच्या मध्यापर्यंत कंपनीने आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यापासून ते जपानपर्यंत वसाहती आणि वखारी उभारल्या.

4.त्यामध्ये सध्याचे मोझांबिक, दक्षिण आफ्रिका, येमेन, इराक, इराण, पाकिस्तान, भारत, बांगलादेश, म्यानमार, सयाम, व्हिएटनाम, लाओस, कांपूचिया, तैवान, चीन, जपान, इंडोनेशिया आणि मलेशिया या देशांचा समावेश होता.

5.डचांनी वखारींच्या इमारती बांधून त्याला तटबंदी करून संरक्षणार्थ तोफा ठेवायला सुरुवात केली. डचांच्या नोकरवर्गात स्थानिक लोकांचाही समावेश असे.

6. डचांनी भारतात मच्छलीपट्टण, पेतापुली, पुलिकत, तिरूपापुलियर, पूर्त नोव्हू, कारिकल, चिन्सुरा, ठठ्ठा, आग्रा, अहमदाबाद, भडोच, खंबायत, सुरत, नागपट्टण येथे वखारी स्थापल्या.

7. विजयनगरच्या शासकीय परवानगीने त्यांनी पुलिकत आणि नागपट्टण येथेकिल्ले बांधले. पुढे डचांनी पोर्तुगिजांचा पराभव करून कोची, कोडुंगलूर, कन्नूर आणि कोल्लम येथील किल्ले स्वतःच्या ताब्यात घेतले.

8. कोचीच्या राजाशी तह करून डचांनी काळ्या मिरीची निर्यात करण्याचा एकाधिकार मिळवला.

◈ उपसंहार : अशा प्रकारे डच सरकारने युनायटेड ईस्ट इंडिया कंपनीला अधिकार दिले

◈◈◈◈◈◈

संविधान तक्ता नुसार एकूण गुण : **10**

# प्रकरण 4 थे : *वसाहतवाद* आणि मराठे

## प्रश्न - दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.

1] भारतात सर्वप्रथम ................ आलेत.

अ) डच ब) इंग्रज क) पोर्तुगीज ड) फ्रेंच

**उत्तर :** भारतात सर्वप्रथम **पोर्तुगीज** आलेत.

2) मराठ्यांनी पोर्तुगिजांना ........................ च्या वेढ्यात पराभूत केले.

(अ) वेंगुर्ला (ब) फोंडा (क) सुरत (ड) राजापूर

**उत्तर :** मराठ्यांनी पोर्तुगिजांना **फोंडा** च्या वेढ्यात पराभूत केले.

3)इब्राहीमखानाने पानिपतच्या युद्धात केलेल्या पराक्रमाने प्रभावित होऊन .......... यांनी फ्रेंच प्रशिक्षकांच्या मदतीने आधूनिक कवायती फौज तयार केली.

अ) महादजी शिंदे ब) मल्हारराव होळकर क) राघोबादादा ड) सदाशिवराव भाऊ

**उत्तर** : इब्राहीमखानाने पानिपतच्या युद्धात केलेल्या पराक्रमाने प्रभावित होऊन **महादजी शिंदे** यांनी फ्रेंच प्रशिक्षकांच्या मदतीने आधूनिक कवायती फौज तयार केली.

4] थोरल्या बाजीराव पेशव्यांचे बंधू चिमाजीअप्पा यांनी वसई येथे ................ यांचा पराभव केला.

(अ) इंग्रज (ब) फ्रेंच (क) डच (ड) पोर्तुगीज

.उत्तर : थोरल्या बाजीराव पेशव्यांचे बंधू चिमाजीअप्पा यांनी वसई येथे **पोर्तुगीज** यांचा पराभव केला.

5] छत्रपती शिवाजी महाराज आणि इंग्रज यांचा संबंध सर्वप्रथम.......................... या प्रकरणात आला.

(अ) कुडाळ स्वारी (ब) अफजलखान (क) फाजलखान (ड) राज्याभिषेक

उत्तर : छत्रपती शिवाजी महाराज आणि इंग्रज यांचा संबंध सर्वप्रथम **अफजलखान** या प्रकरणात आला.

6] पानिपतचे तिसरे युद्ध मराठे आणि................ यांच्यात झाले.

(अ) इंग्रज (ब) अब्दाली (क) अहमदखान बंगश (ड) नजीबखान

उत्तर : पानिपतचे तिसरे युद्ध मराठे आणि **अब्दाली** यांच्यात झाले.

7] छत्रपती शिवाजी महाराजांनी दुर्गनिर्मितीबाबत मांडलेले विचार .................. या पुस्तकात वाचायला मिळतात.

अ) राज्यव्यवहारकोश ब) सभासद बखर क) आज्ञापत्र ड) बुधभूषण

**उत्तर** : छत्रपती शिवाजी महाराजांनी दुर्गनिर्मितीबाबत मांडलेले विचार **आज्ञापत्र** या पुस्तकात वाचायला मिळतात.

8) शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकासाठी .................. हा इंग्रज वकील उपस्थित होता.

अ) हेन्री रेव्हिंग्टन ब) फिलीप गिफर्ड क) हेन्री हॉक्झिडेन ड) रिचर्ड टेलर

**उत्तर :** शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकासाठी **हेन्री हॉक्झिडेन** हा इंग्रज वकील उपस्थित होता.

9) इंग्रज-मराठे यांच्यातील पहिल्या युद्धानंतर झालेल्या तहाला .............. तह असे म्हणतात.

अ) पानिपतचा ब) बडगावचा क) साष्टीचा ड) वसईचा

**उत्तर :** इंग्रज-मराठे यांच्यातील पहिल्या युद्धानंतर झालेल्या तहाला **वडगावचा** तह असे म्हणतात.

10) 14 जानेवारी 1761 रोजी ................. नदीच्या तीरावर पानिपतची तिसरी लढाई झाली.

अ) गंगा ब) घागरा क) सिंधू ड) यमुना

**उत्तर :** 14 जानेवारी 1761 रोजी **यमुना** नदीच्या तीरावर पानिपतची तिसरी लढाई झाली.

## प्रश्न - ऐतिहासिक ठिकाण, व्यक्ती, घटना यांसंबंधी नावे लिहा.

1] भारतात सर्वप्रथम आलेले युरोपीय – **पोर्तुगीज**

2] पोर्तुगिजांचा दारूगोळा असलेले ठिकाण --- **पनवेल**

3] वखारीचे संरक्षण आणि परवान्यासाठी शिवाजी महाराजांना नजराणा देणारे --- **डच**

4] जैतापूरचा इंग्रज दलाल --- **वेलजी**

## प्रश्न : – ब’ गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.

◈

| | ‘अ’ गट | | ‘ब’ गट |
|---|---|---|---|
| (1) | कास्मो-द-ग्वार्द | -- | पोर्तुगीज इतिहासकार |
| (2) | गोंसालू मार्तीस | -- | पोर्तुगीज वकील |
| (3) | फ्रांस्वाँ मार्टिन | -- | डच वखारीचा प्रमुख |
| (4) | हेन्री रेव्हिंग्टन | -- | इंग्रज अधिकारी |

उत्तर : चुकीची जोडी : फ्रांस्वाँ मार्टिन -- डच वखारीचा प्रमुख

☛ दुरुस्त केलेली जोडी : **फ्रांस्वाँ मार्टिन -- फ्रेंचांचा पाँडिचेरीचा गव्हर्नर जनरल**

◈

| | ‘अ’ गट | | ‘ब’ गट |
|---|---|---|---|
| (1) | वेंगुर्ला | -- | इंग्रजांची वखार |
| (2) | राजापुर | -- | फ्रेंचांची वखार |
| (3) | गोवा | -- | पोर्तुगीजांची वखार |
| (4) | मुरूड-जंजिरा | -- | सिद्धीचे ठाणे |

उत्तर : चुकीची जोडी : वेंगुर्ला -- इंग्रजांची वखार

☛ **दुरुस्त केलेली जोडी : वेंगुर्ला -- डचांची वखार**

◈

| | ‘अ’ गट | | ‘ब’ गट |
|---|---|---|---|
| (1) | इब्राहीम खान गारदी | -- | अब्दालीच्या सैन्याचा सेनापती |
| (2) | दौलतखान | -- | मराठ्यांच्या आरमाराचा प्रमुख |
| (3) | अहमदखान बंगश | -- | अयोध्या – दिल्ली परिसरातील अफगाणांचे नेतृत्व |
| (4) | अहमदशहा अब्दाली | -- | अफगाणिस्थानचा बादशाह |

उत्तर : चुकीची जोडी : इब्राहीम खान गारदी -- अब्दालीच्या सैन्याचा सेनापती

☛ **दुरुस्त केलेली जोडी : इब्राहीम खान गारदी -- मराठ्यांच्या लष्करातील तोफखान्याचा प्रमुख**

## प्रश्न - संकल्पना चित्र पूर्ण करा

**(1)**

| परकीय सत्तांची प्रमुख केंद्रे | | परकीय सत्ता |
|---|---|---|
| ----------------- | → | डच |
| दीव | → | ------------------ |
| ----------------- | → | इंग्रज |
| पाँडिचेरी | → | ---------------- |

उत्तर :

| परकीय सत्तांची प्रमुख केंद्रे | | परकीय सत्ता |
|---|---|---|
| **वेंगुर्ला** | → | डच |
| दीव | → | **पोर्तुगीज** |
| **मुंबई** | → | इंग्रज |
| पाँडिचेरी | → | **फ्रेंच** |

**(2)**

**नाना फडणवीस यांनी इंग्रजांविरुद्ध उभारलेला चतु:संघ**

उत्तर :

**नाना फडणवीस यांनी इंग्रजांविरुद्ध उभारलेला चतु:संघ**

हैदर

पेशवे

नागपूरकर भोसले

निजाम

**3) कालरेषा पुर्ण करा.**

| 1795 | | 1817 | |
|---|---|---|---|
| | **इंग्रज-मराठा दुसरे युद्ध** | | **मराठ्यांच्या सत्तेचा अस्त** |

उत्तर :

| 1795 | **1803** | 1817 | **1818** |
|---|---|---|---|
| इंग्रज-मराठा पहिली खर्ड्याची लढाई | इंग्रज-मराठा दुसरे युद्ध | इंग्रज-मराठे तिसरे युद्ध | मराठ्यांच्या सत्तेचा अस्त |

## प्रश्न - दिलेल्या कारणांपैकी योग्य कारण निवडून विधान पूर्ण करा.

**(1)** छत्रपती शिवाजी महाराजांनी मिठाच्या व्यापारावर संरक्षक जकाती उभारल्या. कारण –

(अ)पोर्तुगिजांना विरोध करण्यासाठी

(ब) इंग्रजांचा मिठाचा व्यापार मोडून काढण्यासाठी

(क) स्वराज्यात पैसा उभा करण्यासाठी

(ड) वसाहतवाद्यांना विरोध करण्यासाठी

उत्तर : <u>छत्रपती शिवाजी महाराजांनी मिठाच्या व्यापारावर संरक्षक जकाती उभारल्या, कारण – **इंग्रजांचा मिठाचा व्यापार मोडून काढण्यासाठी**</u>

(2) रघूनाथराव इंग्रजांच्या आश्रयाला गेले; कारण ......

(अ) थोरल्या माधवराव पेशव्यांनी त्यांना तुरूंगवासाची


(ब) रघुनाथरावांना माधवराव पेशव्यांचा कारभार आवडत नाव्हता.

(क) इंग्रजांनी त्यांना मोठा नजराणा भेट दिला होता.

(ड) रघुनाथरावांना पेशवेपद हवे होते.

**उत्तर : रघूनाथराव इंग्रजांच्या आश्रयाला गेले; कारण <u>रघुनाथरावांना पेशवेपद हवे होते.</u>**

## प्रश्न - पुढील नकाशाचे निरीक्षण करून प्रश्नांची उत्तरे लिहा




**<u>पाठ्यपुस्तक पान नं 29</u>**

1] ग्वालियर येथे कोणते मराठी घराणे होते.

उत्तर : **शिंदे घराणे**

2] पूर्व किनारपट्टीवर फ्रेंचांनी कोठे वसाहती उभारल्या ?

उत्तर : **पदुच्चेरी (पाँडिचेरी)**

3] या नकाशाच्या मदतीने कोणती माहिती मिळते ?

उत्तर : **<u>मराठी सत्तेचा विस्तार किंवा मराठ्यांची सत्ताकेंद्रे</u>**

4] नागपुर येथे कोणाची सत्ता होती ?

उत्तर : **भोसले**

5] मुंबई बेट कोणाच्या ताब्यात होते ?
उत्तर : **इंग्रजांच्या**

## प्रश्न - तुमचे मत नोंदवा

(1)छत्रपती शिवाजी महाराजांनी आरमार दल उभारले.
उत्तर : **माझ्या मते,**
1. सतराव्या शतकात हिंदी महासागरात झालेल्या नाविक लढायांमध्ये डच व इंग्रजांनी पोर्तुगिजांचा पराभव केला.
2.या काळात छत्रपती शिवाजी महाराजांचा अपवाद वगळल्यास इतर भारतीय सत्तांकडे स्वतःचे आरमार नव्हते.
3. छत्रपती शिवाजी महाराजांनी युरोपीय व्यापाऱ्यांना ओळखण्यात जी दूरदृष्टी दाखवली ती समकालीन राज्यकर्त्यांमध्ये अभावानेच आढळते.
**.... म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांनी आरमार दल उभारले.**

(2) मराठी सत्तेचे धोरण वसाहतवादविरोधी होते.
उत्तर : **माझ्या मते,**
1. . छत्रपती शिवाजी महाराजांनी या परकियांचे छुपे हेतू आणि त्यांची घुसखोरी ओळखून त्याचा प्रतिकार केला.
2.परकीय वसाहतवादाच्या विरोधात नौदल उभारणे, जलदुर्ग बांधणे इत्यादी उपाय त्यांनी केले.
3.इंग्रजांचा मिठाचा व्यापार मोडून काढण्यासाठी त्यांनी त्यावर जकात बसवली. अशा तऱ्हेने परकीय वसाहतवाद्यांना छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रखर विरोध केला.
4.छत्रपती संभाजी महाराजांनीही पोर्तुगिजांविरुद्ध तीव्र संघर्ष केला. पुढे थोरल्या बाजीराव पेशव्यांचे बंधू चिमाजीअप्पा यांनी वसई येथे पोर्तुगिजांचा पराभव केला.
5. परकीय सत्तेचा अशा रीतीने पराभव करणारी एकमेव भारतीय सत्ता म्हणजे मराठ्यांची सत्ता होय.
**.... म्हणून मराठी सत्तेचे धोरण वसाहतवादविरोधी होते.**

## प्रश्न - खालील प्रश्नांची दिलेल्या मुद्द्याच्या आधारे सविस्तर उत्तरे लिहा

1) इंग्रज – मराठे ह्यांच्यात झालेल्या युद्धाची माहीती
मुद्दे – इंग्रज-मराठा पहिले युद्ध
इंग्रज-मराठा दुसरे युद्ध
इंग्रज-मराठा तिसरे युद्ध

**उत्तर :**

(1) इंग्रज व छत्रपती शिवाजी राजे यांचा पहिला संबंध अफझलखान प्रकरणात आला. नंतर मराठ्यांनी जैतापूर येथील वकील वेलजी याला अटक केली. इंग्रजांनी घातलेल्या सर्व अटी फेटाळून लावल्या पण छत्रपती शाहू महाराज यांच्या नंतरच्या काळात नानासाहेब पेशवे ह्यांनी इंग्रजांची मदत घेतल्याने त्यांना मराठ्यांच्या राज्यकारभारात प्रवेश मिळाला.

(2) **पहिले इंग्रज-मराठा युद्ध -** नानासाहेबाचे भाऊ रघुनाथराव ह्यांना पेशवेपद हवे होते. त्यांनी इंग्रजांपूढे हात पसरवले. इंग्रजीना साष्टी, वसई- ते कोकणपर्यंतचा प्रदेश आपल्या ताब्यात असावा असे वाटत होते. रघुनाथरावांना हाताशी घेवून इंग्रजांची फौज मुंबईहुन पुण्याकडे निघाली व पुण्याजवळील वडगाव येथे इंग्रज-मराठा पहिले युद्ध घडून आले. पण इंग्रजांचा पराभव होऊन वडगावचा तह झाला.

(3) दुसरे इंग्रज-मराठा युद्ध – पुढे नाना फडविसाने इंग्राजांविरूद्ध चर्तुसंध निर्माण केला पण हद्वया चतुर्संघातून निजामाला फोडले, कारभारी नाना फडणीसाचा मृत्यू झाला, तेव्हा दुसरा बाजीराव व होळकर ह्यांच्यातील शत्रुत्व वाढले तेव्हा भीतीपोटी दुसरा बाजीराव इंग्रजांना जावून भेटला वसईचा तह झाला

(1802) शिंदे-होळकर  ह्यांना हे मान्य न झाल्यामुळे इंग्रज-मराछा दुसरे युद्ध झाले. त्यात मराठ्यांचा पराभव झाला.

**(4) इंग्रज-मराठा तिसरे युद्ध -** वसईच्या लहाने दुसरा बाजीराव ह्याने इंग्रजांची तैनाती फौज तर स्वीकारली व तो निश्चिंत झाला पण पुढे ब्रिटीशांच्या मागण्या पूर्ण करणे त्याला अवघड होऊ लागले. तो ब्रिटीशांच्या हातातले जणू बाहुले बनला. शेवटी मराठी सरदारांनी इंग्रज विरूद्ध आक्रमच पवित्र घेतला व 1817 मध्ये मराठी सत्ता संपूष्टात आली व पुण्याच्या शनिवारवाड्यावर युनियन जॅक फडकला.

**(2) अफगाण मराठे संबंध स्पष्ट करा**

मुद्दे : (अ) अब्दालीची १७४८ मधील पहिली स्वारी
(ब) अब्दालीची १७५७ मधील तिसरी स्वारी
(क) अब्दालीची १७५९ मधील चौथी स्वारी (पानिपतचे तिसरे युद्ध )

**उत्तर :** ◈ प्रस्तावना :

१८ व्या शतकाच्या पूर्वार्धात दिल्लीचा बादशाह दिल्ली, आग्रा आणि पंजाब या भागाचा सत्ताधीश होता. त्याच काळात अब्दालीच्या भारतावर स्वाऱ्या झाल्या, ज्या अफगाण आक्रमण म्हणून ओळखल्या गेल्या

◈ मुख्य उत्तर :

☞ **(अ) अब्दालीची १७४८ मधील पहिली स्वारी :**

1.. इ.स.१७४८ मध्ये अफगाणिस्तानचा बादशाह अहमदशहा अब्दाली याची भारतावर पहिली स्वारी झाली. 2.दिल्लीच्या बादशाही फौजेने अब्दालीचा पराभव केला. याच वेळी दिल्लीच्या गादीवर अहमदशहा होता. 3.अब्दालीच्या स्वारीच्या वेळी अयोध्या, दिल्ली आणि आग्रा परिसरातील अफगाणांनी अहमदखान बंगश याच्या नेतृत्वाखाली अब्दालीला पाठिंबा दिला होता.

4. अब्दाली परत गेल्यावर बंगशने मुघलांविरुद्ध युद्ध केले. मुघलांनी शिंदे-होळकरांची मदत घेऊन अफगाणांचा पराभव केला.

☞ **(ब) अब्दालीची १७५७ मधील तिसरी स्वारी :**

1. इ.स.१७५७ मध्ये अब्दालीने भारतावर तिसऱ्यांदा आक्रमण केले. दिल्ली आणि मथुरा लुटून तो अफगाणिस्तानला परत गेला.

2.या वेळेस रघुनाथराव पेशवे यांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांची फौज पुण्याहून निघाली.

3.मराठ्यांचे सैन्य दिल्लीला पोचेपर्यंत अब्दाली परत गेला होता. मराठ्यांनी दिल्ली ताब्यात घेऊन येथील परिस्थिती पूर्ववत केली.

4. मराठे आणि शीख यांनी पंजाब मोहीम आखली. सरहिंद प्रांताचा पाडाव केला. लाहोर ताब्यात घेऊन मराठे अटक शहरापर्यंत पोचले.

.☞ **(क) अब्दालीची १७५९ मधील चौथी स्वारी (पानिपतचे तिसरे युद्ध ):**

1. १७५९ मध्ये अब्दालीने भारतावर चौथी स्वारी केली. त्याचा प्रतिकार दत्ताजी आणि जनकोजी शिंदे यांनी केला. 2.अब्दालीचा वेग आणि आक्रमण एवढे तीव्र  होते की पहिल्याच धडाक्यात त्याने पंजाब जिंकला. या लढाईत दत्ताजी शिंदे यांना वीरमरण आले.

3. अब्दालीने दिल्लीवर अंमल बसवला. अफगाणांना भारतातून कायमचे घालवण्यासाठी सदाशिवरावभाऊ पेशवे आणि विश्वासराव पेशवे यांच्या नेतृत्वाखाली मराठे पुण्यातून उत्तरेकडे निघाले.

4.१४ जानेवारी १७६१ रोजी यमुना नदीच्या तीरावर पानिपत येथे अब्दाली आणि मराठे यांच्यात मोठा रणसंग्राम झाला. हे युद्ध पानिपतचे 'तिसरे युद्ध' म्हणून ओळखले जाते.

5. या युद्धात सदाशिवराभाऊ पेशवे, विश्वासराव पेशवे मारले गेले. 'दोन मोत्ये गळाली, २७ मोहरा गमावल्या व चांदी आणि तांब्याची नाणी किती गेली याची गणतीच नाही.' असा सांकेतिक निरोप पुण्यास पोहचला.

6. 'भारतीयांसाठी भारत' अशी व्यापक भूमिका घेऊन मराठे पानिपतावर लढले. दिल्ली सांभाळणे अशक्य असल्याने अब्दाली दोनच महिन्यात अफगाणिस्तानला परतला. मराठ्यांकडून होणाऱ्या कडव्या प्रतिकाराची जाणीव झाल्यामुळे त्याची किंवा त्याच्या वारसदारांची भारतावर परत आक्रमण करण्याची हिंमत झाली नाही.

◈ **उपसंहार :** अशा प्रकारे अब्दालीच्या स्वाऱ्यांच्या निमित्ताने अफगाण - मराठे  संबंध लक्षात येतात

## प्रश्न - खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा

(1) छत्रपती शिवाजी महाराजांच्या आज्ञापत्रातून युरोपीय व्यापाऱ्यांविषयी धोरणातील महत्त्वाच्या बाबी लिहा.
उत्तर :
◈ प्रस्तावना : छत्रपती शिवाजी महाराजांनी परकियांचे छुपे हेतू आणि त्यांची घुसखोरी ओळखून त्याचा प्रतिकार केला. महाराजांच्या या बाबी आज्ञापत्रातून दिसून येतात.

◈ मुख्य उत्तर :
1. छत्रपती शिवाजी महाराजांनी युरोपीय व्यापाऱ्यांना ओळखण्यात जी दूरदृष्टी दाखवली ती समकालीन राज्यकर्त्यांमध्ये अभावानेच आढळते. युरोपीय व्यापाऱ्यांविषयी आज्ञापत्रातील पुढील धोरण मननीय आहे.
2.''सावकारांमध्ये पोर्तुगीज, इंग्रज, डच आणि डॅनिश लोक आहेत. हे व्यापारी नेहमीच्या सावकारांसारखे नाहीत. हे लोक आपल्या देशातील राज्यकर्त्यांच्या मदतीने आपल्या भागात येतात. परदेशातील राज्यकर्त्यांना आपल्या देशात जागेचा मोह आहेच. येथील प्रदेशांवर त्यांना राज्य करण्याची इच्छा आहे.''
3. ''युरोपीय व्यापारी सगळीकडे जात आहेत. आपला जम बसवत आहेत. युरोपीय व्यापारी हट्टी लोक आहेत. हाती घेतलेली जागा ते सोडणार नाहीत. प्रसंगी मृत्यू पत्करतील परंतु जागा सोडणार नाहीत. त्यांचे आणि आपले संबंध कामापुरतेच असो द्यावेत. त्यांना जलदुर्गाजवळ अजिबात जागा देऊ नका. वखारीसाठी जागा देणे अपरिहार्य झाले तर त्यांना खाडीच्या तोंडाशी किंवा समुद्रकिनारी जागा देऊ नका. जोपर्यंत हेलोक आपल्या मर्यादेत वागत आहेत तोपर्यंत त्यांची काळजी नाही. परंतु वेळ येताच हे लोक आरमार, तोफा, दारूगोळा यांच्याद्वारे आपली ताकद दाखवून देतात.
4.आरमाराच्या मदतीने हेलोक बंदरांच्या परिसरात नवीन जलदुर्ग निर्माण करतात. यासाठी त्यांना जागा न देणे, दिल्यास समुद्रकिनाऱ्यापासून लांब आणि गावाच्या जवळ द्यावी. ज्यायोगे गावात या लोकांच्या वखारीचा त्रास होणार नाही. त्यांना पक्क्या इमारती बांधू देऊ नका. अशा प्रकारे ते राहिले तर बरे, नाही तर त्यांचा उपयोग काय? आपण त्यांच्या मार्गात आडवे येऊ नये, त्यांना आपल्या मार्गात आडवे येऊ देऊ नये. शत्रू मुलखात स्वारी केल्यास तेथे परकीय व्यापारी सापडल्यास त्यांच्याकडून दंड वसूल करावा. दंड घेतल्यावर त्यांना त्यांच्या स्थळी पाठवून द्यावे. शत्रूशी वागण्याची पद्धती या लोकांबरोबर वापरणे योग्य नाही.''
◈ उपसंहार :
अशा प्रकारे, छत्रपती शिवाजी महाराजांच्या आज्ञापत्रातून युरोपीय व्यापाऱ्यांविषयी धोरण कळते.

**(2) छत्रपती शिवाजी राजांचे मराठ्यांचे सार्वभौमत्व अबाधित राखण्याचे धोरण स्पष्ट करा.**
उत्तर :

- भारतात मोगल सत्ता संपूर्ण भारतावर आपले राज्य गाजवत होती, चोहोबानूनी भक्कम शत्रू अश्या प्रतिकूल परिस्थितीने छत्रपती शिवाजी राजांनी मराठी सत्तेची स्थापना केली. त्यातच युरोपीयनांचे वसाहतीकरण प्रभावशाली होऊ लागले, अशा- वेळी राजानी योग्य अशी राजकारणनीती अवलंबिली.
- परकियांचा हेतू लक्षात घेवून नौदल उभारले, जलदुर्ग बांधले. परकीयांच्या वसाहतवादाला विरोध करून स्वराज्याचे सार्वभौमाव टिकवले.
- पोर्तुगीजांच्या बाबतीत लवचिक धोरण ठेवले.
- इंग्रजांचा स्वराज्यातील मिठाचा व्यापार मोडून काढण्यासाठी जकात बसवून स्वराज्यातील व्यापाऱ्याला संरक्षण दिले. त्याचबरोबर शिवरायांनी केलेल्या तहानुसार इंग्रजीना (राजापूर, दाभोळ, चौल, कल्याण) वखारी उघडण्यास परवानगी दिली.
- इंग्रजी शिक्क्यांची नाणी मराठ्यांच्या राज्यात चालणार नाही अशी पण भूमिका घेतली.
- जहाजे फुटून किनाऱ्यालगत पडलेला माल इंग्रजांना परत द्यावा, जंजिऱ्याच्या सिद्धीशी तह करावा, त्यास बुडवू नये ह्या इंग्रजीच्या अटी त्यांनी फेटाळून लावल्या.

◈◈◈◈◈◈

प्रकरण ५ वे व प्रकरण ६ वे एकत्रित

संविधान तक्ता नुसार एकूण गुण **: 19**

# प्रकरण 5 वे : भारत : सामाजिक व धार्मिक सुधारणा

## प्रश्न - दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.

1] राजा राममोहन रॉय यांनी ............... प्रथेविरुद्ध इंग्रजी भाषेत पत्र लिहिले.
(अ) जातिप्रथा (ब) बालविवाह (क) सती (ड) पडदा पद्धती
.उत्तर : राजा राममोहन रॉय यांनी **सती** प्रथेविरुद्ध इंग्रजी भाषेत पत्र लिहिले.

2] 1829 मध्ये गव्हर्नर जनरल ..................... यांनी सती प्रथा नष्ट केली.
अ) लॉर्ड डफरीन ब) लॉर्ड बेटिंग क) लॉर्ड डलहौसी ड) लॉर्ड वेलस्ली
**उत्तर :** 1829 मध्ये गव्हर्नर जनरल **लॉर्ड बेटिंग** यांनी सती प्रथा नष्ट केली.

3) 'स्त्री-पुरूष तुलना करणारा निबंध .................. यांनी लीहीला.
अ) दुर्गाबाई देशमुख ब) सरोजीनी नायडू क) ताराबाई शिंदे ड) सावित्रीबाई फुले
**उत्तर** : 'स्त्री-पुरूष तुलना करणारा निबंध **ताराबाई शिंदे** यांनी लीहीला.

4) .............. यांनी महाड येथे मनुस्मृतीचे दहन केले.
अ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर ब) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे
क) रावबहादूर सी. के. बोले ड) महात्मा फुले
**उत्तर** : **डॉ. बाबासाहेब आंबेडकर** यांनी महाड येथे मनुस्मृतीचे दहन केले.

5) आर्य समाजाची स्थापना .............. यांनी केली.
(अ) स्वामी विवेकानंद (ब) महात्मा जोतीराव फुले
(क) स्वामी दयानंद सरस्वती (ड) रामस्वामी नायकर
उत्तर : आर्य समाजाची स्थापना **स्वामी दयानंद सरस्वती** यांनी केली.

## प्रश्न : – ब' गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.

◈

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (1) | ब्राह्मो समाज | -- | राजा राममोहन रॉय |
| (2) | सत्यशोधक समाज | -- | महात्मा जोतीराव फुले |
| (3) | परमहंस सभा | -- | महर्षी विठ्ठल रामजी शिंदे |
| (4) | रामकृष्ण मिशन | -- | स्वामी विवेकानंद |

उत्तर : चुकीची जोडी : परमहंस सभा -- महर्षी विठ्ठल रामजी शिंदे
☛ दुरुस्त केलेली जोडी : परमहंस सभा -- दादोबा पांडुरंग तर्खडकर

◈

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (1) | चवदार तळे सत्याग्रह | -- | नाशिक |
| (2) | सिंग सभा | -- | अमृतसर |
| (3) | वायकोम सत्याग्रह - | -- | त्रावणकोर |
| (4) | आरक्षणाचा जाहीरनामा | -- | कोल्हापुर |

उत्तर : चुकीची जोडी : चवदार तळे सत्याग्रह -- नाशिक
☛ दुरुस्त केलेली जोडी : चवदार तळे सत्याग्रह -- महाड

◈

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (1) | अलिगढ मुस्लिम युनिव्हर्सिटी | -- | खान अब्दुल गफार खान |
| (2) | मिठाच्या सत्याग्रहात सहभाग | -- | कमलादेवी चट्टोपाध्याय |
| (3) | बहिष्कृत हितकारिणी सभा | -- | डॉ. बाबासाहेब आंबेडकर |
| (4) | वायकोम सत्याग्रह | -- | रामस्वामी नायकर |

उत्तर : <u>चुकीची जोडी :</u> अलिगढ मुस्लिम युनिव्हर्सिटी -- खान अब्दुल गफार खान
<u>दुरुस्त केलेली जोडी :</u> अलिगढ मुस्लिम युनिव्हर्सिटी -- सर सय्यद अहमद खान

## प्रश्न - ऐतिहासिक ठिकाण, व्यक्ती, घटना यांसंबंधी नावे लिहा.

1] कोल्हापुर संस्थानात मोफत व सक्तीचा प्राथमिक शिक्षणाचा कायदा करणारे -- **<u>राजश्री शाहू महाराज</u>**
2) डॉ. बाबासाहेब आबेडकर यांनी भारतीय तरूणांना दिलेला संदेश → **<u>शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा.</u>**
3)मुघल शासकाने राजा राममोहन रॉय यांना दिलेला किताब --- **<u>राजा</u>**
4] मुहम्मदन अँग्लो ओरिएन्टल कॉलेजची स्थापना करणारे --- **<u>सर सय्यद अहमद खान</u>**
5] वायकोम सत्याग्रहात भाग घेणारे --- **रामस्वामी नायकर**
6] बडोदा संस्थानात पुरोगामी धोरण आखणारे --- .............. **<u>महाराजा सयाजीराव गायकवाड</u>**

## दिलेल्या कारणांपैकी योग्य कारण निवडून पुढील विधाने पुर्ण करा.

1)डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अनेक वृत्तपत्रे सुरू केली; कारण .......
i) त्यांना वृत्तपत्रांचा प्रसार करायचा होता.
ii) वृत्तपत्र हे समुह संपर्क माध्यम आहे.
iii) त्यांनी वृत्तपत्रांकडे चळवळीचे एक साधन म्हणून पाहीले.
iv) वृत्तपत्र हे उत्पन्नाचे साधन होते.

**उत्तर:** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अनेक वृत्तपत्रे सुरू केली; कारण <u>त्यांनी वृत्तपत्रांकडे चळवळीचे एक साधन म्हणून पाहीले.</u>

2) डॉ. बाबासाहेब यांनी महाड येथील चवदार तळ्याचा सत्याग्रह केला; कारण ......
i) तळ्याचे चवदार पाणी सर्वांनाच प्यायचे होते.
ii) महाड हे तळे खाजगी मालकीचे होते.
iii) समाजातील प्रतिष्ठितांनाच हे पाणी पिण्याचा अधिकार होता.
iv) सार्वजनिक पाणवठे सर्वांना खुले असावेत ही त्यांची भूमिका होती.

उत्तर : डॉ. बाबासाहेब यांनी महाड येथील चवदार तळ्याचा सत्याग्रह केला; कारण <u>सार्वजनिक पाणवठे सर्वांना खुले असावेत ही त्यांची भूमिका होती.</u>

## प्रश्न - संक्षिप्त टिपा लिहा

1) प्रार्थना समाज :

उत्तर : 1. दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनी स्थापन केलेल्या परमहंस सभेतूनच पुढे 'प्रार्थना समाजा'ची स्थापना झाली.
2.डॉ.आत्माराम पांडुरंग, न्यायमूर्ती म.गो.रानडे, डॉ.रा. गो.भांडारकर या प्रार्थना समाजाच्या संस्थापक सदस्यांनी मूर्तिपूजेला विरोध करून एकेश्वरवादास प्राधान्य दिले.
3. कर्मकांडाला विरोध करून प्रार्थनेवर भर दिला. अनाथालये, स्त्री शिक्षणसंस्था, कामगारांसाठी रात्रशाळा सुरू केल्या.
4.स्त्री-पुरुष समानतेची चळवळ, जातिभेद नाकारणे आणि ऐहिक जीवनाला महत्त्व देणे या गोष्टींना प्राधान्य दिले.

**(2) सत्यशोधक समाज :**

उत्तर : 1. महात्मा जोतीराव फुले यांनी १८७३ मध्ये पुणे येथे ‘सत्यशोधक समाजा’ची स्थापना केली.

2.अन्याय्य धर्माच्या परंपरेवर बौद्धिक आक्रमण करणारा विचार यामागे होता. बहुजन समाजाला नाडणाऱ्या प्रवृत्तींवर महात्मा जोतीराव फुले यांनी प्रहार केला.

3. शेतकरी, कारागीर, कामगार आणि अठरा पगड जातींचे भले साधण्याचा मार्ग महात्मा जोतीराव फुले यांनी दाखवला. एकेश्वरवाद, वेद व पुराणांचे प्रामाण्य नाकारणे, विवेचक बुद्धीचे प्रामाण्य, पुरोहितांच्या वर्चस्वाला व मध्यस्थीला विरोध, मूर्तीपूजा विरोध, तीर्थयात्रा विरोध, चमत्कारांवर अविश्वास, परलोक कल्पनेला विरोध ही सत्यशोधक समाजाची वैशिष्ट्ये होती.

## प्रश्न - पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.

(1) राजर्षी शाहू महाराजांची धोरणे पुरोगामी होती

**उत्तर : राजर्षी शाहू महाराजांची धोरणे पुरोगामी होती, कारण --**


1. कोल्हापूर संस्थानचे राजर्षी शाहू महाराज यांनी ब्राह्मणेतर चळवळीचे नेतृत्व करत असतानाच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वास पाठिंबा दिला.

2.राजर्षींनी कोल्हापूर संस्थानात आरक्षणाचा जाहीरनामा काढला. मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला.


3.राजर्षी शाहू महाराज यांनी रोटीबंदी, बेटीबंदी आणि व्यवसाय बंदीवर टीका केली. आंतरजातीय विवाहाचा कायदा त्यांनी केला. संस्थानात कोणताही व्यवसाय कोणालाही करण्याची परवानगी देण्यात आली.

## प्रश्न - संकल्पना चित्र पूर्ण करा

(1)



उत्तर :




**2) पुढील तक्ता पूर्ण करा.**

| **संस्था** | **संस्थापक** |
|---|---|
| ब्राह्मो समाज | ....................................... |
| ................................ | स्वामी दयानंद सरस्वती |
| सत्यशोधक समाज | ....................................... |
| रामकृष्ण मिशन | ...................................... |

**उत्तर :**


| **संस्था** | **संस्थापक** |
|---|---|
| ब्राह्मो समाज | **राजा राममोहन रॉय** |
| **आर्य समाज** | स्वामी दयानंद सरस्वती |
| सत्यशोधक समाज | **महात्मा फुले** |
| रामकृष्ण मिशन | **स्वामी दयानंद सरस्वती** |

## प्रश्न - खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा

(1) रामकृष्ण मिशनने केलेले कार्य लिहा.

उत्तर : ◈ प्रस्तावना : भारतीय समाजातील अंधश्रद्धा, रूढीप्रियता, जातिभेद, उच्च-नीचतेच्या भ्रामक कल्पना, चौकस व चिकित्सक वृत्तीचा अभाव यांमुळे येथील समाज मागे पडला होता. इंग्रजी शिक्षणामुळे येथील समाजसुधारकांची जगाकडे बघण्याची दृष्टी बदलली. यात स्वामी विवेकानंद अग्रेसर होते त्यांनी निर्मिलेल्या रामकृष्ण मिशनचे कार्य पुढील प्रमाणे ---

**◈ मुख्य उत्तर :**
1. इ.स.१८९७ मध्ये स्वामी विवेकानंद यांनी 'रामकृष्ण मिशन'ची स्थापना केली.
2.रामकृष्ण मिशनने लोकसेवेच्या कार्याला महत्त्व दिले.
3.दुष्काळग्रस्तांना मदत, आजारी लोकांना औषधोपचार, दीनदुबळ्यांची सेवा, स्त्री-शिक्षणाचा पुरस्कार आणि आध्यात्मिक उन्नती या क्षेत्रांत रामकृष्ण मिशनने कार्य केले.




4. 'उठा, जागे व्हा आणि ध्येय प्राप्त होईपर्यंत थांबू नका' हा संदेश स्वामी विवेकानंद यांनी रामकृष्ण मिशनद्वारे भारतीय तरुणांना दिला..
◈ उपसंहार :
अशा प्रकारे रामकृष्ण मिशनचे कार्य होते.

(2) सर सय्यद अहमद खान यांनी केलेले कार्य लिहा.
उत्तर : ◈ प्रस्तावना : सर सय्यद अहमद खान : यांचा जन्म १८१७ मध्ये दिल्ली येथे झाला. त्यांचे उर्दू, पर्शियन, अरेबिक आणि इंग्रजी भाषेवर प्रभुत्व होते. सर सय्यद अहमद खान यांनी केलेले कार्य पुढील प्रमाणे ---
**◈ मुख्य उत्तर :**
☞ 1. सर सय्यद अहमद खान यांनी 'आइन-ए-अकबरी' (अबुल फैज याने सम्राट अकबराच्या प्रशासन पद्धतीवर लिहिलेला ग्रंथ) या ग्रंथाचे संपादन केले होते.
2. १८६४ मध्ये त्यांनी मुस्लिमांसाठी 'सायंटिफिक सोसायटी' स्थापन केली.
3. या सोसायटीचे सदस्य इतिहास, विज्ञान आणि राजकीय अर्थशास्त्र या विषयांचा अभ्यास करत.
4.१८६९ मध्ये सर सय्यद अहमद खान इंग्लंडला गेले. इंग्लंहून परत आल्यावर त्यांनी १८७५ मध्ये 'मुहम्मदन अँग्लो ओरिएन्टल कॉलेज' ची स्थापना केली. नंतर या कॉलेजचे रूपांतर 'अलिगढ मुस्लीम युनिर्व्हसिटी'मध्ये झाले.
5.अहमद खान यांनी 'मोहम्मदन सोशल रिफॉर्मर' या नावाचे नियतकालिक सुरू केले.
6. सर सय्यद अहमद खान यांनी आधुनिक शिक्षण, विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा पुरस्कार केला.
◈ उपसंहार :
अशा प्रकारे सर सय्यद अहमद खान यांनी केलेले कार्य होते.

◈◈◈◈◈◈

प्रकरण ५ वे व प्रकरण ६ वे एकत्रित
संविधान तक्ता नुसार एकूण गुण : 19

# प्रकरण 6 वे : <u>वसाहतवादाविरुद्ध भारतीयांचा संघर्ष</u>

## दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.

1] भारतीय राष्ट्रीय सभेच्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष ............. होते
अ) द्वारकानाथ टागोर ब) व्योमेशचंद्र बॅनर्जी
क) दादाभाई नौरोजी ड) सुरेंद्रनाथ बॅनर्जी
**उत्तर :** भारतीय राष्ट्रीय सभेच्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष **<u>व्योमेशचंद्र बॅनर्जी</u>** होते

2] हंसाजी नाईक यांचे स्वतंत्र राज्य.......... जिल्ह्यात होते.
(अ) सातारा (ब) नांदेड (क) पुणे (ड) नागपूर
उत्तर : हंसाजी नाईक यांचे स्वतंत्र राज्य **<u>नांदेड</u>** जिल्ह्यात होते.

2] बिहारमधील ब्रिटिश मळेमालक तेथील शेतकऱ्यांवर ................... लागवडीची सक्ती करत.
(अ) निळीच्या (ब) चहाच्या (क) कॉफीच्या (ड) उसाच्या
उत्तर : बिहारमधील ब्रिटिश मळेमालक तेथील शेतकऱ्यांवर **<u>निळीच्या</u>** लागवडीची सक्ती करत.

3] राज्य खालसा करण्याचे धोरण .............. या अधिकाऱ्याने अवलंबिले.
अ) लॉर्ड डलहौसी ब) लॉर्ड कर्झन क) लॉर्ड कॅनिंग ड) लॉड वेलस्ली
**उत्तर** : राज्य खालसा करण्याचे धोरण **<u>लॉर्ड डलहौसी</u>** या अधिकाऱ्याने अवलंबिले.

4] राष्ट्रीय सभेच्या स्थापनेत .......... या ब्रिटिश अधिकाऱ्याने पुढाकार घेतला होता.
अ) कमिशनर रँड ब) ग्रँट डफ क) गव्हर्नर विलिंग्डन ड) ॲलन ह्युम
**उत्तर :** राष्ट्रीय सभेच्या स्थापनेत **<u>ॲलन ह्युम</u>** या ब्रिटिश अधिकाऱ्याने पुढाकार घेतला होता.

5) राष्ट्रीय सभेमध्ये ............ च्या अधिवेशनात फूट पडली.
अ) मुंबई ब) लाहोर क) सुरत ड) पुणे
**उत्तर :** राष्ट्रीय सभेमध्ये **<u>सुरत</u>** च्या अधिवेशनात फूट पडली.

6) आझाद हिंद सेनेची स्थापना ....... यांनी केली.
अ) रासबिहारी बोस ब) सुभाषचंद्र बोस क) अरविंद घोष ड) खुदीराम बोस
**उत्तर :** आझाद हिंद सेनेची स्थापना **<u>राबबिहारी बोस</u>** यांनी केली.

7) 1875 मध्ये .......... छावणीत मंगल पांडे यांनी सैनिकांच्या असंतोषाला तोंड फोडले.
अ) मेरठ ब) कानपूर क) बराकपुर ड) लखनऊ
**उत्तर :** 1875 मध्ये **<u>बराकपुर</u>** छावणीत मंगल पांडे यांनी सैनिकांच्या असंतोषाला तोंड फोडले.

## **प्रश्न :** – ब' गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (1) | कुवरसिंह | --- | लखनौ |
| (2) | नानासाहेब पेशवे - | --- | कानपूर |
| (3) | राणी लक्ष्मीबाई | --- | झाशी |
| (4) | चिमासाहेब | --- | कोल्हापूर |

**उत्तर :** <u>चुकीची जोडी :</u> कुवरसिंह -- लखनौ
दुरुस्त केलेली जोडी : कुवरसिंह -- हजारीबाग

**प्रश्न :** ऐतिहासिक ठिकाण, व्यक्ती, घटना यांसंबंधी नावे लिहा.

1] १९४२ मध्ये महाराष्ट्रात स्थापन झालेल्या प्रतिसरकारचे कार्यक्षेत्र - --- **सातारा**
2] आझाद हिंद सेनेची स्थापना करणारे --- **नेताजी सुभाषचंद्र बोस**
3] चितुरसिंग यांच्या नेतृत्वाखाली सातारा जिल्ह्यात या समाजाच्या लोकांनी उठाव केला --- **रामोशी समाज**
4] १९४३ मध्ये आझाद हिंद सेनेने ब्रिटिशांकडून जिंकून घेतलेली भारतीय बेटे --- **अंदमान व निकोबार बेटे**
5] भारतीय राष्ट्रीय सभेच्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष --- **व्योमेशचंद्र बॅनर्जी**

**प्रश्न : दिलेली संकल्पनाचित्रे पूर्ण करा**

(1)

----------------------- | | ----------------
---|---|---
| १८५७ च्या उठावातील नेते | 
-------------------- | | ----------------

**उत्तर :**

| **कुवरसिंह** | | **नानासाहेब पेशवे** |
|---|---|---|
| | १८५७ च्या उठावातील नेते | |
| **राणी लक्ष्मीबाई** | | **बखतखान** |

(2)

| | → ------------------------------- |
|---|---|
| | → ------------------------------- |

सातराच्या प्रतिसरकारने केलेली जनहिताची कामे

- ------------------------------
- ------------------------------

**उत्तर :**

सातराच्या प्रतिसरकारने केलेली जनहिताची कामे

- कर गोळा करणे
- कायदा व सुव्यवस्था टिकवणे
- खटल्यांचा निकाल देणे
- गुन्हेगारांना शिक्षा करणे

## प्रश्न : संक्षिप्त टिपा लिहा

**(1) जहाल विचारसरणी :**

**उत्तर :** 1. स्वातंत्र्यलढ्याच्या काळात विशेषतः महाराष्ट्रात 'आधी राजकीय सुधारणा की सामाजिक सुधारणा' हा वाद सुरू झाला होता. स्वातंत्र्य मिळाले की समाज सुधारेल ही जहाल गटाची विचारसरणी होती.

2. जहालांचे नेतेलोकमान्य टिळक म्हणत, हे घरच माझे नाही !.... ते अगोदर ताब्यात घेऊ या. मग आपण हव्या त्या सुधारणा करू.

3. अर्ज, विनंत्या अगर भाषणे करून इंग्रजी सत्ता बधणार नाही असे लोकमान्य टिळकांच्या गटाचे ठाम मत होते.

**(2) आझाद हिंद सेना :**

**उत्तर :** 1. जपानने आग्नेय आशियातील ब्रिटिशांच्या ताब्यातील प्रदेश जिंकले. ब्रिटिश सैन्यातील अनेक भारतीय सैनिक जपानच्या हाती लागले. त्यातूनच रासबिहारी बोस यांनी आझाद हिंद सेनेची निर्मिती केली. याच सेनेचे नेतृत्व नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी केले.

2. ुभाषचंद्र बोस यांनी १९४३ मध्ये सिंगापूर येथे आझाद हिंद सरकारची स्थापना केली.

3.१९४३ च्या अखेरीस नेताजींनी अंदमान व निकोबार बेटे जिंकून ताब्यात घेतली. ''तुम मुझे खून दो । मैं तुम्हें आजादी दूँगा ।'' ही घोषणा त्यांनी लोकप्रिय केली. १९४४ मध्ये त्यांनी आराकानचा प्रदेश मिळवला. तसेच

4.आसामच्या पूर्वसीमेवरील ठाणी जिंकून घेतली. परंतु त्यांची इंफाळची मोहीम अर्धवट राहिली. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही आझाद हिंद सेनेचे सैनिक नेटाने लढले.

**(3) प्रतिसरकार :**

**उत्तर :** 1. क्रांतिसिंह नाना पाटील यांनी महाराष्ट्रात सातारा जिल्ह्यात 'प्रतिसरकार' १९४२ मध्ये स्थापन केले.

2.आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने त्यांनी तेथील ब्रिटिश शासन संपुष्टात आणले आणि जनतेचे सरकार स्थापन केले.

3.कर गोळा करणे, का यदा व सुव्यवस्था टिकवणे, खटल्यांचा निकाल देणे, गुन्हेगारांना शिक्षा करणे इत्यादी कामे या सरकारतर्फे केली जात.

**(4) राणीचा जाहीरनामा :**

**उत्तर :** 1. १८५७ च्या लढ्याच्या प्रसंगी भारतीयांच्या मनात उफाळलेला असंतोष लक्षात घेऊन इंग्लंडची राणी व्हिक्टोरिया हिने 'राणीचा जाहीरनामा' प्रसिद्ध केला.
2.त्यामध्ये सर्व भारतीय आमचे प्रजाजन आहेत असे म्हणत राणीने भारतीयांना उद्देशून काही आश्वासने दिली. या आश्वासनांमध्ये भारतीय प्रजाजनांमध्ये वंश, धर्म, जात किंवा जन्मस्थान या निकषांच्या आधारे कोणताही भेद केला जाणार नाही असे म्हटले होते.
3. तसेच नोकऱ्या गुणवत्तेच्या निकषावर दिल्या जातील, धार्मिक बाबतीत ब्रिटिश सरकार हस्तक्षेप करणार नाही, संस्थानिकांशी केलेल्या करारांचे पालन केले जाईल, संस्थाने खालसा केली जाणार नाहीत इत्यादी आश्वासनांचा समावेश या जाहीरनाम्यात होता.

## प्रश्न : पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.

**(1) १८२२ च्या अखेरीस लेफ्टनंट औट्रॅम भिल्लांचा उठाव मोडून काढण्यात यशस्वी झाला.**

**उत्तर :** १८२२ च्या अखेरीस लेफ्टनंट औट्रॅम भिल्लांचा उठाव मोडून काढण्यात यशस्वी झाला, कारण--
1. लेफ्टनंट औट्रॅम याने भिल्लांमध्ये राहून त्यांच्यात विश्वासही निर्माण केला.
2. त्यांना शहरी जीवनात आणण्याचा त्याने प्रयत्न केला. माफीचे जाहीरनामे, जमिनी देणे, तगाई, मागील गुन्ह्यांची माफी, सैन्यात भरती यांमुळे भिल्लांचे उठाव करण्याचे प्रमाण पुढील काळात कमी झाले.
3. १८२२ च्या दरम्यान 'हरिया' या भिल्लांच्या म्होरक्याचा उठाव कॅप्टन रॉबिन्सन याने दडपला.

**(2) रवींद्रनाथ टागोर यांनी 'सर' या पदवीचा त्याग केला**

**उत्तर :** रवींद्रनाथ टागोर यांनी 'सर' या पदवीचा त्याग केला, कारण —
1. रौलट कायद्याविरोधी सत्याग्रही लढ्याने पंजाबमध्ये प्रखर स्वरूप धारण केले. १३ एप्रिल १९१९ हा बैसाखी या सणाचा दिवस होता.
2.बैसाखीनिमित्त अमृतसरमधील जालियनवाला बागेत आयोजित केलेल्या सभेसाठी हजारो लोक जमलेहोते. त्यातील बहुसंख्य लोकांना सभाबंदीच्या हुकुमाची कल्पना नव्हती. जनरल डायरने लोकांना पूर्वसूचना न देता जमावावर भीषण गोळीबार केला.
3.या गोळीबारात शेकडो लोक मारले गेले व हजारांवर जखमी झाले. जालियनवाला बाग हत्याकांडामुळे साऱ्या भारतभर संतापाची लाट उसळली.
4. रवींद्रनाथ टागोरांनी हत्याकांडाचा तीव्र शब्दांत निषेध करून ब्रिटिश सरकारने त्यांना दिलेल्या 'सर' या पदवीचा त्याग केला.

## प्रश्न :- तुमचे मत नोंदवा

(1) **वसाहतवादाचा उदय हा युरोपियन राष्ट्रांच्या व्यापारवृद्धीचा परिणाम होता.**

**उत्तर : माझ्या मते,**
1. भारतीय परंपरेचा, येथील पीकपद्धती व हवामानाचा विचार न करता भारतात कायमधारा, रयतवारी, महालवारी या पद्धतीचे प्रयोग इंग्रजांनी केले. त्यामुळे शेतकरी कंगाल, जमीनदार आणि कंपनी सरकार श्रीमंत होत गेले.
2.पूर्वी शेतसारा वस्तूरूपात भरता येत होता. आता तो रोख स्वरूपात द्यावा लागे. पीक येवो न येवो पण कर भरावाच लागे.
3. . इंग्रज मळेवाल्यांनी येथे नगदी पिके घेण्यास सुरुवात केली. निळीच्या शेतात काम करणाऱ्या मजुरांची अवस्था भीषण होती. सार्वत्रिक बेकारी, असंतोष, अविश्वास यांनी भारतभर सामान्य जनतेचे जगणे अवघड केले होते.
........ **म्हणून वसाहतवादाचा उदय हा युरोपियन राष्ट्रांच्या व्यापारवृद्धीचा परिणाम होता.**

(2) **१८५७ चे स्वातंत्र्ययुद्ध हे स्वा.सावकर यांच्या मते पहिले स्वातंत्र्ययुद्ध होते**

**उत्तर : माझ्या मते,**

1. १८५७ चे स्वातंत्र्ययुद्ध जवळजवळ वर्ष-सव्वा वर्ष चालू होते.
2. दिल्ली, मेरठ, कानपूर, लखनौ, ग्वालियर इत्यादी ठिकाणी लढलेल्या हिंदी शिपायांची संख्या सुमारे एक लाखाच्या आसपास जाईल एवढी मोठी होती. शस्त्रबळ, शौर्य, धैर्य यातही ते कमी नव्हते.
3. पहिले सूत्रबद्ध संघटन म्हणून या स्वातंत्र्ययुद्धाकडे पाहिले जाते.


**.... म्हणून १८५७ चे स्वातंत्र्ययुद्ध हे स्वा.सावकर यांच्या मते पहिले स्वातंत्र्ययुद्ध होते**

**प्रश्न : दिलेल्या कारणांपैकी योग्य कारण निवडून विधान पूर्ण करा.**

1) रविंद्रनाथ टागोर यांनी 'सर' या पदवीचा त्याग केला, कारण –
   (अ) रौलेट कायद्याला विरोध करण्यासाठी
   (ब) निळीच्या लागवडीच्या सक्तीचा निषेध करण्यासाठी
   (क) जालियनवाला बाग हत्याकांडाचा निषेध करण्यासाठी
   (ड) मीठावरील कराराचा निषेध करण्यासाठी

उत्तर : रविंद्रनाथ टागोर यांनी 'सर' या पदवीचा त्याग केला, कारण – **जालियनवाला बाग हत्याकांडाचा निषेध करण्यासाठी**

## प्रश्न : पुढील नकाशाचे निरीक्षण करून प्रश्नांची उत्तरे लिहा




**प्रश्न :** 1) महाराष्ट्रातील उठावाची ठिकाणे कोणती होती?
**उत्तर :** औरंगाबाद, सातार, कोल्हापूर, नरगुंद, नागपूर

2) भारताच्या वायव्येकडील भागात-आताच्या वर्तमान सीमांच्या बाहेरची उठावाची ठिकाणे सांगा.
**उत्तर :** पेशावर, कराची, लाहोर, शिकरपुर

3) मंगल पांडे यांची नियुक्ती कोणत्या छावणीत होती?
**उत्तर :** उत्तर प्रदेशातील बराकपुर

4) उत्तर भारतातील उठावाची प्रमुख चार ठिकाणे लिहा.
**उत्तर :** अयोध्या, लखनौ, कानपुर, झाशी, बनारस

5) उठाव प्रामुख्याने भारताच्या कोणत्या भागात एकवटलेला दिसतो.
**उत्तर :** उत्तर भारत

## प्रश्न : खालील प्रश्नांची दिलेल्या मुद्द्याच्या आधारे सविस्तर उत्तरे लिहा

1) १८५७ पूर्वीच्या लढ्यांची माहिती लिहा
मुद्दे : (अ) भिल्लांचा उठाव (ब) रामोशी समाजाचा उठाव (क) सावंतवाडीतील उठाव

**उत्तर :** ◈ प्रस्तावना : भारतीयांनी वसाहतवादाविरुद्ध लढण्याचा आदर्श जगासमोर ठेवला. त्यातून पारतंत्र्यातील अनेक देशांना स्वातंत्र्यलढ्याची प्रेरणा मिळाली. यात १८५७ स्वातंत्र्यलढ्याच्या पूर्वीचे काही लढे समाविष्ट आहेत.

◈ **मुख्य उत्तर :**

☞ **(अ)** भिल्लांचा उठाव **:**

1. १८१८ मध्ये खानदेश इंग्रजांच्या ताब्यात गेला. सातपुडा, सातमाळा आणि अजिंठ्याच्या परिसरातील भिल्ल एकत्र आले. दुसऱ्या बाजीरावाचे विश्वासू सहकारी त्रिंबकजी डेंगळे कैदेतून निसटले आणि त्यांनी भिल्लांना प्रेरणा दिली. त्रिंबकजी डेंगळे यांचे पुतणे गोंदाजी व महिपा यांनी या उठावाचे नेतृत्व केले.

2.या उठावात हजारो भिल्लांनी भाग घेतला. कॅप्टन ब्रिग्ज याने या भिल्लांची कोंडी करण्यास सुरुवात केली. त्यांची रसद बंद केली.

3.इंग्रजी सत्तेचा प्रमुख माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टनने काही भिल्लांनाच वाटसरूंचे संरक्षण करण्याच्या कामावर नेमले. काही भिल्लांना नोकऱ्या व पेन्शन द्यायला सुरुवात केली. एका बाजूला भिल्लांना अशा सवलती देत असताना दुसऱ्या बाजूने मात्र त्यांची गळचेपी करण्यास सुरुवात केली.

4.मेजर मोरिन याने भिल्लांना शरण येण्यास भाग पाडले. १८२२ च्या दरम्यान 'हरिया' या भिल्लांच्या म्होरक्याचा उठाव कॅप्टन रॉबिन्सन याने दडपला. भिल्लांचा उठाव लेफ्टनंट औट्रॅम याने मोडून काढला.

5.त्याचबरोबर त्याने भिल्लांमध्ये राहून त्यांच्यात विश्वासही निर्माण केला. त्यांना शहरी जीवनात आणण्याचा त्याने प्रयत्न केला. माफीचे जाहीरनामे, जमिनी देणे, तगाई, मागील गुन्ह्यांची माफी यांमुळे भिल्लांचे उठाव करण्याचे प्रमाण पुढील काळात कमी झाले.

☞ **(ब)** रामोशी समाजाचा उठाव :

1.चितूरसिंग यांच्या नेतृत्वाखाली सातारा जिल्ह्यात रामोशी समाजाच्या लोकांनी उठाव केला.

2.संतू नाईक व उमाजी नाईक हे त्यांचे म्होरके होते. पुण्याहून मुंबईला जाणारा सावकारी ऐवज त्यांनी ताब्यात घेतला.

3.१८२४ मध्ये उमाजी नाईक यांनी पुण्याजवळील भांबुर्डे येथील सरकारी तिजोरी ताब्यात घेतली. त्यांनी इंग्रजांच्या नाकी दम आणला. या सगळ्या प्रकाराला आळा घालण्यासाठी उमाजी आणि त्यांचे सहकारी भुजबा, पांड्या व येसाजी यांच्यासाठी सरकारने प्रत्येकी ५ हजार रुपयांचे इनाम घोषित केले.

4. अखेर भोरजवळ इंग्रजांनी उमाजींना पकडले. उमाजी नाईक यांच्यावर खटला भरून त्यांना पुणे येथे फाशी देण्यात आली.

☞ **(क)** सावंतवाडीतील उठाव **:**

1. १८२८ मध्ये महादेवगडचा किल्लेदार फोंडसावंत तांदुळवाडीकर याने उठाव केला. मात्र, इंग्रजांनी हा उठाव मोडून काढला. इंग्रजांचे धोरण पाहून सावंतवाडीतील सरदारांनी एकत्र येऊन उठाव केला.

2.परंतु स्पूनर या पोलिटिकल एजंटने हा उठाव मोडून काढला. त्यानंतरही या उठावात सामील असलेल्या सरदारांपैकी काहींनी ब्रिटिशांविरुद्ध एक होऊन लढण्याचा प्रयत्न केला.

3.मात्र १८४५ मध्ये या परिसरात लष्करी कायदा पुकारण्यात आला. कॅप्टन औट्रॅम यानेहा उठाव पूर्णतः मोडून काढला.

◈ उपसंहार :

अशा प्रकारे १८५७ स्वातंत्र्यलढ्याच्या पूर्वी च्या लढ्यांची माहिती देता येईल.

◆◈◆◈◆◈◆◈◆◈

संविधान तक्ता नुसार एकूण गुण : **09**

## प्रकरण ७ वे : **<u>भारत : निर्वसाहतीकरण ते एकीकरण</u>**

### **<u>प्रश्न :</u>** दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.

1] गोवा येथे इ.स.१९४६ मध्ये.................................. यांच्या नेतृत्वाखाली सविनय कायदेभंगाचे आंदोलन झाले.
(अ) डॉ.राम मनोहर लोहिया (ब) डॉ.टी.बी.कुन्हा (क) डॉ.पी.पी.शिरोडकर (ड) डॉ.राम हेगडे
उत्तर : गोवा येथे इ.स.१९४६ मध्ये **<u>डॉ.राम मनोहर लोहिया</u>** यांच्या नेतृत्वाखाली सविनय कायदेभंगाचे आंदोलन झाले.

2] सविनय कायदेभंगाचे आंदोलन गोवा येथे .............. यांच्या नेतृत्वाखाली १९४६ साली सुरू करण्यात आले.
(अ) डॉ.राम मनोहर लोहिया (ब) डॉ.टी.बी.कुन्हा (क) डॉ.पी.पी.शिरोडकर (ड) डॉ.राम हेगडे
उत्तर : सविनय कायदेभंगाचे आंदोलन गोवा येथे **<u>डॉ.राम मनोहर लोहिया</u>** यांच्या नेतृत्वाखाली १९४६ साली सुरू करण्यात आले.

3] हैदराबाद संस्थानाच्या मुक्तिलढ्याचे नेतृत्व ..............................................यांनी समर्थपणे केले.
(अ) राजा हरिसिंग (ब) स्वामी रामानंद तीर्थ (क) पंडित महादेवशास्त्री जोशी (ड) केशवराव जेधे
उत्तर : हैदराबाद संस्थानाच्या मुक्तिलढ्याचे नेतृत्व **<u>स्वामी रामानंद तीर्थ</u>** यांनी समर्थपणे केले.


4] भारतामध्ये ............................................................ यांच्या प्रयत्नातून अनेक संस्थाने विलीन झाली.
(अ) जयंतराव टिळक (ब) सरदार वल्लभभाई पटेल
(क) पंडित जवाहरलाल नेहरू (ड) डॉ.टी.बी. कुन्हा
.उत्तर : भारतामध्ये **<u>सरदार वल्लभभाई पटेल</u>** यांच्या प्रयत्नातून अनेक संस्थाने विलीन झाली.

### **<u>प्रश्न :</u>** ऐतिहासिक ठिकाण, व्यक्ती, घटना यांसंबंधी नावे लिहा.


1] भारत स्वतंत्र झाला त्यावेळी भारतात विलीन न झालेले सौराष्ट्रातील संस्थान --- **<u>जुनागढ</u>**
2] गोवा काँग्रेस कमिटीचे प्रमुख --- **<u>डॉ.टी.बी. कुन्हा</u>**
3] डॉ.टी.बी. कुन्हा यांनी स्वतंत्र भारतात गोव्यात सुरू केलेली वृत्तपत्रे --**<u>आझाद गोवा</u>** , **<u>स्वतंत्र गोवा</u>**
4] भारत सरकारने निजामाविरुद्ध केलेली पोलीस कारवाई ---**<u>ऑपरेशन पोलो</u>**

### **<u>प्रश्न : दिलेली संकल्पनाचित्रे पूर्ण करा</u>**

1)



उत्तर :




## प्रश्न : – ब' गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (अ) | हैदराबाद संस्थानाचे विलिनीकरण | -- | स्वामी रामानंद तीर्थ |
| (ब) | काश्मीर संस्थानाचे विलिनीकरण | -- | शेख अब्दुल्ला |
| (क) | गोवा मुक्तिलढ्यातील मोलाचे योगदान | -- | मोहन रानडे |
| (ड) | पुदुच्चेरी येथील कामगार नेते | -- | व्ही.सुबय्या |

उत्तर : चुकीची जोडी : काश्मीर संस्थानचे विलिनीकरण -- शेख अब्दुल्ला
**दुरुस्त केलेली जोडी : काश्मीर संस्थानचे विलिनीकरण -- राजा हरिसिंग**

## प्रश्न - संक्षिप्त टिपा लिहा

**1) निर्वसाहतीकरण :**
उत्तर : 1. वसाहतवाद्यांचे वसाहतींवरील वर्चस्व संपुष्टात येणे आणि त्यांनी वसाहतींमधील स्थानिक लोकांच्या हाती सत्ता सुपूर्द करणे म्हणजे 'निर्वसाहतीकरण' होय.
2.वसाहतवादाला विरोध, स्वातंत्र्यलढा आणि वसाहतींना मिळालेले स्वातंत्र्य हे निर्वसाहतीकरणाचे तीन टप्पे आहेत.

**2) ऑपरेशन विजय :**
उत्तर : 1. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी लोकभावनेची दखल घेऊन गोव्यात लष्करी कारवाईचा निर्णय घेतला. 'ऑपरेशन विजय' या सांकेतिक नावाने भारतीय सैन्य गोव्यात उतरले.
2.स्थानिक जनतेनेही सैन्याला मदत केली. पोर्तुगिजांनी पेरलेल्या भू-सुरूंगांबद्दल त्यांनी सैन्याला माहिती दिली. ४८ तासांच्या आत पोर्तुगीज शरण आले.
3.१९ डिसेंबर १९६१ रोजी गोवा भारतीय संघराज्यात सामील झाले. गोव्याचे साडेचारशे वर्षांचे पारतंत्र्य संपुष्टात आले.

## प्रश्न : पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.

**1) हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले.**
**उत्तर : हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले, कारण--**
1. हैदराबाद स्टेट काँग्रेसने हैदराबाद संस्थान भारतात विलीन करावे असा ठराव केला. निजामाने स्वतःचे वर्चस्व गमावण्याच्या भीतीने ठरावास विरोध केला. त्याचा कल पाकिस्तानकडे होता.
2.प्रजा भारताच्या बाजूने तर निजाम प्रजेच्या विरोधात अशी परिस्थिती उद्भवली. प्रजेला धडा शिकवण्यासाठी निजामाचा हस्तक कासीम रझवी याने निजामाच्या पाठिंब्याने 'रझाकार' नावाची संघटना स्थापन केली.

3.कासीम रझवी व त्याची रझाकार संघटना यांनी लोकशाहीवादी चळवळीला पाठिंबा देणाऱ्या प्रजेवर अत्याचार केले. निजाम आपल्या भूमिकेवर अडून राहिला. सामोपचाराचे धोरण फेटाळून चर्चेचे दरवाजे बंद केले.
4.अखेरीस भारत सरकारने निजामाविरुद्ध पोलीस कारवाई (ऑपरेशन पोलो) सुरू केली. शेवटी १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजाम शरण आला. हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले.

**2) पुदुच्चेरी हा केंद्रशासित प्रदेश बनला.**

**उत्तर : पुदुच्चेरी हा केंद्रशासित प्रदेश बनला, कारण —**

1. भारत स्वतंत्र झाला त्यावेळी पुदुच्चेरीचा भाग फ्रेंचांच्या ताब्यात होता. पुदुच्चेरी, कारिकल, माहे आणि यानम हे एकमेकांशी निगडीत नसणारे प्रदेश आणि पश्चिम बंगालमधील चंद्रनगरचा प्रदेश फ्रेंचांच्या ताब्यात होता.
2.फ्रान्स सरकार आपल्या ताब्यातील प्रदेश सोडायला तयार नव्हते. पुदुच्चेरी येथील कामगार नेते व्ही. सुबय्या यांच्या नेतृत्वाखाली लोक संघटीत झाले. त्याची दखल घेऊन भारत सरकारने फ्रान्स सरकारकडे पुदुच्चेरी भारताला परत करण्याची आग्रही मागणी केली.
3.जून १९४८ मध्ये दोन्ही सरकारांमध्ये करार होऊन पुदुच्चेरीच्या विलिनीकरणाचा निर्णय घेण्यात आला. वाटाघाटी, आंदोलन अाणि प्रत्यक्ष कारवाई या मार्गाने पुदुच्चेरीचा प्रश्न सुटण्याची शक्यता निर्माण झाली.
4. १ नोव्हेंबर १९५४ रोजी भारताला सगळ्या फ्रेंच वसाहतींचा ताबा मिळाला. १९६२ मध्ये फ्रान्सच्या संसदेने मान्यता दिली. १९६३ मध्ये पुदुच्चेरी हा केंद्रशासित प्रदेश बनला.

**3) गोव्याचे पारतंत्र्य संपुष्टात आले.**

**उत्तर : गोव्याचे पारतंत्र्य संपुष्टात आले, कारण —**

1. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी लोकभावनेची दखल घेऊन गोव्यात लष्करी कारवाईचा निर्णय घेतला. 'ऑपरेशन विजय' या सांकेतिक नावाने भारतीय सैन्य गोव्यात उतरले.
2.स्थानिक जनतेनेही सैन्याला मदत केली. पोर्तुगिजांनी पेरलेल्या भू-सुरूंगांबद्दल त्यांनी सैन्याला माहिती दिली. ४८ तासांच्या आत पोर्तुगीज शरण आले.
3.१९ डिसेंबर १९६१ रोजी गोवा भारतीय संघराज्यात सामील झाले. गोव्याचे साडेचारशे वर्षांचे पारतंत्र्य संपुष्टात आले.

## प्रश्न : तुमचे मत नोंदवा

1) हैदराबाद संस्थानात आंध्र, कर्नाटक, महाराष्ट्र परिषदांची स्थापना झाली.

उत्तर : **माझ्या मते,**

1. हैदराबाद हे भारतातील सर्वात मोठे संस्थान होते. त्यामध्ये तेलुगु, कन्नड, मराठी भाषक प्रदेश होते.
2.तेथील सत्ताधीश निजामाने प्रजेच्या नागरी व राजकीय हक्कांचा संकोच केला.
3.आपले हक्क मिळवण्यासाठी संस्थानातील जनतेने तेलंगण भागात आंध्र परिषद, मराठवाडा भागात 'महाराष्ट्र परिषद' व कर्नाटक भागात 'कर्नाटक परिषद' या संस्था स्थापन केल्या.

........**. म्हणून हैदराबाद संस्थानात आंध्र, कर्नाटक, महाराष्ट्र परिषदांची स्थापना झाली.**

**2) इ- स- १९६१ पर्यंत गोव्यातील पोर्तुगीज राजवट अबाधित राहिली**

**उत्तर : माझ्या मते,**

1. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी लोकभावनेची दखल घेऊन गोव्यात लष्करी कारवाईचा निर्णय घेतला. 'ऑपरेशन विजय' या सांकेतिक नावाने भारतीय सैन्य गोव्यात उतरले.
2.स्थानिक जनतेनेही सैन्याला मदत केली. पोर्तुगिजांनी पेरलेल्या भू-सुरूंगांबद्दल त्यांनी सैन्याला माहिती दिली. ४८ तासांच्या आत पोर्तुगीज शरण आले.
3.१९ डिसेंबर १९६१ रोजी गोवा भारतीय संघराज्यात सामील झाले. गोव्याचे साडेचारशे वर्षांचे पारतंत्र्य संपुष्टात आले.

......**. म्हणून इ- स- १९६१ पर्यंत गोव्यातील पोर्तुगीज राजवट अबाधित राहिली.**

## **प्रश्न : दिलेल्या कारणांपैकी योग्य कारण निवडून विधान पूर्ण करा.**

1) जुनागढ चा नवाब पाकिस्तानला पळून गेला कारण ---

(अ) नवाबाला पाकिस्तानात मोठा प्रदेश मिळणार होता
(ब) संस्थानी प्रजा त्यांना तुरुंगात कैद करणार होती
(क) संस्थानातील प्रजेचा नवाबावर विश्वास नव्हता
(ड) संस्थानी प्रजेने त्याच्या निर्णयाला विरोध करून आंदोलन उभे केले होते


उत्तर : जुनागढ चा नवाब पाकिस्तानला पळून गेला कारण --- **संस्थानी प्रजेने त्याच्या निर्णयाला विरोध करून आंदोलन उभे केले होते**

2) काही संस्थांने वगळता बहुसंख्य संस्थाने स्वतंत्र भारतात विलीन झाली; कारण --

(अ) या संस्थानिकांना तनखा दिला जाणार होता
(ब) सरदार वल्लभभाई पटेल यांनी मुत्सद्दीपणाने सर्वांना मान्य होईल असा सामीलनामा तयार केला होता
(क) केंद्र सरकारने या संस्थानिकांना त्यांचे अधिकार अबाधित ठेवण्याचे आश्वासन दिले होते
(ड) सरदार वल्लभभाई पटेल यांनी संस्थानिकांना संस्थान विलीन झाल्यास मोठे बक्षीस देण्याचे आश्वासन दिले होते

उत्तर : काही संस्थांने वगळता बहुसंख्य संस्थाने स्वतंत्र भारतात विलीन झाली; कारण -- **सरदार वल्लभभाई पटेल यांनी मुत्सद्दीपणाने सर्वांना मान्य होईल असा सामीलनामा तयार केला होता**

## **प्रश्न : पुढील नकाशाचे निरीक्षण करून प्रश्नांची उत्तरे लिहा**




पाठ्यपुस्तक पान नं 56

1] भारतातील पोर्तुगिजांचे सत्ताकेंद्र कोणते ?
उत्तर : **गोवा**
2] पूर्व किनारपट्टीवरील फ्रेंचांची सत्ताकेंद्रे कोणती ?
उत्तर : **पुदुच्चेरी, कारिकल, यानम**
3] या नकाशाच्या मदतीने कोणती माहिती मिळते ?
उत्तर : **१५ ऑगस्ट १९४७ चा स्वतंत्र भारत**
4] भारताच्या दक्षिणेस कोणते राष्ट्र आहे ?
उत्तर : **श्रीलंका**

**प्रश्न :** खालील प्रश्नांची दिलेल्या मुद्द्याच्या आधारे सविस्तर उत्तरे लिहा

**(1) काश्मीर संस्थानाच्या विलीनीकरणाची माहिती लिहा**

मुद्दे : (अ) पाकिस्तानी सीमेवरील सशस्त्र टोळ्यांचे आक्रमण
(ब) सामीलनामा
(क) विलीनीकरण

उत्तर : ◈ प्रस्तावना : १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. मात्र त्यावेळी भारतामध्ये अनेक छोटी छोटी संस्थाने अस्तित्वात होती. भारतात सामील होणे किंवा न होणे हे ठरवण्याचा अधिकार या संस्थानांना देण्यात आला होता.

◈ **मुख्य उत्तर :**

☞ **(अ)** पाकिस्तानी सीमेवरील सशस्त्र टोळ्यांचे आक्रमण **:**

1. भारत स्वतंत्र झाल्यावर भारत आणि पाकिस्तान यांपैकी कोणत्याही एका देशात सामील न होण्याचा निर्णय जम्मू-काश्मीरचा राजा हरिसिंग याने घेतला होता.
2.काश्मीर पाकिस्तानात सामील करून घेण्याचा पाकिस्तानचा मानस होता. यासाठी पाकिस्तान हरिसिंगावर दडपण आणू लागले.
3.२२ ऑक्टोबर १९४७ रोजी या संस्थानावर पाकिस्तानी सीमेवरील सशस्त्र टोळ्यांनी आक्रमण केले.

☞ **(ब)** सामीलनामा **:**

1. दोन्ही देशांपासून आपले स्वतंत्र अस्तित्व राखू इच्छिणाऱ्या राजा हरिसिंगने काश्मीरच्या संरक्षणासाठी भारताकडे लष्करी सहकार्य मागितले.
2.२७ ऑक्टोबर १९४७ रोजी राजा हरिसिंगने आपले संस्थान भारतात विलीन करण्यास परवानगी दिली.
3.भारत सरकारकडे आपला सामीलनामा सुपूर्द केला.
4.अशा प्रकारे काश्मीर भारतात विलीन झाल्यानंतर भारतीय लष्कर काश्मीरच्या रक्षणासाठी गेले.

☞ **(क)** विलीनीकरण **:**

1. लष्कराने काश्मीरचा मोठा भाग घुसखोरांच्या हातून परत मिळवला. काही भाग मात्र पाकिस्तानच्या ताब्यात राहिला.
2.जानेवारी १९४८ मध्ये भारताने काश्मीरचा प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघात नेला. दोन देशांमधील काश्मीरच्या या वादास आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले.
3.काश्मीरमधून पाकिस्तानी सैन्य काढून घेणे राष्ट्रसंघाला देखील शक्य झाले नाही. परंतु प्रौढमताधिकाराच्या आधारे तत्कालीन नॅशनल कॉन्फरन्स पक्षाच्या सरकारने घटनासभेसाठी मतदान घेतले. घटनासभेने भारतात विलीन होण्यावर शिक्कामोर्तब केले.
4.जम्मू-काश्मीरची घटना अमलात आली व तेव्हापासून जम्मू-काश्मीर हा भारतीय संघराज्याचा अविभाज्य भाग आहे.
5.भारतीय राज्यघटनेच्या कलम ३७० अन्वये काश्मीरला विशेष राज्याचा दर्जा प्रदान करण्यात आला होता.

◈ उपसंहार :
अशा प्रकारे, काश्मीर संस्थान भारतात विलीन झाले

◈◆◈◆◈◆◈◆◈◆◈

संविधान तक्ता नुसार एकूण गुण : **10**

## प्रकरण ८ वे : जागतिक महायुद्धे आणि भारत

### प्रश्न : दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.

1] पहिले महायुद्ध ........................ च्या तहाने संपले.
(अ) व्हर्साय (ब) वॉर्सा (क) लंडन (ड) अंकारा
उत्तर : पहिले महायुद्ध **व्हर्साय** च्या तहाने संपले.

2] अमेरिकेने .................................... या शहरावर पहिला अणुबॉम्ब टाकला.
(अ) नागासाकी (ब) हिरोशिमा (क) पर्लहार्बर (ड) स्टॅलिनग्राड
उत्तर : अमेरिकेने **हिरोशिमा** या शहरावर पहिला अणुबॉम्ब टाकला.

3]ऑस्ट्रियाने सर्बियाविरुद्ध युद्ध पुकारले तेव्हा ................................ देश सर्बियाच्या मदतीला धावून गेला.
(अ) जर्मनी (ब) अमेरिका (क) हंगेरी (ड) रशिया
उत्तर : ऑस्ट्रियाने सर्बियाविरुद्ध युद्ध पुकारले तेव्हा **रशिया** देश सर्बियाच्या मदतीला धावून गेला.

4] दुसऱ्या महायुद्धाच्या काळात चीनच्या जखमी सैनिकांची सेवा करण्याचे काम .......................... यांनी केले.
(अ) डी.टी.कोवान (ब) व्ही.शांताराम (क) डॉ.द्वारकानाथ कोटणीस (ड) पंडित नेहरू
उत्तर : दुसऱ्या महायुद्धाच्या काळात चीनच्या जखमी सैनिकांची सेवा करण्याचे काम **डॉ.द्वारकानाथ कोटणीस** यांनी केले.

### प्रश्न : ऐतिहासिक ठिकाण, व्यक्ती, घटना यांसंबंधी नावे लिहा.

1] पहिल्या महायुद्धातील इंग्लंड, फ्रान्स, रशिया या राष्ट्रांचा गट ---- **दोस्त राष्ट्रे**
2] पहिल्या महायुद्धातील जर्मनी, ऑस्ट्रिया, तुर्कस्थान, बल्गेरिया या राष्ट्रांचा गट --- **अक्ष राष्ट्रे**
3] गुरुदितसिंग यांच्या नेतृत्वाखाली कॅनडाला गेलेले जहाज -- **कामागाटा मारू**
4] स्वतंत्र भारतातील पहिले 'फील्ड मार्शल' --- **सॅम माणकेशा**

### प्रश्न : – ब' गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (1) | अमेरिका | -- | वुड्रो विल्सन |
| (2) | इंग्लंड | -- | विन्स्टन चर्चिल |
| (3) | जर्मनी | -- | हिटलर |
| (4) | इटली | -- | लिनलिथगो |

उत्तर : चुकीची जोडी : इटली -- लिनलिथगो
**दुरुस्त केलेली जोडी : इटली -- बेनिटो मुसोलिनी**

### प्रश्न : दिलेल्या कारणांपैकी योग्य कारण निवडून विधान पूर्ण करा.

**(1) १५ ऑगस्ट १९४५ रोजी जपानने दुसऱ्या महायुद्धात शरणागती पत्करली, कारण ---**
(अ) जपानकडे लष्करी ताकद कमी होती
(ब) अमेरिकेने हिरोशिमा व नागासाकी या शहरांवर अणुबॉम्ब टाकला
(क) जर्मनीने जपानला मदत करण्याचे थांबविले
(ड) अमेरिकेने जपानच्या ताब्यातून फिलिपाईन्स परत घेतले
उत्तर : १५ ऑगस्ट १९४५ रोजी जपानने दुसऱ्या महायुद्धात शरणागती पत्करली, कारण --- **अमेरिकेने हिरोशिमा व नागासाकी या शहरांवर अणुबॉम्ब टाकला**

**(2) दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेला उतरावे लागले, कारण ---**

(अ) जर्मनीने अमेरिकेच्या वसाहती जिंकल्या होत्या

(ब) जर्मनी -इटली ने अमेरिकेचे घेतलेले कर्ज फेडले नव्हते

(क) जपानने अमेरिकेच्या पर्लहार्बर या नाविक तळावर बॉम्ब हल्ला करून तो निकामी केला होता

ड) इंग्लंड फ्रान्सने अमेरिकेला दुसऱ्या महायुद्धात उतरण्याचा आग्रह केला होता

उत्तर : **दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेला उतरावे लागले, कारण** --- **<u>जपानने अमेरिकेच्या पर्लहार्बर या नाविक तळावर बॉम्ब हल्ला करून तो निकामी केला होता</u>**

(3) **दुसऱ्या महायुद्धात जपानने शरणागती पत्करली, कारण ---**

(अ) अमेरिकेने जपानशी तहनामा केला

(ब) अमेरिकेने जपानच्या हिरोशिमा व नागासाकी या शहरांवर अणुबॉम्ब टाकला

(क) जर्मनीने जपानला मदत करण्याचे थांबविले

(ड) अमेरिकेने जपानच्या ताब्यातून फिलिपाईन्स परत घेतले

उत्तर : दुसऱ्या महायुद्धात जपानने शरणागती पत्करली, कारण --- **अमेरिकेने जपानच्या हिरोशिमा व नागासाकी या शहरांवर अणुबॉम्ब टाकला**

## प्रश्न - संक्षिप्त टिपा लिहा

**<u>(1) राष्ट्रसंघ :</u>**

उत्तर : 1. अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन हे शांतताप्रेमी आणि ध्येयवादी होते. सर्व प्रमुख राष्ट्रांची मिळून एक संघटना असावी. राष्ट्राराष्ट्रांतील कलह व वाद सामोपचाराने मिटवले जावेत, जगात शांतता प्रस्थापित व्हावी अशी त्यांची भूमिका होती. या हेतूने 'राष्ट्रसंघ' ही संस्था स्थापन करण्यात आली.

2.महायुद्धात पराभूत झालेल्या जर्मनी, ऑस्ट्रिया इत्यादी राष्ट्रांना या संघटनेत सभासद होण्यास मज्जाव करण्यात आला.

3.अमेरिकेने राष्ट्रसंघ ही संकल्पना मांडली. मात्र अमेरिकेने राष्ट्रसंघाचे सदस्यत्व घेतले नाही. राष्ट्रसंघात इंग्लंड आणि फ्रान्स या देशांचेच वर्चस्व राहिले.

**(2) <u>डॉ.कोटणीस</u> :**

उत्तर : 1. १९३७ मध्ये जपानने चीनवर आक्रमण केले तेव्हा चिनी सरकारच्या मागणीप्रमाणे पंडित जवाहरलाल नेहरू यांनी जखमी चिनी सैनिकांची सेवा करण्यासाठी पाच डॉक्टर चीनला पाठवले. त्यात डॉ.द्वारकानाथ कोटणीस मुख्य होते. त्यांनी पाच वर्षे चिनी सैनिकांची देखभाल केली.

2. डॉ.कोटणीस यांचा जन्म १० ऑक्टोबर १९१० रोजी सोलापूर येथे झाला. डॉ.कोटणीस यांचे प्लेगच्या साथीत ९ डिसेंबर १९४२ रोजी निधन झाले.

3. डॉ.कोटणीस यांचा त्याग व समर्पण वृत्तींनी भारत व चीन या देशांत मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित केले. प्रसिद्ध चित्रपटनिर्माते व्ही.शांताराम यांनी 'डॉ. कोटणीस की अमर कहानी' हा चित्रपट निर्माण करून कोटणीसांची स्मृती चिरस्थायी केली आहे.

4.डॉ.कोटणीसांचे सोलापूर येथील घर 'स्मारक' म्हणून घोषित केले आहे. तेथे डॉ.कोटणीस यांच्याशी संबंधित गोष्टींचे संग्रहालय आहे.

**<u>(3) कामा गाटा मारू घटना :</u>**

उत्तर : 1. महायुद्धाच्या काळात भारतातील कित्येक लोक देशांतर करू लागले. कॅनडा, अमेरिकेला जाऊ लागले. कॅनडाचे सरकार हे ब्रिटिश सरकारच्या हातातले बाहुले होते. त्यांनी हिंदी लोकांना थारा देण्याचे नाकारले. 2.बाबा गुरूदितसिंग यांच्या नेतृत्वाखाली गेलेल्या कामगाटा मारू जहाजाला कॅनडाने आपल्या बंदरात व्हँकुव्हर नांगर टाकू दिला नाही. हे परागंदा झालेलेहिंदी लोक परत भारतात आले.

3.'कामागाटा मारू' हे जहाज कोलकाताच्या जवळच्या 'बजबज' या बंदरात पोहचले. जहाजातील उतारूंनी ताबडतोब आपापल्या गावी जावे असे त्यांना इंग्रज अधिकाऱ्यांनी सांगितले.

4.लोकांनी तो हुकूम मोडला. इंग्रज अधिकाऱ्यांनी गोळीबार केला. त्यात ३० लोक ठार झाले. इंग्रजांच्या या निर्दयीपणामुळे देशात प्रचंड प्रक्षोभ माजला.

## प्रश्न - पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.

**(1) भारताला दोन्ही महायुद्धांमध्ये सहभागी व्हावे लागले.**
**उत्तर : भारताला दोन्ही महायुद्धांमध्ये सहभागी व्हावे लागले, कारण--**
1. पहिल्या महायुद्धात इंग्लंडने आपली वसाहत असणाऱ्या भारताला त्याची इच्छा असो वा नसो युद्धात सहभागी करून घेतले.
2. भारताने इंग्लंडला पैसे, अन्नधान्य, कापड, युद्धसामग्री तसेच मनुष्यबळ या रूपात मदत केली.
3.१९१९-२० अखेरपर्यंत हिंदुस्थानमधील ब्रिटिश सरकारने सुमारे १९ अब्ज रूपये युद्धासाठी मदत केली.
4. १९३९ ते १९४५ या कालावधीत दुसरे महायुद्ध घडून आले. युद्धकाळात भारताने उत्तर आफ्रिका, इजिप्त, इराक, इराण, ग्रीस, म्यानमार व मलाया येथील युद्धात सहभाग घेतला.

**(2) इंग्लंडने भारतातून काढता पाय घेण्याचा निर्णय घेतला.**
**उत्तर : इंग्लंडने भारतातून काढता पाय घेण्याचा निर्णय घेतला, कारण —**
1. १९४५ सालच्या ऑगस्ट महिन्यात दुसरे महायुद्ध थांबले.
2.त्यात इंग्लंडला विजय मिळाला खरा, परंतु युद्धामुळे इंग्लंडची आर्थिक हानी व मनुष्य हानी फार मोठ्या प्रमाणावर झाली.
3.त्यामुळे इंग्लंडची शक्ती कमी झाली. तशातच भारतीय जनता आणि भारतीय सैनिक यांच्यावरील ब्रिटिश सत्तेचा दरारा नाहीसा झाल्याची जाणीव ब्रिटिश राज्यकर्त्यांना झाल्यामुळे भारतातून काढता पाय घेण्याचा निर्णय इंग्लंडने घेतला.

## प्रश्न - तुमचे मत नोंदवा

**(1) व्हर्सायच्या तहात दुसऱ्या महायुद्धाची बीजे होती**
**उत्तर : माझ्या मते,**
1. व्हर्सायच्या तहात जर्मनीवर व इतर अक्ष राष्ट्रांवर अपमानकारक अटी लादण्यात आल्या.
2. व्हर्सायच्या तहात जर्मनीवर लादलेल्या अपमानकारक अटी झुगारून जर्मनीला पुन्हा सामर्थ्यशाली करण्यासाठी हिटलरने जोरदार लष्करी तयारी सुरू केली.
3.मोठ्या प्रमाणावर सैन्यबळ, आरमार आणि वायुदल वाढवण्यावर भर दिला.
........ **म्हणून व्हर्सायच्या तहात दुसऱ्या महायुद्धाची बीजे होती**

## प्रश्न - खालील प्रश्नांची दिलेल्या मुद्द्याच्या आधारे सविस्तर उत्तरे लिहा

(1) दुसऱ्या महायुद्धा विषयी सविस्तर माहिती लिहा
मुद्दे : (अ) दुसऱ्या महायुद्धाची कारणे
(ब) दुसऱ्या महायुद्धाची वाटचाल
(क) जपानचा युद्ध प्रवेश

उत्तर : ◈ प्रस्तावना : पहिल्या महायुद्धापेक्षा दुसरे महायुद्ध अधिक संहारक ठरले. पहिल्या महायुद्धाच्या तुलनेत ते अधिक व्यापक तर होतेच; परंतु या युद्धात अधिक प्रगत तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यात आला. दुसऱ्या महायुद्धा विषयी सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे --

**◈ मुख्य उत्तर :**
☞ **(अ)** दुसऱ्या महायुद्धाची कारणे **:**
1. : राष्ट्रसंघाला राष्ट्राराष्ट्रांतील कलह व वाद मिटवण्यात यश मिळाले नाही. हिटलरच्या नाझी पक्षानेजर्मनीमध्ये सत्ता हस्तगत केली.

2.व्हर्सायच्या तहात जर्मनीवर लादलेल्या अपमानकारक अटी झुगारून जर्मनीला पुन्हा सामर्थ्यशाली करण्यासाठी हिटलरने जोरदार लष्करी तयारी सुरू केली. मोठ्या प्रमाणावर सैन्यबळ, आरमार आणि वायुदल वाढवण्यावर भर दिला.
3.सोव्हिएट रशिया हे नवे साम्यवादी राष्ट्र बलिष्ठ होत होते. त्यामुळे इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स इत्यादी देश अस्वस्थ झाले होते.
4.सोव्हिएट रशिया साम्राज्यवादी जर्मनीचा मोठा शत्रू होता. सोव्हिएट रशिया बलिष्ठ होऊ नये म्हणून जर्मनीच्या आक्रमक धोरणाकडे इंग्लंड व फ्रान्स या राष्ट्रांनी दुर्लक्ष केले.
5.सन १९३८ मध्ये हिटलरने चेकोस्लाव्हाकियाकडून बहुसंख्यांक जर्मन वस्ती असलेला सुडेटन प्रांत व इतर मुलुख मिळवला.
6.हिटलरने १९३९ मध्ये पोलंडवर हल्ला केला. वास्तविक पोलंड हे सर्व राष्ट्रांनी मान्य केलेले एक तटस्थ राष्ट्रहोते. पण पोलंडचा तटस्थपणा झुगारून हिटलरने पोलंडवर आक्रमण करून ते जिंकले. त्यामुळे इंग्लंडने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले.
☞ **(ब)** दुसऱ्या महायुद्धाची वाटचाल **:**
1. जर्मनी युरोपचे लचके तोडू लागला. युद्धाच्या आरंभी जर्मनीने पोलंड जिंकले होते. डेन्मार्क जर्मनीला शरण आले.
2.नॉर्वेने जर्मनीसमोर पांढरे निशाण उभारले. अल्पावधीतच हॉलंड आणि बेल्जियम जिंकून जर्मन फौजांनी पॅरिसच्या रोखाने दौड मारली.
3.फ्रान्सची अभेद्य तटबंदी फोडून जर्मनीने पॅरिसवर हल्ला केला. जर्मनीने फ्रान्स जिंकून घेतला.
4.जर्मनीने इ.स.१९४० मध्ये इंग्लंडवर हल्ला केला व डंकर्क येथे असलेल्या ब्रिटिश फौजांवर जोरदार हल्ला चढवला.
5.इंग्लंडने मोठ्या कुशलतेने १९४० च्या मे महिन्यात डंकर्कहून आपले अडीच लाख सैनिक हलवले. जगाच्या इतिहासातील ही फार मोठी लष्करी हालचाल होती.
6. १९३९ मध्ये हिटलरने स्टॅलिनबरोबर केलेला अनाक्रमणाचा करार मोडून सोव्हिएट रशियावर हल्ला चढवला. नाझी सैन्य मुसंडी मारत स्टॅलिनग्राडच्या दिशेने आगेकूच करत होते, तर रशियन फौजा माघार घेत होत्या. पण नोव्हेंबर १९४३ मध्ये स्टॅलिनग्राड येथे तीन लक्ष जर्मन नाझी फौज सोव्हिएट रशियाच्या कोंडीत सापडली. मार्शल जॉर्जी झुकॉव्हच्या नेतृत्वाखाली सोव्हिएट रशियाने जर्मन सैनिकांना पराभूत केले.
7.मित्र राष्ट्रांनी बर्लिनचा पाडाव केला. याच सुमारास हिटलरने भूमिगत होऊन आत्महत्या केली. याअगोदर इटलीच्या मुसोलिनीचा पाडाव होऊन त्याचा अंत झाला होता.
8. उत्तर आफ्रिकेतही जर्मनीचा पराभव होऊन जर्मन सैनिक शरण आले होते.
☞ **(क)** जपानचा युद्ध प्रवेश **:**
1. जपानने जर्मनीच्या बाजूने युद्धात उडी घेतली होती.
2.१९४१ मध्ये जपानने पर्लहार्बरवर बॉम्बहल्ला केला आणि अमेरिकेचा नाविक तळ निकामी केला. यामुळे अमेरिकेने जपानविरुद्ध युद्ध पुकारले. अशा रीतीने या युद्धाला व्यापक स्वरूप आले.
3.पुढे फिलीपाईन्स, म्यानमार, मलाया, सिंगापूर हे देश जपानने जिंकले. तसेच आसाम, अ◌ाराकान, इंफाळ या भागापर्यंत जपानने धडक मारली.
◈ उपसंहार :
अशा प्रकारे] दुसऱ्या महायुद्धाविषयीची सविस्तर माहिती लिहिता येईल

## प्रश्न - खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा

(1) दुसऱ्या महायुद्धाची कारणे लिहा
**उत्तर :**
◈ प्रस्तावना : पहिल्या महायुद्धापेक्षा दुसरे महायुद्ध अधिक संहारक ठरले. पहिल्या महायुद्धाच्या तुलनेत ते अधिक व्यापक तर होतेच; परंतु या युद्धात अधिक प्रगत तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यात आला. दुसऱ्या महायुद्धा ची कारणे पुढीलप्रमाणे --
**◈ मुख्य उत्तर :**
1.राष्ट्रसंघाला राष्ट्राराष्ट्रांतील कलह व वाद मिटवण्यात यश मिळाले नाही. हिटलरच्या नाझी पक्षानेजर्मनीमध्ये सत्ता हस्तगत केली.

2.व्हर्सायच्या तहात जर्मनीवर लादलेल्या अपमानकारक अटी झुगारून जर्मनीला पुन्हा सामर्थ्यशाली करण्यासाठी हिटलरने जोरदार लष्करी तयारी सुरू केली. मोठ्या प्रमाणावर सैन्यबळ, आरमार आणि वायुदल वाढवण्यावर भर दिला.
3.सोव्हिएट रशिया हे नवे साम्यवादी राष्ट्र बलिष्ठ होत होते. त्यामुळे इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स इत्यादी देश अस्वस्थ झाले होते.
4.सोव्हिएट रशिया साम्राज्यवादी जर्मनीचा मोठा शत्रू होता. सोव्हिएट रशिया बलिष्ठ होऊ नये म्हणून जर्मनीच्या आक्रमक धोरणाकडे इंग्लंड व फ्रान्स या राष्ट्रांनी दुर्लक्ष केले.
5.सन १९३८ मध्ये हिटलरने चेकोस्लाव्हाकियाकडून बहुसंख्यांक जर्मन वस्ती असलेला सुडेटन प्रांत व इतर मुलुख मिळवला.
6. **तत्कालीन कारण :** हिटलरने १९३९ मध्ये पोलंडवर हल्ला केला. वास्तविक पोलंड हे सर्व राष्ट्रांनी मान्य केलेले एक तटस्थ राष्ट्रहोते. पण पोलंडचा तटस्थपणा झुगारून हिटलरने पोलंडवर आक्रमण करून ते जिंकले. त्यामुळे इंग्लंडने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले.
◈ उपसंहार : अशा प्रकारे, दुसऱ्या महायुद्धा ची कारणे  लिहिता येतील.


**(2) भारतीय लोक राष्ट्रीय चळवळीत मोठ्या संख्येने का सामील झाले ?**

**उत्तर :**

◈ प्रस्तावना : जर्मनीतील व इटलीतील आक्रमक हुकुमशाही विचारप्रणालींना जसा भारतीयांचा प्रखर विरोध होता तसाच तो इंग्लंडच्या साम्राज्यवादाला व वसाहतवादालाही होता.  त्यामुळेच भारतीय राष्ट्रीय चळवळीत सामील झाले. भारतीय लोक राष्ट्रीय चळवळीत मोठ्या संख्येने का सामील झाले ? या संदर्भातील कारणे पुढील प्रमाणे --

**◈ मुख्य उत्तर :**

1. युद्धकाळात इंग्लंडला मनुष्यबळाची व पैशांची गरज निर्माण झाली. त्यासाठी सरकारने भारतातही लष्कर भरती सुरू केली.
2.प्रसंगी सैन्यभरतीची सक्ती केली. पैसा उभारता यावा म्हणून भारतीय जनतेवर जादा कर लादले.
3.व्यापार व उद्योगधंद्यावरील करांत मोठ्या प्रमाणात वाढ केली.




4.युद्धकाळात जीवनावश्यक वस्तूंच्या किमती भरमसाट वाढल्या.
5.वाढलेल्या महागाईबरोबरच या काळात औद्योगिक मंदीमुळे बेकारीचे संकटही भारतीयांपुढे उभे राहिले.
6.या परिस्थितीला ब्रिटिशांची शोषक सत्ता कारणीभूत आहे याची भारतीयांना जाणीव झाली.
7.कामगार, शेतकरी व मध्यमवर्गीय हे सगळेच ब्रिटिश सत्तेच्या विरोधात राष्ट्रीय चळवळीत मोठ्या संख्येने सामील झाले.
◈ उपसंहार :
अशा प्रकारे, भारतीय लोक राष्ट्रीय चळवळीत मोठ्या संख्येने का सामील झाले याची मीमांसा करता येईल

◈◆◈◆◈◆◈◆◈◆◈

संविधान तक्ता नुसार एकूण गुण : **08**

# प्रकरण 9 वे : जग : निर्वसाहतीकरण

## प्रश्न - दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.

1] पहिल्या महायुद्धात ........................................व तुर्कस्तान या राष्ट्रांचा पराभव झाला.

(अ) अमेरिका (ब) फ्रान्स (क) इंग्लंड (ड) जर्मनी

उत्तर : पहिल्या महायुद्धात **जर्मनी** व तुर्कस्तान या राष्ट्रांचा पराभव झाला.

2] १९३५ मध्ये .........................भारतापासून वेगळा करण्यात आला.

(अ) म्यानमार (ब) श्रीलंका (क) मालदीव (ड) इराण

उत्तर : १९३५ मध्ये **म्यानमार** भारतापासून वेगळा करण्यात आला.

3]१९४७ मध्ये पहिली................................ परिषद भरवली गेली.

(अ) ऐक्य (ब) आशियाई (क) अटलांटिक (ड) मँचेस्टर

उत्तर : १९४७ मध्ये पहिली **आशियाई** परिषद भरवली गेली.

## प्रश्न - ऐतिहासिक ठिकाण, व्यक्ती, घटना यांसंबंधी नावे लिहा.

1] निर्वसाहतीकरणास चालना मिळण्यास कारणीभूत ठरलेली सनद - ---- **अटलांटिक सनद**

2] ब्रिटिशांनी नावारूपास आणलेले जागतिक बंदर --- **कोलंबो**

3] आफ्रिकी ऐक्याचा विचार प्रथम यांनी मांडला. ---- **एच.एस. विल्यम्स**

## प्रश्न : – ब' गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (1) | बांडुंग | -- | बांडुंग परिषद |
| (2) | पॅरिस | -- | १९१९ मधील पहिली अखिल आफ्रिका ऐक्य परिषद |
| (3) | लंडन | -- | १९०० मधील अखिल आफ्रिका ऐक्य परिषद |
| (4) | मँचेस्टर | -- | आशियाई ऐक्य परिषद |

उत्तर : ***चुकीची जोडी :*** मँचेस्टर -- आशियाई ऐक्य परिषद

***दुरुस्त केलेली जोडी :*** मँचेस्टर -- आफ्रिकन ऐक्य परिषद

## प्रश्न : दिलेल्या कारणांपैकी योग्य कारण निवडून विधान पूर्ण करा.

**(1)** दुसऱ्या महायुद्धकाळात आफ्रिकेतील स्वातंत्र्य चळवळ अधिक तीव्र झाली. कारण –

(अ) आफ्रिकेतील वसाहतींनी परकीयांचे वर्चस्व झुगारून टाकले.

(ब) आफ्रिकेत पाश्चात्य शिक्षणपद्धती होती.

(क) दुसऱ्या महायुद्धकाळात इंग्रज व फ्रेंचांनी वसाहतींना काही अधिकार द्यायला सुरुवात केली.

(ड) पाश्चात्य देश दुसऱ्या महायुद्धात गुंतले.

उत्तर : दुसऱ्या महायुद्धकाळात आफ्रिकेतील स्वातंत्र्य चळवळ अधिक तीव्र झाली. कारण – **दुसऱ्या महायुद्धकाळात इंग्रज व फ्रेंचांनी वसाहतींना काही अधिकार द्यायला सुरुवात केली.**

## प्रश्न - संक्षिप्त टिपा लिहा

**(1) बांडुंग परिषद :**

उत्तर : 1. आशियातील जनतेचे प्रश्न, आशियाच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक समस्यांकडे लक्ष वेधणे व परस्पर सहकार्यावर भर देण्यासंबंधी विचार-विनिमय झाला. या पार्श्वभूमीवर १९५५ मध्ये इंडोनेशियात बांडुंग येथे पहिली आशियाई व आफ्रिकन राष्ट्रांची परिषद भरली.

2.या परिषदेत आफ्रो-आशियाई जनतेच्या प्रश्नांची चर्चा, जागतिक शांततेस प्राधान्य आणि सहकार्यावर भर देण्याचे ठरले.

**(2) आफ्रिकी ऐक्य कल्पना :**

उत्तर : 1. आफ्रिकी ऐक्याचा विचार प्रथम एच.एस. विल्यम्स याने मांडला. त्याने लंडनमध्ये १९०० मध्ये पहिली अखिल आफ्रिका ऐक्य परिषद भरवली.

2.या परिषदेस हजर असणाऱ्या डब्ल्यू.इ. बी.द्यूब्वा या कृष्णवर्णीय नेत्याने या कल्पनेस पहिल्या महायुद्धानंतर चालना दिली.

3. १९१९ मध्ये पॅरिस येथे त्याने 'अखिल आफ्रिका ऐक्य परिषद' भरवली. त्याच्या पुढाकाराने पुढे आणखी काही परिषदा झाल्या.

4.यातूनच आफ्रिका खंडात आफ्रिकी ऐक्याची कल्पना लोकांच्या मनात रूजू लागली. या संदर्भात १९४५ मध्ये मँचेस्टर येथे परिषद भरली होती. या परिषदेत आफ्रिकी नेत्यांनी सक्रीय सहभाग घेतला.

## प्रश्न : पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.

**(1) ब्रिटिश आणि म्यानमार यांच्यात तीन युद्धे झाली.**

**उत्तर : ब्रिटिश आणि म्यानमार यांच्यात तीन युद्धे झाली, कारण--**

1. इ.स.१५९९ मध्ये पोर्तुगिजांनी म्यानमारच्या राजाचा पराभव केला. या पराभवामुळे पोर्तुगिजांना म्यानमारमध्ये प्रवेश करणे सोपे झाले.

2.इ.स.१६११ मध्ये म्यानमारमधील विविध राजघराण्यांनी एकत्र येऊन पोर्तुगिजांचा पराभव केला आणि देशाचे एकत्रीकरण केले.

3.पुढे त्यांनी विस्तारवादाचा आश्रय घेऊन मणिपूर आणि आसामच्या भागावर ताबा मिळवला.

4.ब्रिटिशांच्या अंमलाखालील प्रदेशास धोका उत्पन्न झाल्यामुळे ब्रिटिश आणि म्यानमार यांच्यात तीन युद्धे झाली.

**(2) दुसरे महायुद्ध संपताच निर्वसाहतीकरणास अधिकच वेग आला.**

**उत्तर : दुसरे महायुद्ध संपताच निर्वसाहतीकरणास अधिकच वेग आला, कारण —**

1. आशिया-आफ्रिका खंडात स्वातंत्र्य चळवळींचे वारे वेगाने वाहू लागले.

2.या खंडांमध्ये जागरूकता वाढली. कालौघात या दोन्ही खंडातील अनेक देश स्वतंत्र झाले.

3. या नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांना आपल्या गटात सामील करून घेण्याची स्पर्धा महासत्तांमध्ये सुरू झाली.

## प्रश्न - तुमचे मत नोंदवा

**(1) राष्ट्रसंघाने स्वीकारलेली विश्वस्त पद्धती अपयशी ठरली**

**उत्तर : माझ्या मते,**

1. पहिल्या महायुद्धात जर्मनी व तुर्कस्तान या राष्ट्रांचा पराभव झाला. या राष्ट्रांच्या वर्चस्वाखाली असणाऱ्या

वसाहतींच्या शासनव्यवस्थेसाठी राष्ट्रसंघाने विश्वस्त पद्धती आणली.
2.इंग्लंड व फ्रान्स या राष्ट्रांना विश्वस्त म्हणून कार्य करण्यास सांगितले.
3. अमेरिकेने राष्ट्रसंघ ही संकल्पना मांडली. मात्र अमेरिकेने राष्ट्रसंघाचे सदस्यत्व घेतले नाही. राष्ट्रसंघात इंग्लंड आणि फ्रान्स या देशांचेच वर्चस्व राहिले.
**......... म्हणून राष्ट्रसंघाने स्वीकारलेली विश्वस्त पद्धती अपयशी ठरली**

## प्रश्न - खालील प्रश्नांची दिलेल्या मुद्द्याच्या आधारे सविस्तर उत्तरे लिहा

(1) पुढील वसाहतींच्या स्वातंत्र्याविषयी माहिती लिहा
मुद्दे : (अ) मालदीव :
(ब) श्रीलंका :

**उत्तर :**
◈ प्रस्तावना % विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात निर्वसाहतीकरण प्रक्रियेने वेग घेतला. वसाहतवादाच्या माध्यमातून वसाहतींच्या शोषणाचे समर्थन करणे वैचारिकदृष्ट्या युरोपला शक्य नव्हते. वसाहतवाद संपुष्टात येऊन हळूहळू निर्वसाहतीकरण घडून आले. हे घडून येण्यास संयुक्त राष्ट्रेही संघटना कारणीभूत ठरली.
पुढील वसाहतींच्या स्वातंत्र्याविषयी सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे --
**◈ मुख्य उत्तर :**
☞ **(अ) मालदीव :**
1. : मालदीवमध्ये १५०७ मध्ये पोर्तुगिजांनी प्रवेश केला. तेव्हापासून मालदीव गोव्यातील पोर्तुगिजांकडे खंडणी पाठवू लागले.
2.१५७३ मध्ये पोर्तुगिजांची सत्ता मलबार येथील मुहम्मद ठाकुरूफानु अल आझम याने संपुष्टात आणली.
3.तो सुलतान झाल्यावर त्याने डचांशी करार करून या बेटांची जबाबदारी त्यांच्याकडे सोपवली.
4.तेव्हापासून मालदीवचा सुलतान डचांची सत्ता असणाऱ्या श्रीलंकेकडे (सिलोन) खंडणी पाठवूलागला.
5.त्यानंतर हा प्रदेश ब्रिटिशांनी ताब्यात घेतला. ब्रिटिशांनी येथे हवाई तळ आणि रेडिओ केंद्र उभारले.
6.ब्रिटिशांनी भातशेती करण्यासाठी भारतातील मजूर तेथे नेले होते.
7.२६ जुलै १९६५ रोजी कोलंबो येथे झालेल्या करारानुसार मालदीवला स्वातंत्र्य मिळाले.
☞ **(ब) श्रीलंका :**
1. ब्रिटिशांनी श्रीलंका (सिलोन) येथे १७९८ ते १९४८ पर्यंत राज्य केले. डच आणि पोर्तुगीज यांचा पराभव करून ब्रिटिशांनी श्रीलंका ताब्यात घेतले.
2.ब्रिटिश सत्तेविरोधात श्रीलंकेमध्ये उठाव झाले. श्रीलंकेमध्ये कॉफी लागवडीच्या क्षेत्रात काम करण्यासाठी ब्रिटिशांनी अनेक तमिळ मजूर दक्षिण भारतातून नेले.
3.कॉफी, चहा, रबर आणि नारळ यांच्या उत्पादन व विक्रीत ब्रिटिशांनी व्यापारी वर्चस्व मिळवले.
4.ब्रिटिशांनी कोलंबो हे जागतिक बंदर म्हणून नावारूपास आणले.
5.श्रीलंकेत ब्रिटिशांनी महाविद्यालये, विद्यापीठे स्थापन केली आणि बौद्ध धर्माच्या अभ्यासाला प्रोत्साहन दिले.
6.१९४८ मध्ये श्रीलंका हा देश ब्रिटिश वर्चस्वातून पूर्णपणे मुक्त झाला.
◈ उपसंहार :
अशा प्रकारे, मालदीव व श्रीलंका (सिलोन) या वसाहतींच्या स्वातंत्र्याविषयी माहिती देता येईल

◈◆◈◆◈◆◈◆◈◆◈

संविधान तक्ता नुसार एकूण गुण : **10**

# प्रकरण १० वे शीतयुद्ध

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात वॉल्टर लिपमन या वृत्तपत्रात लेखन करणाऱ्या स्तंभलेखकाने सर्वप्रथम 'कोल्डवॉर' (शीतयुद्ध) हा शब्दप्रयोग वापरला. शीतयुद्ध घडून येण्यास दुसरे महायुद्ध कारणीभूत ठरले..

## प्रश्न - दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.

1] सार्क संघटनेचे मुख्यालय........................ येथे आहे

(अ) थायलंड (ब) जकार्ता (क) काठमांडू (ड) दिल्ली

उत्तर : सार्क संघटनेचे मुख्यालय **काठमांडू** येथे आहे.

2] सिएटो संघटनेचे मुख्यालय ..................................येथे होते.

(अ) थायलंड (ब) फिलीपाईन्स (क) पाकिस्तान (ड) ग्रेट ब्रिटन

उत्तर : सिएटो संघटनेचे मुख्यालय **थायलंड** येथे होते.

3] १९८६ च्या.................. येथील परिषदेतील आफ्रिकेच्या मदतीसाठी 'आफ्रिका फंड' स्थापन करण्यात आला.

` (अ) जकार्ता (ब) हरारे (क) नामिबिया (ड) इंडोनेशिया

उत्तर : १९८६ च्या **हरारे** येथील परिषदेतील आफ्रिकेच्या मदतीसाठी 'आफ्रिका फंड' स्थापन करण्यात आला.

## प्रश्न - ऐतिहासिक ठिकाण, व्यक्ती, घटना यांसंबंधी नावे लिहा.

1] ३० जून १९७७ रोजी या संघटनेचे औपचारिकरीत्या विसर्जन झाले - ---- **सीएटो करार**

2] कॉमनवेल्थ गेम्सची संकल्पना यांनी मांडली --- **रेव्हरंड ॲस्टली कूपर**

3] दुसऱ्या महायुद्धानंतर सोव्हिएट रशिया किंवा अमेरिका यांच्या गटात सामील न होण्याचे भारताचे धोरण ---- **अलिप्ततावाद**

4] दुसऱ्या महायुद्धानंतर शीतयुद्ध (कोल्ड वॉर) हा शब्दप्रयोग सर्वप्रथम करणारा अमेरिकन राजनीतिक स्तंभलेखक --- **वॉल्टर लिपमन**

5] सेंटो कराराचे सुरुवातीचे नाव --- **बगदाद करार**

## प्रश्न : – ब' गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (1) | इजिप्त | -- | गमाल अब्दुल नासेर |
| (2) | घाना | -- | क्वामे नखुमा |
| (3) | युगोस्लाव्हिया | -- | मार्शल टिटो |
| (4) | इंडोनेशिया | -- | झिया-उर-रहमान |

उत्तर : ***चुकीची जोडी :*** इंडोनेशिया -- झिया-उर-रहमान

***दुरुस्त केलेली जोडी :*** इंडोनेशिया -- डॉ.सुकार्नो

**प्रश्न : – दिलेल्या कारणांपैकी योग्य कारण निवडून विधान पूर्ण करा.**

**(1) अॅन्झुस करारात ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड आणि युनायटेड स्टेटस् ऑफ अमेरिका वगळता कोणत्याही राष्ट्राला प्रवेश दिला नाही. कारण –**

(अ) त्यांना ग्रेट ब्रिटन व फ्रान्सचे महत्त्व वाढू द्यायचे नव्हते.

(ब) हा लष्करी करार होता.

(क) हा गुप्त करार होता.

(ड) हा फक्त मित्रदेशांतील करार होता.

उत्तर : अॅन्झुस करारात ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड आणि युनायटेड स्टेटस् ऑफ अमेरिका वगळता कोणत्याही राष्ट्राला प्रवेश दिला नाही. कारण – **त्यांना ग्रेट ब्रिटन व फ्रान्सचे महत्त्व वाढू द्यायचे नव्हते.**

## प्रश्न - संक्षिप्त टिपा लिहा

**(1) शीतयुद्ध :**

उत्तर : 1. दुसऱ्या महायुद्धानंतर एका बाजूला भांडवलशाही राष्ट्रे व दुसऱ्या बाजूला कम्युनिस्ट राष्ट्रे यांच्यात सत्ता व प्रभाव यासाठी जो संघर्ष सुरू झाला त्याला 'शीतयुद्ध' म्हणतात.

2.दुसऱ्या महायुद्धाच्या काळात वॉल्टर लिपमन या वृत्तपत्रात लेखन करणाऱ्या स्तंभलेखकाने सर्वप्रथम 'कोल्डवॉर' (शीतयुद्ध) हा शब्दप्रयोग वापरला.

3. शीतयुद्ध घडून येण्यास दुसरे महायुद्ध कारणीभूत ठरले.

**(2) अलिप्ततावाद :**


उत्तर : 1. दुसऱ्या महायुद्धानंतर सोव्हिएट रशिया किंवा अमेरिका यांच्या गटात सामील न होता स्वतःचा विकास स्वतःच करणे, स्वतःची धोरणे ठरवून शांततेचा मार्ग अवलंबणे असे धोरण भारताने स्वीकारले. हे धोरण म्हणजे 'अलिप्ततावाद' होय.

2. 'अलिप्ततावाद' ही कल्पना युद्धापेक्षा शांततेशी निगडीत आहे म्हणून ती विधायक आहे.


3. अलिप्ततावाद (नाम)च्या स्थापनेत पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ.सुकार्नो (इंडोनेशिया), क्वामे नक्रुमा (घाना), गमाल अब्दुल नासेर (इजिप्त) आणि मार्शल टिटो (युगोस्लाव्हिया) यांनी पुढाकार घेतला.

## प्रश्न - संकल्पना चित्र पूर्ण करा

**(1)**



**उत्तर :**




## प्रश्न - पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.

(1)सेंटो करार विसर्जित करण्यात आला.

**उत्तर : सेंटो करार विसर्जित करण्यात आला, कारण--**

1. सेंटो करारान्वये कोणत्याही राष्ट्राला सुरक्षा उपलब्ध करून देण्याची चारही राष्ट्रांपैकी एकाचीही कुवत नव्हती.
2.ग्रेट ब्रिटन वगळता अन्य तीन राष्ट्रांच्या आर्थिक व तांत्रिक विकासाकडे लक्ष देण्यास अमेरिकेलाही वेळ नव्हता.
3.त्यामुळे चारही राष्ट्रांमध्ये अंतर्गत असमाधान होते.
4. सेंटो करारान्वये एकमेकांचे हितसंबंध गुंतवून घेण्यापेक्षा आपले आपण स्वतंत्र धोरण राबवावे या मतावर राष्ट्रे आली. पुढे इराण आणि पाकिस्तान या करारातून बाहेर पडले आणि सेंटो करार विसर्जित करण्यात आला.

(2) **सार्क संघटनेला काही प्रमाणात यश मिळाले आहे.**

**उत्तर : सार्क संघटनेला काही प्रमाणात यश मिळाले आहे, कारण —**

1. सार्क संघटनेने आतापर्यंत काही क्षेत्रांत चांगली कामगिरी बजावली आहे. यात बांगलादेशमध्ये कृषी माहिती केंद्र सुरू करून बी-बियाणे, पशुधन आणि मत्स्योत्पादन यात संशोधन सुरू झाले.
2. ढाका येथे सार्क हवामान संशोधन केंद्र स्थापले, काठमांडूमध्ये अस्थीरोग निवारण केंद्र सुरू झाले.
3. सार्क देशांमध्ये पर्यटनास चालना देण्यात आली. दक्षिण आशियातील गरिबी कमी करण्यासाठी सार्कने 'आशिया प्रशांत क्षेत्रीय आर्थिक व सामाजिक मंडळ' यांच्या मदतीने प्रयत्न केले.
4.व्यापार वृद्धीसाठी 'उच्चस्तरीय आर्थिक सहकार्य मंडळ' स्थापण्यात आले. सार्क दस्तऐवज केंद्रांच्या माध्यमातून माहिती पुरविण्याची सोय करण्यात आली. इस्लामाबाद येथे सार्क मनुष्यबळ विकास केंद्र स्थापण्यात आले.
5.अमली पदार्थ व्यापार विरोधी करार करण्यात आले. डाकसेवा, दळणवळण अशासारख्या महत्त्वाच्या विषयांवर समित्या स्थापण्यात आल्या.

## प्रश्न - तुमचे मत नोंदवा

**(1) अमेरिका व रशिया यांच्यात शीतयुद्ध सुरू झाले.**

**उत्तर : माझ्या मते,**

1. शीतयुद्ध घडून येण्यास दुसरे महायुद्ध कारणीभूत ठरले. इंग्लंड व फ्रान्स यांचे महत्त्व कमी झाले.

2. दुस-या महायुद्धादरम्यान सोव्हिएट रशियाच्या सैन्याने पूर्व युरोप तर अमेरिका, फ्रान्स आणि इंग्लंड यांनी पश्चिम युरोपवर प्रभुत्व मिळवले. यामुळे युद्ध संपल्यावर युरोपचे पूर्व आणि पश्चिम असे विभाजन घडून आले.
3.सोव्हिएट रशियाच्या प्रभावाखाली असलेल्या पूर्व युरोपीय राष्ट्रांनी साम्यवादी विचारप्रणालीचा स्वीकार केला.
4.अमेरिकेच्या प्रभावाखाली असणाऱ्या पश्चिम युरोपीय राष्ट्रांनी भांडवलशाही व्यवस्था मान्य केली. यातून शीतयुद्ध आकाराला आले.
**......... म्हणून अमेरिका व रशिया यांच्यात शीतयुद्ध सुरू झाले.**

**(2) भारताने वसाहतवादाविरोधात नेहमीच भूमिका मांडली आहे.**
**उत्तर : माझ्या मते,**
1. जगातील एक महान लोकशाहीवादी राष्ट्र म्हणून भारताची ओळख आहे.
2. भारताला स्वातंत्र्य मिळण्याअगोदरच जागतिक राजकारणात भारताने भाग घेऊन साम्राज्यवादाविरुद्ध आवाज उठवला होता.
3. भारताला दुसऱ्या राष्ट्राच्या प्रादेशिक अखंडत्वाबद्दल, सार्वभौमत्वाबद्दल आदर राहील. कोणत्याही राष्ट्रावर भारत आक्रमण करणार नाही. सहजीवनाचे तत्त्व मान्य करून 'जगा व जगू द्या' यावर भारताचा भर आहे.
4. १९४९ मध्ये दिल्ली येथे एक परिषद भरली होती. या परिषदेत इंडोनेशियाच्या स्वातंत्र्य चळवळीला पाठिंबा देण्यात आला. या परिषदेत १९५० पूर्वी इंडोनेशियातून डचांनी माघार घ्यावी आणि त्या देशास स्वातंत्र्य द्यावे अशी मागणी करण्यात आली. भारताने आफ्रिका खंडासंदर्भात जी भूमिका घेतली ती महत्त्वाची आहे.
......... **म्हणून भारताने वसाहतवादाविरोधात नेहमीच भूमिका मांडली आहे.**

## प्रश्न - खालील प्रश्नांची दिलेल्या मुद्द्याच्या आधारे सविस्तर उत्तरे लिहा

(1) शीतयुद्धाविषयी माहिती लिहा :
मुद्दे : (अ) शीतयुद्ध व्याख्या
(ब) शीतयुद्धाची पार्श्वभूमी
(क) शीतयुद्धाची वाटचाल

**उत्तर :** ◈ प्रस्तावना : दुसरे महायुद्ध संपल्यानंतर युरोपची विभागणी राजकीय, आर्थिक, लष्करी या मुद्द्यांच्या आधारे झाली. परंतु विचारप्रणालीचा स्वीकार हा महत्त्वाचा मुद्दा शीतयुद्धामागे होता. शीतयुद्धा विषयी सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे --
**◈ मुख्य उत्तर :**
**☞ (अ) शीतयुद्ध व्याख्या :**
1.दुसऱ्या महायुद्धानंतर एका बाजूला भांडवलशाही राष्ट्रे व दुसऱ्या बाजूला कम्युनिस्ट राष्ट्रे यांच्यात सत्ता व प्रभाव यासाठी जो संघर्ष सुरू झाला त्याला 'शीतयुद्ध' म्हणतात.
2. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात वॉल्टर लिपमन या वृत्तपत्रात लेखन करणाऱ्या स्तंभलेखकाने सर्वप्रथम 'कोल्डवॉर' (शीतयुद्ध) हा शब्दप्रयोग वापरला.
**☞ (ब) शीतयुद्धाची पार्श्वभूमी :**
1. शीतयुद्ध घडून येण्यास दुसरे महायुद्ध कारणीभूत ठरले. इंग्लंड व फ्रान्स यांचे महत्त्व कमी झाले.
2. दुस-या महायुद्धादरम्यान सोव्हिएट रशियाच्या सैन्याने पूर्व युरोप तर अमेरिका, फ्रान्स आणि इंग्लंड यांनी पश्चिम युरोपवर प्रभुत्व मिळवले. यामुळे युद्ध संपल्यावर युरोपचे पूर्व आणि पश्चिम असे विभाजन घडून आले.
3.सोव्हिएट रशियाच्या प्रभावाखाली असलेल्या पूर्व युरोपीय राष्ट्रांनी साम्यवादी विचारप्रणालीचा स्वीकार केला.
4.अमेरिकेच्या प्रभावाखाली असणाऱ्या पश्चिम युरोपीय राष्ट्रांनी भांडवलशाही व्यवस्था मान्य केली. यातून शीतयुद्ध आकाराला आले.
**☞ (क) शीतयुद्धाची वाटचाल :**
1. दुसरे महायुद्ध संपल्यावर अमेरिकेने 'मार्शल प्लॅन'ची योजना आखून युरोपीय राष्ट्रांना साम्यवादापासून रोखण्यासाठी आर्थिक मदत सुरू केली. याच्या विरोधात रशियाने आशिया व आफ्रिकेतील स्वातंत्र्य चळवळींना प्रोत्साहन दिले.

2.अमेरिका आणि सोव्हिएट रशिया यांच्यात युरोपच्या पूर्व आणि पश्चिम विभागणीने तणाव निर्माण झाला. या दोन राष्ट्रांमध्ये प्रत्यक्ष समोरासमोर युद्ध झाले नाही.
3.जग तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यापर्यंत पोहचले आहे अशी परिस्थिती निर्माण झाली. परंतु, उभयपक्षी सामंजस्याचे धोरण अवलंबले गेले. दोन्ही राष्ट्रे कायम युद्धाच्या तयारीत, दोन्ही राष्ट्रांमध्ये तणाव मात्र प्रत्यक्ष युद्ध नाही या परिस्थितीला ढोबळमानाने शीतयुद्ध म्हटले जाते.
◈ उपसंहार :
अशा प्रकारे, शीतयुद्धा विषयी सविस्तर माहिती देता येईल.

(2) दक्षिण आशियाई प्रादेशिक संघटनेविषयी (SAARC) माहिती लिहा :
मुद्दे : (अ) सार्कची स्थापना
(ब) सार्कचे ध्येय
(क) सार्कचे घोषणापत्र

**उत्तर :**
◈ प्रस्तावना :
आशिया खंडात आर्थिक, सामाजिक विकासासाठी एखादी संघटना असावी असे बांगलादेशचे तत्कालीन प्रमुख झिया-उर-रहमान यांना वाटत होते. त्यांच्या कल्पनेतून दक्षिण आशियाई प्रादेशिक संघटना (SAARC) आकारास आली. सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे --
◈ **मुख्य उत्तर :**
☞ **(अ) सार्कची स्थापना:**
1. बांगलादेश, भारत, भूटान, पाकिस्तान, श्रीलंका, मालदीव, नेपाळ या देशांच्या परराष्ट्र सचिवांची १९८१ मध्ये एक बैठक झाली. ही बैठक कोलंबो येथे झाली.
2. या बैठकीत प्रादेशिक सहकार्यासाठी नियोजन, कृषी, ग्रामीण विकास, आरोग्य, लोकसंख्या आणि व्यापार या विषयांवर सहकार्य करण्याचे ठरले. १९८३ मध्ये दिल्ली येथे या देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांची बैठक झाली.
3.या बैठकीत सार्कचा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. १९८५ मध्ये ढाका येथे सार्कची स्थापना झाली.

| | |
|---|---|
| ☞ सार्कची स्थापना | ढाका |
| ☞ सार्क संघटनेचे मुख्यालय | काठमांडू |
| ☞ सार्क मनुष्यबळ विकास केंद्र | इस्लामाबाद |

☞ **(ब) सार्कचे ध्येय :** सार्कची पुढील ध्येये निश्चित करण्यात आली आहेत ----------
1. सदस्य राष्ट्रांच्या सर्वांगीण विकासासाठी सहकार्य करणे आणि विकासाचा वेग वाढविणे.
2. दहशतवाद, अंमली पदार्थांची तस्करी अशा विघातक गोष्टींना विरोध करणे.
3. परस्पर विश्वास वाढविण्यासाठी सामंजस्याचे वातावरण निर्माण करून समस्या निराकरण करणे.
4. प्रादेशिक, विभागीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर समविचारी संघटनांशी सहकार्य करणे.
5. आंतरराष्ट्रीय पातळीवर सामायिक हितासाठी प्रयत्न करणे.
☞ **(क) सार्कचे घोषणापत्र :**
1. सार्कच्या पहिल्याच अधिवेशनात सहभागी राष्ट्रांनी जे घोषणापत्र केले त्यामध्ये प्रामुख्याने पुढील बाबींचा समावेश होतो.
2.संयुक्त राष्ट्रे या संघटनेच्या सनदेनुसार आणि अलिप्ततावादाच्या सिद्धान्तानुसार विशेषतः 'राष्ट्रीय स्वातंत्र्य, भौगोलिक एकता, समानता, अंतर्गत वादात बळाचा वापर न करणे, अंतर्गत बाबींत हस्तक्षेप न करणे व परस्पर संघर्ष शांततामय मार्गाने सोडवणे' या तत्त्वांचे आचरण करण्याची हमी दिलेली आहे.
3. हे घोषणापत्र प्रत्यक्ष आणण्याचे कार्य सार्क राष्ट्रांची मंत्रिपरिषद आणि स्थायी समिती करते.
◈ उपसंहार :
अशा प्रकारे, दक्षिण आशियाई प्रादेशिक संघटनेविषयी (SAARC) माहिती देता येईल

◈◆◈◆◈◆◈◆◈◆◈

प्रकरण 11 व प्रकरण 12 एकत्रित
संविधान तक्ता नुसार एकूण गुण **: 20**

# **प्रकरण ११ वे** बदलता भारत-भाग १

१९९० पासून भारताने विविध क्षेत्रांत केलेली प्रगती ही बदलता भारताची मध्यवर्ती कल्पना आहे. देश बदलत आहे हे कसे ओळखावे तर त्याची काही सूचक चिन्हे असतात.

## प्रश्न - दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.

1] १९४७ च्या जिनिव्हा परिषदेत जो करार झाला तो .......................... करार म्हणून ओळखला जातो.
(अ) सिएटो (ब) नाटो (क) गॅट (ड) सार्क
उत्तर : १९४७ च्या जिनिव्हा परिषदेत जो करार झाला तो **गॅट** करार म्हणून ओळखला जातो.
2] २००२ मध्ये ......................... या शहरात मेट्रो सेवा सुरू झाली -
(अ) पुणे (ब) दिल्ली (क) मुंबई (ड) बंगळुरु
उत्तर : २००२ मध्ये **दिल्ली** या शहरात मेट्रो सेवा सुरू झाली -
3] स्वामी विवेकानंद यांचा जन्मदिन ................ ..... म्हणून साजरा केला जातो.
(अ) राष्ट्रीय शिक्षण दिन (ब) राष्ट्रीय युवक दिन (क) राष्ट्रीय एकात्मता दिन (ड) राष्ट्रीय विज्ञान दिन
उत्तर : स्वामी विवेकानंद यांचा जन्मदिन **राष्ट्रीय युवक दिन** म्हणून साजरा केला जातो.
4] १७७६ मध्ये जगात सर्वप्रथम ...................... या देशात माहितीचा कायदा लागू झाला.
(अ) स्वीडन (ब) फ्रान्स (क) इंग्लंड (ड) भारत
उत्तर : १७७६ मध्ये जगात सर्वप्रथम **स्वीडन** या देशात माहितीचा कायदा लागू झाला.

## प्रश्न - ऐतिहासिक ठिकाण, व्यक्ती, घटना यांसंबंधी नावे लिहा.

1] ब्रिक्स संघटनेतील देश ---- **ब्राझील, रशिया, भारत, चीन, साऊथ आफ्रिका**
2] २००४ मध्ये ही कंपनी सॉफ्टवेअर सेवा पुरवणारी आशियातील सर्वात मोठी कंपनी ठरली -
--- **टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस**
3] २००२ मध्ये या शहरात मेट्रो सेवा सुरू झाली - - ---- **दिल्ली**
4] भारताने प्रक्षेपित केलेल्या या उपग्रहाद्वारे चंद्रावर पाण्याचे पुरावे सापडले. -- **चांद्रयान-१**

## प्रश्न - दिलेल्या कारणांपैकी योग्य कारण निवडून विधान पूर्ण करा.

**(1) भारताने जागतिक व्यापार संघटनेचे सभासदत्व स्वीकारले. कारण –**
(अ) भारताला इतर देशांशी व्यापारी स्पर्धा करायची होती.
(ब) भारत जागतिक अर्थव्यवस्थेपासून लांब राहू शकत नाही.
(क) भारताला मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारायची होती.
(ड) भारताला जागतिक पातळीवर नेतृत्व करायचे होते.
उत्तर : भारताने जागतिक व्यापार संघटनेचे सभासदत्व स्वीकारले, कारण — **भारताला मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारायची होती.**

## प्रश्न : – ब' गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.

◈ 

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (1) | छत्तीसगढ | -- | १२ नोव्हेंबर २००० |
| (2) | उत्तराखंड | -- | ९ नोव्हेंबर २००० |
| (3) | झारखंड | -- | १५ नोव्हेंबर २००० |
| (4) | तेलंगण | -- | २ जून २०१४ |

उत्तर : ***चुकीची जोडी :*** छत्तीसगढ -- १२ नोव्हेंबर २०००

☛ ***दुरुस्त केलेली जोडी :*** छत्तीसगढ -- १ नोव्हेंबर २०००

◈ 

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (1) | भारतीय कृषी संशोधन परिषद | -- | कृषी विज्ञान केंद्रांना प्रोत्साहन देणे |
| (2) | फाजल अली आयोग | -- | प्रदूषण नियंत्रण आयोग |
| (3) | जागतिक व्यापारी संघटना | -- | संपूर्ण जग व्यापारासाठी खुले करणे |
| (4) | भारतीय विज्ञान काँग्रेस संस्था | -- | भारतातील वैज्ञानिक वातावरणास प्रोत्साहन देणे |

उत्तर : ***चुकीची जोडी :*** फाजल अली आयोग -- प्रदूषण नियंत्रण आयोग

☛ ***दुरुस्त केलेली जोडी :*** फाजल अली आयोग -- प्रांतरचनेच्या संदर्भात राज्य निर्मिती आयोग

## प्रश्न - संक्षिप्त टिपा लिहा

**(1) गॅट करार :**

उत्तर : 1. १९४७ च्या जिनिव्हा परिषदेत जो करार झाला तो 'गॅट' करार म्हणून ओळखला जातो.

2. गॅट करार म्हणजे जगातील पहिला बहुदेशीय व्यापारी करार होय. या करारानुसार उत्पादन आणि विनिमय या मार्गांद्वारे आर्थिक विकास करणे, परममित्र राष्ट्रोचित व्यवहार (मोस्ट फेव्हर्ड नेशन्स ट्रीटमेंट) करणे या गोष्टींना प्राधान्य देण्यात आले होते.

3. गॅट करारानुसार दरवर्षी जिनिव्हा येथे या संघटनेचे अधिवेशन भरत असे. या अधिवेशनात सभासद देशांचे प्रतिनिधी उपस्थित राहत. प्रत्येक देशाला एक मत होते.

4. आंतरराष्ट्रीय व्यापारातील अडी-अडचणींविषयी या अधिवेशनात चर्चा होऊन निर्णय घेतले जायचे. गॅटचे रूपांतर पुढे जागतिक व्यापार संघटनेत झाले.

**(2) प्रधानमंत्री ग्राम सडक योजना :**

उत्तर : 1. २००० मध्ये ग्रामीण भागाच्या विकासात पक्क्या रस्त्यांचे महत्त्व जाणून केंद्र सरकारने 'प्रधानमंत्री ग्राम सडक योजना' सुरू केली.

2.सुरुवातीला एक हजारपर्यंत लोकसंख्या असणारी गावे पक्क्या रस्त्यांनी जोडण्याचे काम सुरू झाले. २००१ मध्ये ही योजना 'प्रधानमंत्री ग्रामोदय 83 योजने'त समाविष्ट करण्यात आली.

3. २००५ पर्यंत सुमारे ७५००० कि.मी. लांबीचे रस्ते या योजनेअंतर्गत बांधण्यात आले. देशाच्या आर्थिक प्रगतीचा लाभ ग्रामीण भागातील लोकांना विशेषत्वाने होऊन त्यांचे जीवन बदलून जावे हा या योजनेचा उद्देश होता.

4.आरोग्य, शिक्षण, पिण्याचे पाणी, घरे, रस्ते आणि वीज या सुविधांचा विकास करण्यासाठी ही योजना अंमलात आणली गेली.

**(3) स्पीड पोस्ट :**

उत्तर : 1. स्पीड पोस्ट या सेवेने पोस्टाचा चेहरामोहरा बदलला आहे. १९८६ मध्ये सुरू झालेल्या या सेवेने सध्या दर महिन्याला सुमारे तीन कोटीपेक्षा अधिक पत्रे वा पार्सल पाठवली जातात.

2. स्पीड पोस्ट अंतर्गत पत्र पाठवल्यास पत्र पाठवणाऱ्या व्यक्तीच्या मोबाईलवर पत्र पोचवल्याचा एसएमएस येतो.

3.यामुळे पोस्टाची सेवा अधिक विश्वसनीय आणि गतिमान झाली आहे.

**<u>(4)</u> भारत सरकारचे युवक धोरण :**

उत्तर : 1. वय १५ ते २९ असणाऱ्यांना युवकांना शिक्षणाच्या संधी, कौशल्य उपलब्ध करून देणे म्हणजे भारत सरकारचे युवक धोरण होय.


2. भारत हा सर्वाधिक युवा लोकसंख्या असणारा देश आहे. वय १५ ते २९ असणाऱ्यांना युवक संबोधले जाते.

3. १९७२ मध्ये स्थापन झालेल्या 'नेहरू युवा केंद्र संघटन' या संस्थेच्या माध्यमातून युवकांना प्रशिक्षण देणे सुरू झाले. या केंद्राच्या अखत्यारीतून जेवढे कार्यक्रम चालू होते ते 'राष्ट्रीय युवा सशक्तीकरण कार्यक्रम' यात विलीन करण्यात आले.


4.या कार्यक्रमाच्या अंतर्गत साक्षरता, शिक्षण, आरोग्य आणि स्वच्छता, कुटुंबकल्याण, पर्यावरण संरक्षण, सामाजिक प्रश्नांसदर्भात जागृती, ग्रामीण विकास, कौशल्य विकास, स्वयंरोजगार इत्यादी विषयांवर भर देण्यात आला.

## प्रश्न - संकल्पना चित्र पूर्ण करा


**(1)**





उत्तर :



(2)




उत्तर :




## प्रश्न - पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.

**(1) भारतात माहितीचा अधिकार कायदा लागू झाला**

**उत्तर : भारतात माहितीचा अधिकार कायदा लागू झाला, कारण--**

1. संयुक्त राष्ट्रसंघाने इ.स.१९४६ मध्ये 'माहितीचा अधिकार' हा मानवाचा मूलभूत अधिकार असल्याचे सांगितले.

2.१९८२ मध्ये जयपूर शहरातील एल.के.कुलवाल यांनी या कामी पुढाकार घेतला. जयपूर शहरातील अस्वच्छतेच्या संदर्भात नगरपालिका काय कार्यवाही करते हे समजून घेण्यासाठी कुलवाल यांनी एक अर्ज केला. या संदर्भात उच्च न्यायालयातील खटल्यात न्यायाधीशांनी आपल्या निकालपत्रात 'माहितीचा अधिकार हा नागरिकांचा मूलभूत अधिकार' असल्याचे स्पष्ट केले.

3.श्रीमती अरूणा रॉय यांनी १९९० मध्ये राजस्थानमध्ये 'मजदूर किसान शक्ती संघटन' चळवळ चालवली. या चळवळीने माहिती अधिकाराची गरज व्यक्त केली.

4.बिलासपूरचे तत्कालीन विभागीय आयुक्त हर्ष मंडर यांनी सप्टेंबर १९९६ मध्ये 'अन्नधान्य वितरण व्यवस्था व रोजगार विनिमय' याबाबतची माहिती उघड करण्याचे धाडस दाखवले.
5.अण्णा हजारे यांचे महाराष्ट्रातील माहितीच्या अधिकाराबाबतचे २००१ चे आंदोलन निर्णायक ठरले.

**(2) भारत अवकाश संशोधन क्षेत्रातील अग्रणी देश आहे.**

**उत्तर : भारत अवकाश संशोधन क्षेत्रातील अग्रणी देश आहे, कारण —**

1. २००७ मध्ये भारताने अवकाश संशोधनातील एका नव्या क्षेत्रात पदार्पण केले. इटलीचा उपग्रह भारताने व्यापारी तत्त्वावर अंतराळात सोडला.
2. हे काम मिळवण्यासाठी अन्य राष्ट्रांनी चढ्या दराने किंमत आकारली होती. भारताने वाजवी किंमत आकारून हे काम केले. तरीही भारताला या व्यवहारातून नफा मिळाला.
3.व्यापारी तत्त्वावर काम करण्यापूर्वी भारताने अर्जेंटिना, बेल्जियम, दक्षिण कोरिया, इंडोनेशिया आणि जर्मनी या देशांचे उपग्रह अंतराळात सोडलेहोते.
4.२००८ मध्ये भारताने प्रक्षेपित केलेल्या 'चांद्रयान-१' या उपग्रहाद्वारे चंद्रावर पाण्याचे पुरावे सापडले. त्यानंतर 'मंगळयान' आणि 'चांद्रयान-२' हे उपग्रह सोडले.
5. नुकतेच याच वर्षी २०२३ मध्ये भारत देशाने चांद्रयान -३ ही यशस्वी मोहीम राबवली आहे

## प्रश्न - खालील प्रश्नांची दिलेल्या मुद्द्याच्या आधारे सविस्तर उत्तरे लिहा

(1) माहितीचा अधिकार अधिनियमाची माहिती लिहा.:
मुद्दे : (अ) भारतात ही चळवळ कशी सुरू झाली?
(ब) माहितीची व्याख्या
(क) माहितीचा अधिकार या अंतर्गत नागरिकांचे हक्क

**उत्तर :** ◈ प्रस्तावना : 'माहितीचा कायदा' जगात सर्वप्रथम स्वीडन या देशाने १७७६ मध्ये लागू केला. संयुक्त राष्ट्रसंघाने इ.स.१९४६ मध्ये 'माहितीचा अधिकार' हा मानवाचा मूलभूत अधिकार असल्याचे सांगितले. माहितीचा अधिकार अधिनियमाविषयी सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे --

**◈ मुख्य उत्तर :**

**☞ (अ) भारतात ही चळवळ कशी सुरू झाली ? :**

1. १९८२ मध्ये जयपूर शहरातील एल.के.कुलवाल यांनी या कामी पुढाकार घेतला. जयपूर शहरातील अस्वच्छतेच्या संदर्भात नगरपालिका काय कार्यवाही करते हे समजून घेण्यासाठी कुलवाल यांनी एक अर्ज केला.
2. या संदर्भात उच्च न्यायालयातील खटल्यात न्यायाधीशांनी आपल्या निकालपत्रात 'माहितीचा अधिकार हा नागरिकांचा मूलभूत अधिकार' असल्याचे स्पष्ट केले.
3.श्रीमती अरूणा रॉय यांनी १९९० मध्ये राजस्थानमध्ये 'मजदूर किसान शक्ती संघटन' चळवळ चालवली. या चळवळीने माहिती अधिकाराची गरज व्यक्त केली.
4. बिलासपूरचे तत्कालीन विभागीय आयुक्त हर्ष मंडर यांनी सप्टेंबर १९९६ मध्ये 'अन्नधान्य वितरण व्यवस्था व रोजगार विनिमय' याबाबतची माहिती उघड करण्याचे धाडस दाखवले.
5.अण्णा हजारे यांचे महाराष्ट्रातील माहितीच्या अधिकाराबाबतचे २००१ चे आंदोलन निर्णायक ठरले. केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार कायदा १२ ऑक्टोबर २००५ पासून महाराष्ट्रात लागू झाला.

**☞ (ब) माहितीची व्याख्या :**

1. या कायद्यानुसार माहितीचा अर्थ अभिलेख (रेकार्ड), दस्तावेज (डॉक्युमेंटस), ज्ञापने (मेमो), ई-मेल, अभिप्राय, सल्ला, प्रसिद्धीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या (लॉगबुक), निविदा (टेंडर्स), अहवाल, पत्रव्यवहार, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), इलेक्ट्रॉनिक स्वरूपात साठवलेली आधारसामग्री (डेटा), इतकेच नव्हे तर सार्वजनिक प्राधिकरणात अस्तित्वात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याखाली उपलब्ध होऊ शकणारी एखाद्या खासगी संस्थेविषयीची वा व्यक्तिविषयक माहिती या सगळ्याचा माहिती (इन्फरमेशन) या व्याख्येत समावेश होतो.

**☞(क)माहितीचा अधिकार या अंतर्गत नागरिकांचे हक्क :**

1. माहितीचा अधिकार' (राईट टू इन्फरमेशन) या शब्दात माहिती मिळवण्याचे नागरिकांचे हक्क दिलेले असून त्यामध्ये कामाची, दस्तावेजांची वा अभिलेखांची पाहणी करणे, त्यासाठी दस्तवेजांच्या किंवा अभिलेखांच्या अण्णा हजारे 88 अधिकृत प्रती मिळवणे, टिपणे काढणे, उतारेमिळवणे, प्रमाणित सामग्रीचे नमुनेमिळवणे आणि सीडी,

फ्लॉपी, टेप, व्हिडिओ कॅसेट या व अशा स्वरूपात किंवा ही माहिती जर संगणकात साठवलेली असेल तर तिच्या मुद्रित प्रती मिळवण्याचा अधिकार अधोरेखित झाला आहे.
2. नागरिक सार्वजनिक प्राधिकरणाच्या माहिती अधिकाऱ्याकडे लेखी अर्ज करून माहिती मागवू शकतात.
◈ उपसंहार :
अशा प्रकारे] माहितीचा अधिकार अधिनियमाची विषयी सविस्तर माहिती देता येईल.

(2) राज्यांची पुनर्रचना माहिती लिहा :
मुद्दे : (अ) छत्तीसगढ :
(ब) उत्तराखंड :
(क) झारखंड :
(ड) तेलंगण :

**उत्तर :**
◈ प्रस्तावना : इ.स.२००० हे वर्ष नवीन राज्यांच्या निर्मितीसाठी महत्त्वाचे ठरले. या वर्षात मोठ्या राज्यांचे (मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश आणि बिहार) विभाजन झाले आणि नवी राज्ये उदयाला आली. छत्तीसगढ (१ नोव्हेंबर २०००), उत्तराखंड (९ नोव्हेंबर २०००) आणि झारखंड (१५ नोव्हेंबर २०००) अशी तीन राज्ये उदयाला आली. भारताची भाषावार प्रांतरचना झाल्यावर प्रथमच अशा प्रकारे राज्यांची निर्मिती झाली. सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे --
**◈ मुख्य उत्तर :**
☞ **(अ) छत्तीसगढ :**
1. छत्तीसगढ राज्य निर्माण करण्यात यावे अशी मागणी स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात सर्वप्रथम करण्यात आली.
2.भारत स्वतंत्र झाल्यावर प्रांतरचनेच्या संदर्भात नेमलेल्या फाजल अली आयोगाने 'छत्तीसगढ' राज्य निर्मितीची मागणी फेटाळली.
3.१९९८ मध्ये मध्यप्रदेश विधानसभेत 'छत्तीसगढ' राज्य निर्मितीचा ठराव मान्य झाला.
4.पुढे केंद्र सरकारच्या पुढाकाराने छत्तीसगढ हे स्वतंत्र राज्य अस्तित्वात आले.
☞ **(ब) उत्तराखंड :**
1. गढवाल व कुमाऊँ भागातील जनतेने १९३० मध्येच उत्तराखंड राज्याची मागणी केली होती.
2.१९३८ च्या काँग्रेस अधिवेशनात त्याला पाठिंबा देण्यात आला. स्वातंत्र्योत्तर काळात फाजल अली आयोगाने उत्तराखंड राज्याची मागणी फेटाळली.
3.१९५७ पासून या भागातील जनतेने स्वतंत्र राज्यासाठी आंदोलन सुरू केले. १९७३ मध्ये 'उत्तराखंड पर्वतीय राज्य परिषद' स्थापन झाली. १९९४ मध्ये लोकआंदोलन तीव्र झाले. लोकांच्या भावनेची दखल घेऊन उत्तरप्रदेश राज्याच्या विधानसभेत स्वतंत्र राज्याचा ठराव संमत करण्यात आला.
4.२००० मध्ये उत्तरांचल हे स्वतंत्र राज्य अस्तित्वात आले. पुढे त्याचे उत्तराखंड असे नामांतर झाले.

| नवीन राज्य | कधी निर्माण झाले ? | कोणत्या राज्यातून निर्माण झाले ? |
|---|---|---|
| **छत्तीसगढ** | **१ नोव्हेंबर २०००** | **मध्यप्रदेश** |
| **उत्तराखंड** | **९ नोव्हेंबर २०००** | **उत्तरप्रदेश** |
| **झारखंड** | **१५ नोव्हेंबर २०००** | **बिहार** |
| **तेलंगण** | **२ जून २०१४** | **आंध्र प्रदेश** |

☞ **(क) झारखंड :**
1. १९२९ मध्ये झारखंड राज्याची मागणी पुढे आली. १९४७ मध्ये अखिल भारतीय झारखंड पार्टीची स्थापना होऊन राज्यनिर्मितीच्या मागणीला वेग देण्यात आला.
2.१९७३ मध्ये तत्कालीन राष्ट्रपती व प्रधानमंत्री यांना स्वतंत्र राज्यनिर्मितीचे निवेदन देण्यात आले.
3.१९९४ मध्ये बिहारच्या विधानसभेत झारखंड विकास स्वायत्त मंडळ स्थापनेचे विधेयक मंजूर झाले.
4.ऑगस्ट २००० मध्ये बिहारचे विभाजन करून स्वतंत्र झारखंड राज्य स्थापन करण्याची तरतूद असणारे विधेयक लोकसभेत मंजूर झाले. १५ नोव्हेंबर २००० रोजी झारखंड हे स्वतंत्र राज्य अस्तित्वात आले.

☞ **(ड) तेलंगण :**
1. हे राज्य २०१४ मध्ये अस्तित्वात आले. हे राज्य त्यापूर्वी आंध्र प्रदेश या राज्याचा भाग होते.
2.तेलंगण राष्ट्रीय समितीने तेलंगण हे वेगळे राज्य घोषित करण्यासाठी आंदोलन सुरू केले.
3.२००१ मध्ये भारत सरकारने तेलंगण हे स्वतंत्र राज्य होणार असे जाहीर केले.
4.२०१४ मध्ये संसदेने या प्रस्तावास मान्यता दिली. २ जून २०१४ रोजी तेलंगण हे स्वतंत्र राज्य अस्तित्वात आले.
◈ उपसंहार :
अशा प्रकारे, नवीन राज्यांच्या निर्मिती तसेच पुनर्रचना माहिती देता येईल

## प्रश्न - सविस्तर उत्तर लिहा

(1) **भारतात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने कोणत्या योजना राबवल्या गेल्या ?**
**उत्तर :**
◈ प्रस्तावना : वाढत्या लोकसंख्येसाठी रोजगार निर्माण करणे हे सरकारपुढचे एक मोठे आव्हान आहे. भारतात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सरकारने ज्या उपाययोजना केल्या आहेत त्यांची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे --
**◈ मुख्य उत्तर :**
☞ **(1) प्रधानमंत्री रोजगार योजना :** 1. सुशिक्षित तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने २ ऑक्टोबर १९९३ रोजी प्रधानमंत्री रोजगार योजना सुरू केली.
2.या योजनेत शहरी व ग्रामीण तरुणांना रोजगार व उद्योगाच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या. महात्मा गांधीजींच्या जन्मदिवसाचा मुहूर्त साधूनच 'प्रधानमंत्री रोजगार योजना' आणि 'रोजगार हमी योजना' सुरू झाल्या.
3.रोजगार हमी योजनेमध्ये कृषी क्षेत्रातील बेरोजगारांना रोजगाराची हमी देण्यात आली होती. शेतीचे काम नसेल त्या दिवसांमध्ये जो मागेल त्याला काम देणे हाच या योजनेचा उद्देश होता.
4. सुरुवातीला भारतातील २५७ जिल्ह्यमधां ून ही योजना सुरू झाली. दारिद्र्यरेषेखालील प्रत्येक गरजू कुटुंबातील दोन तरुणांना १०० दिवस रोजगार उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट ठरवण्यात आले. डिसेंबर २००१ मध्ये ही योजना ग्रामीण रोजगार योजनेत विलीन करण्यात आली.
5.१९९८ मध्ये शेतकऱ्यांना अडी-अडचणीच्या वेळी आधार मिळावा म्हणून 'किसान क्रेडीट कार्ड' योजना सुरू झाली. शेतकऱ्यांना शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या वस्तूविकत घेण्यासाठी निधी उपलब्ध व्हावा यासाठी ही योजना सुरू झाली. पुढे कार्डधारक शेतकऱ्यांसाठी अपघात विमा सुविधा सुरू झाली.
☞ **(2) सुवर्णजयंती ग्रामीण स्वयंरोजगार योजना:** 1. १९९९ मध्ये ही योजना सुरू करण्यात आली. एकात्मिक ग्रामीण विकास योजना, स्वयंरोजगारासाठी ग्रामीण युवकांकरता प्रशिक्षण कार्यक्रम, ग्रामीण महिला व बालविकास कार्यक्रम, ग्रामीण कारागीरांना आधुनिक अवजारांच्या वाटपाचा कार्यक्रम, गंगा कल्याण योजना, दहा लाख विहिरी खोदण्याची योजना अशा सर्व योजना एकत्र करण्यात येऊन सुवर्णजयंती ग्रामीण स्वयंरोजगार योजना सुरू करण्यात आली. २००५-०६ मध्ये या योजनेचे बारा लाख सात हजार लाभार्थी होते
☞ **(3)संपूर्णग्रामीण रोजगार योजना:**
1. 'रोजगार आश्वासन योजना' आणि 'जवाहर ग्राम-समृद्धी योजना' यांचे विलीनीकरण करून २००१ मध्ये ही योजना सुरू झाली.
2.ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी उपलब्ध करणे, कामाच्या बदल्यात धान्य देणे इत्यादी तरतुदी या योजनेत होत्या.
3.२००४ मध्ये देशातील आर्थिकदृष्ट्या सर्वाधिक मागे असणाऱ्या १५० जिल्ह्यामध्ये 'कामाच्या बदल्यात धान्य' ही योजना राबवण्यास सुरुवात झाली.
4.दुष्काळापासून संरक्षणासाठी जलसंवर्धन व शेतजमिनींचा विकास यावर भर देण्यात आला.
5. २००६ मध्ये ही योजना 'राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी' योजनेत समाविष्ट करण्यात आली.
◈ उपसंहार : अशा प्रकारे] उपाययोजनाची सविस्तर माहिती लिहिता येईल

◈◆◈◆◈◆◈◆◈◆◈

प्रकरण 11 व प्रकरण 12 एकत्रित संविधान तक्ता नुसार एकूण गुण **: 20**

## प्रकरण १२ वे बदलता भारत-भाग २

## प्रश्न - दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.

1] १९९५ मध्ये भारत सरकारचा आरोग्य विभागातर्फे ........................ लसीकरणाची मोहीम सुरू झाली.
(अ) गोवर-रुबेला (ब) पल्स पोलिओ (क) बीसीजी (ड) त्रिगुणी
उत्तर : १९९५ मध्ये भारत सरकारचा आरोग्य विभागातर्फे **पल्स पोलिओ** लसीकरणाची मोहीम सुरू झाली.
2] एर्नाकुलम हा १००% साक्षर झालेला जिल्हा ...................... राज्यात आहे.
(अ) गुजरात (ब) केरळ (क) कर्नाटक (ड) तमिळनाडू
उत्तर : एर्नाकुलम हा १००% साक्षर झालेला जिल्हा **केरळ** राज्यात आहे.
3] युनेस्कोने ...................... या शहराला जागतिक वारसा दर्जा दिला आहे.
(अ) जयपूर (ब) चेन्नई (क) सोलापूर (ड) नवी दिल्ली
उत्तर : युनेस्कोने **जयपूर** या शहराला जागतिक वारसा दर्जा दिला आहे.

## प्रश्न - ऐतिहासिक ठिकाण, व्यक्ती, घटना यांसंबंधी नावे लिहा.

1] 'मुस्लीम सत्यशोधक समाज' या संघटनेची स्थापना करणारे - - ---- **हमीद दलवाई**
2] INTACH चे मुख्यालय - - ---- **नवी दिल्ली**
3] भारतरत्न हा सर्वोच्च सन्मान मिळवणारा खेळाडू - - - ---- **सचिन तेंडुलकर**
4] मानव अधिकार संरक्षण कायद्यान्वये स्थापन झालेला आयोग ----- **राष्ट्रीय मानवाधिकार आयोग**
5] बीजमाता (सीडमदर) या टोपण नावाने सर्वत्र ओळखल्या जातात - - ---- **राहीबाई पोपेरे**

## प्रश्न : – ब' गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (1) | राष्ट्रीय मानवाधिकार | -- | मानवी हक्कांचे आयोग संरक्षण |
| (2) | सेंटर फॉर सायन्स अँड एनव्हायरनमेंट | -- | दिल्लीतील प्रदूषणाचा अभ्यास |
| (3) | सी-स्कॅप | -- | कासवांचे जतन करणारी संस्था |
| (4) | इंटॅक - | -- | वारशाविषयी जतन व जागृती करणारी संस्था |

उत्तर : ***चुकीची जोडी :*** सी-स्कॅप -- कासवांचे जतन करणारी संस्था
***दुरुस्त केलेली जोडी :*** **सी-स्कॅप – गिधाडांचे संरक्षण करणारी संस्था**

## प्रश्न - संक्षिप्त टिपा लिहा

**(1) पोलिओ निर्मूलन :**
उत्तर : 1. बदलत्या भारताचे प्रतिबिंब आरोग्याच्या क्षेत्रातही उमटले आहे. १९९५ मध्ये भारत सरकारच्या आरोग्य विभागातर्फे 'पल्स पोलिओ' लसीकरणाची मोहीम सुरू झाली. या मोहिमेस पोलिओ निर्मूलनाची मोहीम असे म्हटले जाते
2. जागतिक आरोग्य संघटना (WHO), युनिसेफ, रोटरी इंटरनॅशनल आणि भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने ही मोहीम राबवण्यात आली आहे.

3. ही मोहीम पोलिओ रोगाचे उच्चाटन करण्यासाठी होती. पाच वर्षे वयापर्यंतचे एकही बालक  लसीकरणातून वगळले जाणार नाही असा चंग बांधून ही मोहीम राबवण्यात आली आहे.
4. ही योजना यशस्वी होण्यासाठी शिबिरे, घरोघरी लसीकरण, प्रसार माध्यमातून जाहिराती यांसारख्या उपायांचा अवलंब करण्यात आला.

**(2) वायू प्रदूषण :**

उत्तर : 1. वायू प्रदूषणाचा प्रश्न भारतातील सर्वच राज्यांना कमी अधिक प्रमाणात भेडसावत आहे. वाहनांच्या माध्यमातून होणारे प्रदूषण हा मोठा चिंतेचा विषय आहे.
2. सेंटर फॉर सायन्स ॲण्ड एन्व्हायरनमेंट संस्थेने दिल्लीतील प्रदूषणाचा अभ्यास करून या प्रश्नाची तीव्रता जनतेसमोर मांडली. वायू प्रदूषणाच्या अनेक कारणांपैकी एक कारण म्हणजे वाहनांची वाढती संख्या, वाहनांच्या देखभालीकडे दुर्लक्ष अशा कारणांमुळे आणि वाहनांच्या धुरातून हवेत मिसळणारे घातक वायू आणि काजळीचे कण हे दिल्लीच्या प्रदूषणाला प्रामुख्याने कारणीभूत आहेत असे सिद्ध झाले आहे.
3. या प्रदूषणाचा परिणाम दिल्लीतील वारसा वास्तूंवरही होत आहे. या प्रश्नावर उपाय म्हणून घनीकृत नैसर्गिक वायू (सीएनजी-कॉम्प्रेस्ड नॅचरल गॅस) वापरण्याची शिफारस संस्थेने केली.

**(3) खेलो इंडिया :**

उत्तर : 1. २०१७ पासून भारत सरकारने पूर्वीच्या काही योजना आणि नवी उद्दिष्टे एकत्र करून खेलो इंडिया ही योजना सुरू केली आहे.
2. खेळांना व्यापक जनाधार देणे आणि खेळांमध्ये उत्तम दर्जा गाठणे यासाठी ही योजना सुरू झाली. या योजनेचे १२ घटक आहेत.
3. यात शालेय पातळीपासून विद्यार्थ्यांमध्ये गोडी निर्माण करणे, मुलींचा सहभाग वाढवणे इत्यादींचा समावेश आहे.

## प्रश्न - दिलेल्या कारणांपैकी योग्य कारण निवडून विधान पूर्ण करा.

**(1) दिल्लीतील सर्व सार्वजनिक वाहनांमध्ये सीएनजीचा वापर करण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला, कारण –**

(अ) सीएनजीचा वापर करणे सर्वांसाठी सुलभ होते
(ब) पेट्रोल-डिझेलपेक्षा सीएनजी स्वस्त असल्यामुळे
(क) सेंटर फॉर सायन्स ॲण्ड एन्व्हायरनमेंट संस्थेने प्रदूषणावर उपाय म्हणून ही शिफारस केली होती.
(ड) दिल्लीतील सार्वजनिक वाहनांची संख्या मोठी होती

उत्तर : **दिल्लीतील सर्व सार्वजनिक वाहनांमध्ये सीएनजीचा वापर करण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला, कारण –– <u>सेंटर फॉर सायन्स ॲण्ड एन्व्हायरनमेंट संस्थेने प्रदूषणावर उपाय म्हणून ही शिफारस केली होती</u>**.


**(2) सारे शिकू या] पुढे जाऊ या या घोषवाक्यातून खालील अभियान पुढे आले, कारण --**

(अ) स्वच्छता अभियान पूर्ण करण्यासाठी
(ब) व्यसनमुक्ती अभियान राबविण्यासाठी
(क) क्रीडा अभियान राबविण्यासाठी
(ड) प्राथमिक शिक्षणाच्या स्तरावरील विषमता दूर करून सर्व शिक्षा अभियानाचा उद्देश पूर्ण करण्यासाठी


उत्तर : सारे शिकू या] पुढे जाऊ या या घोषवाक्यातून खालील अभियान पुढे आले] कारण **<u>प्राथमिक शिक्षणाच्या स्तरावरील विषमता दूर करून सर्व शिक्षा अभियानाचा उद्देश पूर्ण करण्यासाठी</u>**

# प्रश्न - संकल्पना चित्र पूर्ण करा


**(1)**





उत्तर :




**(2)**



उत्तर :




## प्रश्न - तुमचे मत नोंदवा

**(1) पर्यटनस्थळांची काळजी सर्वांनी घ्यावी.**
**उत्तर : माझ्या मते,**
1. पर्यटन हे क्षेत्र दिवसेंदिवस अधिक प्रगत, विकसित होत जाणारे क्षेत्र आहे. या क्षेत्रातून आपल्या देशास परकीय चलन मोठ्या प्रमाणात मिळते. भारताला भेट देणाऱ्या विदेशी पर्यटकांची संख्या आणि त्यातून मिळणाऱ्या परकीय उत्पन्नात प्रतिवर्षी वाढ होत आहे.
2. पर्यटनास उभारी देण्यासाठी तसेच अधिकाधिक पर्यटक आकर्षित करण्यासाठी 'अतुल्य भारत' ही मोहीम राबवण्यात आली आहे.
3. पर्यटन स्थळे हा आपला ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा आहे, तो जपणे हे प्रत्येक भारतीय नागरिकाचे कर्तव्य आहे
........ **म्हणून पर्यटनस्थळांची काळजी सर्वांनी घ्यावी.**

**(2) रात्रशाळा आणि साखरशाळा यांची समाजाला गरज आहे**
**उत्तर : माझ्या मते,**
1. महाराष्ट्रातील रात्रशाळा, साखरशाळा या उपक्रमांची विशेष दखल घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात पहिली रात्रशाळा पुण्यात महात्मा जोतीराव फुले यांनी एकोणिसाव्या शतकात सुरू केली.
2. यातूनच प्रेरणा घेऊन अनेक रात्रशाळा राज्यात चालू आहेत. दिवसभर काम करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम उपयुक्त आहे.
3. राज्यात ऊसतोडणी हंगामाच्या कामात शेकडो कामगार विविध साखर कारखान्यांच्या ठिकाणी जातात. या कामगारांच्या मुलांसाठी शिक्षणासाठी सोय म्हणून साखर कारखान्यांच्या परिसरात 'साखरशाळा' सुरू करण्यात आल्या आहेत.
4.राज्यात साक्षरतेचे प्रमाण वाढविण्यासाठी स्वयंसेवी संस्थांची मदत घेण्यात येत आहे. यातूनच सिंधुदुर्ग व वर्धा जिल्हे पूर्ण साक्षर झाले. तसेच प्रौढशिक्षणाच्या कार्यासही गती मिळाली आहे.
........ **म्हणून रात्रशाळा आणि साखरशाळा यांची समाजाला गरज आहे**

## प्रश्न - पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.

**(1) १९९३ मध्ये मानव अधिकार संरक्षण कायदा करण्यात आला**

उत्तर: १९९३ मध्ये मानव अधिकार संरक्षण कायदा करण्यात आला , कारण--

1. बदलत्या भारताचे प्रतिबिंब सामाजिक क्षेत्रातही उमटल्याचे दिसते. विविध कायद्यांच्या आधारे सामाजिक विषमता दूर करून आर्थिक विकास समाजातील सर्व स्तरापर्यंत पोचवण्याचा सरकारचा प्रयत्न सुरू आहे.

2.या दृष्टीने १९९३ चा 'मानव अधिकार संरक्षण कायदा' महत्त्वाचा आहे. या कायद्यान्वये 'राष्ट्रीय मानवाधिकार आयोगा'ची (नॅशनल ह्यूमन राईट्स कमिशन) स्थापना करण्यात आली.

3.जगण्याचे स्वातंत्र्य, समानता इत्यादी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आणि हे हक्क नाकारले जाणार नाहीत याची दक्षता घेण्यासाठी हा आयोग स्थापन झाला.

4.या कायद्यानुसार वृत्तपत्रात किंवा प्रसिद्धी माध्यमांमध्ये अन्यायासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या बातमीची दखल आयोग घेऊ शकतो. अत्याचारग्रस्त व्यक्तीच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते किंवा सामाजिक संस्था तक्रार दाखल करू शकतात.

## प्रश्न - खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा

(1) **भारत सरकारचे क्रीडा धोरण स्पष्ट करा.**

उत्तर:


◈ प्रस्तावना : कबड्डी, हॉकी, क्रिकेट, जलतरण, बॅडमिंटन, भारोत्तोलन (वेटलिफ्टिंग), नेमबाजी, बुद्धिबळ, मोटर स्पोर्टस्, स्काय डायव्हिंग, मुष्टियुद्ध, तिरंदाजी, कुस्ती, फुटबॉल, टेनिस, टेबल-टेनिस, बिलियर्डस, मल्लखांब अशांसारखे अनेक खेळ आज खेळले जातात. रोज नवे-नवेविक्रम घडत आहेत. खेळाचे स्वरूप बदलत चालले आहे. त्या अनुषंगाने भारत सरकारच्या क्रीडा धोरणाची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे --

**◈ मुख्य उत्तर :**

1. आंतरराष्ट्रीय पातळीवर भारतीय खेळाडूंचा वाढत चाललेला सहभाग, खेळात विज्ञानाचा वाढता वापर आणि आधुनिक तंत्रज्ञान यांमुळे प्रत्येक देश आपल्या क्रीडा धोरणाबद्दल दक्ष आहे.
2. भारत सरकारने २००१ मध्ये क्रीडा धोरणाची घोषणा केली. खेळांचा विस्तार करणे, खेळाडूंना खेळांमध्ये प्रावीण्य मिळवण्यास मदत करणे, खेळांसाठी पूरक आणि मूलभूत सोयी उभारणे, राष्ट्रीय क्रीडा फेडरेशन आणि सहयोगी संस्थांना मदत करणे व खेळाडूंचा शोध घेणे, खेळांच्या प्रसारासाठी लोकसहभाग व जागृती करणे ही क्रीडा धोरणाची प्रमुख उद्दिष्टे आहेत.
3. २०११ मध्ये भारत सरकारने 'या आणि खेळा' ही योजना सुरू केली. या योजनेच्या अंतर्गत स्पोर्ट ॲथोरिटी ऑफ इंडियानेजवाहरलाल नेहरू स्टेडिअम, डॉ.करणसिंह शुटींग रेंज, डॉ.एस.पी.एम. स्विमिंग पूल संकुल, मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियम, इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियम ही दिल्लीतील पाच क्रीडा संकुले खेळाडूंसाठी उपलब्ध करून देण्यात आली.
4. याखेरीज येथे खेळायला येणाऱ्या मुलांसाठी SAI च्या तज्ज्ञ प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली शिकण्याची संधी मिळू लागली.
5. याच्याच पुढचा टप्पा म्हणजे मणिपूरमध्ये 'नॅशनल स्पोर्टस् युनिव्हर्सिटी'ची स्थापना होय. येथे खेळांचे प्रशिक्षण, खेळांचे व्यवस्थापन, क्रीडा मानसशास्त्र इत्यादी विषयांचे पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.
6. याशिवाय संशोधनालाही प्रोत्साहन दिले जाते. २०१८-१९ पासून एम.एस्सी. (खेळांचे प्रशिक्षण) व एम.ए. (खेळांचे मानसशास्त्र) यांचे अभ्यासक्रम विद्यापीठात सुरू झाले.
7. २०१७ पासून भारत सरकारने पूर्वीच्या काही योजना आणि नवी उद्दिष्टे एकत्र करून खेलो इंडिया ही योजना सुरू केली. खेळांना व्यापक जनाधार देणे आणि खेळांमध्ये उत्तम दर्जा गाठणे यासाठी ही योजना सुरू झाली. या योजनेचे १२ घटक आहेत.

8.खेळांच्या विकासासाठी राष्ट्रीय खेळ विकास कोष (National Sports Development Fund) स्थापन करण्यात आला. त्या कोषाला देणगी दिल्यास त्या रकमेवर आयकरात १००% सूट आहे.

9.ऑलिंपिक खेळात सुवर्णपदक मिळवणाऱ्या खेळाडूस भारत सरकार ७५ लाख रुपयांचे बक्षिस देते. पॅरा ऑलिंपिक, एशियाड, राष्ट्रकुल, विश्वकप, आशियाई चॅम्पियनशिप, आंतरराष्ट्रीय विद्यापीठ स्पर्धा, दिव्यांगांच्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील विविध स्पर्धा, दृष्टीहीन खेळाडूंची क्रिकेट स्पर्धा अशा विविध स्पर्धांमध्ये सुवर्ण, रौप्य आणि कांस्यपदक अथवा विजेतेपद मिळवणाऱ्या संघास रोख बक्षिसे, खेळाडूंना नोकऱ्या दिल्या जातात
10.खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार अर्जुन पुरस्कार, ध्यानचंद लाईफटाईम अचिव्हमेंट पुरस्कार, द्रोणाचार्य पुरस्कार, मौलाना अबुल कलाम आझाद ट्रॉफी, राष्ट्रीय खेल प्रोत्साहन इत्यादी पुरस्कार दिले जातात.




11. एप्रिल २०१८ पासून ऑलिंपिक खेळातील विजेत्यास दर महिना २० हजार रूपये तर आशियाई खेळातील विजेत्यास बारा हजार रुपये दरमहा देण्यात येतात. याशिवाय विजेत्या खेळाडूंना निवृत्त झाल्यावर पेन्शन दिली जाते.
◈ उपसंहार :
अशा प्रकारे, भारत सरकारच्या क्रीडा धोरणाची सविस्तर माहिती देता येईल.

**(2) पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी पर्यटन विभागाकडून कोणत्या सुविधा सुरू केल्या आहेत ?**
उत्तर:
◈ प्रस्तावना : पर्यटन हे क्षेत्र दिवसेंदिवस अधिक प्रगत, विकसित होत जाणारे क्षेत्र आहे. या क्षेत्रातून आपल्या देशास परकीय चलन मोठ्या प्रमाणात मिळते. त्यामुळेच पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी पर्यटन विभागाकडून सुविधा सुरू केल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे --
**◈ मुख्य उत्तर :**
1. विदेशी पर्यटकांना कोणत्याही प्रकारची अडचण येऊ नये म्हणून गृह, पर्यटन आणि विदेश मंत्रालय यांनी एकत्र येऊन ई-व्हिसा सुविधा सुरू केली. यात ई-व्यावसायिक व्हिसा, ई-मेडिकल व्हिसा, ई-व्हिसा सुविधा देण्यात आल्या आहेत .
2. २०१६ पासून या पर्यटकांना हिंदी, इंग्रजीशिवाय १० परकीय भाषांमध्ये आठवड्याचे सर्व दिवस आणि २४ तास माहिती देण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. अरबी, फ्रेंच, जर्मन, इटालियन, जपानी, कोरियन, चिनी, पोर्तुगीज, रशियन आणि स्पॅनिश भाषेत पर्यटकांना त्यांच्या मोबाईलवर माहिती दिली जाते.
3. १३६३ या क्रमांकावर दूरध्वनी केल्यास पर्यटकांना पर्यटन मंत्रालयाच्या वतीने माहिती उपलब्ध करून दिली जाते. या योजनेअंतर्गत क्रुझवरील पर्यटन, साहसी क्रीडा पर्यटन, आरोग्य योजनांशी संबंधित पर्यटन, गोल्फ, पोलो, पर्यावरणपूरक पर्यटन, चित्रपटविषयक महोत्सव इत्यादी विषयांचा समावेश आहे.
4. पर्यटकांशी कसे वागावे, त्यांना कोणत्या प्रकारची मदत करावी, या संदर्भातील वागण्या-बोलण्याचे शिष्टाचार यांचे पद्धतशीर शिक्षण देणाऱ्या संस्था सुरू करण्यात आल्या आहेत.
5.पर्यटकांना राहण्याची उत्कृष्ट सोय करण्यासाठी हॉटेल्स निर्माण करण्यात आली आहेत. आतिथ्य आणि हॉटेल व्यवस्थापनाचे शिक्षण देणाऱ्या उत्तम संस्था अनेक शहरात आहेत.
6. पर्यटनास उभारी देण्यासाठी तसेच अधिकाधिक पर्यटक आकर्षित करण्यासाठी 'अतुल्य भारत' ही मोहीम राबवण्यात आली आहे.
7. स्वदेश दर्शन यात्रेअंतर्गत भारतात १३ प्रकारच्या यात्रा आयोजित करण्यात आल्या आहेत. यात प्रामुख्याने हिमालय परिक्षेत्र, समुद्री तटवर्ती प्रदेश, बौद्ध तत्त्वज्ञानाशी संबंधित क्षेत्रे इत्यादी ठिकाणांचा समावेश आहे.

8. केंद्र सरकारचे पर्यटन मंत्रालय आणि फेडरेशन ऑफ असोसिएशन्स इन इंडियन टूरिझम ॲण्ड हॉस्पिटॅलिटी (FAITH) यांनी इंडियन टूरिझम मार्ट २०१८ चे आयोजन केलेहोते. आंतरराष्ट्रीय धर्तीवर आयोजित केलेलेहे पहिलेच टूरिझम मार्ट होय.

**◈ उपसंहार :**

अशा प्रकारे, पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी पर्यटन विभागाकडून ज्या सुविधा सुरू केल्या आहेत त्याची माहिती देता येईल.

## प्रश्न - खालील प्रश्नांची दिलेल्या मुद्द्याच्या आधारे सविस्तर उत्तरे लिहा

(1) **प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी राबवल्या जाणाऱ्या उपक्रमांविषयी माहिती लिहा**

मुद्दे : (अ) जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रम
(ब) शालेय पोषण आहार :
(क) सर्व शिक्षा अभियान :

उत्तर:

◈ प्रस्तावना : प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी राबवल्या जाणाऱ्या उपक्रमांविषयी सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे --

**◈ मुख्य उत्तर :**

**☞ (अ) जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रम :**

1. प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी १९९४ मध्ये डिस्ट्रीक्ट प्रायमरी एज्युकेशन प्रोग्राम (DPEP) हा कार्यक्रम हाती घेण्यात आला.
2. महाराष्ट्र, मध्यप्रदेश, कर्नाटक, तमिळनाडू, केरळ, हरयाणा व आसाम या सात राज्यांत हा कार्यक्रम राबविण्यात आला. प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांची शंभर टक्के पटनोंदणी, उपस्थिती, विद्यार्थी गळती रोखणे, इत्यादी उद्‌दिष्टांचा यात समावेश होता.
3. या उपक्रमासाठी जागतिक बँकेने आर्थिक मदत दिली होती.

**☞ (ब) शालेय पोषण आहार :**

1. शालेय पोषण आहार : या उपक्रमाद्वारेप्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांचे योग्य पोषण व्हावे म्हणून 'माध्यान्ह भोजन योजना' १५ ऑगस्ट १९९५ पासून सुरू झाली.
2. पोषक घटकांनी युक्त असा शिजवलेला आहार देण्यास सुरुवात झाली. जेथे हे शक्य नव्हते तेथे प्रतिविद्यार्थी धान्य पुरवण्याची सोय करण्यात आली.

**☞(क) सर्व शिक्षा अभियान :**

1. 'सारेशिकू या, पुढेजाऊ या' असे ध्येयवाक्य बाळगून सर्व शिक्षा अभियान २००१ मध्ये सुरू झाले.
2. त्या अगोदर ८६ व्या घटना दुरूस्तीद्वारे ६ ते १४ वयोगटातील मुलांना 'मोफत शिक्षणाचा मूलभूत अधिकार' देण्यात आला.
3.प्राथमिक शिक्षणाच्या स्तरावरील विषमता दूर करणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश होता. ही योजना यशस्वी होण्यासाठी यापूर्वीच्या खडू-फळा योजना, पोषक आहार योजना अशा सर्व योजनांचे एकत्रीकरण करण्यात आले.
4.मुलींचे शिक्षण, दिव्यांगांचे शिक्षण याकडे सर्व शिक्षा अभियान योजनेत विशेष लक्ष देण्यात आले.

◈ उपसंहार :

अशा प्रकारे, प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी राबवल्या जाणाऱ्या उपक्रमांविषयी सविस्तर माहिती देता येईल.

**(2)देशी बियाणे संवर्धन कार्यात योगदान देणाऱ्या राहीबाई पोपेरे यांच्या कार्याची माहिती लिहा**

मुद्दे : (अ) कार्याची सुरुवात :
(ब) कार्य :
(क) पुरस्कार :

उत्तर:

◈ प्रस्तावना : देशी बियाणे संवर्धन कार्यात योगदान देणाऱ्या राहीबाई पोपेरे यांच्या कार्याची

सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे –

◈ **मुख्य उत्तर :**

☞ **(अ) कार्याची सुरुवात :**

1. संकरीत धान्य आणि भाजीपाला खाऊन राहीबाई पोपेरे यांचा नातू आजारी पडला. त्यावर उपाय शोधण्याच्या प्रयत्नातून राहीबाईंना देशी वाण वापरणे हा उपाय सुचला.

2. राहीबाई पोपेरे यांनी कुटुंबासाठी लागणारे धान्य आणि भाजीपाला देशी वाणातून निर्माण करण्याचे ठरवले. घरात खाण्यासाठी देशी वाण पिकवायचे आणि पीक आल्यावर त्यातून निवडक बिया साठवून ठेवायच्या असे काम त्यांनी सुरू केले.

☞ **(ब) कार्य :**

1. राहीबाई पोपेरे ह्या मातीच्या मडक्यात देशी वाणाचे बियाणे जतन करतात. मातीच्या मडक्याला शेणामातीने लिंपतात. त्यामुळे बियाणांना भुंगे किंवा मुंग्या लागत नाहीत. मडक्यात राखेचा व कडुनिंबाचा वापर करतात.

2. आता या बियाणे बँकेत ५० हून अधिक पिकांचे, ३० हून अधिक भाजीपाल्याचे वाण जमा झाले आहेत.

3. . कारले, पालक, तांदुळजा, गोड वाल, कडू वाल, घेवडा, भुईमूग, वरई, ढवूळ भात, काळभात, आंबेमोहोर, उडीद अशा विविध प्रकारच्या भाज्या, रानभाज्या आणि कडधान्यांचे वाण त्यांनी जपले आहे.

4.स्वतःच्या घरापासून सुरू झालेला उपक्रम त्यांनी बचतगटाच्या माध्यमातून सर्वत्र पोहचवायला सुरुवात केली. भारतीय ॲग्रो इंडस्ट्रीज फाऊंडेशनच्या (बाएफ) सहकार्यानेहा उपक्रम फोफावला आहे.

☞ **(क) पुरस्कार :**

1. बीबीसीने २०१८ मध्ये विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या जगभरातील १०० महिलांची निवड केली. त्यात राहीबाई पोपेरेचा समावेश आहे.

2. ८ मार्च २०१८ रोजी भारताच्या राष्ट्रपतींनी महाराष्ट्रातील राहीबाई पोपेरे यांना नारी शक्ती पुरस्कार दिला. 'कळसुबाई परिसर बियाणे संवर्धन समिती'च्या माध्यमातून केलेल्या कामाबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात आला त्या बीजमाता (सीडमदर) या टोपण नावाने सर्वत्र ओळखल्या जातात.

3. सन २०२० मध्ये भारत सरकारने त्यांना पद्मश्री पुरस्कार देऊन गौरवले आहे.

◈ उपसंहार :

अशा प्रकारे, देशी बियाणे संवर्धन कार्यात योगदान देणाऱ्या राहीबाई पोपेरे यांच्या कार्याची माहिती देता येईल

◈◆◈◆◈◆◈◆◈◆◈

# श्रेयनामावली

| अ. क्र. | समन्वयक / सुलभक नांव | पद | अध्यापन करीत असलेल्या कनिष्ठ महाविद्यालयाचे नांव |
|---|---|---|---|
| 1. | प्रा.मनोजकुमार दगडू जाधव | कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक | राहुरी एज्युकेशन सोसायटीचे कनिष्ठ महाविद्यालय राहुरी जि. अहमदनगर |
| 2. | प्रा.विजयकुमार विनायक भवारी | कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक | एस.एन.डी.टी. कनिष्ठ महिला महाविद्यालय, कर्वे रोड, पुणे 411038 |
| 3. | प्रा. स्मिता दिलीपकुमार जयकर | कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक | श्रीमती प. क. कोटेचा महिला महाविद्यालय भुसावळ, जि. जळगाव |
| 4. | प्रा.उमेश अशोक शिंदे | कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक | श्रीमती दुर्गाबाई रघुवंशी हायस्कुल कनिष्ठ महाविद्यालय नंदुरबार जि. नंदुरबार |